# काव्यदोहन.

हें पुस्तक

कृष्णाजी पांडुरंग लिमये

व

कृष्णाजी गोविंद किनरे

यांनीं तयार केलें.

---

पुणें येथें 'चित्रशाळा' छा. छा.

---

किंमत सवा रुपया.

# काव्यदोहन.

हें पुस्तक

**कृष्णाजी पांडुरंग लिमये**
व
**कृष्णाजी गोविंद किनरे**
शिक्षक—न्यु इंग्लिश स्कूल पुणें

यांनीं तयार केलें.

तें

**रा. रा. शंकर नरहर जोशी**

यांनीं पुणें येथें ‘ चित्रशाळा ’ छापखान्यांत छापून

प्रसिद्ध केलें.

---

( सर्व हक्क कर्त्यांनीं आपल्या स्वाधीन ठेविले आहेत. )

सन १९०७.

---

**किंमत सवा रुपया.**

VERIFIED

# प्रस्तावना.

—:०*०:—

१. काव्याचें स्वरूप व व्याप यांचा खोल विचार केला, तर असें दिसून येतें कीं, काव्यकलेचा अंतर्भाव अनुकरणात्मक कलांच्या वर्गांत करावा लागतो; परंतु या वर्गांतील इतर सर्व कलांपेक्षां काव्यकलेचें स्वरूप विशेषतः अमूर्त असून मनुष्याच्या अंतर्वृत्तींशीं संलग्न असल्यामुळें, तिची शक्ति सूक्ष्म व भेदक असल्यामुळें आणि तिचा व्याप अमर्याद असल्यामुळें, या कलेकडे या वर्गाचें अधिपतित्व आलेलें आहे. या वर्गांत मोडणाऱ्या शिल्प, चित्र व नाट्य या तीन कलांच्या अनुकरणाचें—प्रतिमा वठविण्याचें—जें सामर्थ्य आहे, तें प्रायः दृश्य व जड वस्तूंनीं मर्यादित आहे; परंतु ही मर्यादा ओलांडून बाह्य दृष्टीला अगोचर असणाऱ्या प्रदेशांत त्या सामर्थ्याचा संचार होऊं शकत नाहीं. या तीन कलांपैकीं प्रत्येकींत मागील कलेपेक्षां एकेक तत्व जास्ती येऊन प्रतिबिंब मूलबिंबाप्रमाणेंच हुबेहूब वठविण्याचें सामर्थ्य वाढत गेलेलें आहे. शिल्पकलेचा सर्व भार रूपावर—आकारावर आहे; चित्रकलेनें रूपाला रंगाची जोड दिली, नाट्यकलेनें रूपरंगाची हावभावाशीं—चलनवलनाशीं—सांगड घातली. परंतु या ठिकाणीं या कलांची परमावधि झाली. येथें बाह्य व्यवहार खुंटला, व यापलीकडे अंतःसृष्टीच्या क्षेत्रांत त्यांना पाय घालतां येत नाहीं. रूप, रंग व अभिनय यांच्या द्वारें अंतरंगाविषयीं कांहीं अटकळ बांधतां येईल व येतेही, हें कबूल आहे. परंतु एकंदरींत हीं साधनें संकुचित व तुटपुंजी असल्यामुळें, त्यांच्या द्वारानें होणारा व्यवहारही वस्तुस्थित्याच चांचपडता व अपुरा होतो. शिवाय बहिरंग अनेक वेळां बेभरंवशीक असून, त्यावरून बांधलेलीं अंतरंगविषयक अनुमानें सपशेल खोटीं ठरतात, असा अनुभव येतो.

परंतु काव्यकलेकडे पाहिलें तर कांहीं निराळाच प्रकार दृष्टीस येतो. तिचें सर्व सामर्थ्य शब्दशक्तीवर आहे, आणि ही शब्दशक्ति दृश्य व जड वस्तूंनीं

सर्वथैव मर्यादित नाहीं. ही कला आपल्या परिष्कारांत दृश्य व जड सृष्टीचें आकलन करून, शिवाय त्यापलीकडील बहिरिंद्रियांना अगोचर व मानसैकगम्य अशा सूक्ष्म व स्वसंवेद्य प्रदेशांत ती आपला साम्राज्याधिकार अनिर्बंध चालविते. त्या ठिकाणीं तिच्याशीं स्पर्धा करणारी कोणतीही कला नाहीं. परंतु दृश्य व जड मर्यादेच्या आंतील कामगिरीचाच तेवढा विचार केला तर शिल्प, चित्र व नाट्य यांनीं उमटविलेला ठसा काव्यापेक्षां जास्त ठळक, सुबोध व मूळाबरहुकूम वठलेला आढळतो, यांत संदेह नाहीं. कवि कितीही कुशल असला,—व्यास–वाल्मीकि, कालि–दास-भवभूति, ज्ञानदेव–एकनाथ किंवा मुक्तेश्वर–मोरोपंत यांसारखे सरस्वती–देवीचे जरी प्रत्यक्ष कंठमणि असले,—तरी त्यांचें सामर्थ्य बाह्य सृष्टीचें —केवळ बहिरंगाचें—प्रतिबिंब उभें करण्याच्या कामीं मूर्तिकार, चितारी व नट यांच्या कुशलतेपुढें फिकें पडेल, हें निःसंशय आहे. कवीच्या शब्दशक्तीपेक्षां शिल्पकाराच्या टांकीच्या आघातानें, चिताऱ्याच्या कुंचल्याच्या झटक्यानें किंवा नटाच्या हावभावानें जी प्रतिमा तयार केली जाईल, ती चट्‌कन नजरेंत भरेल व मनाला पटेल. शब्दशक्तीनें बाह्य सृष्टीची जी नक्कल छापून निघते, ती मनांत उतरण्याला प्रथम वाक्यार्थज्ञान घडून, त्याला कल्पनेचें योग्य साहाय्य मिळालें पाहिजे. वाक्यार्थज्ञानाशीं कल्पनेचें रसायन मिळून गेलें म्हणजे मनोमय मूस ओतली जाते. अर्थज्ञानाला कल्पनेची पुष्टि देऊन, शब्दमयप्रतिमेचें मर्म आकलन करण्याची जी मनुष्याच्या मनाची शक्ति, तिलाच ' सहृदयता ' किंवा ' रसिकता ' हें नांव आहे. ही बीजरूपानें सर्व मानवी व्यक्तींत वसत असते. पण हिचें रक्षण–पोषण बौद्धिक संस्कारावर व परिस्थितीवर अवलंबून राहतें. ह्मणून सर्व मनुष्यांच्या ठिकाणीं रसिकतेच्या प्रौढीचें प्रमाण अगदीं एकसारखेंच असूं शकत नाहीं. ज्यांच्या अंगीं ही रसिकता प्रगल्भतेला आलेली नाहीं; त्यांना काव्यानें निर्माण केलेल्या केवळ बहिरंगसृष्टीचीही ताबडतोब ओळख पटणार नाहीं, मग स्थूल मर्यादा उल्लंघून सूक्ष्म अंतरंगांतील काव्याच्या विहाराची खरी बहार त्यांना फारशी प्रतीत होणार नाहीं, हें वेगळें सांगावयास नको.

शिल्प, चित्र व नाट्य यांच्या सृष्टींत रंगून जाण्याला वरील रसिकतेची

काव्यसृष्टीच्या मानानें फारच थोडी अवश्यकता भासते; व ती जितकी जितकी कमी भासेल, तितकें तितकें त्या कलेच्या कृतींतील गूढ व मिश्र मनोवृत्तींच्या खेळाचें प्रमाण कमी होतें आणि ती कृति बालांस व प्रौढांस, अज्ञांस व सुज्ञांस, रसिकांस व अरसिकांस, सुसंस्कृतांस व संस्कारहीनांस बहुतेक सारखीच सुगम होते,—परंतु सर्वांस सारखीच सुरस किंवा मनोहर होते असें मात्र नाहीं. याचीं अनेक उदाहरणें देतां येण्यासारखीं आहेत. समजूं लागलेल्या लहान मुलांना ताजमहालाच्या सुंदर संगमरवरी प्रतिमेपेक्षां बाहुलाबाहुलीच अधिक सुंदर वाटतात. दरींखोरीं, दर्याडोंगर, नदी, सरोवर, कुरणें, अरण्यें, धबधबे, भोंवरे, यांच्या देखाव्यांपेक्षां कुत्रा, मांजर, बैल, यांच्या ओबडधोबड रेखाटलेल्या आकृतीही विद्यादेवीच्या उंबरठ्यावर पाऊल ठेवणाऱ्या बालवयी विद्यार्थ्यांस अधिक मोहक वाटत असतात. नाटकगृहांत चारुदत्ताच्या दारिद्र्यावरील अत्यंत मार्मिक विचारांपेक्षां विदूषकाच्या पाचकळ हावभावांनीं अप्रौढ प्रेक्षकांच्या मनांत हर्षाच्या उकळया जास्ती फुटतात, हें कोणी पाहिलें नाहीं ? शापसंभ्रमापेक्षां शारदा, व सौभद्रापेक्षां शशिकला, सामान्यतः असंस्कृत प्रेक्षकांवर जास्त अनुकूल संस्कार कां उठवितात, याचें बीजही वरील विवेचनांतच आढळणार आहे. ईश्वराच्या निर्गुणोपासनेहून सगुणोपासनेंत गुंतणाऱ्या लोकांची संख्या नेहमीं ज्यास्त प्रमाणांत कां आढळते, याचाही उलगडा वरील उपपत्तीनेंच करितां येण्यासारखा आहे.

असो, एकंदरींत प्रतिपादन करावयाची गोष्ट एवढीच कीं, शब्दशक्तीचा प्रभाव बाह्य किंवा स्थूल मर्यादेंत शिल्प, चित्र व नाट्य या कलांच्या प्रभावापेक्षां कमी दर्जाचा आहे. परंतु स्थूलातीत जी सूक्ष्म मानसिक सृष्टि, तींत काव्यशक्तीचा संचार बहुतेक निःसपत्नत्वानेंच होतो, व त्यांतील गूढ मर्म सहृदयतेशिवाय श्रोत्यांच्या किंवा वाचकांच्या मनावर बिंबू शकणार नाहीं. ज्याप्रमाणें अत्यंत सूक्ष्म प्राणी व वनस्पति यांच्या रचनेचें सौंदर्य दृष्टोत्पत्तीस येण्याला सूक्ष्मदर्शकाची मदत लागते, किंवा ज्याप्रमाणें अस्पष्ट असणारा दूरचा देखावा किंवा आकाशस्थ ग्रह, उपग्रह, तारे, तेजोमेघ, वगैरेंचें अगाध दिव्य स्वरूप प्रतीत होण्याला दुर्बिणीची जरूरी

असते; त्याप्रमाणेंच काव्याच्या शब्दशक्तीची लीला ओळखून मन तन्मय होऊन जाण्याला सहृदयता असलीच पाहिजे. ती सहृदयता असली म्हणजे ज्या मनोवृत्तीच्या उद्रेकानें काव्य निर्माण झालें असतें, मनाच्या ज्या तळमळीनें, उल्हासानें, तिडकीनें किंवा आवेशानें काव्यस्वरूप धारण केलेलें असेल, तीच वृत्ति, तीच तळमळ, उल्हास, तिडीक किंवा आवेश, हीं वाचकांच्या किंवा श्रोत्यांच्या मनांत बिंबून, काव्यजनकाचें व वाचक-श्रोतृवृंदाचें मन–अंतरंग-कांहीं वेळपर्यंत एकरूप होऊन जातें. अशा प्रकारें वाचकश्रोतृवृंदाला काव्याच्या प्रभावानें–अल्पावकाशच कां होईना; पण–जो स्वस्थितीचा व परिस्थितीचा विसर पडतो, त्या विसरांतच अपरंपार आनंद भरलेला आहे. विजेच्या पेटीच्या तारा हातांत धरल्याबरोबर आपल्या शरीरांतील प्रत्येक भागांत––प्रत्येक स्नायूंत, प्रत्येक तंतूंत––जसा विद्युत्प्रवाह सुरू होऊन विलक्षण स्फुरण उत्पन्न होतें, तसाच काव्याच्या शब्द-शक्तीचा स्पर्श झाल्याबरोबर सहृदय मनुष्याच्या मनाला अद्भुत चेतना प्राप्त होते. काव्याची शब्दशक्ति ही एक संजीविनी विद्याच आहे. ही कानांत प्रवेशल्याबरोबर शुक्राचार्यांच्या संजीविनीप्रमाणेंच सहृदयांच्या सुप्त किंवा लुप्तचैतन्य मनाला एकदम जागृति आणून, हर्षशोकादि नाना प्रकारच्या वृत्ति चाळवून, शेवटीं सुखसंवेदना उत्पन्न करिते. हिच्याच योगानें रविवर्म्यांनीं चितरलेले शिवाजीमहाराज धर्मनिष्ठेनें व देशभक्तीनें प्रेरित होऊन आपल्या एकनिष्ठ अनुचरांसह तसबिरीची चौकट सोडून धीरगंभीर थाटानें दणदणत जातांना मनोदृष्टीला गोचर होतात. काव्यशक्तीनेंच नटाचें मुकें रूप, रंग व अभिनय, हीं बोलकीं होतात व त्याच्या अंतःकरणाची उघडीक करतात. किंबहुना,

'मूकं करोति वाचालं पंगुं लंघयते गिरिम्'

हें जें भगवत्कृपेचें कार्य वर्णिलें आहे, तेंच अंतरंगदृष्टीनें काव्यशक्तीचें कार्य ठरतें. जडसृष्टीचें स्वरूप पाहून तिचें सौंदर्य ओळखणें, तींतील गूढ ईश्वरी शक्तींचें तत्त्व मनाला पटवून देणें व तद्योगें मनोवृत्तीचे तरंग

उसळणें, याचेंच नांव ' रसिकता ' असें *कार्लाइलचें मत आहे. ही रसिकता काव्य रचण्याला व काव्यमर्म जाणण्याला, दोहोंलाही आवश्यक आहे. हिच्यापासून ज्या वाग्विलासाचा उद्भव घडतो, तो साहजिक रीतीनेंच हृदयंगम, मनाला भारून टाकणारा व अनुरूप वृत्तींच्या लाटा उसळणारा असा होतो. वातावरणांत चळवळ सुरू होऊन जोराचें वारें सुटूं लागलें म्हणजे अगाध जलधीही हालूं लागतो. वाऱ्याच्या सोसाट्याबरोबर सागराच्या पर्वतप्राय लाटा उचंबळूं लागतात. वारा घोंघावूं लागला म्हणजे समुद्रही त्याच तोलाची गर्जना करूं लागतो. असाच कांहींसा प्रकार सत्काव्याचा ओघ व रसिकांचें अंतरंग यांचा आहे. जगाच्या इतिहासाकडे नजर फेंकली तर असें आढळून येतें कीं, त्यांत सारखी उलाढाल—चढउतर—क्रांति घडून आलेली आहे. शास्त्रविज्ञान, व्यापारधंदे, कलाकौशल्य, राज्यघटना, चालीरीति, वेषपेहराव, धर्माचार, वगैरे दरोबस्त बाबींत फेरबदल झालेले आहेत. तरी पण प्राचीन काळीं युरोप किंवा आशिया खंडांत अत्यंत उज्ज्वल प्रतिभादर्शक म्हणून ज्या काव्यकृति रसिकप्रिय झाल्या होत्या, त्या अद्यापही तशाच रसिकप्रिय राहाव्या, हें आश्चर्य नाहीं काय ? परंतु या गोष्टींत जरा खोल शिरलें म्हणजे तिचा उलगडा पडून, या आश्चर्याचा निरास होतो.

* "...Is it not reckoned still a merit, proof of what we call a 'Poetic Nature, that we recognise how every object has a divine beauty in it; how every object still verily is 'a window through which we may look into Infinitude itself' ? He that can discern the loveliness of things, we call him Poet, Painter, Man of genius, gifted, lovable."

"Do we not, as I urged, still account it a merit to recognise a certain inexhaustible significance, 'Poetic Beauty' as we name it, in all natural objects what so ever ? A man is a poet, and honoured, for doing that and speaking or singing it,—a kind of diluted worship."

—Carlyle's Heroes and Hero- worship.

वर काव्यस्वरूपाचें जें विवेचन केलें आहे, त्यावरून हें लक्षांत येईल कीं, " हर्षशोकादि मनोवृत्ति त्याचें जीवन असून, त्या त्या मनोवृत्तींचें उज्ज्वल प्रतिबिंब शब्दांत उठवून, वाचकांच्या मनाचें त्याशीं तादात्म्य करावयाचें व अंतीं त्यांच्या अंत:करणांत सुखसंवेदना उत्पन्न करावयाची, हाच काव्याचा हेतु आहे. " तेव्हां कालक्रमानें लोकांच्या रहाणींत, विचारसरणींत, व्यापारधंद्यांत, कलाकौशल्यांत व अशा तऱ्हेच्या इतर गोष्टींत केवढीही क्रांति घडून आली, तरी जोंपर्यंत मनुष्याच्या अंत:करणांत हर्षशोकादि वृत्तींच्या उगमाचें स्वरूप अविकृत राहिलें आहे, तोंपर्यंत प्राचीन रसभरित काव्यांची छाप रसिक वर्गावर कायम राहील. गवई आपल्या अत्यंत मोहक रीतीनें जुळलेल्या सुरांनीं कानाला किंवा चितारी आपल्या उत्तम रीतीनें वठविलेल्या रंगांनीं डोळ्यांना ज्या प्रकारची मोहिनी घालतो, त्याच प्रकारची मोहिनी कवि आपल्या वाणीच्या जादूनें अंत:करणाला घालतो. म्हणूनच कार्लाईल हे काव्याला ' Musical thoght ' असें ह्मणतात. मेकॉले तर असें म्हणतात कीं, " काव्याची उत्पत्ति मनाच्या एक प्रकारच्या विलक्षण पण गोड अशा भ्रांत स्थितींतूनच होते. काव्याला सत्याची अवश्यकता आहे, ही गोष्ट कबूल आहे. परंतु हें सत्य भ्रांत स्थितींतील आहे. आरंभींच्या गृहीत गोष्टी एकदां कबूल केल्या, म्हणजे कवीची पुढील तर्कपद्धति सुरळीत व संबद्ध अशी असते. परंतु पहिल्या गृहीत गोष्टी खऱ्या मानण्याला जो कांहीं भोळेपणा लागतो, त्यांत व अंशत: आणि तात्पुरत्या भ्रांत स्थितींत फारसा भेद करितां येत नाहीं. म्हणूनच मुलांची कल्पनाशक्ति अतिशय जाज्वल असते; व भुतांखेतांच्या, काऊचिऊच्या, वगैरे अद्भुत गोष्टी तीं अगदीं भाविकपणानें ऐकून रंगून जातात. " कार्लाईल व मेकॉले यांच्या काव्यव्याख्यांत वस्तुत: कांहीं भेद नसून, त्या एकरूपच आहेत. मनाला भारणी घालणें, हें काव्याचें मर्म दोघांनाही कबूल आहे. ही काव्याची भारणी मनाला पडली म्हणजे, तें स्थूल मर्यादा ओलांडून मोहक कल्पनातरंगांत पोहूं लागतें, हेंही त्यांना मान्य आहे. मग या स्थितीला ' मधुरविचारावस्था ' म्हणावें कीं ' मधुराभासावस्था ' म्हणावें, हा केवळ शाब्दिक प्रश्न राहील. आपल्या संस्कृत साहित्यकारांच्या काव्यव्याख्या वरील व्याख्यांहून भिन्न

नाहींत. ' रमणीयार्थप्रतिपादकः शब्दः काव्यम् ' ( जगन्नाथराय ) ' रसादिमद्वाक्यं ' काव्यम् । ( शुद्धोदन ), ' निर्दोषगुणालंकाररसवद्वाक्यं काव्यम् । ' ( भोज ), तद् अदोषौ शब्दार्थौ सगुणावनलंकृती पुनः क्वापि ( मम्मट ), इत्यादि संस्कृत रसविदांच्या व्याख्या व वरील आंग्लांच्या व्याख्या यांत जरी शब्दतः भेदभाव भासला, तरी अर्थतः व वस्तुतः ह्या सर्वांची एकवाक्यताच आहे. आतां मेकॉलसाहेबांचें वर जें मत दिलें आहे, त्यासंबंधें इतकें सांगणें अवश्य आहे कीं, लहान मुलांची, त्याचप्रमाणें संस्कारहीन जनसमूहाची, कल्पनाशक्ति जरी जाज्वल्य असली, तरी त्यांची सहृदयता हीन दर्जाची असते. तींत नाजूकपणा, सूक्ष्मता, प्रौढत्व, मिश्रभावना, मार्दव, उदात्तत्व व अव्यक्तभेदाकलनक्षमत्व, यांची वाण उघड उघड असते. असें नसतें तर ' होडी, बनाते, मुबंइला जाते, खजूर खाते; ' व ' येरे येरे पावसा, तुला देईन पैसा, पैसा झाला खोटा, पाऊस आला मोठा, ' हीं गाणीं लहानथोरांना सारखींच दंगवून टाकतीं. परंतु ज्याप्रमाणें लहानपणचे कपडे मोठेपणीं आपल्या अंगीं बसत नाहींत व बसले तर शोभत नाहींत, त्याप्रमाणेंच हीं लहानपणचीं गाणीं मोठेपणीं कोणी म्हणत नाहींत व म्हटलीं असतां रुचत नाहींत. मागें सांगितल्याप्रमाणें ' रसिकता ' ही परिस्थितीनें व बौद्धिक संस्कारांनीं प्रौढ, शुद्ध व पक्व दशेला येते.

कित्येक रसज्ञांचें म्हणणें असें आहे कीं, ' तत्त्वज्ञाप्रमाणें सत्यप्रतिपादन हेंच कवीचें ब्रीद असतें. ' परंतु विचार केला, तर हें विधान अबाधित सत्यानें भरलेलें आहेसें दिसत नाहीं. मनोवृत्तीचा लोंढा अंतरंगाला तुडुंब भरून टाकून कल्पनेच्या जोरावर जर काव्यरूपानें बाहेर पडतो, तर काव्याचें स्वरूप त्या कल्पनेच्या स्वरूपावर अवलंबून असणार, हें उघड आहे. मागें मेकॉले साहेबांचा उल्लेख करून सांगितलेंच आहे कीं, या कल्पनेच्या मूळाशीं अनेकवार एक प्रकारचा मानसिक आभास असतो. तो जर आभास आहे, तर तो सत्यपूर्ण असेलच, असें आग्रहाचें विधान करण्याला कांहीं एक कारण दिसत नाहीं. एक कवि मेघाला मनोविकारांनीं युक्त समजून त्याच्याबरोबर एका यक्षाचा त्याच्या विरहतप्त व चिंताकुल प्रियेला निरोप पाठवितो; दुसरा स्कॉटलंडांतील बर्न्स कवीप्रमाणें फुलांना रत्नें मानितो

आणि त्यांना दया, प्रेम, इत्यादि कोमल मनोवृत्तींनीं मंडित करितो; तिसरा जगन्नाथपंडिताप्रमाणें पशुपक्ष्यांशीं व झाडाझुडपांशीं संभाषणप्रकार करून सामाजिक नीति व आचार यांविषयींचीं तत्वें त्यांच्यापासून शिकतो किंवा शिकवितो; चवथा वाल्मीकिव्यासांप्रमाणें सीतावियोगानें पोळलेल्या रामाचा शोक ऐकून केवळ वन्य पशू किंवा वनस्पतीच नव्हत तर नद्या आणि डोंगर यांनाही रडवूं लागतो; पांचवा सुभाषितकारांचा कित्ता वळवून आगपेटी, केरसुणी, मांजरूं, इत्यादिकांवर असत्यानसत्या गुणदोषांचा आरोप करून गुणगणूं लागतो; अशा ज्या नाना तऱ्हा दृष्टीस पडतात, त्या सर्वत्रैव सत्याचेंच कंकण बांधून रसिकाचा मनोदुर्ग काबीज करतात काय? आतां सत्याचा प्रसार, नीतीचा उपदेश, सद्गुणांचें बीजारोपण, इत्यादि सत्कृत्यांच्या कामीं काव्यशक्तीचा उपयोग होईल व होतोही, ही गोष्ट आम्हांला मान्य आहे. शिल्प, चित्र व नाट्य या कलांचा उद्भव केवळ मनोरंजनापासून व मनोरंजनाकरितांच झालेला आहे. पण त्यांचा अनेक रीतींनीं लोकांवर इष्ट गोष्टींविषयीं अनुकूल संस्कार उठविण्याच्या कामीं उपयोग करून घेण्यांत आलेला आपण प्रत्यक्ष पाहतों. इंग्लंडामध्यें सर ज्याशुआ रेनॉल्ड्स् हा एक मोठा कुशल चित्रकार होऊन गेला. त्यानें कांहीं नीतितत्त्वें लोकांच्या मनांवर बिंबण्यासाठीं सामाजिक चित्रांचे संच चितारले होते. त्यांतील एका संचांत दारूबाजाची दुर्दशा कशी होते,—तो व्यसनाच्या नादीं लागून सात्विक वृत्तीला कसा पारखा होतो, गृहसुखाला कसा आंचवतो, आतइष्टांबरोबर पशुतुल्य वर्तन कसें ठेवितो, दमडीलाही महाग होऊन आपली वासना तृप्त करण्यासाठीं चोऱ्यामाऱ्या इत्यादि गुन्हे करण्यासही कसा प्रवृत्त होतो, अखेर लोकांत मानखंडना पाऊन व दुर्धर पापाचरण करून तो अधोगतीला कसा जातो,—या सर्व गोष्टींचें यथास्थित स्वरूप रेखाटलेलें होतें. या यत्नांत रेनॉल्ड्स यानें मनोरंजनाच्या द्वारें लोकांना नीतिशिक्षण दिलें; ह्मणजे त्यानें ज्या साधनाचा उपयोग केला, त्याचें प्रधान कार्य मनोरंजन हें असून, नीतिशिक्षण हें इष्ट खरें, परंतु केवळ आनुषंगिक कार्य आहे. दऱ्याखोरीं, गहन अरण्यें, नदीसागर, इत्यादि मनोहर देखाव्यांत नीतिशि-

क्षणाचा हेतु आहे, असें मानण्याला बुद्धीची बरीच ओढाताण करावी लागेल; असें वाटतें. लहान लहान मुलांकरितां जीं चित्रबोधासारखीं पुस्तकें असतात, त्यांतही, चित्रकलेनें मनोरंजन होतें, म्हणूनच चित्रांच्या दर्शनानें फुसलावून मुलांना ज्ञानार्जनाच्या पंथांत सहज आणण्याचा काट असतो. शिल्पाची, तशी-च नाट्याची, मुख्य कामगिरी मनोरंजन असून त्या कामगिरीच्या अनुरोधानें लोकशिक्षणाचें कार्यही कित्येक वेळा साधलेलें असतें. हॅम्पडन्, क्रॉमवेल, नेल्सन्, नेपोलियन्, वॉशिंगटन्, फ्रांक्लीन्, शिवाजी, बाजीराव, रानडे, नाना शंकर शेट, सर जमशेटजी जीजीभाई, इत्यादि थोर विभूतींच्या मूर्ति लोकांच्या नजरेपुढें ठेवून मनोरंजनाच्या ओघाबरोबरच लोकांना इतिहासाचें ज्ञान व अनुकरणीय आदर्शव्यक्ति यांचा लाभ करून देण्याचा हेतु कांहीं अंशानीं साधला जातो. परंतु ‘ सतार वाजविणारी बाई, ’ ‘ गोदोहन, ’ ‘ देवळाकडे जाणारी हिंदु स्त्री, ’ ‘ हंसवाहिनी सरस्वती, ’ वगैरे मूर्तींत मनोरंजनापलीकडे कांहीं विशिष्ट हेतु साधून येणार आहे, असें मानणें जडच आहे. ‘ सौभद्रा ’ सारख्या नाटकांत मनोरंजन हीच काय ती घडून येणारी मुख्य गोष्ट आहे; परंतु ‘ तरुणीशिक्षणनाटिका, ’ ‘ शारदा, ’ ‘ सौभाग्यरमा, ’ ‘ स्वदेशी, ’ वगैरे नाटकांत मनोरंजन या मुख्य परिणामाबरोबर लोकमताला विशिष्ट वळण लावण्याचें कार्य पार पाडावयाचें आहे. या विवेचनावरून इतकें सिद्ध होतें कीं, शिल्प, चित्र व नाट्य यांचा उद्गम मनोरंजनांत आहे व मनोरंजन हेंच त्यांचें प्रधान साध्य आहे. त्यांत लोकशिक्षण किंवा सत्य-प्रतिपादन यांचा अंतर्भाव झालाच पाहिजे, नाहीं तर त्या कलांचें साफल्यच व्हावयाचें नाहीं, असा आग्रह अनुचित होईल. हाच न्याय काव्यकलेला लागू करावयाचा आहे. काव्याचा उद्भव प्रबळ मनोवृत्तींत आहे, व त्या प्रबळ मनोवृत्ती वाचकश्रोतृवृंदांत उसळूं लावावयाच्या हें त्याचें कार्य आहे. तें साधण्याचें कवीनें कंकण बांधलें आहे, आणि तें साधलें म्हणजे त्यानें आपली कामगिरी यथास्थित बजावली. ही मनोवृत्तींची खळबळ सुरू कर-ण्यांतच कवि एखादे वेळीं सत्यप्रतिपादनाचें किंवा लोकशिक्षणाचें कार्य साधील, नाहीं असें नाहीं. पण तें त्यानें साधलें नाहीं, म्हणून त्याचें काव्य रसहीन ठरलेंच पाहिजे, असें नाहीं. जगन्नाथपंडितांनीं ‘ करुणविलास ’

म्हणून एक प्रकरण लिहिलें आहे. त्यांत त्यांनीं मृत पत्नीची आठवण होऊन एका विधुरानें केलेला शोक मोठ्या हृदयद्रावक रीतीनें वर्णिला आहे. या लहानशा चुटक्यावर अनेक रसिकजन अगदीं भाळून गेलेले आहेत व त्याच्या निदान सहा मराठी प्रतिकृति पाहण्यांत आहेत. यावरून तें काव्य कोणत्या दर्जाचें आहे याविषयीं फारशी शंका रहात नाहीं. परंतु या काव्यांत सत्यतत्वप्रतिपादन किंवा लोकशिक्षण धुंडाळूं लागणें म्हणजे गवयांच्या तराण्यामध्यें वाक्यार्थ धुंडाळण्यासारखेंच आहे; किंवा जादुगाराच्या खेळांत धंदेशिक्षण शोधूं जाण्यासारखेंच आहे. वरील विवेचनानुसारच ' ईश्वरी निष्ठा, विशिष्ट देवतांची भक्ति, आस्तिक्य बुद्धि, या गोष्टी काव्याला अवश्य आहेत कीं काय ? आणि यांशिवाय उत्तम काव्य निपजूं शकणारच नाहीं कीं काय ? ' या प्रश्नाचा निकाल लागणार आहे. ज्याप्रमाणें सूर्याला सहस्र–असंख्य–किरण आहेत, त्याप्रमाणेंच मानवी मनाला हजारों फांटे आहेत; तेव्हां मनाच्या या अपरिमित तरंगांपैकीं अमुक एक तरंगापासूनच काव्योत्पत्ति झाली, तरच तें काव्य अस्सल, नाहीं तर नाहीं, असा निसर्गविरुद्ध बादशाही हुकूम पाळला जाणें शक्यच नाहीं.

२. असो; वरील कलमांत काव्याचें स्वरूप व व्याप याचा ऊहापोह झाला. आतां या कलमांत ' प्राचीन व अर्वाचीन मराठी कवी ' या वर्गीकरणाचा विचार करावयाचा आहे.

साधारणतः पाहिलें म्हणजे खिस्ती शकाच्या एकोणविसाव्या शतकाच्या आरंभापर्यंत जे कवि झाले ते प्राचीन कवींच्या वर्गांत गणिले जातात; म्हणजे या वर्गाचा प्रभव मुकुंदरायांपासून होऊन, त्याची अखेरी मोरोपंतांनीं साधली, असें होतें. यापुढील म्हणजे एकोणिसाव्या शतकांतील कवि अर्वाचीन वर्गांत मोडतात. हें वर्गीकरण केवळ कालानुरोधानें केलेलें नाहीं. कारण पहिल्या वर्गांत ७०० वर्षांतील कवि येतात, तर दुसऱ्यांत केवळ १०० वर्षांतीलच येतात. तसेंच या वर्गीकरणाचें तत्व नुसत्या राज्यक्रांतींत आहे, असेंही नाहीं. कारण, ज्ञानेश्वरांच्या काळापासून तों एकोणिसाव्या शतकांतील इंग्रजांनीं घडवून आणलेल्या राज्यक्रांतीपर्यंत, मध्यंतरीं अनेक वेळां महाराष्ट्रांत राज्यक्रांति घडून आलेल्या होत्या. परंतु त्या

क्रांतींमुळें ‘ प्राचीन ’ व ‘ अर्वाचीन कवी ’ असा ठळक भेद झालेला आढळत नाहीं. यावरून हें लक्षांत येईल कीं, या वर्गीकरणाचें बीज केवळ कालगणनेंत किंवा राज्यक्रांतींत नाहीं. मग तें आहे तरी कशांत, असा प्रश्न उद्भवतो; व त्याला असें उत्तर आहे कीं, तें इंग्रजी राज्यक्रांतीबरोबर घडून जालेल्या नवीन बौद्धिक संस्कारांत—नवीन विचार-क्रांतींत—आहे. मुसलमानांनीं घडविलेल्या राज्यक्रांतीबरोबर मराठ्यांचा फार्शी भाषेशीं संबंध आला खरा; परंतु तिचा मगदूर मराठी किंवा संस्कृत भाषेहून वरचढ नसल्यामुळें, तिच्या काव्यांत मराठींत असलेल्या काव्यांहून कांहीं विशेष ठळक भेद न आढळल्यामुळें आणि सरकारी काम सामान्यतः मराठींत किंवा गंगाजमनी फार्शीमराठींत चालल्याच्या योगानें फार्शीचें मार्मिक अध्ययन करण्याची जरूर न पडल्यामुळें, मराठींत बेंरचसे फार्शी शब्द घुसविण्यापलीकडे फार्शी भाषेचा कांहीं एक संस्कार झाला नाहीं. पण इंग्रजी राज्यक्रांतीबरोबर मराठीला इंग्रजीसारख्या मातबर भाषेचा संसर्ग झाला, शिवाय संस्कृत भाषेच्या अध्ययनालाही एक प्रकारचें विशिष्ट वळण लागलें. प्राचीन मराठी काव्यांत ठळक रीतीनें न आढळणारें असें काव्याचें धोरण आंग्लवाङ्मयांत व पुराणेतर संस्कृत काव्यांत नवीन पिढ्यांना दृग्गोचर झालें व त्याचा ठसा त्यांच्या अंतःकरणावर बिंबल्यामुळेंच त्यांच्यापासून ‘ अर्वाचीन ’ कवींचा उद्भव झाला. ‘ अर्वाचीन ’ कवि ही संज्ञा आजमितीस गेल्या ३०—४० वर्षांत जी कविमंडळी आपल्या प्रासंगिक, सृष्टिविषयक किंवा मानवस्वभावदर्शक स्फुट काव्यांनीं प्रसिद्धीस आली आहे, तीस लावण्यांत येते. परंतु या आर्वाचीन कवींचा मार्ग चोखाळणारी व त्यांचा प्राचीन कवींशीं सांधा बसविणारी कविमंडळी इ. स. एकोणिसाव्या शतकाच्या पहिल्या तीन चरणांत उदयास आली. रा. चिपळूणकर, राजवाडे, पारखी, गोडबोले, लेले, इत्यादि संस्कृताचा चांगला परिचय असणारे आणि आंग्लभाषेचाही गंध लागलेले जे शास्त्री, कवी त्यांचा या मंडळींत अंतर्भाव होतो; या कवींनीं मराठी काव्याचें धोरण पुराण ग्रंथावरून काढून संस्कृतांतील पुराणेतर सारस्वताकडे वळविलें. भामिनीविलास, मेघदूत, रघुवंश, ऋतुसंहार, किरातार्जुन, इत्यादि काव्यें

आणि शाकुंतल, मालतीमाधव, मृच्छकटिक, इत्यादि नाटकें, यांच्या मराठी प्रतिमा वरील शास्त्री मंडळींनेंच प्रथम मराठींत आणिल्या. यशवंतरायकाव्य, राजा शिवाजी, भट्टवंशकाव्य, बाजीरावकाव्य; इत्यादि, इत्यादि कृतींनीं ऐतिहासिक काव्याचीही प्रथा पाडिली. या शास्त्रीकवींच्या मागून, म्हणजे गेल्या तीस चाळीस वर्षांत, झालेल्या कवींना पुराणेतर संस्कृत काव्यांचा थोडा बहुत संस्कार घडून, शिवाय इंग्लिश काव्यांचाही परिचय त्यांना चांगला लाभला आहे. त्याचा परिणाम असा झाला आहे कीं, शास्त्री कवींनीं जो मराठी काव्यसारस्वताचा ओघ पुराणग्रंथांकडून पुराणेतर संस्कृत काव्यें व ऐतिहासिक विषय यांकडे वळविला होता, त्यांतच अर्वाचीन कवींनीं आंग्ल काव्याचें जीवन आणून सोडिलें आहे. संस्कृत काव्यें व आंग्ल काव्यें यांतील गुण उद्धृत करून, त्यांचें सहजमनोहर असें बेमालूम नवीन रसायन बणविण्याची कामगिरी अर्वाचीन कवी साधीत आहेत. शास्त्री कवींनीं जें पाऊल टाकिलें होतें, त्यापुढील पाऊल अर्वाचीन कवींनीं टाकिलें आहे; आणि काव्य हें मनोवृत्तींचें प्रतिबिंब असल्यामुळें त्यांना असें केल्यावांचून गत्यन्तरच नव्हतें. शास्त्रीकवींच्या पिढींत जें नव्या जोमाचें बीज पेरलें गेलें, त्यालाच आजकालच्या पिढींत जोमाचे अंकुर फुटले आहेत, व यांचाच कालक्रमानें विशाल वृक्ष बनणार आहे, असा भरंवसा ठेवण्यांत कांहीं हरकत आहे, असें दिसत नाहीं. आतां प्राचीन कवी व अर्वाचीन कवी यांच्या काव्याच्या अंतरगांत व बहिरंगांत कोणते ठळक भेद दिसतात, याचा थोडक्यांत उल्लेख करूं.—

( अ ) ज्ञानदेव, एकनाथ, दासोपंत, वामनपंडित, इत्यादि कांहीं प्राचीन कवींचे ग्रंथ वेदांतविषयक संस्कृत ग्रंथांवर टीकांच्या रूपानें आहेत. त्यांत काव्यमय स्थळें जागोजाग आढळतात. परंतु कवित्व हें कांहीं या ग्रंथाचें जीवनतत्त्व नव्हे व काव्यदृष्टीनें त्यांचें महत्त्व ठरवूं पाहणें म्हणजे त्यांची योग्य किंमत करणेंच नव्हे. ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ, तुकाराम, रामदास, मुद्गल, इत्यादि कांहीं प्राचीन कवींचें अभंगात्मक सारस्वत बरेंच विस्तृत असून, त्याचा बहुजनसमूहावर वज्रलेपासारखा ठसा उमटलेला आहे. हें वाङ्मय म्हणजे संतांळ्याचें व वारकरीपंथाचें जीवितसर्वस्वच आहे, असें

ह्मणण्यास कांहीं प्रत्यवाय दिसत नाहीं. या वाङ्मयांत धर्म, नीति, ईश्वरीप्रेम, वैराग्य, शांति, विश्वकुटुंबता आणि वेदांततत्वें, हे विषय प्राधान्येंकरून यथाप्रसंग आलेले आहेत. यामध्यें प्रतिभा, जाज्वल मनोवृत्ति, वर्ण्य वस्तूशीं अंतःकरणाची तदात्मता, भाषेचा भेदक गुण, इत्यादि सर्व कवित्वलक्षणें ठळक रीतीनें आढळतात, हें अभंगात्मक वाङ्मय बहुतेक दरोबस्त प्रासंगिक किंवा स्फुट स्वरूपाचें आहे. प्राचीन कवींचा एक तिसरा वर्ग आहे. या वर्गाचे मुक्तेश्वर, महिपति, मोरोपंत, श्रीधर, वामन, वीरेश्वर, आनंदतनय, इत्यादि कवी अध्वर्यू होत. यांचा सर्व भार *पुराणकथांवर आहे. कथानुरोधानें त्रोटक सृष्टिवर्णन, मानवस्वभावलेखन, सूक्ष्मनिरीक्षण द्योतक उपमोत्प्रेक्षादि अलंकार, मनोवृत्तींचा खेळ, ओजतेज इत्यादि गुण, हीं या वाङ्मयांत आढळतात; परंतु कवींचें लक्ष मूळ संस्कृत पुराणांतील लांबलचक कथाभाग मराठींत उतरण्याकडेच मुख्यतः वेधल्यामुळें, यांचा व्हावा तसा विलासविकास झालेला नाहीं. मराठींत प्राचीन कवींच्या हातून पुराणविषयावरच परंतु कालिदास, माघ, भारवि, इत्यादि कवींच्या काव्यांप्रमाणें काव्यें झालीं नाहींत, याचें कारण प्रतिभाहीनत्व किंवा रसिकतेची वाण नसून, पुराणांतील लांबट चऱ्हाटें मराठींत वळण्याच्या कामीं त्यांनीं आपणास वाहून घेतलें हें होय. आतां अर्वाचीन कवींकडे पाहिलें, तर हे वरील तिन्ही वर्गांहून भिन्न प्रकारचे आहेत, असें झटकन दृष्टीस येते. निव्वळ वेदांतविषयाचें प्रतिपादन करण्याचें काम अर्वाचीन कवींनीं आपल्या अंगाबाहेर टाकिलें आहे. हल्लीं मराठींत गद्यग्रंथांचा चांगला उदय होत आहे. परंतु एकोणिसाव्या शतकापूर्वीं गद्याच्या नांवानें मराठींत बहुतेक आंवळ्याएवढेंच असल्यामुळें गद्याचीही कामगिरी पद्यालाच बजवावी लागत असे. पण आजमितीस तसें करण्याचें कांहीं कारण नसल्यामुळें, निव्वळ तत्त्वप्रतिपादन, वेदांतविवेचन, हें अर्वाचीन कवींनीं गद्य लेखकांकडे सोंपविलें आहे, व त्यांनींही त्याचा मोठ्या प्रेमानें आदर केला आहे. पण अर्वाचीन कवींच्य

---

* महिपती, मोरोपंत, राजारामप्रासादी, यांसारख्या कांहीं कवींनीं कांहीं संतचरित्रपरही प्रकरणें लिहिलीं आहेत. परंतु तीं ‘ दर्यामे खसखसी’ प्रमाणें असून, त्यांचेंही वळण ऐतिहासिक काव्यांपेक्षां पुराणांकडेच जास्ती झुकतें आहे.

काव्यांत मनाला खळबळवून टाकणारें परंतु वरच्याहून भिन्न असें विशिष्ट तात्विक चळण आढळतें. सृष्टीचें स्वरूप; निरनिराळे भव्य, गंभीर, शांत, भयानक किंवा प्रेमळ असे निसर्गांतील देखावे; प्रत्येक पशु, पक्षी, कीटक किंवा वनस्पति यांत रसिक अंतःकरणाला दिसून येणारें सर्वव्यापी असें गूढ तत्त्व; इतिहासप्रसिद्ध स्थळें; मनुष्यावर वारंवार येऊन कोसळणारे सुखदुःखाचे प्रसंग; ह्या व अशा तोलाच्या अन्य गोष्टींनीं अंतःकरणाला चलन मिळून जें उधान येतें, त्याचें स्वरूप अर्वाचीन काव्यांत चमकतांना दृष्टीस पडतें. प्राचीन कवींच्या द्वितीय वर्गानें, म्हणजे अभंगात्मक वाङ्मय अस्तित्वांत आणणाऱ्या कविवर्गानें, आपली काव्यकृति चांगली वठविली आहे; परंतु त्यांची सर्व कामगिरी एकांगी आहे. तिच्यांत ईश्वरी प्रेम—विशेषतः विठोबासारख्या देवता विशेषाविषयीं सगुण प्रेम—, दंभस्फोट, शांति, वैराग्य व सामान्य नीति इतकेच प्रकार आढळतात. परंतु यापलीकडे मानवी मनोवृत्तींचा जो अवाढव्य प्रदेश आहे, त्यांत वरील अभंगी कवींनीं पाऊल टाकलेलें फारसें आढळत नाहीं. तसेंच सहृदयतापूर्वक सृष्टीच्या निरीक्षणाला त्यांचें मन नसेल, पण काव्य तरी बरेंचसें पराङ्मुखच आहेसें भासतें. या कारणास्तव या प्राचीन कविवर्गांत जें एकांगित्व दिसून येतें, त्याच्याऐवजीं अर्वाचीन कविवर्गांत चौरसपणा चांगलाच आढळतो. ज्या अवाढव्य हर्षशोकादि रसांच्या प्रदेशाकडे प्राचीन अभंग कवींनीं कानाडोळा केला, त्या प्रदेशांत अर्वाचीन कवी यथेच्छ विहार करीत आहेत. अखिल सृष्टि ईश्वरस्वरूप आहे व प्रत्येक भूतमात्रांत सूक्ष्म तेजाचा अंश आहे, या भावनेनें त्यांच्या सृष्टिविषयक कवितांतून प्रेम, शांति, व इतर सात्विक वृत्ति ठसलेल्या आढळतात; आतां मुक्तेश्वर, श्रीधर, मोरोपंतप्रभृति प्राचीन कवींच्या तिसऱ्या वर्गाकडे पाहिलें, तर त्यांच्यांत व अर्वाचीन वर्गांत फारच फरक आढळतो. प्राचीनांचा केवळ धर्मबुद्धीनें पुराणग्रंथ मराठींत उतरण्याचा हेतु होता. कथा लांबते ह्मणून मनाला खळबळवून सोडणारे व काव्यदेवतेला अत्यंतप्रिय असेही प्रसंग त्यांनीं संपुष्टांत आणले आहेत. उलटपक्षीं कित्येक ठिकाणीं कारण नसतांना नीरस गोष्टींचा पाल्हाळही केलेला आहे. मूळ पुराणग्रंथांतील अश्लील बीभत्स प्रकार कोठें नरम करून तर कोठें गरम

करून यांनीं आपल्या काव्यांना उद्वेगजनक स्वरूप आणलेलेंही दृष्टोत्पत्तीस येतें. अर्वाचीन कवींचें लक्ष पुराणग्रंथावर फारसें दिसत नाहीं. पुराणग्रंथांतून काव्यविषय घेतल्यासही, त्यांच्या काव्यांचें स्वरूप कालिदासभारविप्रमुख संस्कृत कवींच्या धोरणावर जातें. सृष्टिवर्णनें, मानवस्वभाव लेखन, विविध रसात्मक प्रसंग, इत्यादि गोष्टींवर मुख्य कटाक्ष ठेवून अर्वाचीन कवींनीं काव्याचें धोरण सांभाळलेलें असतें. सभ्यपणा, मर्यादित शृंगार, सृष्टीशीं मनाचें समरसत्व, मिश्रमनोवृत्तींचें विलसित, या गोष्टी अर्वाचीन काव्यांत अधिक ठळक दिसतात. तसेंच सामान्यतः पाहिलें ह्मणजे असें आढळतें कीं, अर्वाचीन कविता स्फुट स्वरूपाची आहे आणि वरील तृतीय वर्गांतील प्राचीन कवींनी ज्या गोष्टींना आपल्या काव्यांत गौण स्थान दिलेलें आहे, त्याच गोष्टी अर्वाचीन स्फुट काव्याचे मुख्य विषय बनल्या आहेत. एवढ्या प्रकारापुरते अर्वाचीन कवी व प्राचीन अभंगकवी यांत सादृश्य आहे. अर्वाचीन कवींनीं प्राचीन अभंगकवींप्रमाणेंच सलग मोठी रचना न करितां, बहुतेक स्फुट रचनाच केली आहे. दोन्ही वर्गांत मनोवृत्तींची उकली ही प्रधान आहे. वामन, श्रीधर, मुक्तेश्वर, मोरोपंत, इत्यादि कवींनीं ज्या भावनांना दुय्यम स्थळ दिलें आहे, त्यांनाच वरील दोन्ही वर्गांनीं आपल्या स्फुट कृतींत अग्रतिलकाचा मान दिलेला आहे. असो. प्राचीन अभंगकवी व अर्वाचीन कवि, यांमधील भेदाचें स्वरूप मागेंच वर्णिलें आहे.

( आ ) कवितेच्या बाह्य रूपांत—छंदांत—ही प्राचीन व अर्वाचीन कवींत बराच भेद दिसून येतो. प्राचीन कवींचा भर विशेषतः ओवीछंदावर आहे. संस्कृतांतील वेदांतविषयक ग्रंथ व पुराणें हीं प्रायः अनुष्टुप् छंदांत आढळतात. त्या संस्कृत छंदाच्या धाटणीचेंच हें मराठी ओवीवृत्त आहे. अनुष्टुपाला गणमात्रांचें मोठेंसें निबंधन नाहीं; ओवीलाही गणमात्रांचा चांगलासा धरबंध नाहीं. पण मराठी कवींचा स्वच्छंदीपणा या बाबतींत संस्कृत कवींच्या पलीकडे गेलेला आहे; कारण, अनुष्टुप् छंदाला निदान अक्षरसंख्येचा तरी ताळ आहे, कांकीं प्रत्येक चरणांत तीं बरोबर आठच असावीं लागतात; पण मराठी कवींनीं अशा प्रकारच्या अक्षरसंख्येच्या नियमालाही धाब्यावर बसवून, ओवीवृत्ताला म्हणण्याच्या सोईपेक्षां निराळें असें कांहींएक

बंधन जखडून दिलेलें दिसत नाहीं. या ओवी वृत्तांत प्राचीन मराठी काव्याचा जवळ जवळ तीनचतुर्थांश भाग गुंफलेला आहे. बाकी उरलेल्या भागापैकीं जवळ जवळ निम्मे भाग अभंग, पदें, दिंडी, अशा थाटाच्या छंदांत रचलेला, आहे आणि बाकीचा शिल्लक राहिलेला अंश मात्र संस्कृत वाङमयांतील प्रसिद्ध वृत्तांत—शार्दूलविक्रीडित, शिखरिणी, उमा, भुजंगप्रयात, वसंततिलका इंद्रवज्रा, इत्यादि छंदांत— आढळतो. अलीकडील कवींच्या कृतीकडे लक्ष पोंचाविल्यास असें आढळतें कीं, पदें, दिंड्या, साक्या, वगैरे रचण्याचें काम बहुशा नाटककार कवींकडे सोंपविलेलें दिसतें. नाटकाला संगीताची जोड मिळाल्यापासून हा एक प्रकारचा वाङ्मयात्मक श्रमविभाग फारच ठळक रीतीनें लक्षांत भरूं लागला आहे. नाटककारांशिवाय इतर कवींनीं आपला सर्व भार संस्कृतांतील वृत्तांवर टाकिला आहे. या संस्कृत छंदांना अक्षर, गण व मात्रा या त्रिगुणाचीं फारच दृढ बंधनें आहेत; आणि मराठींत शद्बांमधील स्वरांच्या उच्चाराची पद्धती बोलण्यांत प्रांतोप्रांतीं कशीही असली, तरी पद्यांत, विशेषत: वरील छंदांत, शद्बांमधील स्वरोच्चार संस्कृताप्रमाणेंच म्हणजे उदात्त, अनुदात्त, प्लुत, अशा तऱ्हेचे भेद न करितां—होत असल्यामुळें, हीं छंदांचीं बंधनें शिथिल होऊं शकत नाहींत व बळेंच शिथिल केल्यास सुज्ञांच्या उपहासास पात्र झाल्यावांचून रहात नाहीं. त्यामुळें अर्वाचीन कवींनीं संस्कृत छंदांचा आदर करून आपणाला बरेंच जखडून घेतलें आहे. ग्राटल्यांवर कसरत करणाऱ्या इसमाप्रमाणें किंवा शास्त्रोक्त यमनियम संभाळून व्रत साधणाऱ्या भाविकाप्रमाणें अर्वाचीन कवींना संस्कृत छंदांत काव्यग्रथन फार सावधानपणें करावें लागत आहे. तरी पण त्यांच्या हातून हें काम संस्कृत छंदांचा आदर करणाऱ्या प्राचीन मराठी कवींपेक्षां अधिक निर्दोष रीतीनें पार पडत आहे. मोरोपंतांशिवाय इतर प्राचीन कवींत यासंबंधानें शैथिल्य ठिकठिकाणीं आढळून येतें. आजमितीस ग्रंथसंग्रह वाढल्यामुळें आणि कोश व व्याकरण या दोन भाषानियामक साधनांचा लाभ झाल्यामुळें, मराठी भाषेचें स्वरूप बरेंच निश्चित झालेलें आहे. तेव्हां हल्लींच्या कविकृतींत भाषेची शुद्धता पूर्वकविकृतींपेक्षां अधिक आढळते, ही गोष्ट कालकृत आहे. तिचा अभाव

किंवा उणीव प्राचीन कवींत परिस्थितिपरत्वें फारशी दूषणाई होणार नाहीं हें एकवार मान्य करतां येईल; पण अर्वाचीन कवींत भाषारचनाशैथिल्य खपणार नाहीं, हें उघड आहे. परंतु प्राचीन कवींच्या रचनाशैथिल्यामुळेंच त्यांना सहजस्फूर्तीचें श्रेय द्यावें आणि अर्वाचीन कवींना रचनेच्या टापटिपीमुळेंच कृत्रिमतेचें दूषण द्यावें, अशी जी कित्येक नवीन टीकाकारांना बुद्धि होत आहे, तिचें आम्हांस अत्यंत आश्चर्य वाटतें.

३. वरील कलमांत प्राचीन कवि व अर्वाचीन कवि यांच्या काव्यांचें अंतरंग व बहिरंग यासंबंधें तुलनात्मक विवेचन केलें. आतां अर्वाचीन कवींवर असतीं नसतीं खुसपटें काढून तोंडसुख घेणाऱ्या आक्षेपकांच्या कांहीं मुद्यांचा उहापोह करितों. जॉनसन् या आंग्ल पंडितानें म्हटल्याप्रमाणें पूर्वकालीन ग्रंथांचें स्वरूप गतकालाच्या पडद्यांतून पाहात असतांना सामान्यत: त्यांचे दोष हलके मानण्याकडे व गुणांची अतिशयोक्ति करण्याकडे, निदान त्यांचें मोठ्या प्रेमानें कौतुक करण्याकडे, लोकांचा स्वाभाविक कल असतो. शिवाय व्यक्तिविषय कृत्यांमुळें प्राचीन ग्रंथांविषयीं प्रतिकूल दुराग्रहांनीं मन दूषित होण्याचा फारसा संभव नसतो. पण वर्तमान कालांतील ग्रंथांचा विचार करण्याची पाळी आली कीं, अनेक वेळां सर्व हवामान बिथरून जातें. व्यक्तिविषयक गोष्टी, दुराग्रह, संकोचित मनोवृत्ति, निष्कारण कठोरपणा, मतभेद, इत्यादिकांचें भयंकर वारें सुटून विवेकनौकेला निंदा-मत्सरादिकांत समाधि मिळते. प्राचीन कवींचा उद्धार करून अर्वाचीन कवींना दडपण्याकडे किंवा प्राचीनांचे गोडवे गाऊन अर्वाचीनांवर कडाका उडविण्याकडे अलीकडे ज्या कित्येक व्यक्तींचा ओढा दृष्टोत्पत्तीस येतो, त्याचें मुख्य कारण वरील गोष्टच होय. प्राचीनांच्या दोषांवर पांघरूण घालणें व अर्वाचीनांच्या अंगीं नसते दोष लाविणें; प्राचीनांच्या ठायीं सर्व गुणांचें अस्तित्व कल्पिणें व अर्वाचीनांच्या असलेल्या गुणांकडे कानाडोळा करणें; हें जणूं काय या कंपूचें व्रतच झालें आहे. या कंपूचे अर्वाचीन कवींवरील कांहीं आक्षेप येथें नमूद करितों.—

* ( अ ) अर्वाचीन कवि हे गुलाम आहेत, परंतु प्राचीन कवि स्वतंत्र वृत्तीचे होते.

( आ ) प्राचीन कवींचें आचरण शुद्ध होतें, म्हणून त्यांचें काव्य शुद्ध व सरस आहे. अर्वाचीन कवींचें आचरण अशुद्ध म्हणून त्यांचें काव्यही अशुद्ध व नीरस असलें पाहिजे.

( इ ) पूर्वीचे कवी ईश्वरभक्ति हें काव्याचें जीवन मानीत; हल्लींचे कवि सृष्टि, पशु, पक्षी, झाडें, झुडपें, यांवर कविता करितात. म्हणून हल्लींचे कवि पूर्वीच्यापेक्षां हीन होत.

( ई ) पूर्वीचें कवि प्रसिद्धीस्तव किंवा द्रव्यास्तव काव्य करीत नसत, पण हल्लींचे कवि प्रसिद्धीकरितां किंवा पैशाकारितां काव्य लिहितात.

( उ ) हल्लींचे कवि मेलेल्या बायकोसाठीं रडतात, पूर्वींचे कवि असें करीत नसत.

( ऊ ) पूर्वींच्या कवींत प्रसाद आहे, हल्लींच्यांत आढळत नाहीं. पूर्वींच्या कवींत प्रतिभा होती. हल्लींचे कवि मारून मुटकून बनले आहेत.

( ऋ ) पूर्वीं अनेक महाकवि झाले, हल्लीं एकही नाहीं.

( ॠ ) प्राचीन कवि एकमेकांशीं सलोख्यानें वागत, अर्वाचिन कवि भांडखोर आहेत.

हे या दूषक कंपूचे मुख्य मुख्य आक्षेप आहेत. या शिवाय आणखीही कांहीं किरकोळ आक्षेप असतील, परंतु त्यांचें बहुतेक धोरण वरीलप्रमाणेंच असणार. या आक्षेपांकडे सूक्ष्म दृष्टीनें पाहिलें म्हणजे आक्षेपकांच्या क्षुद्रबुद्धीचें मोठें कौतुक वाटतें. आरबी अद्भुत गोष्टींतील आपल्या छायेनें अफाट समुद्रालाही व्यापून टाकणारा विशाळ देही राक्षस, जेव्हां सूक्ष्म देही होऊन त्या लहानशा हंड्यांत सामावला, त्या वेळीं सालोमन कोळ्याला जें आश्चर्य वाटलें असेल, तसेंच आश्चर्य, उदात्तपणा, औदार्य, स्वातंत्र्य, देश-

* हे व अशाच नमुन्याचे आणखी कांहीं आक्षेप रा. आजगांवकर यांच्या 'प्राचीन व अर्वाचीन कवी' या विषयावर १९०७ च्या मे महिन्यांत इंदुप्रकाशांत प्रसिद्ध झालेल्या निबंधांत आढळतील.

हितेच्छा, इत्यादिकांविषयीं अवडंबर माजवून अर्वाचीन कवींविषयीं वरील क्षुद्र आक्षेप घेणाऱ्यांच्या बुद्धिमत्तेविषयीं आम्हांस वाटतें. प्राचीन व आर्वाचीन कवींची तुलना करणें असेल, तर दोघांसही एक धारवाडी कांटा लावला पाहिजे; नाहींपेक्षां तुलना करण्याचें साहसच करूं नये आतां वरील आक्षेपांचें थोडक्यांत विवेचन करूं.

( अ ) हल्लीं इंग्रजांचें राज्य महाराष्ट्रावर आहे, ह्मणूनच जर सांप्रतच्या कवींना ' गुलाम ' म्हणणें असेल, तर ' गुलाम ' या नांवाला नामदेव, एकनाथ, दासोपंत, तुकाराम, मुक्तेश्वर, वामन, किंबहुना रामदास, यांचाही हक्क पूर्ण शाबीत होतो; कारण त्या कवींच्या वेळींही महाराष्ट्र परतंत्रच होतें. परंतु वरील कवींच्या स्वतंत्र वृत्तीचें अनुमान जर त्यांच्या काव्यांवरून काढावयाचें असेल, तर तोच न्याय अर्वाचीन कवींनाही लागू करणें भाग आहे. गुलामगिरीचे गोडवे गाणारा अर्वाचीन कवी आम्हांला पाहिलेला आठवत नाहीं; परंतु गुलामगिरीचा तिटकारा प्रकट करणाऱ्या व स्वतंत्रवृत्तीचें कौतुक करणाऱ्या काव्यांची आजकाल उणीव नाहीं, ही गोष्ट प्रस्तुत पुस्तकावर नजर टाकिली असतां आढळून येईल. प्राचीन कवींची राष्ट्रीय बुद्धि सिद्ध करण्यासाठीं सांधीकोंदींतील अल्पस्वल्प पद्यें ज्यांनीं मोठ्या दिमाखानें पुढें आणावीं, त्यांना स्वातंत्र्यविषय अर्वाचीन स्फुट काव्यें व मोठीं ऐतिहासिक काव्यें दिसूं नयेत, हें खास समतोल बुद्धीचें लक्षण नाहीं. पूर्वीच्या कवींनीं पौराणिक किंवा वेदांतविषयक काव्यांत प्रसंगानुरोधानें देशस्थितीचे कोठें कोठें स्पष्ट पण बहुश:अस्पष्ट उल्लेख केलेले आहेत; पण अर्वाचीन कवींनीं वरील प्रकार आपल्या काव्यांत आणून, शिवाय स्वतंत्रता, देशस्थिति, प्राचीन ऐतिहासिक पुरुष व स्त्रिया, राष्ट्रगीत, अशा तऱ्हेचे विषय उघड घेऊन त्यांवर काव्यें रचिलीं आहेत.

या विषयासंबंधीं हेंही लक्षांत ठेवण्यासारखें आहे कीं, प्रत्यक्ष राजकीय बाबी या आजमित्तीस वर्तमानपत्रांकडे सोंपविल्या आहेत. तेव्हां अर्वाचीन कवींनीं त्या बाबींकडे थोडासा कानाडोळा केला असता तरीही पतकरता परंतु वर्तमानपत्रांचें साधन पूर्वी उपलब्ध नव्हतें, तरीही प्राचीन कवींनीं या विषयाला आपल्या काव्यांत योग्य महत्त्व दिलेलें आढळत नाहीं.

( आ ) प्राचीन कवींपैकीं बरेचजणांचें आचरण कोणत्या प्रकारचें होतें हें जाणण्याला कांहींच साधनें नाहींत. कांहीं संत कवींच्या आख्यायिका महिपतीसारख्या कवींनीं लिहिल्या आहेत; परंतु त्यांतून सत्य निवडून काढणें, हें काम झारेकऱ्याच्या कामासारखें दगदगीचें असून, दीर्घश्रमानें सत्याचे कणहीं लाभण्याची कित्येक वेळां मुष्कील पडते. परंतु आपल्या समकालीन लोकांसंबंधीं आपल्याला बारीकसारीक माहिती असण्याचाही संभव पुष्कळ असतो. शिवाय वेड्यावांकड्या कंड्यांनींही आपलीं मनें अनेक वेळां दूषित झालेलीं असतात. तेव्हां प्राचीन व अर्वाचीन कवींच्या आचरणाची व मनांची तुलना करावयाची म्हणजे आपलें लक्ष आपल्यापुढें असलेल्या त्यांच्या काव्यांनींच मर्यादित केलें पाहिजे व त्यांवरूनच निकाल लाविला पाहिजे. आणि असें केलें म्हणजे अर्वाचीन कवींविरुद्ध तक्रार करण्यास फारसें कारण राहील असें वाटत नाहीं. शिवाय अर्वाचीन सबंध कविवर्गावर दुराचरणाचें सरसहा दूषण लादणें, हें फार अविचाराचें साहस आहे. अशा प्रकारें एकाद्या वर्गाविषयीं व्यापक विधान करण्याची ज्यांस चट लागली आहे, ते टीकाकार अंतीं तोंडघशीं पडल्याशिवाय बहुधा रहात नसतात. सर्व हिंदू लोकांना सरसहा असत्यप्रिय ठरविणाऱ्या लोकांपेक्षां वरील आक्षेपकांची स्थिति विवेकबुद्धिसंबंधीं जास्त आशाजनक आहे, असें आम्हांस तरी वाटत नाहीं.

( इ ) या आक्षेपाचा पहिल्या कलमांत विचार झालेला आहे.

( ई ) या आक्षेपाची वरील ( आ ) आक्षेपाप्रमाणेंच वाट लावली पाहिजे.

( उ ) ‘ हल्लींचे कवी मेलेल्या बायकोसाठीं रडतात, ’ हा आक्षेप वाचून आम्हांस तर केवळ हंसूं येतें व या टीकाकारांची काव्यासंबंधीं कल्पना तरी काय असेल याची खास अटकळ होत नाहीं, पण ती कल्पना कांहींही असली, तरी ती असबद्धपणा, अप्रयोजकपणा, इत्यादि अनेक दोषांनीं व्याप्त असली पाहिजे, अशी आम्हांला खात्री वाटते. कांकीं मेलेल्या बायकोसाठीं रडणें, हें जर कवित्वाला बाधक असेल, तर वाल्मीकिव्यासांपासून तों लेंभेभांडाऱ्यांपर्यंत दरोबस्त कवींपैकीं कोणीही या

दोषांतून सुटून उपरिनिर्दिष्ट टीकाकारांच्या कंपूच्या कविकसोटीला उतरेल असें वाटत नाहीं. रामराजाला सीतेसाठीं रडविणारा वाल्मीकि, अजराजाला इंदुमतीस्तव शोक करूं लावणारा कालिदास, विधुराचा विलापरव ठविणारा जगन्नाथपंडित, नलदमयंती. आणि हरिश्चंद्र—तारामती यांच्या दु:खालापानें रसिकाचें अंत:करण द्रववून टाकणारा मुक्तेश्वर, इत्यादि सर्व कवि जर याच कृतींनीं कवित्वपदाला लायक ठरतात, तर बिचाऱ्या अर्वाचीन कवींवरच ' शोकावर्त, ' ' सखीसंस्मृति, ' ' शोकक्षोभ, ' ' विलापलहरी ' इत्यादि काव्यें रचल्याबद्दल आग कां पाखडण्यांत यावी, हें आम्हांस समजत नाहीं.

( ऊ ) हा आक्षेप ज्या वेळेस अर्वाचीन कवींवर घेण्यांत येतो, त्यावेळीं प्राय: ' प्रसाद ' हा शब्द संदिग्ध रीतीनें योजलेला आढळतो. काव्यासंबंधीं ' प्रसाद ' हा शब्द योजिला असतां, त्याचा साहित्य शास्त्रांत ' रचनेचा सरळपणा, सुबोधता ' असा अर्थ होतो. या अर्थानें हा शब्द योजिला असतां, अर्वाचीन कवींसंबंधीं या बाबतींत प्राचीन कवींहून विशेष तक्रार करण्यास मुळींच जागा नाहीं, हें प्रस्तुत पुस्तकाचीं पानें चाळणाऱ्यांच्या प्रत्यक्ष अनुभवास येईल.

परंतु पूर्वकवींसंबंधें ' प्रसाद ' शब्द योजिला असतां, त्याचा अर्थ ' ईश्वरी प्रसाद ' ' ईश्वरी स्फूर्ति ' असा करण्याचा टीकाकारांचा सामान्यत: रोख आढळतो. पण हा अर्थ घेतला म्हणजे ' प्रसाद ' व ' प्रतिभा ' यांत वस्तुत: कांहींच भेद रहात नाहीं. मग प्राचीन कवींची प्रतिभा तेवढी ईश्वरनिर्मित व अर्वाचीन कवींची ईश्वरनिर्मित नाहीं, अशी अद्भुत कल्पना या टीकाकारांच्या माथ्यांत कशी भरली, याचें आम्हांस राहून राहून नवल वाटतें. आतां काव्यप्रतिभा सर्व कवींची सारखीच उज्ज्वल असते, असें नाहीं. जसे पूर्वीं प्रतिभावान् कवि होते, तसे ते हल्लींही आहेत; याची साक्ष प्रस्तुत पुस्तकच देत आहे. प्रतिभा हा कांहीं तागडींत घालून मोजतां येणारा पदार्थ नाहीं. तो रसिकानें केवळ अंतरंगानें ओळखावयाचा आहे. तरी अर्वाचीन कवींत प्रतिभाच नाहीं, अशी ज्या अभागी प्राण्यानें आपली

ठाम समजूत करून घेतली असेल त्याची तद्विरुद्ध खात्री करून देणें ब्रह्मदेवाच्याही हातून घडणें नाहीं. परंतु

' पुराणमित्येव न साधु सर्वं
नचापि काव्यं नवमित्यवद्यम् , '

या कालीदासोक्तीला हृदयांत वागवून, प्रतिभेचें डबोलें सर्वस्वीच पुराणकवींनीं लांबविलें नसून, त्याचा वारसा अर्वाचीन कवींकडे आला आहे, अशा भावनेनें अर्वाचीन काव्यें वाचण्यांत येतील तर सांप्रतचें काव्यसृष्टीचें स्वरूप आपण मानितों त्याहून फार भिन्न आहे, असें या अर्वाचीन-काव्य-दूषकांस आढळून येईल. ' महाराष्ट्रकवि, ' ' प्रभात, ' ' काव्यसंग्रह, ' वगैरे प्राचीन कवींचा उद्धार करणाऱ्या मासिकांतून प्रसिद्ध झालेल्या प्राचीन कवींच्या कृति पाहिल्या, तर केवळ हाताच्या बोटांवर मोजतां येतील एवढ्या लोकप्रसिद्ध कवींना बाजूस ठेविलें, तर इतर केवळ पानांच्या भरतीला घेतलेले प्राचीन कवि किती नीरस व प्रतिभाशून्य आहेत, हें आपल्या सहज प्रत्ययास येईल. मग असा प्रकार प्रत्यक्ष नजरेपुढें असतांना, सरसहा प्राचीनांची स्तुति व सरसहा अर्वाचीनांची निंदा करणें, हें न्यायदेवतेला रुचावें तरी कसें?

( ऋ ) वरील आक्षेपाप्रमाणेंच या आक्षेपांतील ' महाकवि ' हा शब्द संदिग्ध आहे. ' महाकाव्य ' हा एक संस्कृत साहित्य शास्त्रांतील पारिभाषिक शब्द आहे. तेव्हां ' महाकवि ' म्हणजे ' महाकाव्या ' चा कर्ता असा असेल, तर ' महाकाव्याचीं लक्षणें ज्यांस लागू पडतात, अशीं काव्यें अर्वाचीन कवींनीं रचलेलीं आहेत. ' यशवंतराय महाकाव्य, ' ' भट्टवंशकाव्य, ' ' राजा शिवाजी, ' 'फडणीस काव्य,' ' छत्रपति शिवाजी-महाराज काव्य, ' वगैरे काव्यांचे कर्ते ' महाकवि ' या पारिभाषिक पदाला पात्र होतील. महाकवि म्हणजे प्रतिभावान् कवि, इतकाच अर्थ घेणें असेल, तर हल्लींच्या स्फुटकाव्यें रचणाऱ्या कवींनाही महाकवि म्हणण्यास हरकत नसावी.

( ॠ ) ' अर्वाचीन कवी भांडखोर आहेत, म्हणून त्यांचें काव्य सरस होणें नाहीं, ' हा आक्षेप फारच विक्षिप्त डोक्यांतून बाहेर पडला असला

पाहिजे. सर्वजणांचें एकमत झाल्याशिवाय उत्तम काव्य निपजूं शकत नाहीं, हें प्रमेय अद्‌भुत व असत्य आहे. आंग्ल कवि ड्रायडन, मिलटन्, पोप, गोल्डस्मिथ्, टेनिसन, स्कॉट, बायरन्, इत्यादिकांचीं चरित्रें व काव्यें वाचलीं म्हणजे वरील आक्षेप किती वेडगळपणाचा आहे, हें सहज ध्यानांत येतें.

४. प्राचीन कवींच्या काव्यांचें धोरण, स्वरूप व योग्यता, हीं समजण्याला कै० रा० परशुरामपंत गोडबोले यांनीं ‘ नवनीत ’ तयार केलें. अर्वाचीन काव्यांची ओळख करून देणारें पुस्तक मात्र अद्याप फारसें नजरेस पडत नाहीं. ग्रंथप्रसारक व संपादक मंडळीनें ( बडोदें ) ‘ अर्वाचीन कविता, भाग १ ला ’ म्हणून एक पुस्तक छापिलें आहे. परंतु त्यांत केवळ वीसएक कवींचाच समावेश झाला आहे; आणि त्यांतील बरेच ‘ शास्त्री ’ कविवर्गांतील ’ असल्यामुळें, ‘ अर्वाचीन ’ शब्दानें सामान्यत: ज्यांचा बोध होतो, त्या कवींचा त्या पुस्तकांत फारसा मागमूसही लागत नाहीं, मग ओळख पटणें दूरच राहिलें. तरी या अर्वाचीन कविवर्गाची कृति ठळक रीतीनें लोकांपुढें यावी व तिची खरी योग्यता नजरेंत भरावी, या हेतूनें हें पुस्तक प्रसिद्ध करण्यांत येत आहे. तो हेतु पूर्णपणें सफळ होवो, इतकेंच जगन्नियंत्याजवळ मागणें आहे.

मुरुड–जंजिरा,
२३–८–०७.

**बाळकृष्ण अनंत भिडे.**

# पुस्तककर्त्यांचे दोन शब्द.

कै. कृष्णशास्त्री चिपळुणकरांपासून आलीकडच्या कवींच्या प्रसिद्ध व अप्रसिद्ध कृतींतील निवडक व विशेषतः शालोपयोगी अशा वेंच्यांचा या पुस्तकांत संग्रह केला आहे. प्राचीन कवींच्या वेंच्यांचीं जीं पुस्तकें आज काल प्रसिद्ध आहेत, त्यांशीं विरोध किंवा स्पर्धा करण्याकरितां हा प्रयत्न नसून, प्राचीन कवींचा काव्यविषया-संबंधानें जो एक-देशीयपणा आहे तो कालदेशपरिस्थित्यनुरूप घालविणें इष्ट वाटल्या-वरून त्या पुस्तकांना केवळ जोड म्हणून हें पुस्तक तयार केलें आहे. यांतील विषयांचें विविधत्व व रचना हीं पाहिलीं म्हणजे हें पुस्तक Golden Treasury किंवा Words From the Poets वगैरे इंग्रजी भाषेंतील पुस्तकांच्या धर्तीवर तयार करण्याचा प्रयत्न केला आहे असें रसिक वाचकांच्या लक्षांत येईल. 'आर्वाचीन कवि' एवढे शब्द ऐकल्याबरोबर नाक न मुरडतां निर्मल व अकलुषित मनानें, सहृदयतेनें, व उदार अतःकरणानें पुढील उतारे लक्ष्यपूर्वक वाचावे व मग आर्वाचीन कवींसंबंधानें आपलें मत बनवावें, इतकीच सहृदय, विद्वान्, रसिक व मर्मज्ञ वाचकांस आमची नम्र पण आग्रहाची विनंति आहे. यांतील उतारे इंग्रजी शाळेंत पहिल्या इयत्तेपासून सातव्या इयत्तेपर्यंत पुरतील व चालतील अशा दृष्टीनें त्यांची निवड केलेली आहे. प्रयत्न नवीन आहे; विद्वानांस तो रुचो, इतकीच आम्ही आशा करितों.

आमच्या नम्र विनंतीस मान देऊन सध्याचे 'काव्यसंग्रहाचे' विद्वान् संपादक, आर्वाचीन प्रमुख कवींपैकीं एक कवि--रा. रा. बाळकृष्ण अनंत भिडे यांनीं प्रस्तुत पुस्तकास आपल्या विद्वत्तेस साजेशी सुंदर, विस्तृत

व विचारपरिप्लुत अशी प्रस्तावना जोडून आमच्या अल्प कृतीस एक प्रकारचें विशेष महत्व आणलें आहे. त्यांच्या या लेखामुळेंच पुस्तक लोकादरास जास्त पात्र होईल अशी आमची खात्री आहे. तेव्हां रा. भिडे यांनीं आपला अमोल वेळ खर्च करून उदार मनानें आमची उत्कट हौस पुरविली याबद्दल आम्ही त्यांचे फार आभारी आहों. ज्या ज्या कवींचे आम्ही उतारे घेतले आहेत त्यांची त्यांची परवानगी बहुतेक आम्हीं घेतलीच आहे. त्यांतून कोणाची नजरचुकीनें घेणें राहिली असल्यास ते बालशिक्षणासारख्या पवित्र कार्याकडे लक्ष्य देऊन, आम्हांला क्षमा करतील अशी आमची खात्री आहे. कवींचीं चरित्रें जोडण्याचा हेतु फार होता—कांहींचीं आणविलींही होतीं—परंतु सर्वांचीं उपलब्ध न झाल्यामुळें मोठ्या नाखुषीनें तो बेत आयत्या वेळीं सोडून देणें भाग पडलें. पुढील आवृत्तीचा सुयोग आल्यास तसें करण्याचें मनांत आहे. सर्व कवींनीं मोठ्या उत्साहानें व हौसेनें आम्हांला साहाय्य केल्याबद्दल आम्ही त्यांचे फार ऋणी आहों.

रा. रा. म्यानेजर चित्रशाळा, रा. रा. रामचंद्र भिकाजी जोशी शिक्षक न्यु इं. स्कूल पुणें, रा. रा. भिकाजी विठ्ठल महाजन शिक्षक नवीन मराठी शाळा पुणें, या तिघांनीं आम्हांला वाचनपाठमाला भाग १ ला या पुस्तकाचे बाबतींत जसें बिनमोल साहाय्य केलें—त्याचा विस्तारानें उल्लेख त्या पुस्तकाचे प्रस्तावनेंत आहेच—तसेंच याही पुस्तकाचे वेळीं केल्यामुळेंच आज हें पुस्तक जगापुढें येत आहे. त्यांचे आभार कसे मानावे हेंच आम्हांस समजत नाहीं.

पुणें,<br>
ता. १० आक्टोबर १९०७ } कर्ते.

# अनुक्रमणिका.


| विषय | पृष्ठ |
|---|---|
| ंगलाचरण | १ |
| ंगलाचरण | १ |
| शरतवन | ३ |
| संतकाल | ४ |
| ीष्मकाल | ८ |
| र्षाकाल | १३ |
| त्काल | १६ |
| काल | १९ |
| शि[illegible]रकाल | २३ |
| सूर्योदय | २५ |
| प्रातःकाल | २६ |
| माध्यान्हकाळ | २९ |
| ंध्याकाळ | ३१ |
| सायंकाळ | ३३ |
| चंद्रोदय | ३५ |
| मध्यरात्र | ३७ |
| [illegible]-आणि काजवा | ३८ |
| [illegible]ाद्रि | ४० |
| हिमालय | ४२ |
| ाईचीं फुलें | ५० |
| माधवीचें पुष्प | ५१ |
| [illegible]ांपासून उपदेश | ५२ |
| [illegible]वृक्षास | ५३ |
| मुद्र | ५५ |
| समुद्र शांत असतां त्याचा देखावा | ५८ |
| तुफान | ५८ |
| गजान्योक्ति | ६३ |
| हरिणोन्योक्ति | ६४ |
| वृक्षान्योक्ति | ६६ |
| सूर्यान्योक्ति | ६७ |
| चंद्राविषयीं अन्योक्ति | ६८ |
| कुंजकूजन | ६९ |
| काळ आणि दुष्काळ | ७७ |
| एका दुःखी पक्ष्याचा वृत्तांत | ८० |
| कराल करवाल | ८२ |
| वीरमती द्रौपदी | ८९ |
| विदुलापुत्रानुशासन | ९९ |
| कुबडीतीर्थ | ११६ |
| महाश्वेतेची कथा | ११९ |
| पानपतचें युद्ध | १२८ |
| भीमकर्मा राघोबा | १३२ |
| दुर्योधनास अर्जुनाचा जबाब | १३९ |
| आंबा आणि बाभुळ | १४३ |
| आश्रम | १४५ |
| साऱ्या जगांत फुलेंच फुलें | १४७ |
| भेपपेषण | १४८ |
| जरठविलास | १५३ |

| | |
|---|---|
| मूर्तिकार | १५६ |
| शिविसौहार्द | १५८ |
| एका पुष्पाच्या नाशावर | १६८ |
| दिवाळी | १७० |
| ऐक्य | १७४ |
| अमरत्व | १७६ |
| जीवितकर्तव्य | १७६ |
| यमाशीं गांठ | १७८ |
| दीपविसर्जन | १७९ |
| मेघराजास नोटीस | १८१ |
| बालविधवा | १८५ |
| तुतारी | १८९ |
| सांत्वन | १९२ |
| स्फुट अभंग | १९३ |
| ऐतिहासिक बोध | १९५ |
| पक्क पंडित | १९६ |
| मूर्तिभंजन | २०२ |
| दया | २०३ |
| मित्रा विहंगा | २०३ |
| माशांची तरुणीस विनंति | २०५ |
| शोकक्षोभ | २०७ |
| परमेश्वराची पूजा | २१४ |
| इंद्रधनुष्य | २१९ |
| जाळ्यांत सांपडलेला मासा धीवरास म्हणतो | २११ |
| स्वप्न | २२३ |
| पुराणनीतिमाला | २२५ |
| घनाभिनंदन | २२९ |
| प्रश्नोत्तरमाला | २३० |
| प्रमाण | २३ |
| स्वप्नांत पाहिलेलें शारदामंदिर | २३ |
| प्रियविषयक वस्तु लोपल्यावर | २ |
| शारदेची प्रार्थना | २ |
| वृक्षोपदेश | २३ |
| कृपणाचें स्वप्न | २४ |
| मातृप्रेम | २५ |
| एका स्त्रीपुत्रशोकाकुल गृहस्थाच्या सांत्वनार्थ के. अभंग | २ |
| बंधच्छेदन आणि शंकराचार्यांस विनंति | २ |
| सह्याद्रिवर्णन | २ |
| दु:खच सुखाचें मूळ | २ |
| प्रेम | २५ |
| जुनें मत आणि नवें मत संवाद | २५ |
| सांदिपनाचा शिष्यत्रयीस उपदेश | २६ |
| श्रीछत्रपति शिवाजी महाराज काव्य, विश्वासराय | २६ |
| स्फुटप्रकरण | २७ |
| वस्तुनिर्देश | २ |
| शनवारचा वाडा | २७ |
| बोधचषक | २८ |
| चंद्रावरील कलंक | २९ |
| मार्कंडेयोपदेश | २९ |
| कन्या | २९ |
| पद्यमंजुषा | २ |

| | |
|---|---|
| विरत्न परलोकवासी कृष्णाजी केशव दामले | २९६ |
| कुलेल्या भटकणाराचें गाणें | २९७ |
| ्चा उपदेश | २९८ |
| ात्ताप | ३०० |
| संदेश | ३०४ |
| ानासाहेब पेशव्यांचा शेवटचा विलाप | ३०८ |
| ीमाहात्म्य | ३०९ |
| कसा असावा | ३१० |
| ाकुमारीचें आईस उत्तर | ३१२ |
| ंगजेबाचा शेवटचा विलाप | ३१३ |
| वर्णाचा महिमा | ३१४ |
| त्तवियोग | ३१६ |
| केल्याची खबरदारी | ३२० |
| द्राजित स्वपत्नीसह, युद्धास ार्ण्यापूर्वी मंदोदरीस भेटतो | ३२३ |
| ण्याची सद्यःस्थिति | ३२५ |
| वितेचें प्रयोजन | ३२७ |
| किमणीपत्रिका | ३२७ |
| घोबादादा व अहल्याबाई | ३३० |
| व्यदेवीची प्रार्थना | ३३१ |
| क स्त्री आपल्या बागेंतील वृक्षांस सोडून जातांना त्यांचा निरोप घेते | ३३३ |
| चंडालास उद्देशून | ३३५ |
| खरा मित्र | ६३६ |
| संक्रांतीची भेट | ३३७ |
| इंदिरा व चंद्रकेतू | ३३८ |
| निजाम व रावबाजीची भेट | ३४१ |
| पतिव्रतामाहात्म्य | ३४२ |
| दसरा | ३४४ |
| ईशस्तवन | ३४६ |
| प्रीती निमाली तर | ३४७ |
| सवाईमाधवरावांचा मृत्यु | ३४८ |
| मूर्खांचीं लक्षणें | ३४९ |
| कवीची कविता | ३५० |
| भक्ति | ३५१ |
| मंथरा कैकयीचें मन वळविते. | ३५३ |
| स्मशानशांतता | ३५५ |
| सुजनता असो मोहिनीपरी | ३५५ |
| मृतवसंत | ३५७ |
| मृत्यु | ३६८ |
| नदी | ३६० |
| तमाखु | ३६१ |
| स्मृतिचित्र | ३६२ |
| हिमालयवर्णन | ३६३ |

# काव्यदोहन.

—— ०❋० ——

## १ मंगलाचरण.

शार्दूलः—सांगोपांग समस्त वेद थकले योगी महा भागले
ब्रह्मा विष्णु महेश जिष्णु[1] शिणले देवाग्रणीही भले
ज्याचा अंत अनंत गोचर परी झाला नसे त्यांप्रती
भावें त्या करितों परात्परपदा आनंद-कंदा नती. ॥ १ ॥

मालिनीः—अणुहुनि अणु वाटे तेंवि मोठ्यांत मोठें
न यदधिगमशून्य[2] स्थान विश्वांत कोठें
अनुदय[3] अविनाशी त्या अगम्यस्वरूपा
नमन करितसें मी सच्चिदानंदरूपा. ॥ २ ॥

राधारमण.

## २ मंगलाचरण.

शार्दूलः—ज्याचीं पादरजें सदा सुखविती ब्रह्मादि ज्या सेविती,
ज्यातें आठवितां क्षणें निरसती त्या विघ्नराशी किती;
भावें भाविक भक्त ज्यासि नमिती तैं कार्य आरंभिती,
ज्याचें मंगल नाम हो गणपती मी वंदितों त्याप्रती ॥ १ ॥

प्रार्थोनी तुज मागतों, शिवसुता! विघ्नें लया पाववीं,
माझीया वदनें रसाळ चरितें तूं मोरया गाववीं;

---

१ इंद्र २ ज्याच्या अस्तित्वावांचून ३ अनादि.

भ्रांतीतें निरसोनियां सकलही दे स्फूर्ति ह्या बुद्धिला,
हेतू जो धरिला मदीय मतिनें तो पाववीं सिद्धिला ॥ २ ॥

वसंतति०:—जें कां करूं नच शकें अजि तें कराया,
घे धांव हा जडमती जगदेकराया,
व्हावा प्रसाद शरणागत किंकरातें,
लावीं प्रभो ! धरुनियां सुपथीं करातें. ॥ ३ ॥

आर्या—आतां सरस्वती मी करितों जोडून हात तुज नमन,
वद काव्य मन्मुखानें कीं जें बहु रंजवील सुजन-मन. ॥ ४ ॥
निर्भय तवाश्रयें कवि करिती वर्गार्णवांत केलीला,
विधिहरिहरासहि तुझी नकळे त्रैलोक्यचालके ! लीला. ॥ ५ ॥

वसंतति०:—वेदादिकांहि न तुझा गुणपार लागे,
तो पामरास तरि देवि कसा मला गे;
जीचा अतर्क्य महिमा त्रिजगीं न माये,
त्या वर्णवेल तुजला मज केविं माये ! ॥ ६ ॥
मागे धरोनि बहु छंद न ये करा तें,
स्नेहाळ माय पुरवी तरि लेंकरातें;
माझ्या तसेंचि पुरवोनि मनोरथांतें,
माते ! मुखें सुरस गे वदवीं कथांतें. ॥ ७ ॥

आर्याः—कर जोडुनियां माझें सकळांही सज्जनां असो नमन,
काय उणें मज आतां लीन तयांच्या पदीं असोन मन! ॥८॥

भुजंगप्र०:—अहो प्रास विप्रास ह्या साह्य आतां,
करा येउनी ह्या चरित्रास गातां;
बहु त्रास मित्रांस होतो तुम्हांतें,
परी अन्यथा कार्य साधे न मातें. ॥ ९ ॥

जरी कां म्हणां आमुचें काम नाहीं,
कशी सिद्धिला पावते कामना ही!
तुम्हीं साह्य केलें तया वामनाला,
तसा तूमच्या हाहि यावा मनाला. ॥ १० ॥

शि. रा. नित्सुरे.

## ३ ईशस्तवन.

पृथ्वीः—अशेषजगदुद्भवस्थितिलयाचिया हेतुला,
असो नमन सर्वदा भव शमावया हें तुला,
सदा करिति माधवा तव पदाब्ज भक्तीस जे,
तयांस वरण्यास ती करुनि हार मुक्ती सजे. ॥ १ ॥
चतुर्विध पुमर्थही[1] तव पदांबुजीं वागती,
भवें परम तापल्या तव पदांबु जीवा गती.
तुला भजति त्यांचिया पुरविशी वरा कामना,
गमे मग तयांचिया सुराभिही वरांका[2] मना ॥ २ ॥
तुझी परम शोभते त्रिभुवनीं यशोभारती[3],
गमे मज तिच्यापुढें विगतकायशोभा रती;
म्हणूनि तुझिया यशा विबुध गाति कुंदाऽमला,
कृतार्थ करिं उद्धरीं झडकरी मुकुंदा मला. ॥ ३ ॥
महर्षि तुज अर्पिती करुन यज्ञ देवांऽऽसवा[4],
छळें तव विमूढता गुरु नयज्ञ दे वासवा[5].
प्रभो! लवहि दर्प तूं तुरविला नगांऽरातिचा;
अचिंत्य कृति ही तुझी निगम हा नगारा तिचा. ॥ ४ ॥
तुझ्या मनुज चिंतनें तरु जसा वसंताऽऽगमें,
सतेज दिसतो विभो! म्हणनि तोच संतां गमे.

---

१ पुरुषार्थ. २ तुच्छ. ३ वाणी. ४ चकचकणारी दारू. ५ इंद्र.

जसा असमि तूं प्रभो! सतत भक्तवृंदाऽवेनीं,
तसा न रविनंदिनीपुलिनिं सक्त वृंदावनीं. ॥ ५ ॥

तुला असुर पाहतां बहु गदाधरा कांपती,
स्वदासकुमुदांस तूं गमसि नित्य राकोपती.
तुवां पतित तारिले जन अनेक राधावरें,
बुडे भवजलांत हा करिं विभो! त्वरा धांवरे. ॥ ६ ॥

अगा भवचिकित्सका! मनुज काय हा नाडिला!
प्रभो! भवगदार्त्त हा निजकरें पहा नाडिला;
हतें लवहि अर्थ म्यां बत न आपुला साधिला,
भवामय हरी, करीं, अगद तूं मला साधिला. ॥ ७ ॥

मला नवल वाटतें, मम तनू गदें वांकली,
तथापि मम मानसा करि सराग देवा! कली!
कधीं त्रिविध ताप हा मम असह्य देवा! सरे?
कृपा करुनि आपुल्या मज पदाब्जिं दे वास रे. ॥ ८ ॥

**ना० धों० खांडेकर.**

## ४ वसंतकाल. ( नर्मदातीरावरील )

श्लोकः—शीतासवें शिशिर, सोडुनि विश्व जाई
शौर्यें वसंतनृप सर्वहि राज्य घेई
पर्णें गळूनि, नव कोमल पल्लवांच्या
वृक्षीं ध्वजा फडकल्या मधुराज याच्या. ॥ १ ॥

आधीं फुले बकुल, नंतर मोतियाही
त्याच क्रमें कनकचंपक फुल्ल होई

१ रक्षणीं २ चंद्र. ३ भवरोग. ४ आधिग्रस्तास.

तो पारिजात करि मौक्तिक पोवळ्याचा—
वर्षाव; दे, फुलुनि गंध, गुलाब साचा. ॥ २ ॥

हे दोहदाविण अशोकहि फुल्ल झाले
जाणों वसंतयश निर्मळ तें उदेलें
झाले पलाशतरु रक्तचि कुड्मलांहीं
पुष्पोद्भवें नटुनि सज्ज वसंत होई. ॥ ३ ॥

वायु स्वयें शिरुनियां वेनवंश—रंध्रीं[1]
वाद्यें सुमंगलाचि वाजवि मोदकारी
गुंजारवें भ्रमर गुंगुनि त्यांसवें ते
झाले विशंक नृपवादकें[2] मोददाते. ॥ ४ ॥

मंजुस्वनें पिक न, भाटचि या नृपाचे
स्वारींमधें फिरती गात यशासि साचे
ही सारिका मधुर गान करूं निघाली
झाले मयूर नटनर्तक याचि कालीं. ॥ ५ ॥

पुष्पान्विता नवलता[3] जणुं पौरनारी
पुष्पांजली उधळिती झणिं भद्रकारी
जो झोंकिला सुरभि दिव्य पराग त्यांहीं[4]
तेणेंचि राजपंथ[5] रंजित होय पाहीं. ॥ ६ ॥

ऐसा वसंत, तरुणी—प्रिय—मित्र आला
रेवा[6]—प्रदेश अवघा रमणीय झाला
आरक्त—कोमल—दलान्वित वृक्षमाला
शोभे बहू धवल पर्वतमालिकेला[7]. ॥ ७ ॥

---

१ वांबूच्या छिद्रांत. २ वसंत राजाचे वाजंत्रे भृंग. ३ लता ह्याच नारी.
४ लतांनीं. ५ वसंत राजाचा मार्ग. ६ नर्मदाप्रदेश. ७ पर्वताची रांग.

एकीकडे हरितवर्ण धरा विराजे !
एकीकडे धवल—पर्वतपंक्ति साजे !
एकीकडे क्षितिज, भव्य नभोङ्गणान्तीं !
एकीकडे सुरनदीपरि नर्मदा ती. ॥ ८ ॥

तें तीर दूरवर जें हिरवें विराजे
त्याच्यावरी चमकुनी दंव फार साजे
छाया[1]चि पैल विलसे नव पल्लवांची
वाहे अगाध, मधुनी सरिता सुखाची. ॥ ९ ॥

एकीकडे झुळझुळां कुरणांत वाहे
ओढा; जिथें हरित शैवल शोभताहे
एकीकडे विलसते घन आंबराई
वारोनि ताप, पथिकां बहु सौख्य देई. ॥ १० ॥

वत्सांसवें तरुतळीं बसल्याचि गाई
हें देखुनी निज सख्यां[2]सह गोप गाई
आनंदल्या प्रियसख्या[3] मुरलीरवानें
होई, न कोण वश ? मंजुळ भाषणानें. ॥ ११ ॥

एकीकडे वरिवरी स्मर[4]सारिका ते
उच्चस्वरें करुनि मंजुळ गान गाते
त्याच स्वनें मधुर कुक्कु[5]टकुंभ गाई
नीलांबरामधुनि सोडुनि नाद देई. ॥ १२ ॥

एकीकडे सहज वाहुनि मंदमंद
देहास दे सुरभि दक्षिणवात मोद

---

१ नदींत पडलली छाया. २ मित्रासह. ३ गाई. ४ मदनसारिका. ५ भारद्वाज.

एकीकडे रव मनोहर मक्षिकांचे ?
भोक्त्यांसि या बकुनिया मकरंद नाचे. ॥ १३ ॥

रंगेल माधव, फुलांप्रति रंग नाना-
दे; तत्सुगंध करि लोल पुरांगनांना
त्या चित्रवर्णकुसुमान्वितमंडपान्तीं
संकेतकेलि करिते वनदेवता ती. ॥ १४ ॥

घ्याया मरंद, फिरती फुलपांखरें तीं
ते चित्रवर्ण वनु देखुनि नेत्र धाती
पुष्पांजलीच जणुं अर्पियली वसंतें
प्रेमोद्गमेंकरुनि ही वनदेवतेतें. ॥ १५ ॥

जो दे पिकां मधुरकूजित मोदकारी
जें ऐकतां मदनबाण शिरे शरीरीं
जो सौरभें सुचवि, होय वसंत भेटी
नांदे असा रुचिर मोहर आम्रवाटीं. ॥ १६ ॥

प्रेमोद्गमेंकरुनिया नव हेमवल्ली
आलिंगुनी बकुलनायक, धन्य झाली
गुंजारवें, मधुर मंगल कूजितोनें
हे दंपती हितगुजा करितीच जाणे. ॥ १७ ॥

**विठ्ठल भगवंत लेंभे.**

---

१ मधुमक्षिका २ हेमवल्ली ही नायिका. ३ बकूल हा नायक. ४ गुंजारव हा मल्लिकेचा शब्द. ५ कूजित हा बकुलाचा शब्द.

## ५ ग्रीष्मकाळ.

आफ्रिकेंत गेलेल्या एका मित्रानें कोंकणांतील ऋतुमानवृत्त विचारल्यावरून त्यास कवीनें पाठविलेलें उत्तरः––

उपजातिः—मार्गस्थ होतां मधुमासलीला
निदाघ[१]लक्ष्मी वरि तत्पदाला
मित्रा, तिचें मी अवतारवृत्त
यथामती वर्णिन देइं चित्त. ॥ १ ॥
उच्चण्डता भास्करमण्डलाची
भासे जनांना परमावधीची
बाटे करांनीं ज्वलदाग्निधूली
पेरी मही-मंडलिं रश्मिमाली. ॥ २ ॥
जसा जसा उच्च चढे पदाला
तसा तसा निष्ठुर मित्र[२] झाला
सहस्र[३]पादें करितो प्रहार
म्हणूनि तापे जणुं भूमिगोल. ॥ ३ ॥
घर्म[४]व्यथा—व्याकुल—मंदवेग
निःशंक झाले रविचे तुरंग
लागे कसा संप्रति त्यांस वेळ
आकाशमार्ग क्रमण्या समूळ. ॥ ४ ॥
अदृश्य कीं लोळ हुताशनाचे
निश्वास कीं तप्तमहीमुखींचे
फूत्कार कीं ग्रीष्म-भुजंगमाचे
वारे नभीं वाहति चंड साचे. ॥ ५ ॥

---

१ ग्रीष्म. २ सूर्य पक्षीं सोबती. ३ किरण पक्षीं पाय. ४ उष्णता.

संतप्त धूली पवन–प्रकीर्णा
दाही दिशा धुंद करी विवर्णा
पांथस्थचक्षुःकुमुदावलीला
झोंबे जशी सूर्यमयूखलीला ॥ ६ ॥
करी तमारी[1] जणुं जातशोष
जलाशयीं जीवन नामशेष
तदीयनाशें जलजंतुमाला
सुदीन होई वश अंतकाला ॥ ७ ॥
सह्याद्रिचे दुर्गम घोर रानीं
मध्यान्हकालीं भडके दवाग्नी
विकर्तन[2] क्रूर-कराल-काय
जाळावया सिद्ध जगास काय! ॥ ८ ॥
पक्षी पशू वृक्ष लता अनेक
भक्षी शिखी एकसरें विशंक
कृष्णस्वरूपाकुल-भूमि-भागें
दुष्कीर्ति ठेवी जणुं पाठिमागें ॥ ९ ॥
महा प्रजापीडक जेंवि भूप
देई जनां ग्रीष्म असह्य ताप
स्वकीय–पीडा–परिहार–पात्र
मेघाकडे लाविति ते स्वनेत्र ॥ १० ॥
तमीं कुलें उज्वल काजव्यांचीं
चकाकती जेंवि फुलें नळ्यांचीं
वर्षर्तुचे होउनि अग्रदूत
जनां निदाघातुर धीर देत ॥ ११ ॥

१ सूर्य. २ अग्नि.

अश्वत्थ जोडी नव पत्रलीला
संक्षुब्धता भेटत सागराला
वारा सुटे दक्षिण सांगण्याला
" प्रस्थानशाली घनराज झाला " ॥ १२ ॥

*चालूनियां अंबुदकाल आला
घाला स्वसत्तेवरि घालण्याला
मार्गी कराया प्रतिरोध त्याला
मित्रा गमे ग्रीष्म तयार झाला ॥ १३ ॥

दोघे ऋतू हे रण-शूर योध
आकाशही संगर-भू अबाध
मेघ-ध्वनीनें करुनी सलामी
आरंभिती तुंबळ युद्ध नामी ॥ १४ ॥

सगर्जिता आक्रमितां नभाला
पयोदपंक्ती गमतें मनाला
तोफा रणीं सोडिति सत्य वीर
त्यांचा नभा व्यापित धूम्रपूर ॥ १५ ॥

कडाडणारी बहु मेघमाला
कठोर वर्षे करकांवलीला
मनांत येई गुलिका शिशाच्या
परस्परीं सोडिति वीर साच्या ॥ १६ ॥

---

* ग्रीष्म ऋतूचे महिने जेष्ठ व आषाढ. परंतु जेष्ठ महिना संपण्यापूर्वीच वर्षाऋतूस आरंभ होतो. ही वस्तुस्थिति लक्षांत आणून वर्षाकाल ग्रीष्मकालाचे सत्तेवर घाला घालतो, ग्रीष्म त्यास प्रतिकार करितो व दोघांचें युद्ध होतें इ० कल्पना केलेल्या आहेत. १ गारा.

दिव्य-प्रभा-भासुर-चंचलांगी
विद्युन्नटी नृत्य करी खरंगीं
खड्गास चक्रापरि भोंवळोनी
वाटे रणीं झुंजति वीर दोनी ॥ १७ ॥

संग्राम ऐसा घनघोर होई
कोणी न कोणा जणुं हार जाई
तेव्हां करीं इंद्रधनुष्य मेघ
घेई करी वृष्टि शेरें अमोघ ॥ १८ ॥

प्रत्यक्ष तेजोनिधि भास्कराचे
खंडीतसे जी कर चंड साचे
साहे मुळीं वृष्टि न ती तपाला
युद्धीं अकालीं विलयास गेला ॥ १९ ॥

नभस्तलीं अंबुद अंबुवर्षी
शोभे जयश्री-शुभ-संग-हर्षी
प्रसन्न होई जलसिक्तगात्री
ग्रीष्मोग्रतापाकुलभूतधात्री ॥ २० ॥

**द्रुतविलंबित:**—नवपयोधरचुंबित पर्वत
जलदकाल करी जणुं धूपित
सकल भूमितलीं अथवा कसा
सुरभि गंध सुटे मनमोहिसा ॥ २१ ॥

सलिलसंततिसिक्त तरूलता
धरिति निर्मल उज्वल रूपता

---

**१** पाणी, पक्षीं बाण. २ ग्रीष्मास. ३ आषाढ सरेपर्यंत ग्रीष्म **असावयाचा, पंरतु त्यापूर्वींच वर्षाकालास** आरंभ होतो म्हणून अकालीं.

नरकपूर्व चतुर्दशिचे दिनीं
समभिषिक्त जशा नरकामिनी ॥ २२ ॥

मुदितमानस मानव भूतल
करिति सीर-मुखोत्कषणाकुल
सतत संततिच्या करण्या हिता
जननि सोशिल ताप न कोणता ? ॥ २३ ॥

तृण-नवांकुर कोमल कोमल
करिति मंडित हें धरणीतल
घनजलें अभिषिक्त जणूं मही
हरितवस्त्र करी परिधान ही ॥ २४ ॥

भुजंगप्रयातः—ध्वनी अंबुदाचा वनीं आयकोनी
करी नृत्यलीला शिखी मोद मानी
पयोदा जणूं भेटण्याला अनेक
मिळोनी नभीं उंच जाती बलाक ॥ २५ ॥

निदाघीं मुखा वासुनी प्रेतरूप
सख्या जाहला, तोच कासार कूप
मुखीं दिव्य ओती रसा मेघकाळ
तदा स्वीकरी जीवनाचा सुकाळ ॥ २६ ॥

मालिनीः—स्फटिकविमलतोया मालिका निर्झरांची
झुळ झुळ झुळ वाहे दृष्टि मोही जनांची
उपवर दुहितेला तेंवि शस्याश्रियेला
स्थळिं समुचित सिद्ध स्थापण्या लोक झाला ॥ २७ ॥

वसंततिलकाः—देशीं तुझ्या घडति ज्या शुचिकाललीला
त्या सांगण्या तुज यथामति यत्न केला

मित्रा, करीं सदयशील तयास मान्य
ही मागणी तुजसि मागतसें न अन्य ॥ २८ ॥

राधारमण.

## ६ वर्षाकाल.

वसंतति०:—हा मेघ आर्द्रमहिषोदरतुल्य काळा,
शंखाकृती धरि करांत बलाकमाळा;
विद्युत्प्रभा वसन पीत कसोनि हातें,
वाटे दुजा हरिच आक्रमितो नभातें ॥ १ ॥

आर्या:—माधवगात्रश्यामल शुभ्र-बलाका-समूह-रचित दर,
विद्युत्पीत-वसन हा शोभे अंभोद जेंवि चक्रधर ॥ २ ॥

ओवी:—मेघोदरांतूनि जलाच्या धारा, भूमीवरी पडती झरारा,
जैशा शुद्ध रजाच्या तारा, विद्युत्प्रकाशें झळकती ३।

शार्दूल०:—कांहीं हंस मयूर काक बकसे वेगें उडों पाहती,
कांहीं कांसव मीन नक्र सुसरी पाण्यामधें पोहती;
कांहीं पर्वत वृक्ष तुंग शिखरप्रासादसे दीसती,
वातें हालवितां नभीं घन असे नानाऽकृती शोभती ।४।
भासे कौरवराष्ट्रतुल्य नभ हें जें अंधकारा धरी,
हर्षानें बहु गर्जना करि शिखी दुर्योधनाचे परी;
द्यूतीं निर्जित धर्मसा पिक वनीं आला असे संप्रती,
गेले स्त्रीसह हंसपांडव तसे अज्ञातवासाप्रती ॥ ५ ॥

वसंतति०:—होऊनि शैलशिखरावरि लंबमान,
हे गर्जतात घन दुंदुभिच्या समान;
ऐकोनि शब्द उडती शिखि पक्षवातें,
कीं वीजिती मणिमयव्यजनीं नभातें ॥ ६ ॥

---

१ शंख. २ मोर, ३ वारा घालती.

शार्दूल:—धाराजर्जर दर्दुर प्रसरती पंकीं उड्या घालिती,
झाले मोर विमुक्त कंठ, फुललीं झाडें पहा डोलती;
साधूला खळ मंडळी तशिचही चंद्रास मेघावळी
झांकी ती कुलटे समान चपला राहे न एके स्थळीं ॥७॥

आर्या:—पवनचि जवन तुरग ज्या, जलमयधाराचि शस्त्रधारा ज्या,
ज्या स्तनित दुंदुभिध्वनि शोभे विद्युत् पताक ज्या राजा ८
तो मेघराज नेतो हरुनि नभीं करसमूह चंद्राचा,
राजा जसा स्वनगरा नेतो करभार अबल शत्रूचा ॥ ९ ॥

शार्दूल:—मेघीं आर्द्र तमालपत्रमलिनीं आकाश आच्छादिलें
बाणीं हस्तिस तेंवि वारुळशता धाराशतें भेदिलें;
शोभे वीज घनावरीहि, दिवटी प्रासादमाथां जशी,
चंद्राची हरिली प्रभा जलधरें स्त्री दुर्बलाची तशी.॥ १० ॥

साक्या:—ज्यांच्या पाठीवर बांधियले विद्युल्लेखा दोर,
धांवुनि धराधर हे खालीं धारा सोडिति थोर ॥ ११ ॥
जाणों हे गज शक्राज्ञेनें रजताच्या दोरांनीं,
ओढुनि नेती या पृथ्वीला वर अपुल्या जोरांनीं ॥ १२ ॥

शिखरिणी:—विजेच्या चापल्यें क्षुभित घन नीलाभ वळले,
महावातें अभ्यंतरिं उदधि जैसे खवळले,
तिहीं गंधोद्दामा हरिततृणसस्यांकुरवती,
असे केली धाराशरशतविदीर्णा वसुमती. ॥ १३ ॥

शार्दूल:—मोरांनीं बहु आदरें करुनि जो येये असा बाहिला,
वेगें जाउनि जो बलाकततिनें सोत्कंठ आलिंगिला;
हंसांनीं निजपंकजें त्यजुनियां त्रासोनि जो पाहिला,
तो हा मेघ दिशांस झांकित नभीं नीलांबरें राहिला ॥१४॥

ओव्याः—तारा गेल्या नाशाप्रती, जैशी दुर्जनावरी उपकृती ।
कांतावियुक्त युवती, तैशा भासती दशदिशा ॥ १५ ॥
पेटतां विद्युल्लताज्वलन, अंतरीं गेले संतापोन ।
वाटे विरघळलें गगन, जळरूपें पडतसे ॥ १६ ॥

आर्याः—उतरे चढेहि वर्षे गर्जे पाडी घनांधकारातें,
प्राप्तनवश्रीपुरुषापरि मेघ धरी अनेक रूपातें ॥ १७ ॥

उपजातिः—विद्युल्लतांनीं जळतेंच काय ?
धाराजळांनीं गळतेंच काय ?
बलाहकांनीं हंसतेंच काय ?
वायुभ्रमें निःश्वसतेंच काय ? ॥ १८ ॥

इंद्रवज्राः—मेघोदरा भेदुनियां निघाल्या,
पंकांतुनि जेंवि मृणालि आल्या;
धाराच चंद्रव्यसनें हजारा,
सोडीतसे हे दिव अश्रुधारा ॥ १९ ॥

आर्याः—सज्जन चित्त सुनिर्मळ विजयशरसमान कर्कशाकारा,
चंडानिलसंचोदित जलधर हे वर्षतात जलधारा ॥ २० ॥
सोडिति जलद जलाचे बिंदू बलरामवस्त्रसमकाय,
इंद्राच्या कोशांतिल घेउनि मुक्ताच टाकिती काय ॥ २१ ॥

अनुष्टुपः—तमालपिष्ट-नीलांनीं, मेघांनीं नभ लिंपिलें,
संसक्तशीतसुरभि वातांनीं उपजीविलें ॥ २२ ॥

ओवीः—विद्युज्जिव्हा लांबवूनी, जलधर हनुवटी खालवूनी ।
इंद्रचाप भुजा उभारोनी, जांभई देतें अंतरीक्ष ॥ २३ ॥

ताडावरी कर्कश शब्द होतो,
जळीं स्थळीं केवळ मंद हो तो;

जशा विण्याच्या झडतात तारा,
तालानुसारें पडतात धारा ॥ २४ ॥

**परशुराम तात्या गोडबोले.**

## ७. शरत्काल.

द्रुतवि०:—मळविलें गगनास जरी घनें, । शरद निर्मळ त्या करि ईक्षणें;
सुजनसंग घडे क्षण पामरा, । सकल सिद्धि तया वरिती नरा ॥ १ ॥
उडुसती युवती धरुनी करें । हळु हळू गगनीं विधु संचरे;
बघुनि त्यां न कळे मज,सुप्रभा । विधुस दे नभ वा विधु त्या नभा ॥२॥
विधु करें पसरी महि गौरता, । हिमवतासहि आणवि गौणता;
नच घडो वदना जणुं दृष्ट ते । म्हणुनि तो धरि काजळबोट तें ॥ ३ ॥
भगण बालगणापरि वाटतो, । अतिविशाल नभोंगणिं खेळतो,
तव विधूदय हो सहसा नभीं, । गळुनि तेज जणूं धरि चित्तिं भी ॥४॥
जणुं करी विधु जीवनरक्षण, । उधळिती भसुमेंच तरु क्षण;
उपकृती करि अल्पहि जो नर । स्मरति, कां न बहू करित्या नर ॥५॥
गढुळ फार मळें उदकाशय, । शरदिं त्यांतिल होय मळक्षय;
सुजनिं ये गमलें जरी आपदा । भिउनि ते पळते दुरि तत्पदा ॥ ६ ॥
उगवतां रवितेज नभीं भरें, । कमलिनी फुलती जगतीं भरें,
पतिस देखुनियां युवती जशी । अति मुदें डुलते सरसी तशी ॥ ७ ॥
भ्रमरसंघ रवा करुनी फिरे, । परि मनोरथ होति न ते पुरे;
स्वमनिं लोभ धरी अति जो जन। अणुहि तो लभतो कधिं तोष न ॥८॥
सरस तें गमतें नभ विस्तृत, । सुधवलें कमलें विधु शोभत,
भ्रमर तें मृगलांछन वाटतें, । करिप मेघ विधूप्रति झांकिते ॥ ९ ॥
रमति हंस तिथें दिनयामिनीं, । परि तिथें नच सौख्य बका मनीं;
सुजन सज्जन पाहुनि हर्षतो, । गमतसे कुजनां पविवर्ष तो ॥ १० ॥

पवन पद्मसुवास सुशीतल । सुखवितो पसरूनि महीतल;
अरुणशीं कमलें धवलें किती । फुलति तेथुनि नेत्र न हालती ॥११॥
करिप केलिसुखार्थ जलीं शिरे । कमलिनी गतवैभव तो शिरें;
पदिं करी, न शिवेहि विचार तो. । कृपण आत्महितासाचि देखतो ॥१२॥
पिकुनि धान्य मही नव शोभते, । बघुनि वर्ण बरा मन लोभतें;
उतरली अवनीवरि संपदा । अजि गमे हरली मनुजापदा ॥ १३ ॥
भरलि लोंब असे लवली, पहा, । अपुरि रिक्त धरीत मदा महा
शिकवि काय मही जणुं या मिषें । बहुत नाडियले नर या विषें ॥१४॥
सकल जीवगणा सुख दें सदा । अणु नसे परि वीट मनीं कदा;
भजक–भक्ति बघूनि जसा हरी, । भजक–दुःख तसेंच मही हरी ॥१५॥
बघुनि शालि सुपक्क चहूंकडे, । विहग धांवति लंघुनिही कडे;
वसति सान्निध लोक धनागमीं, । परि न पाहति ढुंकुनि निर्गमीं ॥१६॥
वसन पीत मही धरि नूतन, । कनक लज्जित त्या मनिं देखुन;
सुनवयौवनलब्धचि कामिनी । विहरते पतिशीं जणुं ती वनीं ॥ १७ ॥
फलभरें तरु आणिक त्या लता । लवति, खेद नसे तरि तत्वतां;
जसि जपे जननी स्वसुता सदा । सहुनिहीं बहुतापरि आपदा ॥ १८ ॥
झटुनि वर्षभरी श्रमती परी । सफल देखुनि हर्ष जनांतरीं;
करुनि कष्ट जनां फळ जें मिळे, । जगतिं अन्य गमे नच तत्तुळे ॥१९॥
शरद उत्तम उद्यमकाळ, हा । त्यजुनियां बसतां म्हणवील हा !
म्हणुनि घालविती न कृषीवल । पळहि, वेंचिति सर्वहि तें बळ ॥२०॥
करिति लोक जणूं शरदुत्सव । झटुनि अश्विनमासिं दिनीं नव;
भजुनियां नवरातिंत अंबिका । सुख जनांस वसंतिं जसें पिका ॥२१॥
मिळविती सुमनांस कुमारिका, । बहुपरी गुफुनी सुममालिका
भगवतीनिलया मग जाउनी । नमिति तत्पद त्या शिरिं वाहुनी ॥२२॥

दशम तो विजयादशमीदिन, । करिति लोक जमूनि शिलंगण;
प्रमुख पूजिति ते शमि आपटा. । म्हणति ‘ वित्त ’परस्पर ‘ या लुटा ’॥ २३॥
मग जना जन पर्ण समर्पिती, । म्हणति ‘ घ्या धन हें ’ बहु हर्षती;
न सुदिनास घडे कधिं दर्शन । वदति त्या सुजनांसह हर्षुन ॥ २४ ॥
सण दिवाळि पुढें सरसावला, । म्हणुनि तोष जनांमधिं दाटला;
वसति बालकचित्तिं फटाकडे, । म्हणुनि तन्मन जाय हटाकडे ॥ २५ ॥
स्वजनसंगतिलाभ न ज्यां मिळे । निजगृहास्तव होति उताविळे;
सकळ तीं जमती घरिं माणसें । गृह गमे दिनिं त्या सुरलोकसें. ॥ २६ ॥
उजाळितात गृहीं जन दीप, ते । बघुनियां जनतामति दीपते;
उडविती किति बार घरोघरीं- । करिल उत्सव कोण बरोबरी ? ॥ २७ ॥
करुनि अन्न परोपरि वाढिती । सुगरणी, करणी जणु दाविती;
मिळवुनी सुजनां धनपूजन । करुनि आदरिती बहुधा जन. ॥ २८ ॥
तनुस तैल सुवासिक लावुनी । धुविति ती सुजलें मग आंगणीं;
सुवसनें शरिरीं निज लेवुनी । दवडिती दिनरातहि खेळुनी. ॥ २९ ॥
अजिच ये निजबंधु निजालया । म्हणुनि होति समुत्सुक त्या स्त्रिया;
बघुनि त्या वदती ‘ बहु हें भलें । करिसि, भाउ ! अम्हां बहु लाभलें’॥ ३० ॥
करुनि कृष्णविवाह सुसाजरा । निघति पाहु सुतेप्रति सद्वरा;
परतती किति पाहुनि सुस्थलें, । फिरफिरूनि किती अति कष्टले. ॥ ३१ ॥
सकळ मंडळि कार्तिकपौर्णिमे । शिवगृहीं तनयांसह ती जमे,
उजळुनी त्रिपुरा, शिव वंदिती, । परतती निलया किति सन्मती. ॥ ३२ ॥
‘ बहुत कष्ट तुम्हीं जन ! साहिले, । म्हणुनि उत्सव हे अजि पाहिले;
कसुनि कास पुढें तिळही सरा. ’ । शरद सांगतसे जणुं हें नरा. ॥ ३३ ॥

बा. सी. जोशी.

---

## ८ हेमंतकाल.

—*—

( आफ्रिकेंत गेलेल्या एका मित्रानें कोकणांतील ऋतुमानवृत्त विचारल्यावरून कवीनें पाठविलेलें त्यास उत्तरः— )

[ इंद्रवज्रा व उपजाती. ]

चेतोहरा शारदकाललीला
गेली सख्या कालवशें लयाला
हेमंतलक्ष्मी बहुरूक्षरूपा
त्वज्जन्मदेशीं विचरे विरूपा ॥ १ ॥
स्वीकारिते यद्यपि शीततेला
हेमंतकालांत निशा विशाला
खोडी जणूं हें बहुमान्य तत्व
शीतें पदार्थां जडतें लघुत्व ॥ २ ॥
निसर्गसिद्धक्रमलंघनाला
शीता तसें ये बळ पावकाला
जनांस शीतें बहु ताप होई
जो अग्निसंगें विलयास जाई ॥ ३ ॥
होतां प्रभात क्षितिमंडलाशीं
आच्छादिती धूर तुषारराशी
वाटे मही शीतनिवारणाला
घेई निजांगावरि शुभ्र शेला ॥ ४ ॥
विलोभवी संप्रति, दक्षिणाशा
विप्रा तशी पूर्णपणें दिनेशा

१ उष्णता पक्षीं त्रास. २ धुकें. ३ दक्षिणदिशा पक्षीं दक्षिणा मिळण्याची आशा.

तदाश्रयें आश्रयही द्युतींचा
लोकीं सुमंदद्युति होय साचा ॥ ५ ॥
नेणार हेमंत तरूच्चयाला[2]
क्रमें क्रमें स्थाणु[3]-समानतेला
वाटे अपर्णा[4] म्हणुनीच झाली
लतावली तत्तनुसंगशाली ॥ ६ ॥
भूजन्मदा पीडित फार झाली
शीतें, असें पाहुनि पादपाली[5]
आत्मांगिंच्या काढुनि पर्णचैलीं[6]
आच्छादिते तत्तनु धन्यशीला ॥ ७ ॥
प्रभातकालीं हिमबिंदुधारी
वाटे वनश्री रडते बिचारी
स्वपुष्पपत्रावलिवित्तभार
कीं ने हरोनी हिमकालचोर ॥ ८ ॥
जो आत्मरूपीं शिव विष्णु धाता
आणूनियां तोषवि अत्रिकांता
त्या श्री-गुरूचा शुभ जन्मवार
संतोष दे भक्तजनां अपार ॥ ९ ॥
बालातपें सारवि ज्यास मित्र
वृंदावनीं त्या बसुनी पवित्र
निर्वर्तिती शीतजखेदसंगी
वेणी फणी या तरुणी शुभांगी ॥ १० ॥

---

१ तेज. २ समुदाय. ३ शंकर पक्षीं झाडाचा खुंट. ४ पार्वती पक्षीं पर्णहीना. ५ वृक्षपंक्ति. ६ वस्त्रा.

बकूल वृक्षीं पिकल्या फळांनीं
स्वचंचु शोभा हरिली म्हणोनी
शुकावली चंचुपुटें कठोर
करी सरोषा जणुं त्यां प्रहार ॥ ११ ॥
पाषाणखंडें बदरीतरूला
पांथस्थ हाणी परि तो तयाला
अर्पूनियां गोडफळें निवारी
शत्रूसही सज्जन सौख्यकारी ॥ १२ ॥
निष्पेषयंत्रास्थित इक्षुदंड
देई सुधातुल्य रसा उदंड
शोभा विशेषा गुण संकटांत
पावे जसा दीप महातमांत ॥ १३ ॥
शुद्धद्वितीयाशशिखंडरूपा
फलावली तिंतिडिची सुरूपा
हेमंतलक्ष्मीश्रुतिभूषणांची
करी अपेक्षा जणुं पूर्ण साची ॥ १४ ॥
येई न येई उदया मरीची
ज्या जाहली संगति ती धनांची
तों आप्तबंधूंसह सुप्रसन्न
आस्वादिती लोक सुमिश्र अन्न ॥ १५ ॥
विलासवांच्छा विषयीजनाला
व्यायाम मल्ला बहुता क्षुधेला

---

१ चरक. २ चिंच. ३ धनरास. ४ खिचडी.

सुपक्कता पूगफलावलीला[1]
ही भेटवी हेमनकाललीला ॥ १६ ॥

द्रुतवि:०— हिमतुषारहता बहु कोमली
न बिसिनी प्रसवे कमलावली
कमललोचन हीन सरोमुख
लव न दे नयनां सखया सुख ॥ १७ ॥

कुसुमगंधभरा विखुरी[2] खुरी[3]
पनस, बाल-फल-प्रसवा वरी
मुकुल[4] अस्फुट हा सहकार[5] वी
मकर-संक्रमणार्थ निघे रवी ॥ १८ ॥

मालिनी—" मधुर तिळ-गुळा या, घे सदा गोड बोल "
श्रवणसुखद जे ते, बोलती गोड बोल
अहह जरि मला हा, अंतरे लाभ नामी
तुज तिळगुळ द्याया, योजिली योजना मीं ॥ १९ ॥

वसंततिलका:—हा लेखरूप हलवा तुजला अपूर्व
म्यां अर्पिला सुसखया बहु-भक्ति-पूर्व
वाटो तुला सरस नीरस वा कसाही
घे गोड मानुनि सखा सखिदोष[6] साही ॥ २० ॥

**राधारमण.**

---

१ सुपारी. २ पसरी. ३ वृक्षविशेष. ४ मोहोर. ५ आम्र. ६ मित्रदोष.

## ९ शिशिरकाल.

आर्याः—शिशिरीं शीत लयातें, जातां जंतूंस दुःख बहु करितें
अधिकारी जे कुमती, जातां जातांहि ताप करिती ते ॥ १ ॥
जातांना शीत लया, प्रवृद्ध होतें च चेतनांस्नेह ।
दीप जसा क्षयकालीं, वृद्धीतें पावतो विना-स्नेहें ॥ २ ॥

साक्याः-ऋत्वर्घोच्या नंतर शीतहि, हळु हळु निघून जातें ।
उष्णारीची स्वारी लवकरि येइल, भिऊनि कीं तें ? ॥ ३ ॥
धान्यें तांटें आदिकरूनी खटला घेउनि जाते ।
लक्ष्मी म्हणुनी उदासीनता शिशिरा तुजला येते ॥ ४ ॥

वसंतति०:—गोधूमधान्यचणकांवरचीहि लक्ष्मी
जाई त्यजूनि विपिना शिशिरीं स्वधामीं
जी श्री असे सकलभूषण तीच जातां
शोभा कुठूनि मग राहिल तेथ आतां ॥ ५ ॥

आर्याः—लक्ष्मी त्यजुनी जातां, विशोभ शिशिरा, पहा तुझ्या ठायीं
धनधान्यर्द्धिहि जाउनि, राहे अवशिष्ट धूळ त्या ठायीं ॥६॥
शिशिरा श्रीविण जीवन, व्यर्थ तुझें वाटतें मज विरामा
जाणुनि हेंच विधीनें, अपमानें योजिलें तुज विरामा ॥ ७ ॥

शिखरिणीः—गृहातें टाकूनी क्षणभरि जरी जाइ रमणी
नवी वस्तू वाटे विकल सदनीं ही भणभणी
उदासीनत्वानें मनुज यँदभावीं भटकती
वनश्री स्त्री नाहीं तुज कुठुनि शोभा विलसती ॥ ८ ॥

---

१ चेतन-सजीव प्राणी त्यांचा नाहीं स्नेह-प्रीति ज्याचेठायीं. २ तेल. ३ स्त्रीरहिता.
४ अखेरीस. ५ कलारहित. ६ स्त्रीच्या अभावीं.

वसंतति०:—तूं जीर्णता लपविण्या करिशी स्वकाया
जाणो सुवर्णमय *पीत करून माया
लक्ष्मीस मोह करण्या बरि युक्ति केली
नाहीं परी तुज गड्या तरि साध्य झाली ॥ ९ ॥
खुंटावरील म्हणतात तयास काक
ज्या स्त्री, सुतादि नसती पुरुषास लोक
कांतेविणें दिससि तूंहि, तसे तुझ्यांत
ते खुंट वृक्ष वरि काकहि बैसतात ॥ १० ॥
शार्दूल०:—मोठाले दिसतात सोट तरु हे पर्णें न ज्यां राहती
जाणो स्तंभच हे वधार्ह[1]पुरुषांसाठीं उभे वाटती
कीं हे मुंडित भिक्षु[2] पत्रनिकर[3]न्यासा[4] करूनी उभे
लक्ष्मी राजविलासिनी तिजसवें कैसें तुझें रे निभे! ॥ ११ ॥
वसंतति०:—शीतोष्णभूप इतरेतर[5] शत्रु-खास
झुंजा करूनि हटवीति परस्परांस
येतां मधें शिशिर त्याक्षणिं हो चुराडा
शोभा स्वकीय दवडून बसेच वेडा ॥ १२ ॥
विश्रांति तूंच सकलां कृषिकांस[6] देशी
अन्यर्तुमाजि न मिळे क्षण एक त्यांसी
होती कृषीवल फिरून नव्या दमाचे
नाल्पोपकार तव त्यांवर होति साचे ॥ १३ ॥
नाहीं तुझ्यांत अति ऊष्ण न शीत फार
आहेस तूं सुखद यास्तव होशि थोर

१ वधाला योग्य. २ संन्याशी. ३ समुदाय. ४ त्याग, पत्रादिकांनीं रहित सोट. ५ परस्पर. ६ शेतकरी. *पिवळी.

कार्यें अनेक करण्या दिन हेच योग्य
आहेत, यापरि किती म्हणतात योग्य ॥ १४ ॥
बारे सुवर्णमय तूं घडवूनि खाशा
त्या मोहरांसे जरि दाविशि ही स्वकोशीं
कारागिर प्रथम तूं असतां तयांचों
देती वसंतऋतुला जन मान साचा ॥ १५ ॥
सुव्यक्त कारण असे कथितों तुलाबा
श्रीशांस मान जन देति न ते गरीबा
राहे समानकृति ही सरशीहि खाशी
नांवावरीच भुलती, जनरीति ऐशी ॥ १६ ॥

साकीः— हळुहळु तें हिम जातें नंतर उष्णाहि तसेंच येतें
दोघांमध्यें चेंगरुनी ऋतु-दीन-दशा कीं होते! ॥ १७ ॥

आर्याः— शीतोष्णोभयधर्मा, संपे श्री म्हणुनि तूं सुखें रहित ।
पर ऋतु एकच धर्मा, करिती श्री संग्रहा; असे प्रथित ॥१८॥
गमनागमनावसरीं, उभयाप्तातिथ्य योग्य करण्यानें ।
जाते श्री संपूनी, उक्त श्रीरहितता तुला त्यानें ॥ १९ ॥

**पांडुरंगशास्त्री पारखी.**

## १० सूर्योदय.

श्लोकः—आरक्त रागें बहु पूर्व झाली । येईल आतां वर अंशुमाली
जाईल सारें तम हें लयाला । प्रकाश वेढील पहा जगाला । १ ।

---

१ सुरेखवर्ण, सोनं २ मोहरा, फुलें, कळ्या. ( आंब्याच्या ) ३ जामदारखाना. कळ्या. ४ मोहरांचा. ५ श्रीयुक्तास. ६ शीताचें गमन व उष्णाचें आगमन ह्या दोन्ही प्रसंगीं. ७ शीत व उष्ण या दोघांचें. ८ योग्य.

गेलीं पहा तीं किरणें नभांत । वर्णें सुवर्णासम वाटतात
तेथून कांहीं फिरतात मागें । खालीं जणूं तीं बघतात रागें ।२।
धनुर्धराचे बहु तीक्ष्ण तीर । ते भंगिती स्पर्श करून ऊर
हीं भास्कराचीं किरणें उदार । लागून देती न कुणास मार । ३ ।
स्पर्शें पदार्थां नव रूप देती । तत्कांतिला उज्वलतेस नेती
आनन्द त्यामाजि भरून देती । ही सज्जनांची अवघ्याच रीती ४
आनन्दमूर्ती उदयास आला । पिटून लावी अवघ्या तमाला
जीवित्व वाटे नव द्यावयाला । सृष्टींतल्या वस्तुगणास आला ५
उठा मुलांनोहि पहा रवीला । भेटावया तो पसरी करांला
उद्योग त्याला प्रिय फार वाटे।आलस्य त्यालागिं कधीं न भेटे६
जो सर्वदां चालतसे नभांत । राहे न कोठें पळही निवांत
विश्रांति ज्याला अगदीं न ठावी।त्याची मुला मूर्ति तुवां बघावी ।७
नेत्रीं मुला सस्मित मूर्ति पाहीं । आनन्दवृत्तीस धरीं सदाही
तयार जैसा रवि उद्यमातें । व्हाया तसें तूं वळवीं मनातें । ८ ।
हा सूर्य जैसा उगवे नभांत । सुज्ञान तैसें उगवो मनांत
काळोख जैसा रविला न ठावा । ठावा तुला आळस तो नसावा ९
क्रमी क्रमानें रवि अंबराला । हा ज्ञानमार्गांत धडा मनाला
सोडी न तो स्वीय कधींहि पंथ। तूं ठेव चित्तामधिं हेच रीत १०

**मोरो गणेश लोंढे.**

## ११ प्रातःकाल.

स्रग्धराः—लोळें निद्राभरें जों अजसुखनयनीं, चौकडा स्कंधदेशीं
तेव्हां घांसे, तनूची उटिहि घुसडुनी माखलों चांदरीशीं;

प्रातःकाळीं उठावें म्हणुनि समयशी ते अजीचेचि भाट,
तत्काळा योग्य ऐसा श्रुतिमधुररवें[1] गाति तत्स्तोत्रपाठ. ॥ १ ॥

शा. वि.:—गेली रात्र पहा विचारचतुरा, ऊठ प्रभो, लौकरी
क्षोणिरक्षणभार हा सकलही घ्यायास खांद्यावरी;
दोघे पूरुष योजिले कमलजें[2], दोहींकडोनी तिहीं[3]
खांदे देउनियां वरी उचलिजे, ऐसी असे गोष्ट ही. ॥२॥

व. ति.:—त्यांतोनि एक तव तात असे कुमारा,
एकीकडोनि धरितो उचलोनी भारा
बाजू दुजी उचलण्या तुजलाचि तेणें
बा, योजिलें, म्हणुनि ऊठ अतां त्वरेनें. ॥ ३ ॥

शा. वि.:—निद्राधीनमनें तुवां क्षणभरी लक्ष्मी तिरस्कारिली,
तेव्हां खंडित नायिकेपरी मनस्तापास बा पावली;
चंद्र त्वन्मुखकांतियुक्त म्हणुनी त्याच्याकडे जाय ती
विश्रांत्यर्थ, परंतु तोहि बघ रे झाला फिका संप्रती. ॥ ४ ॥

व. ति.:—आतां मनोज्ञनयनांस व पंकजांस
बा एकदाचि अजि येउ नवा विकास,
नेत्रांत गर्गर तुझ्या फिरताति तारा,
पद्मांत भृंगततिका करि येरझारा. ॥ ५ ॥
ऐसीं विकासि कमलें अणि नेत्र यांचें,
अन्योन्यसाम्य घडुं दे नरवीर साचें,
कां कीं सहस्रदलबंधु नभःप्रदेशीं,
येवोनि सूर्य कमलाप्रति हा विकाशी. ॥ ६ ॥

---

१ कर्णप्रिय शब्दानें. २ ब्रह्मदेवानें. ३ त्या दोनपुरुषांनीं.

शिख.:—प्रभातीं फुल्लांभोरुहसमुदयालागिं भजतो,
तसा वृक्षांच्याही शिथिल कुसुमांलागिं हरितो;
तुझ्या श्वासामध्यें परिमल निसर्गीचे वसतो,
जणू तत्प्राप्त्यर्थ स्फुट पवनहा यत्न करितो. ॥ ७ ॥

शा. वि.:—वृक्षांचीं नवकोमलारुण अशीं स्नेहांशशाली दलें,
त्यांमाजी दंव शुभ्र मौक्तिकसरावाणी दिसे चांगलें,
हास्याची रुचि दंतकांतिसहिता आतां बहू पांढरी.
जेवीं शोभतसे, तुझ्या नृपसुता, रक्ताधरोष्ठा वरी. ॥ ८ ॥

पृथ्वी:—प्रतापनिधि सूर्य हा जरि नये वरी अंबरीं,
तरी अरुण सत्वरी अधिच त्या तमा संहरी,
रणीं अतुल विक्रमी असुनि वीर तूं तत्वतां,
नकारण रिपूवरी रवुस जावयाला स्वतां. ॥ ९ ॥

वं.:—कुशांवरी दोहिं निजूनि जे क्रमें,रात्रीस निद्रासुख घेति अश्रमें
जागेवरोनी उठताति कुंजर। तैं श्रृंखलांचे रवँ होति दुर्धर॥ १०॥
नत्यांचिया दंतयुगास लागला, तैं रक्तिमा पर्वतधातुचा भला.
तथापि बालार्करुची तयांवरी,तै गैरिकाचा भ्रम पाहत्यां करी॥११॥

शि.ख. :—इराणी घोडे जे पटघटितविस्तीर्ण सदनीं
निबद्धस्वच्छंदें उठति बत्र निद्रेस त्यजुनी;
तयांतें चाटाया पुढति धरिती सैंधवें नवें,
मुखोष्म्यानें होते मलिन जरि तें स्वच्छ बरवें. ॥ १२ ॥

---

१ विकसित झालेल्या कमल समुदायास २ या क्रियापदाचा कर्ता पवन. ३ त्वल्लवास परिमल प्राप्त्यर्थ. ४ वायू. ५ सूर्याचा सारथी. ६ अक्लेशें (सुखानें). ७ शब्द. ८ तरुण सूर्याची कांती. ९ गेरूचा (भ्रम) १० पाहणारांस. ११ सैंधवाचे तुकडे ( घोड्यास घालण्याची रीत वर्णिली आहे. )

स्र.:—पुष्पें गेलीं सुकोनी म्हणुनि विरळता फार हारास आली,
निस्तेजा ही प्रदीपावलि नृपतनया देख रे सर्व झाली;
जीं जीं बा त्वां उठावें म्हणुनि वदतसों रम्यवाक्यें सुखानें,
तीं तीं हा पंजरस्थ प्रकट वदतसे, देख रावा मुखानें. ॥ १३ ॥

शा. वि.:—ऐसी बंदिसुतोक्त वाणि मधुरा ऐकोनियां जागृत
होवोनी शयना त्यजी झडकरी तो भूपतीचा सुत;
जागा होउनि राजहंस विरुतें गंगेचिया सैकता
जेवीं सोडुनि सुप्रतीक उठतो, तैसा दिसे हो स्वतां ॥१४॥

**गणेशशास्त्री लेले.**

## १२ माध्यान्हकाळ.

दिनकर जधिं येतो व्योमभागीं प्रभातीं ।
सुखकर बहु वाटे कोमला तत्प्रभा ती ।
तरतर रविपुष्पें ताठ होवोन सारीं ।
सरसर इतरांतें बोलती ये तमारी ॥ १ ॥
भरभर परि वाढे उष्णता भास्कराची ।
थरथर बहु पावे शीतता कंप साची ।
दरदर फुटुं लागे घर्म अंगीं जनांच्या ।
हरहर लहरी या उष्ण भारी खगाच्या ॥ २ ॥
सकल जठरकोशीं अग्नि चाले धडाड ।
क्षुधित म्हणुनि सेवी तिक्त आम्लादि गोड ।

---

१ राजहंस पक्ष्याच्या शब्दानें. २ वाळवंटाला. ३ सुप्रतीक नांवाचा एक दिग्गज आहे. ४अज.

गिरिकुहरनिवासी येति भिक्षाटणास ।
म्हणति कठिण कालाहूनि मध्यान्ह खास ॥ ३ ॥
तृषित बहुत शोधी जीवजाती जलासी ।
दिसति लहरि खाशा काननादि स्थलासी ।
बघुनि मृग कसे हे धावती तातडीनें ।
विषय-लहरि जीवा रौरवाच्या थडी ने ॥ ४ ॥
प्रभातिचें टाकुन बालरूप ।
धरी रवी हा प्रखर स्वरूप ।
प्रपूर्ण ये यौवन मध्यकालीं ।
स्वरश्मिनीं शोभत भाग्यशाली ॥ ५ ॥
यदा भरे यौवन पूर्ण देहीं ।
जनास पीडाकर हो सुदेही ।
शिशूपणीं जो बहु मोद देतो ।
जवान होतां परि कष्टवीतो ॥ ६ ॥
सुदीन पांथस्थ करीत हाय ।
परोपकारी तरुपासि जाय ।
म्हणे, पहा निष्ठुर मित्र भारी ।
पुष्पांजली दे असि पादचारी ॥ ७ ॥
यदा जरा ये मद ओसरेच ।
सतेजता, क्रूरपणा सरेच ।
क्षणक्षणें तापहि शांत होई ।
प्रतीचिला तो मग शीघ्र जाई ॥ ॥ ८ ॥
म्हणोन येता भर यौवनाचा ।
मत्तापरी सज्जन हो न नाचा ।

वृक्षापरी शांतवुनी सुपांथ ।
सुकीर्ति जोडा बनुनी सुशांत ॥ ९ ॥
जरी रवीच्या परि हो कराल ।
अकीर्ति-भार्या सहजीं वराल ।
रवीपरी कोणि न पाहतील ।
मुखाकडे, नेत्रचि झांकितील ॥ १० ॥ **माधवराय.**

## १३ संध्याकाळ.

मंदा०:–संध्यारागें अरुण रुचिर प्रांत सूर्यप्रभेचा,
शोभे साक्षात् प्रणयाचि जणों पश्चिमादिग्वधूचा;
जातां जातां क्षितिजसुपथें रक्तबिंब प्रियेतें,
देवोनीयां विरह, बुडुनी जाय अस्ताचलातें ॥ १ ॥
झाली बाला विरहविकला रक्तरागोंचि साची,
झाली तेणें जलदपटलें अंबरीं सोनियाचीं;
आशाभंगासह हृदयही भंगिलें जें तयानें,
झाला रक्त क्षितिजभुवनप्रांत हा सर्व जाणें. ॥ २ ॥
उत्साहें तो अरुणतनु ये चंद्रमा पूर्वभागीं,
नक्षत्रांची चकचक दिसे अंबरीं जागजागीं;
व्योमामध्यें कनकरजप्रांत जे मिश्र होती,
त्यांच्यामध्यें भगण रुचिनें शोभती मौक्तिकें तीं. ॥ ३ ॥

**वि. भि. लेंभे.**

## १४ संध्याकाळ.

श्लोकः–संध्याकाळ असे; रवी उतरतो आहे समुद्रावरी,
त्याचें बिंब सुरेख चुम्बित पहा लाटांस या लौकरी;

मातीला मिळुनी गळूनि पडलें तें पुष्प जाई जसें,
लोपाला लहरींत मण्डलहि हें जाईल आतां तसें. ॥ १ ॥
आकाशीं ढग हे पहा विखुरले, त्यांचेवरी सुन्दर
रंगाच्या खुलती छटा, बघुनि त्यां येतें स्वचित्तावर
कीं, मृत्युंगत होतसे दिवस, तन्मास्तिष्क[1] पिण्डावरी
येती अक्षयमोक्षसिंधुलहरी तेजोयुता यापरी. ॥ २ ॥
पक्षी हे घरट्याकडे परतुनी जातात कीं आपुले,
त्यालागीं किलबील शब्द करुनी आनन्द देती पिलें;
गाई या कुरणांतुनी परततां हम्बारवा फोडिती,
त्यांचे उत्सुक वत्स त्यांस अपुल्या दीनस्वरें बाहती. ॥ ३॥
आनन्दी दिसती युवें, फिरकती जे या किनाऱ्यावरी,
ध्याती ते निज सुन्दरीस, गमतें, उल्हासुनी अन्तरीं;
जी ही मन्दिरराजि पैल दिसते, तीच्या गवाक्षांतुनी
झाल्या त्या असतील रुष्ट युवती, चित्तीं असें आणुनी॥ ४ ॥
" अस्तालागुनि जातसे दिनमणी, रात्रीं अहा येतसे !
रात्री ! जादु किती विलक्षण तुझे नामामधें गे वसे !
प्रेमाचें हृदयीं उषीं कुमुद जें संकोच गे पावलें,
देसी त्यास विकास !- चित्त म्हणुनी नाथाकडे लागलें ! " ५
सन्ध्येला प्रणयी तुम्ही जन सुखें द्या हो दुवा, मी करीं
हेवा तो न मुळीं; नसे प्रणय तो माझ्याहि का अन्तरीं ?
आहें मी घर सोडुनी पण दुरी; चित्तीं ह्मणूनी असें
मी सायंसमयीं उदास ! —अथवा व्हावें तरी मी कसें ? ॥ ६॥

केशवसुत.

---

१ मस्तिष्क —मज्जा, मेंदू.

## १५ सायंकाल.

घेऊनियां निजशिरावरि रश्मिभार
उल्लंघितां पथ नभस्तलिंचा अपार
आदित्य दिव्य पथिक श्रम फार पावे
अस्ताचलीं म्हणुनि संप्रति तो विसावे ॥ १ ॥

केशावली रविशिरीं किरणस्वरूपा
झाली गमे विरल वृद्धदशानुरूपा
जातां लया सुदिन कीं दिनराज याचा
गेला लया विपुलही करभार साचा ॥ २ ॥

अध्व-श्रमें दिनकरा बहु ताप झाला
होई न तो सहन कीं बहुधा तयाला
अस्ताचलीं म्हणुनि शीतल वात सेवी
वस्त्रापरी किरणमंडल दूर ठेवी ॥ ३ ॥

जे राहिले मजसवें उदयप्रसंगीं
ते सोडिती किरण कां मजला प्रसंगीं
देखूनि दुष्कृति अशी बहु कोप आला
त्याकारणें मज गमे रवि लाल झाला ॥ ४ ॥

उत्तुंग शैलशिखरीं कनक-द्रवाचा
ओती सडा निजकरें पति पद्मिनीचा
वाटे प्रदोषसमयासह संगरास
तो अर्पितो रुचिर केसरि वेष त्यांस ॥ ५ ॥

संपूर्ण कुंकुमरसें भरली प्रतीची
भासे मना समर—भूमिचिया प्रतीची

लीन-प्रभावलय भास्कर लब्धदैन्य
शोभे श्रमाकुल जसा भट नष्टसैन्य ॥६॥
लोकोपकार करण्या निजरश्मिमात्र
वेंची; उरे तपन केवळ बिंबमात्र
होई विशेष नयना परि-तोषदाता
चित्तीं भरे अधिक निर्धन पूर्ण दाता ॥ ७ ॥
चंडांशुशीं बिसिनिचा चिर सख्यभाव
चित्तांमधें निपजवी बहु चित्र-भाव
पाहूनियां प्रियकरा परितापमुक्त
झाली मनीं कमलिनी परि-तापयुक्त ॥ ८ ॥
जों जों करी गमन भास्कर पश्चिमेस
तों तों मिळे भुवनिंच्या लय चेतनेस
मंदावलें विविध-भूमुखशब्दजाल
अंग--प्रभा जगतिची गळली विशाल ॥ ९ ॥
जेव्हां बुडे जलधिच्या जलिं अर्धकाय
घेण्या समाश्रय जणू दिनकालराय
दे क्षीण आत्मकर उन्नत शैलभाळीं
उच्चांस उच्चसहवास रुचेल काळीं ॥ १० ॥
ज्या सागरीं सकल—भूतल-तीर्थ-गेह
ठेवी तदंतरिं सुखें रवि शुद्ध देह
आत्माच सृष्टितनुचा परलोक सेवी
कां स्तब्ध शून्य मलिना मग ती न व्हावी ॥ ११ ॥
रत्नें दुजीं वसति अंतरिं सागराचे
शंका अशी निपजली मनिं निर्जरांचे

शोधार्थ ते म्हणुनि पाठविती दिनेश
तो हेरसा जणु करी जलधिप्रवेश ॥ १२ ॥
सायंतनें विकसती कमळें फुलेंही
दीपावली मिरविते निजतेज गेहीं
झांकी स्वपर्णनयना तरुवर्ग कांहीं
मित्रापदा निरखिण्या जणु शक्त नाहीं ॥ १३ ॥
मार्तंड हा तिलक सुंदर कुंकुमाचा
गेला गळूनि घडला क्षय मंगलाचा
सायंप्रभा अनुमृता जणु शोकमग्ना
तों जन्म घे रजनि कृष्णमुखी कुलघ्ना ॥ १४ ॥

**राधारमण.**

---

## १६ चंद्रोदय.

श्लोकः—या बोळिं कुंकुमच चर्चुनि भाळ—देशीं
राहे पतीस निरखूं युवतीच जैशी
तैशी दिशा सजालि उत्सुक काय पूर्व
ती तांबडी धरुनि कांति दिसे अपूर्व ॥ १ ॥
निर्वीर भूमि—तल पाहुन अंधकार
चाले मदांध गज हर्ष—भरें पुढार
पूर्वेस त्यास मृगराज मृगांक भेटे
हें अंधकार—गज—रक्तच काय वाटे ॥ २ ॥
लक्षावधी उगवती गगनांत तारे
हे भालदार शशि—भूपतिचेच सारे

बुक्का गुलाल उधळीतच मानपानें
ते आणितात निजनाथ महोत्सवानें ॥ ३ ॥

अन्य स्थळीं दिवस घालवुनी विलासें
येतो पुन्हा परत लाजत चंद्र भासे
डोकावुनी हळुच रात्रि-वधूच पाहे
मर्जी असेल कशि काळजि हीच वाहे ॥ ४ ॥

सारून दूर पडदे जलद-स्वरूप
आला प्रगल्भ नटराज पुढें अमूप
जों लावितात टक एकच लोक मात्र
तों रंग मंडपिं नभीं शशि रम्यगात्र ॥ ५ ॥

चंद्र-प्रभा गिरि-शिरावर फांकतात
ज्यांच्या लपे तम भयार्त गुहोदरांत
राजाच तो मन उदार करून ठेवी
डोक्यावरी कर जणो अभयास दावी ॥ ६ ॥

नाना लतौषधिंस जीवन घालणारे
एकाच काळिं जन--नेत्र सुखावणारे
पृथ्वी सुधा--धवल सर्व करून घाले
हे शीत शीत--किरणें कर धाडियेले ॥ ७ ॥

आकाश--भूमि--गिरि--कंदरिं पूर्व साचे
ओघावरी पडति ओघचि चंद्रिकांचे
क्षीराब्धिच्या उठति या लहरीच काय!
कीं सर्व चंदन--रसांत बुडून जाय ८

---

१ धनी, पक्षी चंद्र. २ चुन्याप्रमाणें शुभ्र.

या चांदण्यांत अमृतांत जणों बुडाल्या
हर्षांत डोलति हि नाचति मत्त झाल्या
वेली कशा स्वतनुंनीं तरु वेढितात
प्रेमें प्रिया धरुन तन्मय काय होत ॥ ९ ॥

वासुदेव वामन शास्त्री खरे.

---

## १७ मध्यरात्र.

श्लोकः—सामसूम जिकडे तिकडे गमे । स्वच्छ पाहुन नभाप्रत तो रमे
तारका चमकती नभ-मंडळीं । कांति राजपथिं त्यांचि फांकली १
पारिजात फुलले सुर-काननीं । हीं फुलें विलसती गमलें मनीं
कीं हिरेजडित सुंदर सुन्दरी । भूषणें विमल-कांति निशा धरी २
शांतता त्रिभुवनास लाभली । प्राणिमात्र निजले निजस्थलीं
पाहुनी कृपण कादि निर्भय । आपुला गगन रत्न-संचय ३
उंचसा गगन-मंडप थोर हा । बांधुनी रुचिर आवडिनें पहा
रात्र पाजळुन दीपक तारका । वाट पाहि पतिची अति उत्सुका ४
दोन बाजुस उभे अचल-स्थिति । राक्षसांसम भयंकर दीसती
राज-मार्ग गत वस्तुंस पाहती । हर्म्य कान जणु देउन ऐकती ५
जे दिनीं गजबजाट करी महा । शांत या समयिं पूर्ण दिसे अहा
अंधकार-जलधी पसरे वरी । कीं बुडे सकल सृष्टि तदंतरीं ६
श्वान कारण नसूनहि भुंकती । भीरु मार्ग-गत लोक चपापती
शब्द जो करितसे पद आपुले । तो भयें श्रवुनि अंग थरारलें ७
ज्यांस नाहिं घरदार असे जन । दीन अंध पडतात पथांतुन
थंडिनें प्रखर विव्हळ जाहलीं । इंद्रियें, उदरिं भूक धडाडली ८

व्यर्थ हारविति यौवन ही धन। जातसे वय झरून दिनोदिन
तें गणून न मदांध सुखी जन। खेळतात गणिका-सदनांतुन ९
सारमण्डळ सताराहि ताउस। वाजतात खुलतो पहिला रस
गोड वार-युवती-गृहिं गायन। चाललें परिसतात पथीं जन १०

**वासुदेव वामन शास्त्री खरे.**

---

## १८ तारा आणि काजवा.

श्लोकः-झालें निद्रित विश्व, शान्त रजनी हो ती तशी जाहली
मच्चित्तीं परि शांतता नच मुळीं; नाना विचारावली
येवोनी मम मानसा दुखवितीं; निद्रा न ये लोचना
आरामीं पडलों म्हणोनि शयनीं आराम द्याया मना ॥ १ ॥
ताऱ्यांची गगनांगणीं द्युति अती होती वरी फांकली
खालींही पण काजवे पसरिती अल्पप्रभा आपुली
झाली वृत्ति मदीय या उभयतां तल्लीन ती पाहुनी
गर्वें तारक काजव्यास वदला तारस्वरें तो झणीं:— ॥ २ ॥
" खद्योता! द्युति अल्प रे तव किती स्पर्धा कशाला तरी
माझ्याशीं करिशी नभांत उडशी तूं व्यर्थ वेड्यापरी
आहे का उपयोग बोल कवण्या त्वद्दीप्तिचा या जनीं
स्पर्धा आजवरी कधीं बलवतासंगें न केली कुणी ॥ ३ ॥
" कोठें कांच हिरा कुठें, गगन तें कोठें धरा ती कुठें
राजा थोर कुठें, भिकार तसला तो रंक सांगे कुठें,
मर्यादा त्यजुनी न वर्तन असें थोरासवें आचरीं
जा, जा, जा, तर खालतींच मषका! येऊं नको तूं वरी " ४

अंगाचे मग तारकें करुनिया निक्षेप नानापरी
खद्योतास कितीतरी हिणविलें त्या काय सांगू परी
खद्योतें परि आपुली न समता ती अल्पही सोडली
बोलें नम्रवचें पुढें करुनिया त्याच्या प्रणामांजली ॥ ५ ॥
" व्योमीं वास तुझा, धरेवर असे माझा, मला हें कळे
तें तूं स्पष्ट मला वदोनि तुजला मोठेपणा का मिळे ?
स्वप्नीं देखिलही खरोखर कसा हेवा न ठावा मशीं
कां रे व्यर्थ अशीं धरें कटुवचें मन्मर्मिं तूं पाडिशी ? ॥ ६ ॥
" गर्वोक्ती परि ही तुझी परिसतां खेदोर्मि हेलावती
तूं रे थोर तरी तव मला येते अहा कींव ती !
कां हा गर्व असा मनीं धरिसि तूं त्वद्दीप्तिचा निष्फल
चंद्राची द्युति रे तुझ्याहुनि, रवी त्याच्याहुनी उज्ज्वल ॥ ७ ॥
एकाहूनिच एक थोर असती तूंतें न कैसें कळे
बुद्धिभ्रंश घडे त्वदीय गमतें हा आज गर्वामुळें
येतां मेघ तुझ्यावरी मग कुठें त्वत्कांति लोपेल रे
छे ! छे ! मेघ तरी कशास ? नलगे, आहे धुकेंही पुरें ॥ ८ ॥
कान्तीचा जरि आव घालुनि नभीं टेंभा असा वाहसी
आहे अल्प धुकें तया विझविण्या तें शक्य वाटे मशीं
माझी दीप्ति पुरे मला न कवणा झाला जरी लाभ तो
गर्वाचें गृह खालतीं तव परी येईल हें सांगतों " ॥ ९ ॥
झालें भाषण हें तदीय न पुरें तों मात ही जाहली
एकाकी श्रवणीं कडाड रव ये ज्वाला नभीं फांकली
तारा तो तुटुनी धरेवर पडे खद्योत त्या पाहतां
' गर्वें घातचि जाहला तव बरें ' झाला तया बोलतां ॥ १० ॥

हा ! हा यापरि आज थोर गरिबां गर्वांत धिक्कारिती
त्यांनीं मानसिं तारकस्थिति परी ही ठेवणें जागती
येतां मन्मनिं हा विचार हृदया शान्ती अती वाटली
निद्रेला वश जाहलों सहज मी बागेंत रम्यस्थलीं ॥ ११ ॥

नरहर शंकर रहाळकर.

---

## १९ सह्याद्रि.

श्लोकः—तापीपासुनि दक्षिणेस जलधीपर्यंत जो दक्षिण
व्यापी अंबर चुंबि रम्य शिखरीं लावण्य सल्लक्षण
यत्पृष्ठीं सुविशाल ताल शिसवा यांचीं बनें शोभती
तो श्रीसह्यगिरींद्र वर्णित करूं लोभे मदीया मती ॥ १ ॥
गोदा, भीमरथी तशा हरितनू कावेरि पूर्वेकडे
गायत्र्यादिक, पश्चिमेस सरिता फोडीत जाती कडे
यांहीं दक्षिणदेश सस्ययुत हा श्रीयुक्त केला तुवां
सह्या, उत्तरनाथ तो धनद ही लाजे तुझ्या वैभवा ॥ २ ॥
ठायीं ठायिं असंख्य निर्झर नद्या झोंकावुनी खालती
येतां इन्द्रधनुष्यकांति झळके दे तोष नेत्रांस ती
स्नानप्राप्त-ससंभ्रमामरसतीविस्रस्त भूषावली
स्वर्गंगा शतधा विकीर्णतनु, हा आणी जणों भूतळीं ॥ ३ ॥
तुंगाद्या विजितामृता बहु नद्या पुण्यावहा वाहती
स्थानें रम्य महाबळेश्वरमुखें उत्तुंग संशोधिती
ऐसें देखुनिया अमूल्य गुण हे सह्याद्रिचे, लाजती
मैनाकादिक सागरांत दडती, निर्लज्ज ते राहती. ॥ ४ ॥

राहे पश्चिम दक्षिणाब्धि निकटीं देशास रक्षी सदा
स्वप्रांतास्थित वीर धाडुनि करी निर्वैर भू कैकदां
नामें सह्य जरी असह्यच जया अन्याद्रिशोभा तरी
ऐसा पर्वत चक्रवर्ति विलसे हा शैल भूमीवरी. ॥ ५ ॥

किति तरु किति वल्ली शोभती सह्यशैलीं
सुरतरुसम ज्यांची लोकविख्यात शैली
विहरति विबुधाली नाचती चंचला ते
बघुनि फसति देव स्वर्ग मानून यातें. ॥ ६ ॥

प्रतिध्वनितकंदरा फिरति आगगाड्या किती
जयांतुनि असे इथें बहुत बोगदे शोभती
पुरें कितिक घाट ही धरितसे स्वपृष्ठावरी
शरीर झिजवून हा गिरि परोपकारा करी. ॥ ७ ॥

प्रति शिखरिं धरी हा सह्य शैलेंद्र दुर्ग
बघुनि पळति पूर्वीं ज्यांस हो वैरिवर्ग
परि बहुत विपत्ती भोगिती सर्व आतां
सकळ मिळति नाशा वांकडा काळ येतां ॥ ८ ॥

नैसर्गिकी तशिच कृत्रिम चित्रता जे
ह्या सह्यशैलवरि, निस्तुल ती विराजे
कीं पाहतां धबधबे हरपेच भान
लेणीं[1] बघून, न कलापटु थक्क कोण? ॥ ९ ॥

असति फणस कोठें काजुचे वृक्ष कोठें
पिकति बहु लवंगा वेलदोडेहि कोठें

१ घारापुरी वगैरे ठिकाणचीं.

कनकखनिहि मोठ्या शोभती ठाइं ठाईं
चकित बघुनि सह्यैश्वर्य हें, चित्त होई. ॥ १० ॥
इथें या शैलाचे शिशुच जणुं हे दंति फिरती
तिथें जाळ्यामध्यें मृगभयद ते व्याघ्र फिरती
वराह स्वच्छंदें समद, डबक्यामाजि रुळती
कुठें चंचन्नेत्रें चपल हरिणें स्वस्थ चरती. ॥ ११ ॥
घेरी ये बघतां जयास गगनीं गेलीं कशीं तीं शिरें
कोठें खोलचें खोल पाहुनि दऱ्या अंधार नेत्रीं भरे
कोठें आपटती तटा, जलधिच्या लाटा कठोर ध्वनी
ऐसे सह्यगिरींद्र–भाग दिसती नानापरी लोचनीं. ॥ १२ ॥
ऐसा हा सह्यशैल क्षितिवर मिरवे सर्व शैलांत राणा
हिंदुस्थानेतिहासा प्रकट करि, धरी चित्रतेचाहि बाणा
उच्चत्त्वैश्वर्य ज्याचें अतुलच, विलसे शील, अन्वर्थ नाम
होई उद्योगि लोकां सतत शिवद हा सद्गुण श्रेष्ठ धाम ॥१३॥

सदाशिव मोरेश्वर भिडे.

## २० हिमालय.

श्लोकः–ज्याशीं समग्र जगतींत तुलावयातें
नाहींच अन्य गिरि योग्य म्हणून ज्यातें
अद्रींद्र हें प्रथित नाम जगीं मिळालें,
तो हा हिमाद्रि बघतां मम नेत्र धाले. ॥ १ ॥
घेऊनियां विमल काचमणी करांत,
अत्यंत सूक्ष्म नयनें बघतां तयांत,

---

१ सदाशिवगडाकडे वगैरे फास्यावर.

जैसा सभोंवतिल थोरहि भूमिभाग
त्या तेवढ्यांतचि दिसे प्रतिबिंबतांग; ॥ २ ॥
तैसेंचि या क्षितितळीं जनतोषकारी
जे जे पदार्थ अतिदुर्मिळ, रम्य भारी,
ते सर्व या क्षितिधरेंद्रतटप्रदेशीं
होऊन एकवट, भूषविती तयासी. ॥ ३ ॥
या कारणास्तवचि केवळ दर्शनानें
याच्या, समस्त धरणीतल पाहिल्यानें
जें श्रेय दिव्य मिळणार, पहा नरांतें
तें सर्व, अल्प करितां श्रम, साध्य होतें. ॥ ४ ।
ज्या पूज्यबुद्धि हृदयांतरिं निर्मितात,
ज्या पाहतां भय उचंबळतें मनांत,
ज्या दर्शनेंचि नरदृष्टिस रंजवीती,
त्या यास्थळीं सकल वस्तु दिसून येती. ॥ ५॥
अद्रींद्र हा भरतवर्षजनांस भारी
नानापरी घडतसे उपयोगकारी;
मर्यादितो प्रथम हा स्वतनुप्रसारें
हें उत्तरेकडुनि भारत–खंड सारें. ॥ ६ ॥
याची सुभव्य हिमधूसुर शृंगमाला,
जी जाय भेदुनि पयोधरमण्डलाला
ती, तीव्रदक्षिणसमीरसमीरिता जी
वर्षाऋतूंत नव नील पयोदराजी. ॥ ७ ॥
जाते वहात धनदेशदिशे, तियेतें
मार्गांत तूर्ण अडवून हिरून घेते,–

द्याया समृद्धि जणु या विषया अपार,–
साराहि तज्जठरसंस्थित वारिभार. ॥ ८ ॥
येथें महार्हउपयुक्तहि धातुखंड,
रत्नें तशींच बहुतांपरिंचीं उदंड
खाणींत सांपडति, यास्तव संपदेतें
न्यूनत्व या जनपदीं न कधींहि येतें. ॥ ९ ॥
या पर्वतीं निखिल भारतवर्षवासी
अत्यंत पावन असें गणिती जयासी,
ऐसे प्रदेश असती बहु; त्या सभोंतें
जी भव्य सृष्टिरचना वसते, पहा! ते. ॥ १० ॥
होतांक्षणीं नयनगोचर, नास्तिकांतें–
देखील विश्वपति ईश्वर मानण्यातें
होऊन बुद्धि, अवितर्क्य तदीय शक्ति
चित्तीं ठसून, उपजेल मनांत भक्ति. ॥ ११ ॥
श्रीवामनैकपद सर्व वसुंधरा हे
व्यापी, तसें यश यदीय भरून राहे
या भारताप्रति, अशांहि महा नद्यांतें
हा देतसे हिमगिरीश्वर उद्गमातें; ॥ १२ ॥
तत्रापि, त्याहि सुपवित्र महानद्यांत
गंगेसमान दुसरी न दिसे प्रतींत;
भोगी जसें अधिपतित्व पिता नगांचें,
कन्या तसेंचि महिषीपद सागराचें. ॥ १३ ॥
जेथें प्रकाल्पित जटेंतुनि शंकराच्या
ही येतसे प्रथम दृष्टिपथा जनांच्या

तेथें घडीभर बसून समग्र सृष्टी—
सौंदर्य भोंवतिल देउनि सूक्ष्मदृष्टी ॥ १४ ॥
जातां बघूं, मग किती तरि जागजागीं
चोंहींकडील सुमनोहर भूविभागीं
शोभा दिसे, विविध रम्य किती पदार्थ
देऊन दर्शन तिला करिती कृतार्थ! ॥ १५ ॥
जैसें वसंतसमयीं मधुमाक्षिकेला
चोंहींकडून फुटल्या सुमवाटिकेला
दैवें प्रवेश मिळतां, तिजला अपार
होतो प्रमोद, मनिं उत्सुकताहि फार ॥ १६ ॥
तैसेंचि मन्मनही या बघतां नगातें,
आनंद-सिंधु लहरींत बुडून जातें;
जो या स्थळीं रुचिर वस्तुसमूह थाटे
तो पाहण्यास मज कौतुक फार वाटे! ॥ १७ ॥
त्यानंतरें मग जशी मधुमाक्षिका ते
सानंद पंख अपुले उडवीत जाते;
एका फुलांतिल पिऊन रसा दुज्यातें
तेथीलही रस पिऊन पुढें तिज्यातें ॥ १८ ॥
त्या रीतिनेंच मम दृष्टिहि या स्थळींची
शोभा विचित्र रमणीय पहावयाची
इच्छा धरून हृदयांत, यथाक्रमानें
सारे पदार्थ निरखी परमादरानें ॥ १९ ॥

जातां दृष्टि प्रथमचि पहा या गिरीच्या तळातें
जें रानाचें वलय दिसतें रुंद त्याच्या सभोंतें,

त्या ‘ तार्यानी ’ म्हणुनि वसतें देशभाषेंत नांव
लोकीं त्याच्यापरि न दुसरा सांपडे घोर ठाव ॥ २० ॥
होती या उद्गम जवळच्या उंचभागीं जयांचे
त्या साऱ्यांही सलिल जमतें या स्थळीं निर्झरांचें;
त्या योगानें बहु दलदली थोर या घोर रानीं
होती, तापे रविहि वरती लंब-रूपी करानीं ॥ २१ ॥
त्यानें येथें विपिन इतकें किर्र माजून जातें,
कीं त्यामध्यें स्थळ न गवसे पायही ठेवण्यातें.
कोठें माजे यवस, झुडुपें कंटकांचीं हि कोठें,
कोठें जाती सरळ गगनीं वृक्षही मोठमोठे. ॥ २२ ॥
कोठें होती अविरल बनें वेतसांचीं अफाट,
कोठें साधारण गवतहि वाढतें उंच दाट.
जागोजागीं पडुनि तरुंचीं जीर्णपर्णें, कुजून
जातां वाफा विषमय निघूं लागती त्यांमधून; ॥ २३ ॥
त्यांनीं वातावरण भरतें भोंवतालील साचें
त्यायोगें यास्थळिं न घडतें राहणें मानवांचें.
ऐसें आहे तरिहि, विविध श्वापदें क्रूर, चंड,
रानीं या निर्भय चहुंकडे हिंडतीं हीं उदंड. ॥ २४ ॥
कोठें मत्त द्विरद फिरती थोर यूथेंकरून,
कोठें व्याघ्रप्रवर करिती वास खिंडींमधून;
कोठें कुंजाश्रय करुनियां वन्य गाई रहाती,
कोठें वस्ती करिति तरुच्या कोठरीं ऋक्षजाती. ॥ २५ ॥
यांतें स्वप्नामधुनि हि नसे मानवी शक्ति ठावी,
तेव्हां तीपा-सुनि मरणभी केंविं यांतें असावी!

हें सोडून प्रविततविषोद्गारगंधी अनूप
जातां कांहीं चढुनि वरतीं, या नगाचें स्वरूप ॥ २६ ॥

पूर्वीपेक्षां अधिक दिसतें सौम्य, पाहून ज्यातें
होतें दृष्टिप्रति सुख, महानंदही मानसातें!
जातां मार्गीं बघत, लवणांतून दोहींकडे तें,
येथें दृष्टी पडति हिरवीं गार विस्तीर्ण शेतें. ॥ २७ ॥

कोठें त्यांच्या मधुनि दिसती ओघ हे निर्झरांचे,
वाहे शुद्ध स्फटिकसदृश स्वच्छ वारी जयांचें.
कोठें कोठें मधुनि दिसती रम्य गांवें, तयांच्या
भोंतीं ताट्या अविरल पहा लागल्या या फुलांच्या ॥ २८ ॥

चांफा, जाई, गुलतुर, गुलाबादिकांतें विकास
होतां, त्यांचा मधुर पसरे गंध दाही दिशांस.
कोठें सौगंधिक शतदलीं पद्मखंडें विकास
कासारांच्या धरिति सलिलीं, त्यामधें राजहंस ॥ २९ ॥

आनंदानें प्रियसहचरीयुक्त राहून शांत,
संसारीचीं सकळ हि सुखें पूर्ण हे भोगितात!
जे उत्पत्ती धरिति समशीतोष्ण वा उष्णदेशीं;
ते एकत्र द्रुम सकलही वाढती या प्रदेशीं; ॥ ३० ॥

कोठें माळावरि उगवती देवदारू विशाल,
कोठें ओकद्रुम विलसती उंच, कोठें तमाल;
पारंब्याही सुटुनि धरणीमाजि कोठें वडांच्या
जीं का त्यापा-सुनि उगवती अन्यझाडें तयांच्या. ॥ ३१ ॥

गुंफा होती निबिड, तरुणादित्य-तापार्त ज्यातें

कस्तूरीचे मृग निपतती प्रत्यहीं आश्रयातें.
ज्यांतें आलिंगिति मधुलता मुग्ध-शाखा-करांनीं,
ऐसे आम्रद्रुमहि दिसती नम्र भारी फलांनीं; ॥ ३२ ॥

जो या स्थानीं सतत घुमतो कंदरांतून वारा
त्या मानून स्तनित, अपुला चित्रवर्णी पिसारा
सारा प्रेमें पसरुनि, गलत्प्रेम-नेत्रांबु-पूर
वृक्षस्कंधीं रुचिर करिती तांडवातें मयूर! ॥ ३३ ॥

जी या स्थानीं निबिड जमते शीतकाळीं हिमानी
ती ग्रीष्मींच्या द्रुत वितळतां भास्कराच्या करांनीं
मोठीं मोठीं हरित कुरणें वाढती या विभागीं,
त्यांच्यामध्यें चरति पशुंचे संघही जागजागीं. ॥ ३४ ॥

कांहीं जागीं हरिण चरती हे निजेच्छानुसारें
कोठें वन्यच्छगल इकडे, ग्राम्य कोठें खिलारें
कोठें दृष्टी पडति बकरीं, आत्मजांतुल्य ज्यांसी
शालीसाठीं जतन करिती लोक काश्मीरवासी ॥ ३५ ॥

जातां हाही चढून भाग वरतीं, तेथें दिसूं लागती
साऱ्या वस्तु उदास, रुक्ष, अवघे ओसाड दृष्टीप्रती
भासे हें स्थळ पाहतां, मधुरसा चाखून त्याच्यावरी
खाता तिंतिडिका घडे तशि, अतां मच्चित्तवृत्ती बरी ॥ ३६ ॥

जातां या स्थलिं खालती, वरि, पुढें, मागें, चहूंहीकडे
सारें बर्फ दिसे, तयाविण दुजें कांहीं न दृष्टी पडे.
वर्षांतून सदैव शीत अपुला आवास येथें करी,
तेणें वृद्धि न उद्भिजां घडतसे या शून्य भागावरी ॥ ३७ ॥

भूर्जीचे तरु जे क्वचित् खुरटले थंडीमुळें राहती,
त्यांवांचून न कोणतेहि दुसरे तेथें तरू वाढती;
कस्तूरीमृग, वा मदोद्धत करी, वा हिंसक श्वापदें,
किंवा पक्षिसमूहही न करती येथें निवासास्पदें. ॥ ३८ ॥
जातां प्राणिनिवासचिन्हहि बघूं कोठें नसे तत्वतां,
सारा भाग दिसे भयाण, अवघी भासे उदासीनता
कोठें उंच कड्यांवरून पडतां वेगें नद्या खालतीं,
त्यांचीं पात-विशीर्णतूर्णशतधा धाराजळें वाहती; ॥ ३९ ॥
तीं वेगें खडकांमधून पुढतीं वाहूं जशीं लागती,
त्यांच्या भीमरवें प्रपूरित दऱ्या तैशाहि नादावती,
या येथून विलोकितां दिसति जीं जातां नभोभ्यंतरीं,
स्वर्गारोहण--हेतुनिर्मित महासोपानमार्गापरी ॥ ४० ॥
एका मागुन एक, उंच शिखरें या अद्रिचीं, त्यां शिरीं
शोभे क्षीर-विपांडु निर्मळ हिम-प्रावार वस्त्रापरी;
ग्रिष्मींचा प्रखरप्रतापहि जरी भास्वान् सहस्रांकरीं
प्रत्यब्दीं हिम येथलें वितळण्यासाठीं प्रयत्नां करीं ॥ ४१ ॥
सारें व्यर्थ तरीहि; बर्फ न कधीं येथील जातें लया,
ज्यातें थोर निजाश्रया वितरिती कांहीं नसे भी तया.
जीं येथून समीप फार, दिसती तीं स्वच्छ नेत्रांप्रती;
त्यांमागील लगेच अंधुक जरा कांहीं दिसूं लागती; ॥ ४२ ॥
त्यांहींहून विशेष अंधुक दुजीं त्यां मागचीं त्यापरी
ओळीनें शिखरें जशीं चढत हीं जाती नभोभ्यंतरीं;
तैसा आदिमवर्ण पालटुनियां नीलत्व त्यां येतसे,
या योगें गगनास आणिक तयां वर्णैकता होतसे ! ॥ ४३ ॥


पांडुरंग वेंकटेश चिंतामणिपेठकर.

## २१ जाईचीं फुलें.

( कवि आपल्या मित्राच्या भेटीस गेला असतां त्यानें त्याचा जाई-च्या फुलांनीं सत्कार केला; त्या प्रसंगास उद्देशून– )

स्वागत केलें माझें, सन्मित्रा, त्वां फुलांस देऊन ।
झाला मोद मनाला प्रेमें त्यांचा सुगंध सेवून ॥ १ ॥
जीं ' दारचीं ' फुलें त्वां अपुल्या मज आणुनी दिलीं सुमनें ।
होता पुंज गुणांचा नव्हतीं तीं सत्य जाइचीं सुमनें ॥ २ ॥
कारण त्या पुष्पांनीं कथिलें भाषा स्वकीय बोलून ।
" वरिवरि हुंगुनि आम्हां वेड्या देऊं नकोस फेंकून ॥ ३ ॥
जे गुण असती साधे हितकर अंगांत आमुच्या चार ।
घे शिकुनी त्यां योगें स्वर्गाचेंही खुलें तुला द्वार ॥ ४ ॥
जैसा परिमल अमुचा टाकी सज्जनमनास मोहून ।
तव कीर्तीचा परिमल जग मोहू दशदिशीं दणाणून ॥ ५ ॥
आहे जगांत अमुचें निर्मल अतिशुभ्र सर्वदा रूप ।
तैसें तुझें असावें वर्तन त्या नच शिवो कधीं पाप ॥ ६ ॥
आम्ही कोमल तैसें हृदय असावें तुझें सदा साच ।
कोमेजावें त्यानें दीनांचा पाहुनी जगीं जाच ॥ ७ ॥
रूप मनोहर अमुचें दिसतें परि तें नसे रहायाचें ।
जग हें असार सारें जें दिसतें तें अखेर जायाचें " ॥ ८ ॥
इतुकें बोलुनि थकलीं, सुकलीं, मुकलीं स्वकीय तेजातें ।
जाईचीं दिव्य फुलें असलीं फेंकील कोण हो हातें ॥ ९ ॥
तीं धन्य रम्य कुसुमें मित्रा, तूं धन्य सत्य त्यांहून ।
मीं धन्य धन्य कां कीं माझ्या तीं पावलीं करीं निधन ! ॥ १० ॥

माधवानुज.

## २२ माधवीचें पुष्प.

दिंड्याः—माधवीचें हें पुष्प डुले वातें,
एकटें या वल्लीस शोभवीतें;
इतर पुष्पें केव्हांच गळुनि गेलीं !
अहा गंधाची माधुरी निमाली ! ॥ १ ॥

नसे येथें एकही बंधु याला,
नसे कलिकाही दुजी या लतेला;
एकमेकांचा सुखस्पर्श होतां,
हंसति सुमनें, तो काल कुठें आतां ? ॥ २ ॥

रम्य सुमना ! ही दशा दीनवाणी,
पाहुनीयां लोचनीं येइ पाणी !
लतेपासुनि मी तुला खुडुनि टाकीं,
नको होऊं तूं मग्न असें शोकीं ! ॥ ३ ॥

जेथ गेले त्वद्बंधु तेथ जाइं !
सवें त्यांच्या तूं गाढ झोंप घेइं !
जेथ लोपे तन्मूर्ति सुवासाची,
तेथ विखुरीं पाकळ्या तुझ्या साची. ॥ ४ ॥

असा होवो मद्विलय, जयीं होतें,
क्षीण मित्रत्व, प्रेम लया जातें;
शिथिल होतीं जैं प्रणयबंधनें तीं,
सकल मित्रां यमदूत जयीं नेती. ॥ ५ ॥

खऱ्या प्रेमाचें स्थान सखे जातां,
पिता, भ्राता, सुत, दार, तशी माता;

रहायाला इच्छील कोण मागें!
शून्य ऐशा या जगीं मला सांगें ॥ ६ ॥

वि. मो. महाजनी

## २३ फुलांपासून उपदेश.

दिव्या:–फूल जासुंदी फार दिसे लाल।
पाहुनीयां मन होतसे बहाल!।
हातिं घेतां परि होइ तें उदास।
वास नाहीं म्हणुनीच त्या फुलास! ॥ १ ॥
जुई जाई मोगरा सुपुष्पें हीं।
लहानमोठीं आसती त्यांत कांहीं!।
सुंदराकृति तीं तशीं एकरंगी।
गंध त्यांच्या बहु गोड असे अंगीं ॥ २ ॥
पुष्पवर्गामधिं मुख्य तो गुलाब।
मना लोभवि, तो जरी असे लांब!।
जवळ घेतां टोंचती फार कांटे!।
देइ उपदेशा नित्य नित्य वाटे! ॥ ३ ॥
मार्ग जगिंचा हा असे कष्टदायी।
तशीं दुःखें पसरलीं त्यांत पाहीं!।
दुःखरूपी कंटका दूर सारीं।
सुखा शोधुनि भोग तूं पसारीं! ॥ ४ ॥
सर्व पुष्पांमधिं पारिजात गोड।
दिसुनि, मनिंचे तो पुरवि सर्व कोड।
रंगिं खुलतो; नाजूक असे फार।
चिर न त्याला परि योग्य भू-विहार! ॥ ५ ॥

पूर्ण ऐसें या जगीं नसे कांहीं ।
दोष द्यावा नच कुणीं तो कुणाही ।
सर्व गुण ते प्रायशा एकठायीं ।
विश्वकर्ता द्यावया खुषी नाहीं ! ॥ ६ ॥
दिसुनि अपणां हें पदोपदीं येतें ।
सदा ठेवा मनिं याच सत्यतेतें ! ।
कवी ऐसें विनवूनि वाचकांस ।
रजा घेई जावया गुंगण्यास ! ॥ ७ ॥

**माणि.**

## २१ वटवृक्षास.

पुराणवंद्या तरुतापसा मी
विनम्र माथा करुनी प्रणामीं
यथामती थोर अवर्णनीय
पवित्र गातों महिमा त्वदीय ॥ १ ॥
लागे तुझें मस्तक देवलोका
पाळें तुझीं पावति नागलोका
तूं मृत्युलोकीं दिसशी कसा न
त्रिविक्रमाची प्रतिमाच सान ॥ २ ॥
लोकां तिन्ही आक्रमिण्या हुरूप
ज्या, तें तुझें भव्य विराट रूप
चित्तीं करी जागृत दृष्टिपातें
भीत्यादराचें दृढ मिश्र नातें ॥ ३ ॥
शाखा तुझ्या दूरवरी प्रयाण
दिग्मंडलांतीं करितात जाण

बुंधे तुझे नूतन जाग जागीं
येणींच विश्रांतिस त्यांजलागीं ॥ ४ ॥
तुझ्या शरीरावर लांब फार
हारी मुळांच्या करिती विहार
जशी जशी प्रौढ दशा बळावे
वाटे तशी दाढिच वाढ पावे ॥ ५ ॥
अन्योन्यसंगें बहु दर्शनीय
होती दळें पक्क फळें त्वदीय
कां पाचुचें पात्र न फार साजे
मध्यें जरी लाल मणी विराजे ॥ ६ ॥
सन्मान्य एका तव पूर्वजाची
लाभे तुला सत्कृति जाण साची
नाहीं तरी बा वटपौर्णिमेस
नारी तुझ्या कां जपत्या पुजेस ॥ ७ ॥
छाये तुझ्या वाटसरू विसावे
माथीं खगांचें कुळ वास पावे
स्कंधीं कपी कोटरिं कीट घेशी
नाना जिवां आश्रयदान देशी ॥ ८ ॥
जें जें दिसे तें सगळें विनाशी
या तूं प्रमेयाप्रति आड जाशी
होईल जेव्हां लय या जगाचा
पर्णीं तुझ्या विष्णु वसावयाचा ॥ ९ ॥
होई तुझी ब्राह्मणतुल्य मुंज
नाहीं परी ती श्रुत सोडमुंज

तूं ब्रह्मचारीच सदा रहाशी
दीर्घायुरारोग्यसुखा पहाशी ॥ १० ॥
देहीं पिशाचांस जरी प्रवेश
बाधे तरी ताप तुला न लेश
या ब्रह्मचर्याचरणेंच वाटे
अंगीं तुझ्या अद्‌भुत तेज दाटे ॥ ११ ॥
तुझ्या दुधाचें करितात पान
येई तदा बाल जटांस मान
तुझ्या समायुक्तदलावलीला
आलिंगिते भोजनपात्रलीला ॥ १२ ॥
तुझ्या जगन्मान्य समागमाचा
व्हावा द्रुमेशा सुखलाभ साचा
म्हणूनि कीं राम जगन्निवास
सेवी सुखें पंचवटीस वास ॥ १३ ॥

**राधारमण.**

## २४ समुद्र.

[ रावणास मारून श्रीरामचंद्र आपले पत्नीसह पुष्पकविमानांत बसून अयोद्ध्येकडे येण्यास निघाले. त्यांची दृष्टी खालील समुद्राच्या पाण्याकडे जाऊन, समुद्रासंबंधीं सुचलेले विचार ते आपले पत्नीस ( पुढील श्लोकांत वर्णिल्याप्रमाणें ) निवेदन करितात. ]

**शा. वि.**—सांगातें जनकात्मजेस अपुल्या घेवोनियां सत्वरी, ।
जाई व्योमपथें विमानि बसुनीं श्रीरामनामा हरी; ।
तैं रत्नाकर पारशून्य सहसा पाहोनियां खालता, ।
एकांतीं दयितेस तो गुणनिधी झाला असें बोलता. ॥१॥

" हा पाहें मम सेतुनें जलनिधी झाला द्विधा मैथिली, ।
लाटा या मलयावधी उसळती, तैशाच फेनावली; ।
तारांचे गण जेथ शोभति शरत्कालीं बहू निर्मळ, ।
त्या छायापथ[1] जेवि भेदि गगना, तैसा दिसे सोज्वळ." ॥२॥
" पूर्वी जैं सगर क्रतूंस[2] करिता झाला तंई सुंदरी, ।
अश्वाला कपिल स्वयें हरुनि तो पाताळिं ने सत्वरी; ।
तच्छोधार्थ, वसुंधरा खणिलि तत्पूर्वी खनित्रीं[3] महा, ।
केला वर्धित पूर्वजीं मम असा सिंधू प्रिये हा पहा." ॥३॥
" याचें घेउनि अंबु वृष्टि करिती अंशू रवीचे जनीं, ।
होती चंद्रमुखी अमोलिक असे पोटांत याच्या मणी; ।
अंभोभक्षण वाडवाग्निहि जलीं यानेंच गे पोषिला, ।
लोकानंदन चंद्रमाहि सखये यापासुनी जन्मला. ॥ ४ ॥
विष्णूची स्थिति भिन्नभिन्न असते तेवींच याची असे, ।
जेवीं व्यापक विष्णु तेविं दयिते दिग्व्यापि हाही दिसे; ।
यासाठीं निजरूप अंबुनिधिचें विस्तीर्णताही खरी, ।
विष्णूचे परि, जानकी, न समजे कोणासही भूवरी. ॥५॥
ज्याच्या नाभिसरोरुहीं बसुनियां ब्रह्मा स्तुतीतें करी, ।
शक्तीनें सकलां जगांस उदरीं जो आवरोनी धरी; ।
शेषाच्या शयनावरी निजमुखें श्रीपुंडरीकाक्ष गे, ।
कल्पांतीं जलधींत या निजुनियां तो योगनिद्रेस घे. ॥ ६ ॥
पक्षच्छेद करोनियां सुरवरें हारीस ज्या आणिलें, ।
ते अब्धींत शतावधी गिरिसुखें येवोनियां राहिले; ।
शत्रूंनीं अतिपीडित क्षितिपती ते जेंवि धर्मान्विता, ।

---

१ आकाश गंगा २ यज्ञास. ३ खणण्याच्या हत्यारांनीं.

मध्यस्था नृपतीस आश्रिति, तसें हेंही दिसे पाहतां.॥७॥
साधी उद्वहनक्रिया कृतयुगीं कोलावतारी हरी, ।
तेव्हां ह्या जलधींतुनी वसुमती ती शीघ्र येई वरी; ।
कल्पांतीं उसळे बळें जळ बहू याचेंचि तें भ्वानना, ।
झालें कीं मुखवस्त्र तैं क्षणभरी, वाटे असें गे मना ॥८॥
लांबी शंभर योजनें, बघ शिरीं राहे ज्यांच्या बिळें, ।
ज्याचें नांव तिमी अशा जलचरीं हा अंबुधी संकुल; ।
हे मासे नदिच्या मुखीं जमलिया सप्राणि तोया पिती, ।
डोळ्यांला मिटुनी, बिळांतुनि वरी पाणी त्वरें झोंकिती.॥९॥
मातंगाकृति नक्र या जलनिधीमध्यें उड्या मारिती, ।
तेणें फेनागिरी फुटोनि तुकडे होवोनि नानारिती;
तेही उच्च उडोनि कर्णयुगुला नक्राचिया लागती, ।
पाहातां नयनीं जनां क्षणभरी हे चामरें भासती ॥ १० ॥
येती सर्पवरी बिळांमधुनि हे वेलानिला प्यावया, ।
या लाटाच असा जनां ग्रह मुळीं होतो बघूनी ययां; ।
सूर्याचे किरणव्रजें चमकती जेव्हां फणांचे मणी, ।
तेव्हां निश्चय होय कीं, पसरले आहेत येथें फणी ॥ ११ ॥
ओष्ठाचे परि रक्त विद्रुम तुझ्या आहेत, त्यांच्यावरी, ।
लाटा लागुनि शंख येउनि पहा हे ठेपती सत्वरी; ।
त्यांचे अंकुर तैं मुखांत शिरती शंखांचिया सुंदरी, ।
त्यांतें सोडुनि जावयास सखये, हे कष्टती अंतरीं ॥ १२ ॥
आकाशांतिल मेघ सिंधुसलिला प्यायास ओणावला, ।

१ वराहावतार. २ तिमि नांवाच्या माशांचे डोक्यावर एक छिद्र असतें त्यांतून ते पाण्याचे फवारे उडवितात. ३ तीरवायु. ४ पोंवळीं.

पाण्याच्या भ्रमणामुळें गरगरां तेथें फिरों लागला; ।
त्याला पाहुनियां मनांत वनिते येतें असें संप्रती
कीं हा मंदरशैल या घुसळितो सिंधूप्रती मागुती ॥ १३ ॥
हे वैदेहि दुरून सिंधु दिसतो हा लोहचक्राकृती ।
त्या भोंतील तमालवृक्षनिकरीं कृष्णा विराजे क्षिती; ।
एथोनी बहु दूर यास्तव दिसे ती फार सूक्ष्मा तसी, ।
चाकाच्या भंवतील काळि दिसते रेखा मळाची जसी ॥ १४॥
शुक्ती भंगुनि सैकतीं विखुरल्या मुक्तावली शोभती ।
जेथें नारळि पोफळीहि लवल्या भारें फळांच्या अती; ।
ऐशा सिंधुतटीं विमानगतिनें अत्यल्पकालें पहा, ।
आलों आपण इंदुसुंदरमुखी आश्चर्य वाटे महा ॥ १५ ॥

१ वाळूंत.

**गणेशशास्त्री लेले.**

## २५ समुद्र शांत असतां त्याचा देखावा.

**इंद्रवज्रा:**—तूं शांत होसी जंव सिंधुराया ।
पृष्ठास शोभा दिसते कशी या
जों दृष्टि चाले क्षितिजास दूर ।
तों स्वच्छ देखें तव नीलनीर ॥ १ ॥

**मंदाक्रांता:**—धन्या कन्या चपल लहरी पाठवोनी निजाया ।
तूं एकांतीं बससि चरितें मागचीं आठवाया ।
आनंदानें तदुपरि तुला तंद्रि लागे मनांत ।
आणी वारा प्रियसख तदा जागृतीच्या दशेंत ॥ २ ॥

**वसंतति०:**—त्वत्पृष्ठभागजल शांत सुरम्य नीळ ।
वाटे जणो रचिलि लावुन भूमि नीळ ।
वारा सुटे हळु हळू मग लाट हाले ।

कीं हार मौक्तिक हिरे रचुनीच ठेले ॥ ३ ॥
शिखरिणी:—अशा वेळीं दूर क्षितिजिं मिळतें तें गलबत ।
शिडें त्याचीं शुभ्र असति गगनांतीं फडकत ।
तुझ्या पृष्ठीं वाटे मणिमय जमीनीच वरुन ।
पदें टाकी हंस स्तिमित निजपक्षां उभरुन ॥ ४ ॥
शार्दू०वि०:—तारे अंबरिं ते क्वचित् चमकती जैसे जगीं सज्जन ।
तद्बिंबें कुसुमें जणो उधळलीं त्या शांत पाण्यांतुन ।
जाते लाट हळू उठोनि न कळूं देतां कुलस्त्रीगती ।
ऐशा त्या समयीं प्रशांत दिससी गंभीर रम्याकृती ॥५॥
शिखरिणी:—सुपुष्पोद्यानांतीं भ्रमर जणु गुंजारव करी ।
तसा वारा कर्णीं सुटुन हळु झंकार विखरी ।
निजे पृष्ठीं वाटे तव हरि तया नारद मुनी ।
स्तवूं गातो त्याचे ध्वनि पडति कर्णांत दुरुनी ॥ ६ ॥
फुटाया ज्या तेव्हां उठति लहरी त्यांच मधुन ।
जणो झोंके खाती पडुन उदकीं चंद्रकिरण ।
अशाकालीं रात्रीं बसुन तव तीरीं जलनिधी ! ।
तुला प्रेमें हर्षें नयनिं सखया पाहिन कधीं ! ॥ ७ ॥

**वासुदेव वामनशास्त्री खरे.**

## २७ तुफान.

मालिनी:—जवन पवन धांवे सायकाच्या गतीनें,
नदिपति खवळे हा त्याचिया संगतीनें;
अहह ! कहर केला आजि या फार वातें,
बसति कितिक झोंके आमुच्या तारवातें ॥ १ ॥
पुरुषभर उडोनी मागुती येत खालीं,

खळ खळ जळ येतें आंत जैशा पखालीं !
भरुनि भरुनि त्यातें श्रांत झाले खलाशी,
सुजन सदुपदेशा जेविं देतां खलाशी ॥ २ ॥
उसळति लहरी या पर्वतप्राय तुंग !
बघुनि मति भयानें होतसे सर्व गुंग;
क्षणहि भरंवसा या येइना तारवाचा,
विकल वदनिं चाले घोष चिंता--रवाचा. ॥ ३ ॥
बघुनि मन थरारे सिंधुची उग्र मुद्रा,
व्यसनसमयिं धावें तूं दयेच्या समुद्रा !
फिरफिरुनि उठे हा घोर कल्लोळ लाटीं,
विधिलिखित कळेना काय आहे ललाटीं ! ॥ ४ ॥
बहुत कठिण घोंघो वाहतो काय वारा !
क्षणभरि गवसेना प्राणिमात्ना निवारा;
अटपुनि अवजारें फाटकीं छिन्न भिन्न,
दिसति मनिं खलाशी जाहले फार खिन्न ॥ ५ ॥
म्हणति शरण आम्ही तार रे वायुदेवा !
विसरुन चुकलीसे कोणती सांग सेवा,
नवस करुनि भावें फोडिती श्रीफलांतें,
घडि घडि अठवीती बायकांतें मुलांतें. ॥ ६ ॥
डुलत डुलत तारूं आपटे एक बाजू,
धरणिं पडत जेवीं एक भारें तराजू;
प्रति समयिं तडाका अब्धिची लाट हाणी,
हिकडुनि तिकडे हें खेळतें सर्व पाणी ॥ ७ ॥

---

१ दुश्वास. २ निस्तेज. ३ नारळ.

किति तरि लहरींची होय मोठी कमान,
वळणमुद दिसे ती पर्वताच्या समान;
गगनिं जळ चढोनी होतसे छत्र काळें,
वदन पसरलें हें खावया काय काळें ! ॥ ८ ॥
चढुनि चढुनि लाटा झांकिती सूर्यबिंब,
स्थळ वसन भिजोनी जाहलें सर्व चिंब;
हुडहुडि भरुनीयां अंग झालें बधीर,
अजुनि मनिं धरावा कोठपर्यंत धीर ! ॥ ९ ॥
अवजड परि जोरें डोलकाठीहि हाले,
कर कर कर ऐसा सारखा शब्द चाले;
तट तट तट जाती दोरखंडें तुटोनी;
शिव शिव ! हृदयांचा धीर गेला सुटोनी ॥ १० ॥
कवळुनि तुळयांतें बैसलों एक ठायां,
गर गर फिरतें कीं, शक्ति नाहीं उठाया;
फिरुनि फिरुनि डोकें पित्त आलें कपाळा,
अतडिं तुटुनि गेलीं ओकतां विश्वपाळा ! ॥ ११ ॥
बहुत दिवस झाले अन्न नाहींच पोटा,
विकल सकल गात्रें येति पोटांत वेटा
बुरसुन दशम्याही जाहल्या त्या निकामी,
काधिंच पडशी झाली लाडवाची रिकामी ॥ १२ ॥
भरुनि जळमटें हे नासले सर्व पोहे,
विपरित विधि झाल्या वांकडें काय नोहे ?
हर हर ! पडले कीं, गोड पाण्यांत जंतू,

अजि तर तुटतो हा वाटतें प्राणतंतू ॥ १३ ॥
वरति दिसत सारें शून्य आकाश मात्र,
जलमय भय वाटे खालतें सिंधुपात्र,
गगनिं दिसत नाहीं एकही आज पक्षी,
कठिण समय आला, ह्यांतुनी कोण रक्षी? ॥ १४ ॥
तरु नगहि दिसेना येथ कैंची जमीन,
सभय पळत जाती मोठमोठेहि मीन;
इतर जलचरेंही धांवती सैरवैरा;
व्यसनसमयिं हा हा! टाकुनी लोभ वैरा. ॥ १५ ॥
गलबत खुटवीलें टाकुनी लंगराशीं,
तरिहि जलधिसंगें ना टिके संगराशीं;
अधिक अधिक वारा होतसे फार जोर,
अहहह! तुटला कीं नांगराचाहि दोर ॥ १६ ॥
भडकुनि पवनानें स्वैर तारू निघालें,
किति तरि न कळे हे दैव घालील घाले!
जलद हल[1] खलाशी टाकिती दूसरा हो,
अजुनि तरि दमानें बापुडें स्थीर राहो! ॥ १७ ॥
फिरुनि जरि हलाचा दोर तोडील वायू,
तरि मग सकलांचें संपलें खास आयू!
गमत मम मना हा दोर नोहे हलाचा,
प्रगट निवळ तंतू जीविताच्या बलाचा ॥ १८ ॥
घडि घडि जइं होतो वायुचा फार जोर,
दचकुनि तुटला कीं पाहतों काय दोर;

---

१ नांगर.

निशिदिना सकलाना लागला तोचि घोर,
व्यसनसमयिं होतो नीचही फार थोर. ॥ १९ ॥
रडुनि रडुनि झालों काय हो दीनवाणी;
नयन सुकुनि गेले आटलें सर्व पाणी;
उगिच करुनि होतों स्वस्थ ऐसा विवेक,
नविन नविन तों तों संकटें एक एक ॥ २० ॥
निबिड गगनिं आल्या मेघपंक्ती भरून,
सळ सळ जळ धारा ओतती कीं वरून!
गड गड गड अंगा गर्जना कापवीते,
जलद जलद आला साह्य व्हाया पर्वीतें. ॥ २१ ॥
चम चम चम नाचे काय विद्युल्लता ही!
कड कड कड शब्दें नाद कोंदून राही;
घँसरुनि पडते ही वाटतें मस्तकांत,
खचित खचित आलों मृत्युच्या मी मुखांत! ॥ २२ ॥

**कृ० ना० आठल्ये**

## २८ गजान्योक्ति.

ज्याची स्पर्धा कराया इतर गज कधीं शक्त नाहीं च झाले,
सांगावें काय? ज्याच्या मृगपति हि भयें रान सोडून गेले,
तो पंकामाजि आजी गजवर फसला, युक्ति नाहीं निघाया.
आव्हेरीती, पहा, हे कलकल करुनी क्षुद्र कोल्हे तयाला.॥१॥
माझी शक्ति अपूर्व, बाग अवघा म्यां मोडुनी टाकला,
ऐसें मानुनि हर्ष फार तुजला चित्तीं खरा वाटला,
ग्रीष्मीं तीव्र रवी तपोनि करितां आंगीं तुझ्या काहली,

---

१ मेघ, २ घाईनें.

ती पीडा टळण्यास कोणति तुवां युक्ती, गजा, योजिली ? ॥२॥
कंठीं मोठा बळकट असे पाश, पायांत बेडी,
बैसोनीया शिरिं नर तुझ्या अंकुशें गंड फोडी,
जीपेक्षां कीं मरण बरवें भासतें, त्या दशेतें;
पावोनीयां अजुनिहि, गजा दाविशी कां मदातें ? ॥ ३ ॥
साक्या:—जेथें शीतळ मधुर स्वच्छ प्राशियलें त्वां वारी,
सरस कमलिनीकांडें जेथें भाक्षियलीं ही भारी, ॥ ४ ॥
ग्रीष्मीं मध्यान्हीं सूर्याच्या तीव्रांहीं किरणांहीं,
झाला ताप तुझा कीं शमला ज्यामध्यें स्नानांहीं, ॥ ५ ॥
त्याच ढवळुनी सरोवराचें नाशिशि पाणी सारें !
तटें पाडशी जणु तव आंगीं भरलें पिशाचवारें ! ॥ ६ ॥
कृतघ्नतेचें नीच असें हें करिशी कैसें काज ?
नाहिं वसत कीं चित्तीं तुझिया, हे गजराजा, लाज ?॥७॥

## हरिणान्योक्ति.

दिंड्या:—मत्त असती जे धनाच्या मदानें.
न दावीशी त्यां तोंड दीनवाणें,
आर्जवाचीं भाषणें मधुर खोटीं
करुनि तोषविशी न त्यां कधीं पोटीं, ॥ १ ॥
गर्ववचनें ही परिसशी न त्यांचीं,
धरुनि आशा त्यांचिया प्रसादाची,
घरा त्यांचीया करुनि येरझारा
न घालविशी तूं स्वीय काळ सारा. ॥ २ ॥
भूक लागलिया कोमला तृणातें
भक्षुनीयां तूं पावसी सुखातें,

स्वस्थ निद्रेशीं घेशि झोंप येतां,
चित्तिं नाहीं तव काडिमात्र चिंता. ॥ ३ ॥
अशी सौख्याची स्थिति प्राप्त व्हाया
योजियेलें त्वां कोणत्या उपायां ?
काय कोठें त्वां तपश्चरण केलें ?
मृगा, योगें[1] ज्यो भाग्य हें उदेलें. ॥ ४ ॥
नवें कोमल उगवलें गवत दाट,
स्वच्छ सुंदर वाहतो त्यांत पाट,
मृगी ठायीं त्या एक देखियेली,
जिच्या आंगीं तारुण्य करितें[2] केली. ॥ ५ ॥
अशा पाहुनियां उत्तम स्थलातें
भूल पडली तैं मृगाच्या मनातें,
व्याध चापीं योजुनी बाण राहे,
आड जाळीच्या न तो[3] त्यास पाहे ॥ ६ ॥
वनीं हिंडोनी शीण फार झाला,
घाम आंगाला तुझ्या दाट आला,
बैस येऊनि स्वस्थ आश्रमांत,
करीं रोमंथा, नीज, बा, निवांत ॥ ७ ॥
दुष्ट भिल्लांचा इथें वास नाहीं, ।
मुनी बसले हे शांत यांस पाहीं,
भूतमात्रीं हे दयेतें करीती,
मृगा, मनिंची, बा, सोड सर्व भीती ॥ ८ ॥

---

१. ज्या योगं म्हणज ज्या तपश्चरणाच्या योगानें. २. तारुण्य जिच्या आंगांत खेळत आहे म्हणजे रसरसत आहे. ३ तो मृग त्यास म्हणजे व्याधास.

श्लोकः—जाळें तोडुनियां बळें हरिण तो टाळोनि दावाग्निला,
व्याधाचे चुकवूनि बाण हि महा वेगें पुढें चालिला,
तों घाईंत उडी फसूनि पडला आडामधें बापडा;
होती सर्वहि यत्न निष्फळ, जरी होई विधी वांकडा ॥९॥

## वृक्षान्योक्ति.

मार्गीं वाढुनि सांवली पसरिशी विस्तीर्ण कां तूं अशी ?
कां होशी फलयुक्त ? होउनि तसा कां वांकशी भूमिशी ?
तेणें ओढिती, तोडिती, जन तुला पाषाणही मारिती,
वृक्षा, सोस निमूट हाल अवघे, आतां न अन्या[१] गती ॥ १ ॥

आर्याः—दाटी वाटसरांची, तीव्र उन्हाळा असा असे फार,
मार्गीं एकच तरु हा कितिकांचा ताप तो करिल दूर ? ॥ २ ॥

श्लोकः—दावाग्नी खवळोनियां तरुवरा जाळावया जैं वळे,
जाती सर्व पळोनि कोकिल, शिखी, रावे तसे कावळे,
भक्षायास फळें चहोंकडुनियां एकत्र [२]जे जाहले;
येतां संकट-काळ होय जवळी ऐसा न कोणी मिळे. ॥ ३ ॥

जे भक्षूनि फळें सदैव पिकलीं स्वादिष्ट आनंदले,
कोटीं बांधुनि त्यांत जे तुजवरी वर्षें बहू नांदले,
ते पक्षी करुणस्वरें विलपती, वृक्षा तटीं बैसुनी,
पाडाया तुज थोर जोर करितां पूरास या देखुनी. ॥ ४ ॥

तापानें पीडिले, त्यां निववविशि; करिशी तृप्त त्यां जे भुकेले;
अर्थी देऊनियां त्वां अभिमत मनिंचें फार संतुष्ट केले;

१ आतां दुसरा मार्ग नाहीं. २. कोकिलादिक.

ऐशी कीर्ती तुझी ही परिसुनि दुरुनी पातलों आश्रयातें,
कांटे झाडें अम्हा हीं अडवुनि धरिती कां? तरो वार यातें. ॥९॥

## सूर्यान्योक्ति.

कोकां शोकास त्यांच्या शमवुनि दयितासंगमें हर्षवी जो,
कारागारें करांहीं उघडुनि कमलें भृंग ही सोडवी जो,
जेणें अंधार सारा पळवुनि हरिलें सृष्टिच्या दृष्टिदोषा,
त्या मित्राचा बघूनी उदय कवण तो चित्तिं मानी न तोषा॥१॥
देखूनी उदया तुझ्या द्विजकुळें गाती अती हर्षुनी,
शार्दूलादिक सर्व दुष्ट दडती गिर्यंतरीं जाउनी;
देशी ताप परी जसा वरिवरी येशी नभीं भास्करा,
अत्युच्चीं पदिं थोर ही बिघडतो हा बोल आहे खरा. ॥ २॥
थोडा बहू उजड पाडुनि अंधकारा
कांहीं कमी करिति दीप, शशांक, तारा;
नाशी प्रकाश अवघ्या हि तमा जयाचा
ऐसा जगीं, समज, एकच भानु साचा ॥ ३ ॥

---

१ कोक या नांवाचे पक्षी आहेत त्यासच चक्रवाक म्हणतात. ही पांखरें नदी, तळीं इत्यादि जलाशयांच्या आश्रयानें असतात व त्यांत नरमादीचें फार प्रेम असल्यानें हे पक्षी जोड्यानें बहुनकरून फिरतात. या पक्ष्यांविषयीं प्राचीन कवींची समजूत अशी आहे कीं, संध्याकाळीं नरमादींची फुटाफूट होऊन एक एका तीरास व दुसरा दुसऱ्या तीरास अडकून सर्व रात्र तीं वियोगानें दुःख पावत असतात. व सूर्योदय झाला म्हणजे पुनः त्यांची भेट होते.

२. कमळें संध्याकाळीं मिटलीं असतां त्यांत भृंगे अडकून सकाळपर्यंत तसेच कोंडून राहतात, या प्रसिद्धीवरून कमलांस येथें कारागारें कल्पिलीं आहेत.

३. कर या शब्दावर येथें श्लेष आहे.

४. मित्र व उदय या शब्दांवर श्लेष आहे.

होता जोंवरि अंबरीं तपत तो चंडांशु तेजें निजें
झाला निष्प्रभ तारकाधिपति ही, बोला कशाला दुजें ?
राहूच्या वदनीं अजीं गवसतां तो भानु दैवें अहा !
कैसे क्षुद्रहि काजवे चमकती त्याच्या पुढें हे पहा ! ॥ ४ ॥

आर्या:—असती बहु तेजस्वी नक्षत्रें, दीप, अमृतमयगात्र
ज्याच्या उदयास्तांहीं होती दिनरात्रि, तो रवी मात्र॥५॥

## चंद्राविषयीं अन्योक्ति

चंद्रा, सकल जनांहुनि तव ही विपरीत रीत काय अशी ?
क्षय होतां वक्रत्वा वृद्धी होतां सुवृत्तत्ता धरशी. ॥ १ ॥
वाढशि जसा जसा तूं तसा तसा त्वत्कलंक उघड पडे
चंद्रा योग्यच हें तुज जडस्वभावा सदां असेंच घडे ॥ २ ॥

श्लोकः—नक्षत्रें परिवार ज्यास, पतिही जो औषधींचा असे,
ज्यातें पाहुनि हर्षती जन, सुधा ज्याच्या शरीरीं वसे,
होई तेज कमी तया हि विधुचें येतां रवीच्या गृहीं,
ज्या येई लघुता न अन्यसदनीं, ऐसा न कोणीच ही ॥३॥

**कृष्णशास्त्री चिपळूणकर.**

---

१अमृतरूप आहे शरीर ज्याचें तो म्हणजे चंद्र. चंद्राचें शरीर अमृतमय असून देव त्याचें पान करितात म्हणून त्याचा क्षयवृद्धी होते, अशी प्राचीन लोकांची समजूत होती.

२. या पद्यांत वक्रत्व व सुवृत्तत्ता या शब्दांचे दोन दोन अर्थ आहेत, ते कोशांत पाहावे.

३. ड आणि ल. या अक्षरांचें ऐक्य असल्यानें या शब्दाचे जलस्वभाव म्ह० पाण्याचा व जडस्वभाव म्हणजे मूर्ख असे दोन अर्थ होतात. चंद्र जलमय आहे अशी प्राचीन लोकांची समजूत होती.

४. चंद्रास औषधींचा म्हणजे झाडांचा राजा ह्मणतात.

५. सूर्याच्या स्थानीं आला असतां म्हणजे सूर्य व चंद्र एका राशींत आले असतां.

## २८ कुंजकूजन.

श्लोकः—" वाणी ममैव सरसा यदि रंजयित्री
न प्रार्थये रसविदामवधानदानम्
सायंतनीषु मकरंदवतीषु भृंगाः
किं मल्लिकासु परमंत्रणमारभन्ते "

दिंड्याः—कृष्णपक्षींचा चंद्र कलाहीन ।
पश्चिमेच्या क्षितिजांत होय लीन;
भागलेला जणुं जरठसा प्रवासी, ।
लागलाहे खालती बसायासी. ॥ १ ॥

दीर्घसूत्री ती रात्र चंद्रजाया, ।
पूर्व गोलातें त्यजुनि निघे जाया;
उदयसंधी येतांच आळशातें, ।
स्वयें तंद्रा सोडोनि जशी जाते. ॥ २ ॥

बाल दिनकर तो उदयगिरि–शिराला ।
प्रयासानें आरूढ जणों झाला;
मृदुल दुलईसम धवल धुकें त्यानें ।
निजकरांहीं सारिलें आळसानें ॥ ३ ॥

अरुण किरणें मंदोष्ण तयाचीं तीं ।
पडुनि, आकाशीं लाल छटा देती;
प्रेमरंगें जणुं बाळ–रवि–चितारी, ।
किरणकलमांनीं गगनपट चितारी ॥ ४ ॥

सुखद त्याचें तें उष्ण पसरताहे, ।
तरिहि कमती हेमंतशीत नोहे;

असुनि अर्थोष्मा, जेंवि लोभियाचें ।
दैन्य म्हणुनी कधिंही न जावयाचें ! ॥ ५ ॥
अझुनि ठेवुनि निज गाल गालुशीतें ।
बिछान्यांताचि असतील आळशी ते;
अशा समयीं मधुमधुर ह्या रवानें ।
आळवितसे हा कोण गौरवानें ? ॥ ६ ॥
कुठुनि येते ही शब्दसुधाधारा ।
हिनें भरिला कीं निकट भाग सारा !
अहो ! बघताहे चकित लोचनांहीं ।
उगम हीचा तरि दिसत मला नाहीं ॥ ७ ॥
' कोण तूं गा ! कोठील कवणियाचा ? ' ।
कुठें आहे तव वास वसायाचा ?
कुठें केला अभ्यास गायनाचा ? ।
कोण झाला गुरुराय तुज, तयाचा ? ॥ ८ ॥
असासि कलरव कीं काय सतारीचा ? ।
दिव्य सुस्वर कीं अमर--सुंदरीचा ?
मूर्तिमंतचि कीं सामवेद साचा ? ।
सांग मजला तें सांग सुधावाचा ! ॥ ९ ॥
जिच्यामाजीं प्रतिबिंब तुझें राहे ।
वस्तु लोकीं कोणती अशी आहे ?
सरस हृदयीं मेत्र तो स्वातिचाही ।
तुझ्या सारिचा जरि म्हणूं तरी नाहीं ! ॥ १० ॥
कर्णरूपी उघडल्या शिंपल्यांत ।
वचनबिंदू जे तुझे उतरतात,

अमित सोज्वलसें तयांचेंच पाणी ।
रुचिर मोत्यांसही गौणताच आणी ॥ ११ ॥
वेणुनादें माधवें मधुवनांत
ब्रह्म बिंबवुनी प्रणयिजनमनांत
परम हर्षाचा परम लाभ त्यांतें
करुनि दिधला ऐकोनि ठाउकें तें ॥ १२ ॥
परी त्याची अनुभूति मला नाहीं!
न हो किंबहुना मना कल्पनाही!
आजि तूझ्या परिसोनि गायनातें,
किमपि त्याचें अनुमान मला होतें! ॥ १३ ॥
काळसर्पाहुनि जे महा विखारी,
असे दुर्जन, त्यांनांहि जिंकणारी,
चंद्रमणिसम रसिकांस झरविणारी,
होय वाणी तव अमृतगर्वहारी. ॥ १४ ॥
पहा विस्मय चहुंकडे प्रसारीत,
गाढ जिज्ञासा रसिक मनिं भरीत,
उष्णसंगें अनुराग संचरीत,
गिरा विचरे ही पवन–लकेरींत. ॥ १५ ॥
उदासांचें औदास्यतम हरोनी,
निराशांचें नैराश्य निवारोनी,
व्यथित हृदयांची व्यथा शांतवोनी,
विलसते ते उल्हास उपजवोनी. ॥ १६ ॥
तरी अद्भुतरस असा निर्मिणारा,
सरस मानस उचमळुनि आणणारा,

हेंच नन्दनवन करुनि दाविणारा,
कोण अससी तूं दिव्य गुणागारा? ॥ १७ ॥
गुच्छ जैसा काश्मीर--गुलाबाचा
हरितपर्णांमधिं गुप्त असे साचा,
तरी परिमल चहुंकडे तयाचा तो
दरवळोनि रसिकांस मोहवीतो; ॥ १८ ॥
लपुनि कोठें तरि विहंगमा! तैसा
नादसंगम वितरोनि मधुर ऐसा,
गड्या! मजला तूं वेड लावियेलें!
तरी सांगें त्वां गेह कुठें केलें! ॥ १९ ॥
असाधारण गुण असुनि असा अंगीं
कासया तूं बैससी गूढ जागीं?
वसत असतां कीं नित्य विजन--वासी
येत आहे थोरवी गुणिजनांसी? ॥ २० ॥
दिव्य तेजोवलयांत विचारांच्या
लीन होउनिया कवी, सुधावाचा,
वदे नैसर्गिक काव्य, तसा तूंही
गासि गायन हें विस्मयप्रवाही! ॥ २१ ॥
काव्य तूझें ज्यांतोनि उगम पावे
विषय लोकीं ते कोणते असावे?
लोल सलिलें, कोणतीं उपवनें तीं?
माळ, किंवा कोणत्या शैलपंक्ती? ॥ २
रम्य देखावे नभोमंडलाचे,
प्रेम किंवा तूझिया प्रियजनाचें?

अपरिचय कीं संसार विपत्तींचा
उगम आहे ह्या काव्यनिर्झरीचा? ॥ २३ ॥
अगा गंधर्वा! अगा विहगराया!
चित्तचातक हा आत्मवश कराया,
तुझ्या हृदयीं कोणते तरि विचार
असति हृदयंगम जेहि काव्यसार?! ॥ २४ ॥
ठाउका जो आनंद तव मनाला
लेश त्याचा देशील काय याला?
शिकविं शिकवीं तव शब्दमोहिनी ते
ह्याहि जिव्हेतें सहज कर्कशेतें ॥ २५ ॥
अरे! इतुक्यांतचि मौन असे कां हें?
तुवां वरिलें! हें उचित तुला नोहे!
असुनि कवि मी तुज करित विनंती ही
अविनयें कां अवमानितोस तीही! ॥ २६ ॥
होय तूझा व्यवसायबंधु गा मी;
सतनुवाङ्मन मी रसिक–जन--लगामीं
बघुनि तूझा गुण दिव्य निराभिमानी
करी विनती, ती सुजनपणें मानीं ॥ २७ ॥
गुणाविहीना गुणमणी गमति कांचा,
गुणी हेवा करितात गुणिजनांचा;
परी गुणवान् गुणिगणा चहाता
विरल विरलचि तो सरलजन पहातां! ॥ २८ ॥
लक्ष पक्षी लक्षिले आजवेरी
रंगरूपें शब्देंहि मनोहारी;

परी करणारा यापरी बहारी
नाहिं नाहीं कुणी कुंजवनविहारी! ॥ २९ ॥
अगा गंधर्वा! तरी लताऽगारीं
छेडिं छेडीं तूं फिरुनि रागदारी!
तिच्या श्रवणाचा, तुझ्या दर्शनाचा,
लाभ झाल्याविण मी न हलायाचा ! ॥ ३० ॥
हाच वाङ्मधु हृदयांत सांठवीन,
काव्यरूपें रसिकांस पाठवीन;
तरी तव ते बहुमोल बोल बोल!
देइ दर्शन दृष्टीस या विलोल! ॥ ३१ ॥
अहो! परि हा भ्रम काय मला झाला!
प्रार्थिताहें मी काय हें? कुणाला?
वनेचर जो स्वातंत्र्यसुधास्वादी
कासया तो साहील मम उपाधी? ॥ ३२ ॥
काय म्हणुनी शिकवील मला हो तो!?
आणि शिकवोनी काय कवी होतो?
कदा नोहे!—रससिद्ध कवी जो कीं
स्वयंभू तो अवतरत असे लोकीं. ॥ ३३ ॥
स्वयं काव्यस्फूर्तीस पावणारा
स्वयं नादब्रह्मांत गुंगणारा,
शब्दसृष्टीचा चतुर विधाता तो
जगन्मोहन या खगापरी गातो. ॥ ३४ ॥
कुठें वाणी या कुंजकूजनाची!
कुठें माझी वैखरी खरतराची!

कुठें निर्मल जीवंत झरा तीचा
कुठें कर्दम मत्काव्यपल्वलींचा ! ॥ ३५ ॥
कुठें त्याचें निश्चिंत अंतरंग !
कुठें माझे दुर्मनो--मनोभंग !
कुठें त्याचा स्वातंत्र्य वनविहार !
कुठें जीवित परतंत्र हें असार ! ॥ ३६ ॥

निराशेनें जाहलों उदासीन !
कवित्वाचा मद होय मनीं लीन;
गमे सारें जग जीर्णवन मला हें;
त्यांत एकचि मी जीव वृथा आहें ! ॥ ३७ ॥
अहो ! इतुक्यामधिं काय नवल झालें
प्रेम-बिंबचि कीं भानुचें-उदेलें !
आणि तेणें निमिषांत उपवनाला--
नव्हे ! --आलें चैतन्य या जगाला ! ॥ ३८ ॥
हृदयरूपी जो प्रेमकोश त्यातें
व्यक्त करुनी जणुं सर्व सहृदयांतें,
जडांलाही चैतन्य द्यावयाला
कुंजकूजन लागला गावयाला ! ॥ ३९ ॥
जसा त्याचा रव कर्णमनोहारी,
तसा होई प्रतिरवहि सभोंवारीं;
जणों उपवनही कुंजकूजनाचे
असुनि नादब्रह्मांत लीन नाचे ! ॥ ४० ॥
धन्य अससी तूं कुंजकूजना गा !
गाइं गाईं निजगान महाभागा !

तुझ्या गानें होईल खलभुजंग
वशहि तरि तो मग कां न रमारंग ? ॥ ४१ ॥
पंचमांतिल आलाप कोकिलांचे,
नादसंयोगाहि तंतुवादनांचे,
काव्यमकरंदहि महाकविजनांचे,
वृथा ! येथें जाहले वृथा साचे ! ॥ ४२ ॥
परमसीमा ही दिव्यमाधुरीची,
मनुज वाणीनें कधिं न कळायाची.
स्वाद हीचा रसिकांस जरी व्हावा,
तरी त्यांनीं रव हाच आयकावा ! ॥ ४३ ॥

## समर्पण.

जें जें निसर्गरमणीय म्हणोनि कांहीं,
निर्माण होउनि जगीं विलसोनि राही;
सौंदर्य तें नयनगोचर होय साचें,
अज्ञेयशा भुवनसुंदर ईश्वराचें ! ॥ ४४ ॥
विश्वास ठेवुनि मनांत असा विवेकें,
विश्वास जे निरखिति प्रणयातिरेकें,
तद्वैभवीं असति लीनहि कौतुकानें,
त्यांनांच ही कृति समर्पण आदरानें. ॥ ४५ ॥

चंद्रशेखर.

## २९ काळ* व दुष्काळ.

श्लोक.–ये राष्ट्रावर ह्या महाव्यसन तें, जें नाशुनी शांततें
झालें कीं करितें क्षणांतचि यमप्रांतीं जनां पांथ ते
भक्षी ग्रंथिकताप तापद जनां भेकां जसा साप तो
झाल्या निर्जन घोर थोर नगरी, हा लोक त्या कांपतो ॥ १ ॥
त्रैलोक्यप्रलयीं प्रचंड लहरी हेलावुनी सागरीं
सीमा लंघुनि तो जसा सकळही विश्व क्षणें संहरी
तैसा हा प्रभुकोप ताप अदयें ने अल्पकालीं जना
झालें दुःख असह्य तें, कवण हो ! वर्णील त्या यातना ॥ २ ॥
भक्षी तक्षक लक्ष लक्ष जन जो, तो रोग भासे बरा
हा! हा! दुःसह अन्य संकट परी ये संप्रतीं हें घरा
कोठें सौख्य न, दैन्य मात्र जमलें कैसें अम्हां भोंवतें
केलें काय असे असें अत्र अम्हीं जें हें असें भोंवतें ॥ ३ ॥
ध्वंसी सर्व विकारि–वर्ष सुख हें, आणी जनीं दीनता
तोडोनी उदकान्न पीडित असे आम्हांस दुःखें नतां
झाली सस्यविहीन कांचनमही, आली स्थिती ती तिला
जी ये अंतिमतैलबिंदु सरतां दीपीं ज्वलज्ज्योतिला ॥ ४ ॥
आधीं वर्षुनि कांहिं, ऐन समयीं पर्जन्य देई दगा
नेई ओढुनि हाय! निर्घृणपणें घांसास तो हस्तगा
क्षेत्रीं वारि नसे उभींच म्हणुनी शेतें अहा ! वाळती
झालीं आर्द्र जळें कृषीवलमुखें जें लोचनें गाळती ॥ ५ ॥

---

* शक १८२१ विकारी संवत्सर–सन १८९९–१९०० सालीं जो भयंकर दुष्काळ पडला त्याचें हें वर्णन आहे.

हा दुष्काळ कराळ काळ अहिसा आला जनां खावया
हाणी संतत तो अनंत मनुजां, पाही न वंशा वया
झाला जर्जर हाय ! आर्य अवघा, आली मृतीची कळा
देवा! विस्मरसी दयाजलनिधे ! बाळांस कां दुर्बळां ? ॥ ६ ॥
गेलें पीक मरून, भीक कुदशा पाठीं बया लागली
दुःखाद्रीसह सर्वदा झगडतां धैर्ये तनू भागली
गाडी, नांगर, कोयती, कुदळही, जी घोंगडी पांघरी
तीही हा विकितो कृषीवल अशी; राहे न कांहीं घरीं ॥ ७ ॥

येतां ही कुदशा न राजपुरुषां येई दया हो? तिळ
अस्मद्दैव फिरे तरी न उलटे कां सर्वही होतिल ?
सारा सर्व वसूल हे करुनिया, दुःखावरी डागिणी
देती, ही धनलालसा भयकरा आहे खरी नागिणी ॥ ८ ॥
नाहीं अन्न–रती; विपन्न करिती मृत्युप्रतीक्षा जन;
घेती जीवितघातपात करुनी जें प्रीतिचें भाजन
पाहोनी उपवासि लोक भरती अश्रू अती लोचनीं
देवा ! धांव विपन्न-रक्षण-परा ! दीनाचिया मोचनीं ॥ ९ ॥
अंगीं वस्त्र नसे, क्षुधाकुल असे, मालिन्य सारें वसे
गात्रीं त्राण सुटे, विटे मुखकळा, मृत्यू स्वरूपीं दिसे
आहे काय सुदामसा, यतिपरी पिंजारले केश हे
नाहीं हो सुखलेश हंत ! सहसी कैसें? त्रिलोकेश हे ! ॥१०॥
देहीं मांस नसे, शिरा सुरकुत्या होतात दृग्गोचरा
गेलें खोलचि पोट, वीत दिसतो पाठीं कणा हा खरा
नाहीं अन्न-लव, क्षुधा भडकते ह्या वाळल्या आंतड्या
शक्ती आटुनि, हातपाय गमती काड्या खऱ्या रोकड्या ॥११॥

दुष्काळार्थ जनार्थ सार्थ असती कामें जरी काढिलीं
तत्रप्राप्तधनें न अल्पहि शमे लोकक्षुधा ही बली
बाळें हीं मरती अवन्नराहितीं पोशी न त्यां चाकरी
व्याधिग्रस्त वयस्क जे जन न त्या खाया मिळे भाकरी ॥१२॥
नाहीं पेजहि, सर्व तेज विझलें प्राणांत आला खरा
डोळे जाउनि खोल खोल; तनु ही हो अस्थिचा पिंजरा
प्रेतें हाय सजीव ? काय दिसती; झाली स्थिती भीतिदा
पोटाची खळगी यदा न भरते सौंदर्य कैचें तदा ॥ १३ ॥
नाहीं अन्न मुळीं स्फुरे तळमळीं क्षुद्व्याकुळें लेंकरें
दुःखत्रस्तमना कितीक वधिति माता तयातें करें
बाळांची जननीस जोड विरळा लोकीं जरी भासते
वाटे मृत्यु बराच, दुःसह परी होती शिशुक्लेश ते ॥ १४॥
जीचा हस्त धरूनि लग्नसमयीं जायास सौख्यांगणीं
जो गंभीरपणें भलें वचन दे सद्ब्राह्मणांच्या गणीं
तोही सत्पति तप्तचित्त सहसा सोडी सती सन्मती
आली दुःखद ही स्थिती जरि करी पापा न आजन्म ती॥१५॥
नाहीं अन्न, विपन्न दुःस्थिति जनां येतां पहा सादर
नीचत्वें जन हे कितेक करिती स्वार्थास बाहादर !
किंवा येउनि राष्ट्रसंकट जधीं चाले भलें कंदन
तेव्हां मासकणप्रलोलुप करी का गृध्र आनंद न ? ॥ १६ ॥
नाहीं थार गुरांस, घांस न मिळे, पाणी नसे निर्मळ
प्राणांतें त्यजती पटापट गुरें हीं कोवळीं दुर्बळ
शेती होति अती मतिव्यथित हे ही पाहुनी आपदा
आला काळ अहा ! महा बिकट हा; जागा न धैर्या तदा॥ ॥१७॥

प्रेमानें अतुल स्वबालकपरी जीं सर्वदा पाळलीं
होती ज्यावरती सदैव सगळी तद्वृत्ति ही चालली
तींही व्याकुळचित्त हाय ! विकिती शेती तशीं तीं गुरें
नाहीं पोट भरे, पुरे गरज ना, कांहीं न गेहीं उरे ॥ १८ ॥
शेत्यांनीं विकितां गुरें निजकरें, ये पीळुनी आंतडीं
आनंदें परि नष्ट खाटिक; चढे त्याची वरी ही कडी
धंदा उत्तम चालला, करितसे अत्यंत तो तांतडी
पैशाचा कुणगा करी विकुनिया रक्ताक्त हीं कातडीं !!॥१९॥
चिंता-व्याकुळ जाहले, तिळ नसे ज्यां भान तें राहलें
दुःखाग्नीमधिं काहले, नयन जे जे अंबुनें नाहलें
ऐशा भ्रांत मना जनांस सजती वंचावया यन्मनें
त्यांची धन्य ! न अन्य त्यांसम कुणी, धिक् धिक् तयांचें जिणें॥२०॥

बाळकृष्ण अनंत भिडे बी. ए.

### ३० एका दुःखी पक्ष्याचा वृत्तांत.

श्लोकः—क्षणोक्षणिं पडे उठे परि बळें उडे बापडी,
चुके पथिहि येउनी स्तिमितें दृष्टिला झांपडी.
किती घळघळां गळे रुधिरें कोमलांगांतुनि,
तशीच निजकोटरा परत पातली पक्षिणी. ॥ १ ॥
म्हणे निजशिशूंप्रती " अधिक बोलवेना मला,
तुम्हांस अजि अंतिचा कँवळ एक मीं आणिला.
करा मधुर हा ! चला ! भरवितें तुम्हां एकदां,
करो जतन ह्यापुढें प्रभु पिता अनाथा सदा ॥ २ ॥

---

१ वाट. २ मंद झालेल्या. ३ रक्त. ४ आपल्या घरट्याला. ५ आली. ६ आपल्या पिलांना. ७ घास.

अहा मधुर गाउनी रमविलें सकाळीं जनां
कृतघ्न मज मारितील नच ही मनीं कल्पना.
तुम्हांस्तव मुखीं सुखें धरुन घास झाडावरी,
क्षणैक बसलें न तों शिरत बाण माझ्या उरीं. ॥ ३ ॥

निघून नरजातिला रमविण्यांत गेलें वय,
म्हणून वधिलें मला ! किति ! दया कसा हा नय*
उदार बहु शूर हा नर खरोखरीं जाहला,
वधून मज पांखरा निरपराध कीं दुर्बला ! ॥ ४ ॥

म्हणाल भुलली जगा विसरली प्रियां लेंकरां,
म्हणून अतिसंकटें उडत पातलें मी घरा.
नसे लवहि उष्णता नच कुशींत माझ्या शिरा,
स्मरा मजबरोबरी परि दयाघना ईश्वरा." ॥ ५ ॥

असो; रुधिर वाहुनी नच भिजो सुशय्यों[1] तरी,
म्हणून तरुच्या तळीं निजलि ती द्विजों[2] भूवरी.
जिवंत बहु बोलकें किति सुरम्य तें उत्पल[3],
नरें धरून नाशिलें खचित धन्य बुद्धीबल ! ॥ ६ ॥

मातींत ते पसरिले अतिरम्य पंख,
केलें वरी उदर पांडुरें[4] निष्कलंक.
चंचू तशीच उघडी पद लांबवीले,
निष्प्राण देह पडला श्रम ही निमाले[5] ! ॥ ७ ॥

टिळक.

---

* न्याय. १ घरट्यांतला सुरेख बिछाना. २ पक्षीण. ३ कमळ. ४ पांढरें. ५ संपले.

## ३१ करोल[1] करवाल[2].

श्रीसत्यवान् म्हणुनि एक महर्षि होता,
स्वाधायधर्मपर[3], सत्तम, वंद्य, होतां[4];
तो आपुल्या सतत राहुनि आश्रमांत,
सेवूनि कंदफलमूल वसे वनांत. ॥ १ ॥

बाहेर सोडुनि निजाश्रम तो न गेला,
तो स्वाश्रमींच मुनिवर्य सदैव ठेला;
आकर्षिलें मन तदीय न भोगजातें,
ठावा न भोगपरिवार मुळीं तयातें. ॥ २ ॥

तोडोनि कंदफलमूल वनीं स्वहातें,
आणोनियां विमल निर्झरकोदकातें;
तो सत्यवान् करि निरन्तर शान्त वृत्ति,
तो पांघुरे मुनिजनोचित एक कृत्ति. ॥ ३ ॥

वर्षे अनेक मुनिचीं वनिं याप्रकारें
गेलीं, न तृह्रदयिं लेशहि पाप थारे;
तो शान्तचित्त शुचिशील महर्षि राहे,
कामादिषड्रिपुविकाररुजां न वाहे. ॥ ४ ॥

आरंभिलें मग तयें कठिना तपातें
इच्छा मनीं धरुनि सार्थ करूं स्वतातें;

---

१ भयंकर. २ तरवार. ३ वेद आणि धर्माचरण ह्यांत निमग्न. ४ यज्ञ करणारा, ५ भोग्य पदार्थांचा समुदाय. ६ उदरनिर्वाह. ७ अजिन किंवा चामडें. ८ शांत आहे चित्त ज्याचें. ९ पवित्र आहे स्वभाव ज्याचा. १० रुजा=पीडा.

रुद्धेंद्रियप्रसर[1] होउनि निग्रहानें[2]
केलें तयें तप; तदीय न धैर्य सानें. ॥ ५ ॥
येतां रविभ्रम[3]वशेंहि निदाघ[4]काल,
सेवी हुताशन[5]शिखा मुनि तो कराल[6];
स्थापी कृशानु[7] खर[8] चार सभोंवतालीं,
येई शिरीं परुष[9] उष्णगभस्तिमाली[10]. ॥ ६ ॥
वर्षर्तुच्या समयिं वृष्टिजलासि साहे
आच्छादन त्यजुनि भूमितलास राहे;
केले तयें जलद[11]वृंद सदा वितान[12]
मानील तो कवण निग्रह अल्पमान[13]. ॥ ७ ॥
हेमन्त येइ ऋतु सूर्यगतिप्रसंगें,
मग्न तदा मुनि करी सलिलीं स्वअंगें;
तो शैत्य वारिगत संतत शान्त साहे,
हाले जलांतुनि न तो, स्थिर तेथ राहे. ॥ ८ ॥
केलें तयें तप महोग्र सहस्र वर्षे,
लाजावले मुनि तदीयतपःप्रकर्षें[14];
ते बोलले तप न आचरिलें कधींही,
कोणीहि यापरि, अहो ! स्थिरता किती ही ! ॥ ९ ॥

---

१ नियंत्रित केले आहेत इंद्रियांचे व्यापार ज्यानें. २ करारीपणानें. ३ सूर्य फिरल्यानें. ४ उन्हाळा. ५ अग्नीच्या ज्वाला. ६ भयंकर. ७ अग्नि. ८ प्रखर, प्रदीप्त ९ तीव्र, १० सूर्य. ११ मेघमण्डल. १२ छत. १३ लहान आहे मोजदाद ज्याची. १४ ज्याच्या तपाच्या उत्कर्षानें किंवा अतिशयानें.

श्रीसत्यवत्तप महोग्र असें बघून
झाला दिवोऽधिपति मत्सरशील दून;
साहे न दुष्टमति इन्द्र तपःप्रकर्षा,
पावे तपश्च्यवन इन्द्र करोनि हर्षा. ॥ १० ॥

मात्सर्यलुप्तसुमती पुरुहूत आला
श्रीसत्यवन्नियमभंग करावयाला;
त्यानें तदा धरियलें भटरूप रम्य,
तो जाहला मुनिसि ह्या कपटें अगम्य. ॥ ११ ॥

होता सुतीक्ष्ण करवाल तदीय हातीं,
देखोनि जो भय विकंपित हो अरातीं;
होता सुवर्णघटित त्सरुही तयाचा,
चंचन्मणिद्युतिमनोहररूप साचा. ॥ १२ ॥

श्रीसत्यवन्मुनिपुढें उभला बलारी,
शोभे उरःस्थल विशाल तदीय भारी;
पाहोनि त्यासि वदला मुनि आतिथेय,
" सांगें भटा ! मजसि तावक नामधेय; ॥ १३ ॥

तूं कोण, कोठुनि, कशास्तव, या स्थलास
आलास ? काय हृदयीं तव सांग आस ?
झाले तुला असतिल श्रम फार वाटे,
येथील वाट विषमा बहु तींत कांटे " ॥ १४ ॥

---

१ मत्सरी आहे स्वभाव ज्याचा. २ पीडित. ३ तपोभंग. ४ मत्सरी स्वभावामुळे लोपली आहे सद्बुद्धि ज्याची. ५ इन्द्र. ६ तरवार. ७ शत्रू. ८ मूठ. ९ चमकणाऱ्या मण्यांच्या कांतीनें सुंदर आहे रूप ज्याचें असा त्सरू. १० पाहुण्यांचा सत्कार करण्यांत चांगला. ११ नांव.

हे प्रश्न ऐकुनि मुनीप्रति इंद्र बोले,
ब्रह्मर्षि निष्कपट तें परिसोनि डोले;
" माझा सुवर्णनगरांत असे निवास,
आलों तुझ्या कुतुकचोदित दर्शनास. ॥ १५ ॥
सोडोनि धामक पुराप्रती येथ आलों,
त्वद्दर्शनेंकरुनि आज पवित्र झालों;
साधूसि पाहुनि अघें जळती समस्त,
होई क्षणांत भवदुःखतती निरस्त. ॥ १६ ॥
मी दुष्करें तव तपें परिसोनि आलों,
त्वद्दर्शनाविषयिं उत्सुक फार झालों;
इच्छी न कोण नर साधु पहावयातें,
यद्दर्शनें दुरित जात असे लयातें ॥ १७ ॥
आशीर्वचें मज करीं परिपूत साधो !
तीर्थाटनोत्थ मज येथचि पुण्य साधो;
मीं त्वत्पदीं नमवितों शिर नम्रभावें,
आशीर्वचें मजसि उद्धरिं आज. पावें. " ॥ १८ ॥
ऐकोनि हें वच मुनी पदसन्नतातें
बोले असें मधुर भाषण त्या भटातें:-
" लोपो तुझें सकल पातक, सौख्य पाव,
गाजो तुझा क्षितितलीं सुभटा! प्रभाव. " ॥ १९ ॥
आशी अशी मिळाविल्यावर त्या द्विजातें
बोले महेन्द्र कर जोडुनि या वचातें:—

---

१ कौतुहलानें प्रेरित होत्साता. २ तति=समुदाय. ३ नष्ट.

" साधूत्तमा ! विनति मी करितों तुला, ते
मान्या असो; पुरविं अल्प मनोरथातें. ॥ २० ॥
हा देख खड्ग कनकत्सरु रत्नविद्ध,
जो लाजवी अनल कान्तिगुणें समिद्धं;
राहो तुझ्याजवळ हा मम खड्ग, मी हा
नेईन येउनि पुन्हां, मम हीच ईहा. ॥ २१ ॥
निक्षेप हा मम तुझेजवळीं असावा,
आशाविभंजक न शब्द तुवां वदावा;
येईन शीघ्र परतोनि तवाश्रमातें,
निक्षेप हे मुनिवरा ! मम खड्ग मातें ॥ २२ ॥
कार्यार्थ येथुनि अदूर मुनीश्वरा ! मी,
जातों; फिरोनि तव येइन शीघ्र धामीं;
जेथें असे मुनिवरा ! मज जावयाचें
तेथें नको मजसि खड्ग, न काम याचें. ॥ २३ ॥ "
स्वीकारिला द्रुत अशंकित मानसानें
निक्षेपरूप करवाल मुनीश्वरानें;
श्रीसत्यवन्मन पवित्र तया न माया
ठावी, तयें न गणिलें लवही अपाया. ॥ २४
ठेवोनि इंद्र करवाल निघोनि गेला,
त्या हेतिचा मुनिवरें प्रतिपाल केला;
निक्षेप तो असुपरी गणिला तयानें,
तो ठेविला जवळि संतत सावधानें. ॥ २५ ॥

---

१ रत्नजडीत. २ अग्नि. ३ प्रदीप्त किंवा पेटलेला. ४ इच्छा. ५ हत्यार.

आणावयासि फलकंद वनासि जातां
ठेवी सदैव करवाल मुनींद्र हातां;
तो हा कधीं न करवाल विसंबला हो,
तद्रक्षणीं समजला मुनि थोर लाहो. ॥ २७ ॥
गेल्या अनेक शरदा किल ह्याप्रकारें,
नेला न खड्ग निज गौतमदारजारें[1];
नेईल खड्ग भट येउनि तो स्थला या,
आशा अशी मुनिमनांतिल जाय वाया. ॥ २७ ॥
छेदावया मग फुलें मुनि खड्ग योजी,
त्याचा असा न उपयोग अकृत्य मोजी;
अल्पें श्रमें फलनिकृंतन[2] होइ जेव्हां,
ह्या हेतिनें, मुनिस संमद[3] होइ तेव्हां. ॥ २८ ॥
तेव्हां पुढें हळुहळु विपिनांत कंदें
खांडावया धरियली खलु बुद्धि मंदें;
ती हेति योजुनि अशी मुनि फार हर्षे
तो तोषला स्वमनिं हेतिबलप्रकर्षें. ॥ २९ ॥
त्यानें पुढें प्रतिदिनीं हरिणीकलाप[4],
नाणोनियां करुण आर्त मनीं विलाप
संछेदिला कुलिशकर्कशमानसानें[5],
तें क्रौर्य कोण मज सांग म्हणेल सानें ! ॥ ३०
श्रीसत्यवर्म्यानिं अहो नुरली प्रशान्ति,
न ब्रह्मवर्चसभवा[6] उरली सुकान्ति;

---

१ इन्द्रानें. २ फलें तोडणें. ३ आनन्द. ४ हरिणींचा समूह. ५ वज्राप्रमाणं कठोर. ६ ब्राह्मणत्वाचें तेज.

त्याचें तपश्चरणकर्म अतीव्र झालें,
एकाग्रचिन्तनिं मनःस्थिरता न चाले. ॥ ३१ ॥
स्वाध्याय तो विसरला, स्मरला न धर्म,
खड्गोपयोगपटुताच[1] म्हणे स्वशर्म[2];
खड्गास नित्य परिघर्षणजन्य धारा
देओनियां करि मृगांवरती प्रहारा. ॥ ३२ ॥
देखोनि कान्ति असिची परिघर्षजन्य,
मानी स्वतासि मुनि तो अतिमात्र धन्य;
हा हन्त ! हन्त ! मुनिचें तप नष्ट झालें,
कीं हेति चालवुनि तन्मन फार धालें ॥ ३३ ॥
दीनां मृगांवरि करोनि अहो प्रहार
तोषे मुनी क्षितिसि पाडुनि त्यास फार;
एकेंच देखुनि हतां हरिणां प्रहारें
हर्षे अती, मनिं तदीय न हर्ष थारे ! ॥ ३४ ॥
श्रीसत्यवद्व्रतविभंग दिवोऽधिपाला[3],
संतोषहर्षद असा अतिमात्र झाला;
त्याची तदा निजपदच्युतिभीति गेली,
भेरी[4] तयें निजकरें बहु ताडियेली ! ॥ ३५ ॥
सान्निध्य नित्य घडतां असिचें गळाली
सद्बुद्धि शांति नुरली, करुणा पळाली !
तो क्रूर हिंस्रपशुचेपरि वागला हो,
व्हावा कसा मग तयाप्रति पुण्यलाहो ! ॥ ३६ ॥

---

१ तरवारीचा उपयोग करण्याचें कौशल्यच. २ आपलें सुख. ३ इंद्राला. ४ नगारा.

एके दिनीं असि तयें मग ताडियेला
धेनूवरी, असुविनाश तिचाहि केला !
हा हन्त ! त्या क्षणिंच दुष्टहि तो निमाला,
गेला तयाक्षणिंच दुर्मति नारकाला[1]. ॥ ३७ ॥

दुष्टासवें न सहवास जनें करावा,
दुःसंग न क्षणहि एक जनें धरावा;
हा बोध वामनसुतें[2] सकलां कराया
हें गुंफिलें कवन तच्छ्रम हो न वायां. ॥ ३८ ॥

जी वस्तु दुष्ट करणाराचि ती अपाय,
ठेवा न ती जवळिं, सौख्यद हा उपाय;
दुर्वस्तुसंग्रह करोनि फसों नका रे !
मद्यें अफू वितरिती असुखें अपारें. ॥ ३९ ॥

दिधला ' करालकरवाल ' जनां
वितरो मुदा बहु तदीय मनां;
मजला उमातनुभवासि[3] शम,
वितरो असाचि मनिं हेतु मम. ॥ ४० ॥

**विद्याधर वामन भिडे.**

## ३२ वीरमती द्रौपदी.

अज्ञातवास सरतां पांडव आले फिरून सदनातें,
भीमार्जुन निज मानसिं असती सोत्कंठ शत्रुकदनातें. ॥ १ ॥

१. नरकाला. २ वामन हें विद्याधर कवीच्या तीर्थरूपाचें नांव . ३ उमा हें विद्याधरकवीच्या मातुःश्रीचें नांव

" राज्यापहार करुनी वसति सुखें जे निशंक दायाद,
ज्यांच्या अपराधांची वदनें नच मोजवे कदा याद ॥ २ ॥
संहारुनि ते समरीं बांधव अत्यन्त दुष्ट पापरत,
मिळवावी निजशौर्यें हारविलेली स्वसंपदा परत. ॥ ३ ॥
केली अपकृति संतत कपटानें राज्यविभव–हरणानें,
फेडावी ती वेगें समरामध्यें निजप्रहरणानें. ॥ ४ ॥
वदले अवाच्य वचनें बोलाया जे घरांतहि न शकले,
त्यांच्या खल जिव्हेचीं रणीं करावीं सहस्रधा शकलें. " ॥ ५ ॥
इच्छा वीरोचित ही धरिती मनिं भीमविजय वीरमती,
ज्याच्या सद्यशकथनीं आनंदानें सदा कवी रमती. ॥ ६ ॥
धर्मात्मा धर्मतनय साक्षात् लोकीं क्षमानभस्तरणी,
नच इच्छी साधुहृदय माराया आप्तजन समस्त रणीं. ॥ ७ ॥
म्हणुनी साम कराया विनवी वेगें रमावरा चतुरा,
पंडित-सभा स्थलीं जो शोभे मस्तकिं जसा खराच तुरा. ॥ ८ ॥
" आपत्कालीं आतां तारीं मज तूंच यदुकुलाभरणा !
होइल सर्व कुलक्षय अहह ! नसे करुनि अल्प लाभ रणा. "९
यदुवंशमंडन निघे मग परिमित-सेवकांसहित जाया,
अवलोकी तोंच तया पांडुसुतांची महामहित जाया. ॥ १० ॥
आली धावुनि वेगें त्याजवळी, मुक्तकेश, साधुमती,
अपमान–शिखिज्वाला तीच्या हृदयांत अनुदिसां घुमती. ॥ ११ ॥
पडली स्कंधावरती वेणी कालाहिसम सुचिर–मुक्ता,
निष्प्रभवदना शोभे, मळलेली ज्यापरी रुचिर मुक्ता. ॥ १२ ॥

---

१ शस्त्रानें. २ परमपूज्य.

जवन समीरें गगनीं ज्यापरि कादंबिनी तशि खवळली,[1]
क्रोधोद्दीपन करण्या वीरमती कठिण-वाक्विशिख वळली.॥ १३॥
" यदुकुलनृपावतंसा ! असशी आधार तूं अशरणातें,
मी दीन तुझी दासी, नमितें विनता त्वदीय चरणातें. ॥ १४॥
कारुण्यांभोदा तूं, दीन जनां आप्त बंधुसा गमशी,
विनवावें दासांनीं तुजवांचुनि बा कुणास सांग मशीं ? ॥ १५॥
सुहृदर्थसिद्धिपर तूं, नच बघशी सदयनयनिं कां मजशी,
हरिणी व्याधशरांनीं कान्तारीं पीडिली निकाम जशी. ॥ १६॥
साम कराया जाशी शत्रूंच्या दुश्चिता अगाराशी
कां नच बघशी तूं मम दुःखाची निश्चिता अगा ! राशी ? ॥१७॥
कौरवनगरा जाशी करावयाला निशंक सामातें,
तूं मुक्तवेणिकेला यदुवर्या ! विसरशी कसा मातें, ॥ १८ ॥
कर्षी खल दुःशासन सभेमधें हेच खचित ना केश !
समरपराङ्मुखता ही पांडुसुतां काय उचित ? नाकेश ! ॥१९॥
विसराल संधि करुनी सर्व तुम्ही शत्रुकृतनिकारा हो,[2]
ही दुःखित पांचाली काय सदा मुक्तवेणिका राहो ? ॥ २०॥
सजलां केंवि कराया कृत्य असें हें स्वमानहानिकर ?
आदळला मजवरतीं अशनिनिपातासमान हा निकर[3]. ॥ २१ ॥
पंचग्रामांसाठीं शुद्ध यशा केंवि चिद्घना ! विकतां ?
आपन्नदींत तारो भूपा आतां तुझीच नाविकता. ॥ २२ ॥
हा हा ! पंचग्रामां मागतसां कां सुदीन याचकसे ?
हा ! विसरलांत संकटसमयीं तुम्ही सुधी नयाच कसे ! ॥२३॥

१ मेघमाला. २ बिटंबना. ३ कहर.

मानापमान टाकुनि राज्यविभव-तुच्छ-कांचनाकरितां,
हस्तांजली रचुनियां भिक्षुपरी हाय ! याचना करितां ! ॥२४॥
मत्स्येश्वरगोग्रहणीं ज्यांनीं अत्यन्त शौर्य गाजविलें,
अश्वत्थामाकर्णद्रोणकृपाचार्य यांस लाजविलें. ॥ २५ ॥
थोर प्रताप त्यांचा कृष्णा ! कां जाहला सकळ वायां ?
त्यांची दीन विनंती म्हणुनी जाशी खलास कळवाया ! ।२६।
परिहरणीय असे तो त्यांनां, दुर्जन निका, महा नीच,
त्यांच्या शुद्ध यशाची होइल येणें निकाम हानीच. ॥ २७ ॥
दीनवचन बोलुनियां धवल यशा कां अपाप हारवितां ?
खद्योतत्वा वरिलें सोडुनियां विश्वपा पहा रविता. ॥ २८ ॥
निजवावे निजशौर्यें दुर्जन ते मग्न जे दुराचरणीं,
कां लववितां शिरांतें होउनियां लीन त्यांचिया चरणीं ! २९
अगणित-बलाधिपें हें भूपें दीनत्व ना वरायाचें,
यायोगानें कृष्णा वरील हीनत्व नांव रायाचें. ॥ ३० ॥
दुर्दान्त शत्रु दुर्मद यदुपाला ज्या नृपास नावरती,
इच्छी किमर्थ तरि तो बसावयाला नृपासनावरती ? ॥ ३१॥
वीर परापकृत सदा सजती समरांगणीं मरायाला,
परि समराची वार्ता न रुचे स्वप्नींहि धर्मरायाला ! ॥ ३२ ॥
सदनीं भीरुत्व धरुनि बसती न वरी तयासि का मरण ?
निजकीर्तिपालना भट मरतांहि करी बळें प्रकाम रण. ॥ ३३॥
भटसत्तम समरांत न जोडाया का यश मरती सरती,
युद्धविमुख धर्मात्मज जोडा या काय शमरतीस रती ? ३४

---

१ सामप्रियास.

अपकृतिपर रिपुशीं जो तदुचित वर्तन सुसत्वरी न वरी,
आदरि तयास लोकीं सोत्कंठा अवदशा खरी नवरी. ॥ ३५
गांठाया खलरिपुला समरीं भय नच जया कदा शिवतें,
वदती संतत सन्मति आदरितें त्यास सर्वदा शिव तें. ॥ ३६ ॥
'बैस ममांकावर तूं,' यापरि निर्लज्ज बोलला गा जो,
करुनी तदूरुमथना भीमपराक्रम जगीं भला गाजो. ॥ ३७ ॥
करि पापधूलिमध्यें दुःशासन मज्जना खरासम जो,
त्याला चिरुनी समरीं तद्विक्रम सज्जना खरा समजो. ॥ ३८ ॥
समरकथा नच जाणे, जाणे जो शयन मंचकावरती,
होओ विच्छिन्नतनू भीमगदा पडुनि वंचकावर ती. ॥ ३९ ॥
पाहुनि मनीं हरखले कर्षित असता कुलांगनाकेश,
कीर्तिध्वज उभवावा छिन्न करुनियां खलांग नाकेश ॥ ४० ॥
भार्याधर्षणहि हरी ! नच गमतें मानहानिसम याला,
आतां उपाय नुरला, झालें मी या अनाथ समयाला ॥ ४१ ॥
हारविलें राज्य बळें, ज्यापरि गज उपरि फेकितो हार,
बसला मुनिसम आतां, हाय ! करिल कोण दुःखपरिहार ! ४२
कुर्वधमें कर्षियलें जरि लघुदासीसमान रमणीतें,
नच सोडी यदुनाथा ! तरि अजुनी या क्षमा नरमणीतें. ॥४३॥
व्यर्थचि अहा प्रसवली यास खचित वीरसू पृथादेवी,
केंवि युधिष्ठिर म्हणुनी रणविमुखा वर्णिलें वृथा देवीं ! ॥४४॥
वर्णावी कोठवरी धवलयशःकीर्ति पांडुरायाची,
रणवार्ता ऐकुनियां वदनच्छवि होय पांडुरा याची. ॥ ४५ ॥
जरि आवडे शमव्रत, उचित असे जें सदा मुनिजनातें,
तरि मग कां जोडावें वीरश्रेष्ठासि सांग निज नातें ! ॥ ४६ ॥

पंचग्रामचि मागे दीनापरी हा जया सहाय हरि,
गजगंडस्थलभेत्ता हर्षे जंबुकवधेंच काय हरी. ॥ ४७ ॥
जरि मानमहा भूपति साहुनि अपकार शान्ति आश्रयती,
तरि मग झाली लोकीं अहह ! खरी मानिता निराश्रय ती. ४८
राज्य कशाला याला, विभव कशाला तसें शमैकरता
संधि करायाला ही खटपट व्यर्थचि कशास हो करतां !॥४९॥
जेथें मृग संचरती, आनंदें तरुलताहि मर्मरति,
राहो जाउनि तेथे मुनिसम हा धर्मराज धर्मरति. ॥ ५० ॥
जें दुःख भोगिलें मीं नाहीं जगतीं तयास हाय ! तुला,
आहेस सर्वसाक्षी भगवान् ! तूं विदित तें न काय तुला ! ५१
द्यूतपरा भूपाला नच समजे काय आपणास हित,
द्यूतामध्यें घालवि राज्यविभव हाय आपणासहित. ॥ ५२ ॥

तेव्हां खळ दुःशासन झोंबे माझ्या भयाकुलांगा रे !
ओढुनि सभेंत नेलें मजला सोडुनि भया कुलांगारें. ॥ ५३ ॥
ज्यापरि अनाथ हरिणी कान्तारीं वृककरांत सांपडली,
त्यापरि दुर्धरसंकटिं यदुनाथा ! ही तव स्वसा पडली. ॥५४॥
हिसडे देउनि खल तो पुनःपुन्हा केश चिद्धना ! कर्षी,
तेव्हां नयनांमधुनी गाळिति अविरत-नवाश्रु नाकर्षी. ॥ ५५ ॥

धर्मवृकोदरविजयहि बघति सुखें तो तदा मदवमान,
धर्मपरायण भीष्मद्रोणाहि करिती वरी न लव मान! ॥ ५६ ॥
धर्मपरायण न वदे सद्वच कोणी महाधमांमाजी;
सुतविक्रम पाहुनियां बहुत हरखले ममांध मामाजी. ॥ ५७ ॥

वदुनी अवाच्य वचनें सुज्ञामध्यें नरापसद नाचे,
पावे साम्य तदा तें राजसभागृह सुरापसदनाचें. ॥ ५८ ॥
यापरि विटंबिली ही भार्या अत्यन्तमानिधर्माची,
नानाविध चेष्टांनीं केली निःशेष हानि धर्माची. ॥ ५९ ॥
मूक सभाजन बसले, स्वस्थ बसे विदुर तो तथापि कसा?
त्या काकसभेमध्यें गमला तो एक सर्वथा पिकसा. ॥ ६० ॥
'खल दुर्जनहो जमुनी येथें हें कर्म मांडिलें काय?
पडतिल येणें सत्वर तुमचे समरांत खंडिले काय. ॥ ६१ ॥
वांचेलही कदाचित् दीपशिखा शिवुनि कीट पामर तो,
चित्तेंहि परस्त्रीला शिवतां नर रे अपत्रपा! मरतो.' ॥ ६२ ॥
वदति सुधी 'प्राशा हो प्राशा स्वर्गाधिका नव सुधा ही,
विदुराच्या जन्मानें झाली ही धन्य कां न वसुधाही.' ॥ ६३ ॥
दुर्जनहृदया गमलें विदुरवचन तें जसा कराल पवि,
अंधसुतावांचुनियां वदन इतरजन दयाकरा! लपवी. ॥ ६४ ॥
'अंकिं बसें ये' वदला फणि तो कुरुवंशचंदनावरिल,
पाहुनि सुंदर वनिता विषयाशा काय मंद ना वरिल? ॥ ६५ ॥
अश्लील वचन ऐकुनि दुष्टाचें कितिक झाकिती कानां,
खलदंडा येशिल तूं असा भरंवसा तुझा कितीकांनां ॥ ६६ ॥
करण्या स्वनाश, अमुचें यश मळवाया, खलांत दाहांत
दुःशासन कुर्वधमें लुगड्याला घातला तदा हात. ॥ ६७ ॥
तेव्हां प्रगटुनि सत्वर त्या स्थानीं दुष्टसत्तमामाजी,
पुरवुनि असंख्य वस्त्रें राखिलि लज्जा यदूत्तमा! माजी. ॥ ६८ ॥

---

१ कलालाच्या गृहाचे.

भरतां नभ तेजानें भीति भरे दुर्जनास कामरता,
परता झाला खळ तो, न तरी सत्वर कुधी न कां मरता. ६९
करशिल वध सर्वांचा तूं विश्वाधार रुष्ट चक्रानें,
म्हणुनी भीतमनानें आदरिलें मौन दुष्ट-चक्रानें. ॥ ७० ॥
वनवासगमनसमयीं वदले ' गौगौं ' दुरूनियां मेले,
पाहीन त्यांस केव्हां भीमगदेनें चुरूनियां मेले. ॥ ७१ ॥
राजकुलोत्पन्नाला तापद तो हाय कां न वनवास,
मीं देखिलें अनुदिनीं असुखा यदुनायका ! नवनवास. ॥ ७२ ॥
आला काय समय हा भीष्माच्या हाय नातवांवरती,
सोडुनि राज्यसुखातें दुर्मार्गे काननांत वावरती. ॥ ७३ ॥
प्रासादीं ज्यास खुपे शय्या शय्या अभिनवा सुमनखचित,
केवल धराच त्याला कान्तारीं होय ही शयन खचित. ॥ ७४ ॥
उठवी बंदि जयाला गाउनियां नित्य गीति निकट शिवा,
कान्तारीं अशिवरुतें जागवि हा हा ! तयास विकट शिवा. ॥ ७५ ॥
प्रासादीं बहुत सुटे वस्त्रांचा घमघमाट परिमळ कीं,
धरि वल्कलेंच तनुवरि रानीं हा हा ! सदाहि परि मळकीं ! ॥ ७६ ॥
संहारी शत्रुजनां जो करुनीयां महारण गदीनें,
रानामध्यें फिरला इतस्ततां तो जसा भणग दीन ! ॥ ७७ ॥
पूर्वी संपत्कालीं पक्वान्नांची जयास बहुत रुची,
स्वोदरपोषण करि तो भक्षुनियां विरसही फळें तरुचीं. ॥ ७८ ॥
जिंकुनि धनराशी जो दीनजनां नित्य बहुल दान करी,
ज्यापरि मधुकरवृंदा तुष्ट करी सत्य बहुलदान करी. ॥ ७९ ॥

---

१ दुर्जन मंडलानें. २ गदाधर योद्ध्यांत श्रेष्ठ. ३ विपुलमदस्राव करणारा.

जो प्रगटला असे या मूर्त धनुर्वेद सत्य जगतांत,
श्रमला विजय वनीं तो ज्यापुढती वीरही न तगतात. ॥८०॥
वनगजसम हे फिरती वनीं परुषकाय नकुलसहदेव.
राज्यसुखाला मुकुनी झाला दीनानन कुलसह देव. ॥ ८१ ॥
राजसुखोचित तव ही भगिनी सोशी घनातपालाही,
केव्हां केव्हां सदया! भक्षण करि काननांत पाला ही! ॥८२॥
यापरि खलशत्रुजनीं दिधला जो त्रास नच तयास मिति,
फेडावा पूर्णपणें तो शौर्यानें करूनियां समिति[1]. ॥ ८३ ॥
परि धर्मराज बसला स्वस्थ गृहीं रणकथाहि नायकता,
पांडुसुतांनीं वरिलें शलभत्व त्यजुनियां विनायकता. ॥ ८४ ॥
वीरोत्तम भीमार्जुन असती सोत्कंठ रण करायाला,
आतां कोण तुझ्याविण कथील सुविचार धर्मरायाला. ॥ ८५ ॥
संधि करुनियां तुम्हां हरि! पंचग्राम मात्र मिळणार,
हें पांडुनृपाळाचें राज्य सुयोधन समस्त गिळणार ॥ ८६ ॥
यदुनाथ! मानिलेंस प्रियभगिनीसमाचि सर्वकाळ जिला,
तारुनि तीतें संकटिं हरण करीं तूंचि सर्व काळजिला. ॥८७॥
मीं सोशिल्या कितितरी आजवरी आपदा रमाजानें,
हा मर्मनिकर्तनपर नच सहवे दुःखभार माजानें. ॥ ८८ ॥
करुणा दीनजनांची तुजवांचुनियां कुणास यदुपा! ये,
आपन्नदींत बुडतें, तारीं भगिनीस तूंच सदुपायें. ॥ ८९ ॥
नाहीं तव महिम्याला कृष्णा नवघनसमा! जगांत तुला,
ब्रम्हानंदें संतत सुरजनमुनिजनसमाज गात तुला. ॥ ९० ॥

---

१ युद्ध.

तूं निर्मिशी विघटिशी श्रीमदनन्त सहजाच विश्वास,
या घोर विपत्समयीं या दासीला तुजाच विश्वास. ॥ ९१ ॥
तेथें जाउनि होइल निःसंशय मानहानि, वळवाया
खळ दुष्कर बा लोकीं, व्याप तुझा मान हा निवळ वाया.९२
तरि उघडुनियां वेगें सुमहः पापान्तक–रविनयनातें
दुर्जन रिपुच्या भो कृतसुमहःपापान्त ! कर विनयनातें.॥९३॥
अपमानानलदग्धा तनुलतिका म्हणुनि हे वरा ! जवळी
आलें धावुनि वेगें सत्वर तूं मेघ देवराज बळी. ॥ ९४ ॥
कां साम प्रिय म्हणुनी नच वदशी अल्प वचनही कृष्णा,
जा जा संधि कराया बसेल आतां उगिच न ही कृष्णा ! ९५
आहे जन्म दिला मीं दीप्तिमता पंचपुत्रक- रवीतें,
नष्ट तयांकरवीं हे तिमिरासम खल अमित्र करवीतें. ॥ ९६ ॥
वीरशिरोमणि मत्सुत नसती जगिं भीरु कौरवांसमही,
निस्तुल शौर्य विलोकुनि वानिल तत्कीर्तिगौरवास मही. ।९७।
आहे विनायकासम तेजस्वी तव समरकुशल भाचा,
निजशौर्यानें समरीं करील संहार शत्रुशलभांचा ! ॥ ९८ ॥
खल वधुनी मम दुःखा नच हे प्रेमप्रणाल हरितिल का,
मद-मलिनगंड-करि-वध अशक्य लोकीं न बालहरितिलका, ९९
जा जा सत्वर कृष्णा ! धर्मेप्सित तूं खुशाल साम कर,
मत्तनय मूर्तिमान् पवि वधितिल तो खल विशालसा मकर," १००

श्रीपाद नारायण मुजुमदार.

---

१ तेजस्वी. २ महाप्रभाव.

## ३२ विदुलापुत्रानुशासन.

ज्यांतून हें विविध विश्व असे उदेलें,
ज्यानें निबंधन तदीय सुरेख केलें;
तें मूळबीज, परमाव्यय, मंगलादि,
मी संस्मरोन दुरवीं निजमानसाधि. ॥ १ ॥
वाग्देवते! तव रसाल पदाब्ज कान्त
सेवी मदीय हृदयालि मुदें नितान्त;
हा लाभुंदे तव कृपेस जसा मयूर,
कां व्यंग पुत्र जननी ढकलील दूर? ॥ २ ॥
होता नृपाल गुणमंडित ‘ दान्त ’ नामा,
सद्वृत्त, लोकहितसक्त, प्रशास्तधामा;
नांदे पुरींत निज निर्जितशत्रुवर्ग,
कैलासशैलशिखरोपरि काय भर्ग! ॥ ३ ॥
लक्ष्मी तदीय विलसे वितरून दानें,
व्हावें कशा जल, जरी न दिलें नदानें?
सत्ता शुभंकर असे विनयें, नयें ती,
ऐशा नृपास शिवण्यास भयें न येती. ॥ ४ ॥
राज्ञी गुणाढ्य ‘ विदुला ’ अभिधान तीस,
रूपें करी तिस रमा बहुधा नतीस;
सुक्षत्रिया विमल मूसचि निश्चयाची,
ती कां रुचेल न सखी गिरिजेस साची? ॥ ५ ॥
झालें तयांस शुचिलक्षण पुत्ररत्न,
संगोपिलें गुरुजनीं करुनी प्रयत्न;

दैवज्ञमंडलमतें नृप पूर्णकाम
दे त्यास 'संजय' असें शुभधाम नाम. ॥ ६ ॥
काळें नृपास जडला दृढ राजयक्ष्मा,
तो काळदूतच; वरी सुत संजय क्ष्मा;
स्वक्षात्रधर्म विदुला तनयास सांगे,
लोकानुरंजन करी श्रमुनी निजांगें. ॥ ७ ॥
तों एकदा समरमानस सिंधुराज
येई जसा धरुनि सिंधुरराज माज;
जाळूनपोळुनि करी खल देश फस्त
दण्डार्थ संजय निघे सबळ प्रशस्त. ॥ ८ ॥
युद्धांगणीं तडक संजय ये ससेन,
बोले सगर्व "कधिं शत्रुदळीं घसेन!"
पाहून सिंधुपतिचा परि सैन्यसिंधू,
याच्या ठरे न हृदयांतिल रक्तबिंदू! ॥ ९ ॥
दाखवी तडफ सिंधुराज तो
संगरांत बळसिंधु साजतो;
त्यास संजय विलोकितां पळे
तो शृगाल, रिपु काय सांपळे! ॥ १० ॥
सोडुनी सभय संगरक्षिति,
काय वीरवर अंग रक्षिती?
त्या परंतु विदुलातनूभवें
त्यागिलीं समरकीर्तिवैभवें! ॥ ११ ॥
निजात्मजोत्साह असा जिराला,
दे पाठ तो हंत! रणाजिराला;

ही आर्यकोंनी विषतुल्य वार्ता,
झाली मृगीशी विदुला दवार्ता. ॥ १२
कशी अशी निंद्य कृती नराशीं
ती क्षत्रिया साहिल मानराशि ?
देई न संताप उसंत तीतें,
गणी महारोगाचि संततीतें ! ॥ १३ ॥
पाहोनि नष्टा कुलसद्यशोभा,
लज्जाविलुप्ताननभव्यशोभा,
क्षोभातुरा कांतिनिरस्तवेत्रा,
ती जाहली कोपविरक्तनेत्रा. ॥ १४ ॥
संत्रासली ती विषवृत्तपानें,
दग्धधारा निःश्वासितातपानें;
धिक्कारिते आत्मसुता प्रकोपें,
भेदी तया निष्ठुर शब्दरोपें. ॥ १५ ॥
घडे यदा तीक्ष्ण अयःप्रहार,
तेजःकणातें वमणार गार;
ती चालवी जाज्वल शब्दटंक,
कीं पुत्र दावो यश निष्कलंक. ॥ १६ ॥
" स्वपूर्वजांचे गुण आठवीं रे !
न दाविणें शत्रुस पाठ वीरें !
न पुत्र तूं, मी तव माय नाहीं !
कुलघ्न होसी रडगायनांहीं ! ॥ १७ ॥
झालास तूं स्वान्वयकीर्तिहर्ता !
शत्रुप्रति श्रीपददानकर्ता !

मी मानितें तो नरवीर मेला !
जो शत्रुहस्तीं वरवी रमेला. ॥ १८ ॥
न पुत्र तूं, केवळ मांसगोळा !
मज्जास्थिच्या मात्र वहासि खोळा !
रणांत मृत्यू मज मान्य होय,
न, सोडसी जें स्वयशास, तोय. ॥ १९ ॥
या मूर्तिमान् प्राक्तनपापकोटीं
रूपें तुझ्या जन्मति काय पोटीं !
न जन्मदात्रीसच, पूर्वजांला,
सर्वां, कृतीनें तव पात झाला ! ॥ २० ॥
बा ! संजया ! कौतुकपूर्व, देख !
म्यां ठेविलें नाम तुझें सुरेख !
अजागळा ! तूं परि अप्रबुद्ध
आचार हा दाविसि तद्विरुद्ध ! ॥ २१ ॥
विमन्यु, निस्तेज, अवीर्य, षंढ,
अशांस कां मान मिळे अखंड ?
हूं, ऊठ, झाडीं भ्रममोह दैन्य,
गर्जें हरीसा समरीं ससैन्य. ॥ २२ ॥
मागें न ये, दे पुढतींच पाय,
क्षत्रांस हा एक यशा उपाय;
रणांतला मृत्युहि फार गोड;
अकीर्तिला भीरुपणें न जोड. ॥ २३ ॥
क्षात्रत्व, भीरुत्व, दिसे विजोड,
स्त्रैणत्वदोषास समूळ खोड;

कलंक साजो द्विजराज चंद्रा,
नें क्षत्रिया, मानधना, अतंद्रा. ॥ २४ ॥
तृणापरी प्राण रणांत लेख,
यशास वा देवपुरास देख !
नाहींतरी, लोळति नीच कीट,
त्यांतील तूं एक खरा अवीट ! ॥ २५ ॥
बा ! ऊठ ! ऊठ ! भ्रम दूर सार,
तूं होइं लोहोपम शूरसार;
वृत्ति त्यजीं बांधवशोकदा ते,
दे शत्रुगर्वावर ओखदातें. ॥ २६ ॥
ओढा भरे लाहुनि अल्प वारी,
कुधान्यही मूषक तोषकारी;
अल्पांत तोषे नृप एक मूढ,
ही आठवीं क्षत्रियनीति गूढ. ॥ २७ ॥
जा, पाड, जा, शत्रुभुजंगदंत,
वा पाव वीरोचित तूं सदंत;
परंतु दावीं सुपराक्रमातें !
सेवीं न या क्षुद्र नरकमातें ! ॥ २८ ॥
जो जन्मला सिंहकुळांत बाळ,
व्हावा न तो भ्याड जसा शृगाळ !
ह्मणूनि त्यानें मददंतिकुंभीं
पंजा करावा अपुला कुसुंबी ! ॥ २९ ॥
निघें, निघें येथुनि तीव्र रागें,
सरों नको तूं पदमात्र मागें;

जा, घूस युद्धीं जणुं मुक्तबाण,
दे हें असें आइस दिव्य वाण ! ॥ ३० ॥
नभीं ससाणा धरि रंगणातें,
टपोनि पाही रिपुच्या गणातें;
तद्रंध शोधी, करि विक्रमातें,
होतो न तो वश्य भयभ्रमातें. ॥ ३१ ॥
न वीर्यवन्ही समरें विझावा,
घृतें तसा तो अति पाजळावा;
हा दूरवीं अंमल आळसाचा,
न प्रेत हो, हो नृपबाळ साचा ! ॥ ३२ ॥
आलातसा पाजळवोनि ओज
जरी विझालास, करीन चोज;
तुषाग्निसा केवळ धूमराशी
नको, नको हा धरणें उराशीं ! ॥ ३३ ॥
सहिष्णुता भूषण रासभाला,
न संगरीं ती परि राजबाला !
करोनि खड्गें घन खणूखणाट,
चोखाळ जा मुक्तियशांस वाट ॥ ३४ ॥
त्वां सांडिला क्षत्रिययुद्धयज्ञ
छी ! संजया ! काय असा नयज्ञ ?
कां दाविसी हें मज कृष्ण तोंड ?
ह्मणूनि घ्यावी स्वशिरांत धोंड ! ॥ ३५ ॥
ज्याची जळे हिंमत सर्व खाक,
पोटार्थि तो केवळ नीच काक !

न ज्या नृपातें स्तवितात लोक,
न स्त्री, न तो पूरुष, हें विलोक. ॥ ३६ ॥
जो ज्ञानशौर्यास न गाढ वीतो,
संख्याच तो केवळ वाढवीतो!
होतां नृपाचा सुयशीं वियोग,
न क्षत्र तो, घातक मातृरोग! ॥ ३७ ॥
रे! भैक्ष्यवृत्ती अनुरूप का ही?
दावीं स्फुट स्वोचित रूप कांहीं;
तुला अशा पाहुनि दुर्बळाला
संतोष होतो अरिच्या बळाला! ॥ ३८ ॥
जो क्षुद्र लाभास महत्व देता,
जीवंत राही रिपु कीर्ति नेतां,
हो हीन राजा स्वजनीं वधावा!
तेज त्यजी, कां तरि सूर्य व्हावा? ॥ ३९ ॥
न लांकडी निर्बळ बाहुला हो,
लक्ष्मीप्रसादा तव बाहु लाहो!
होतोस का मांडलिकत्वकामी,
बांधूं नको तूं अपणा लगामीं. ॥ ४० ॥
लक्ष्मी न भाळे कधिं मेषपात्रा,
हा कंप कां त्वद्गलितांगगात्रां?
हो धीट, कालाहिपरी फणाणें,
धांवें न वेड्या! सरड्याप्रमाणें. ॥ ४१ ॥
लक्ष्मी बळें साहसिवीर खेंची,
बुळा खुळा अश्मकणांस वेंची!

जेव्हां हणावे निधडे तडाखे,
तेव्हांच हें विश्व समस्त धाके. ॥ ४२ ॥
जी त्वत्प्रजा घेइं न शाप तीचा,
ठेवी न भू मान अशा पतीचा;
न स्वप्रजांहीं जरि तूज गावें,
किमर्थ लोकीं तरि तूं जगावें! " ॥ ४३ ॥
जननी वचनाशुगीं क्षित
विनवी संजय साश्रुवीक्षितः—
" रिपुनिर्जित हीन दुर्बला
न असें निष्ठुर तूं वदें मला. ॥ ४४ ॥
सहितां हिमकाल तीव्रता,
तरु घेतात जणूं यतीव्रता !
दलसंघ समस्त तो गळे,
दिसताती नयनांस ओंगळे. ॥ ४५॥
परि ये अनुकूलता यदा,
मिळवीती गतपर्णसंपदा;
नव, कोमल, रम्य पल्लवीं
नयना रंजवितात माधवीं. ॥ ४६ ॥
शिशिरीं तरु भासतो यती,
म्हणुनी चालविणें न कोयती;
दलहेतु वसंत जाणुनी,
तरु टाकी सहसा न खाणुनी. ॥ ४७ ॥
दलहीनहि तो जरी तगे,
नवलक्ष्मी तरि दे वसंत गे !

समया विपरीत पाहुनी,
असु रक्षीं, परिभूति साहुनी. ॥ ४८ ॥
करितां हृदयें दुरुद्धतें
निजपूर्णक्षयहेतु युद्ध तें,
मज लाभ न लेशही दिसे,
उलटें तें असुघातकी पिसें ॥ ४९ ॥
यश येइल काय ? मावली !
जरि ती शोणितसिंधु धावली;
उलटा फिरलाच काळ कीं ?
न उगीं घ्या सडकून टाळकीं. ॥ ५० ॥
भिडुनी, लढुनी महाहवीं,
तनु मी रक्तनदींत वाहवीं;
तरि काय तुला सुताविणें
वद, होईल सुखाढ्य हें जिणें ! ॥ ५१ ॥
जरि आज तगेल ही कुडी,
तरि मारीन पुढील मी उडी;
जरि ही जळली समिद्ध्वें,
जळलीं सर्व भविष्यवैभवें ! ॥ ५२ ॥
अजि मांडलिकत्व मी वरीं,
परि दृष्टी चिर वैभवावरी;
अनुकूल परिस्थिती बरी
दिसतां, मी अपणास सावरीं. ॥ ५३ ॥
मजवांचुनि वाचुनी तुतें
क्षितिलाभीं दिसती न हेतु ते;

कुयशें खिजसी, महाशये !
न कशी तूं परि या कुलक्षयें ? ॥ १४ ॥
असुनी तव मी कुलांकुर !
जननी ! भाससि काय निष्ठुर !
समरांत मरावया मुला
दवडोनी क्षय लाविशी कुला ! ॥ १५ ॥
बळवे खळ वेगवान् मदें,
मज धाडीं न रणास जन्मदे !
अजि मांडलिकत्व हें बरें !
फिरला काळ करील धाबरें ॥ १६ ॥
उजवीन कुळा कधीं तरी,
जगलों मी जननी ! अजी जरी;
परि होइन मी यमा वश,
तरि कैचें कुळ ? कोठलें यश ? " ॥ १७ ॥
अशी ऐकुनी पुत्रवाणी स्वकर्णें,
दिसे क्षात्रिया निष्प्रभा देहवर्णें;
जणों शब्दरूपी कटू काळकूट
शिरे काळजाची करायास फूट ! ॥ १८ ॥
सुतस्त्रैणता पाहुनी ती चपापे,
खिळोनी जणों टाकिली शब्दचापें !
मुहूर्तावधी बैसली स्तब्ध हीन,
अतिक्षोभवेगें फुटे शब्दही न. ॥ १९ ॥
असा काय यावा तिच्या रोग पोटीं ?
हिरा मानिला, तो ठरे गारगोटी !

नव्हे ही सुताची, प्रसूची कसोटी !
कुवेळा तिला खेदकूपांत लोटी. ॥ ६० ॥
परी अल्पकालें करी मोह दूर,
पुन्हा क्षोभली क्षत्रिया धीर शूर;
प्रकोपोद्गमें तो स्फुरे भ्रूविभंग,
गमे अर्चि ती, पुत्र हा का पतंग ! ॥ ६१ ॥
मुखीं क्रोधजश्यामिका घे प्रकर्षा,
दिसे पातली काय ही मूर्त वर्षा !
दणाणे, चकाके, द्रुतश्वास चाले,
जणों चंडिका ती स्वरूपें करालें ! ॥ ६२ ॥
करूनियां उन्नत तर्जनीतें
म्हणे स्वपुत्राप्रति गर्जुनी तेः—
" गचाळ कां बोलसि बोल हे बा !
न पाजळावा अपकीर्तिटेंभा ! ॥ ६३ ॥
रणीं प्रवेशून घन प्रचंडीं
पळूनि आलास भयार्त लंडी !
करोनि पांडित्य घरांतलें, का
होशील तूं क्षत्रियनाथ? लेंका ! ॥ ६४ ॥
भीरूस बुद्धी, असि बुद्धिमंदा,
न योग्य जैसें जल दुष्टकंदा;
भीरुत्व नामी पहिला वदे हा,
छेदी दुजा साधुस वा स्वदेहा ! ॥ ६५ ॥
न मारितां एकहि खड्गघाय,
रणांतुनी हालविलास पाय;

हा मासला का तव धोरणाचा ?
भावि क्रमा हा सुचवील साचा ! ॥ ६६ ॥
रणास हे उत्सुक सर्व लोक,
भीरुत्व तूझें करि त्यां सशोक;
यत्नाविणें कां वदसी नहाक ?
कीं हा असे दुर्विधिदुर्विपाक. ॥ ६७ ॥
न एकदाही लढलास नेटें,
तुझा न कोपानल हंत! पेटे;
उगा कशा बोलसि दैवदोष ?
निमीलिताक्षा दिनहि प्रदोष ! ॥ ६८ ॥
भय त्यजूनी कर तूं विचार,
हें आयके सांगति काय चार;
रे! सिंधुराजा चढुनी यशानें
झाला सुरामत्तनराप्रमाणें. ॥ ६९ ॥
सैन्यांत त्याच्या न मुळींच बंध,
बेहोष सारे करितात फंद;
न सैन्य हें बा ! विषवल्लिकंद,
होई पतीलाच यमप्रबंध ! ॥ ७० ॥
परंतु तूंची पडलास भ्याड,
देसी विपत्तीस बळें बिऱ्हाड;
करीसि हा आणिक बुद्धिवाद,
न का लपाकारक हा प्रमाद ? ॥ ७१ ॥
या दैववादांत पडूं नकोच,
खेंची यशा, ठेवुनि वीर पोंच;

न वीर, जो कालवश, स्मरें तूं,
स्वयेंचि सुक्षत्रिय कालहेतू. ॥ ७२ ॥
वैरी करी फस्त समस्त देश,
वेंगाडशी तोंडचि तूं पदेश !
जा, माग, जा, भीक पिटोनि झांज,
मी मानितें रे ! अपणास वांझ ! ॥ ७३ ॥
ज्याला प्रतिष्ठा न, न कीर्तिमान
न धाडसी शौर्य, न कृत्यभान,
नाहींच वंशांकुर तो कुमार,
तो सद्यशःस्वस्तरुचा कुठार ! ॥ ७४ ॥
रे ! संजया ! आठव तो सुतात,
न यद्गुणांचा लवही सुतांत !
वसुंधरेच्या उदरांत गार.
तसाच तूं क्षत्रकुलीं भिकार ! ॥ ७५ ॥
हें दैववादित्व न कांहिं सत्य,
करीतसों आपण आत्मकृत्य;
जो दीर्घसूत्रत्व वरील मूढ,
तो होय आपन्नरकीं निगूढ. ॥ ७७ ॥
पुरीं लव्हाळे तगतात भ्याड,
महातरू मोडति धाडधाड !
म्हणून मंदा ! न बरा लव्हाळा,
न मान मानाधिक राजबाळा. ॥ ७७ ॥
लवे, जगे जें तृण, तें न वृक्ष !
न क्षत्र तो, जो भुजवीर्य रुक्ष;

प्रयत्नवीर्याविण दैव पंगू,
यशोनुबंधास नको विभंगू. ॥ ७८ ॥
तुझा असे थोर नृपाधिकार,
त्वदाश्रयानें बहु राहणार;
झालास तूं बाष्कळ आज कोल्हें,
स्वलोकनेत्रोर करीसि ओलें ! ॥ ७९ ॥
स्ववंशकीर्तिध्वजहानि घाला
घालावया शत्रु, पहा, निघाला;
नृपावरी कीर्ति वितान होते,
तीविण दे आयु फला न हो ! तें ॥ ८० ॥
तातें तुझ्या रक्षुनि ठेविला हा
अपार आहे धनकोष, पाहा;
यशार्थ, सैन्यार्थ तयास वेंच,
बा ऊकलीं हा परि दुष्ट पेंच. ॥ ८१ ॥
जा, मेळवीं सत्वर तूं प्रधान,
ससैन्य रक्षीं स्वयशोनिधान.
कर्तृत्वहानीच समस्त हानी
ध्यानीं धरीं हें, यश जीव मानीं. ॥ ८२ ॥
जीवंत जों, तों न वरीं ढिलाई,
रिपूंस दे तोंड, करी लढाई;
सिद्ध स्वसेना कर याच पायीं,
प्रख्यात होशील गडी शिपाई ! ॥ ८३ ॥
' मरेन मी ' हें न मनांत आणीं,
उगारिला नित्यच मृत्युपाणी;

रणीं तसा मृत्यु गृहींहि आहे
न ' हा ' म्हणोनी अवमान साहें. ॥ ८४ ॥
यज्ञांत अग्नींत पडेल अन्न,
करील तेंच त्रिदश प्रसन्न !
मरे रणीं घेउनि आयुधाला,
तो क्षत्र मानी सफलायु धाला ! " ॥ ८५ ॥
अशी मातृवाणी लसत्तेज खाणी,
जणों टोंचलीं त्या सुताला पराणी !
घडे तत्क्षणीं गुप्तवीर्यप्रबोध,
स्फुरे वायुसंक्षुब्ध जैसा पयोद. ॥ ८६ ॥
जसा सूर्यकांत प्रचंडांशुतप्त,
तसा बाल उद्गारितो तेज सुप्त;
भुज प्रस्फुरे, नेत्र अंगार साच,
भयें पावते काय भंगा रसाच? ॥ ८७ ॥
नवें रक्त दिव्याभ अंगांत वाहे,
सळे श्वास, कोपाग्निचे काय आहे?
उडे चेतली रुंद छाती धडाडा,
करारा तशा चावती गाढ दाढा? ॥ ८८ ॥
ज्वलत्पर्वताचा घडे स्फोट काय,
असा संजयाचा उसाळेच काय;
न बोलोन, तो वंदुनी मातृपाय,
हयारूढ तेथून सावेश जाय. ॥ ८९ ॥
अशा आपुल्या दिव्यवाणीप्रभावीं
मनीं राजमाता मुद क्षिप्र भावी;

बघोनी रणोत्कंठ तो सिंहछावा,
तशा वीरमूला न का मोद व्हावा ? ॥ ९० ॥
खडाडून झाला भला वीर जागा,
निरुत्साहभावा भलावी रजा गा?
नवीनोद्गतौजोज्वलन्मुद्र साचा
गमे शुद्ध देह द्वितीया रसाचा! ॥ ९१ ॥
प्रधानासवें तो करी गुप्तमंत्र,
पिटी दंड ते व्हावयास स्वतंत्र;
स्फुरे अंतरीं क्षोभली मातृमुद्रा,
उगे राहवी ती न तेजःसमुद्रा. ॥ ९२ ॥
नमी शंभु भोळा, करी सैन्य गोळा,
उडोनी धुरोळा खुपे देवडोळां !
असे ते निघाले करायास घाले,
धरापृष्ठ खालें भराक्रांत हाले ! ॥ ९३ ॥
जयश्रीकृपामत्त तो सिंधुनाथ,
नसे सावधानत्व त्याच्या दळांत;
करीती सदा पान मद्यासवाचें,
विटाळीति अश्लील शब्द स्ववाचे. ॥ ९४ ॥
जिला भान नाहीं स्वतांच्या तनूचें,
तिचें स्वामिनिष्ठत्व कैचें चमूचें ?
अशांनां जयश्री कशी ती पचेल,
जशी दानवांना सुधाकल्पवेल. ॥ ९५ ॥
उडे रंग रात्रीं निवेशीं अमूप,
तिथें बैसती खुद्द खासे चमूप

न भीती, न रीती, न नीती तयांत,
न ते जाणती कीं समीपीं कृतांत. ॥ ९६ ॥
अकस्मात् कडाडे परी वीज काय !
घडे रंग बेरंग लागून घाय;
गदा, चक्र, भल्ली, असि, प्रास, बाण
सुरापांस त्या हाणती हाण हाण ! ॥ ९७ ॥
उठे चंड उद्दंड तों वीरघोष,
उडे तत्क्षणीं मंडळींतील तोष;
दिसे मद्यप्यांची स्थिती भीकरा जी,
महाहीपुढें तीच घे भेकराजी. ॥ ९८ ॥
पहा, संजय प्राप्त झाला ससेन,
म्हणूं सिंह तो, मूढ हे का ससे न ?
शरौघास वर्षी जसा मेघ वारी,
सुरापांस तो जेविं दैत्यां भवारी. ॥ ९९ ॥
न ती थारवे सिंधुराजा स्वसेना,
कसें फूटल्या आवरावें नदेना ?
दशाशांस त्यां फांकवी बालवीर,
सुमांच्या परागांस जैसा समीर. ॥ १०० ॥
दशाशांस ते वालुकेचे रवेची,
कसा त्याप्रती कोणता वीर वेंची ?
हरी संजय क्षुब्ध ऐंद्र स्वचापीं,
रवीसा तपे प्रौढचंड प्रतापी. ॥ १०१ ॥
जयश्री कृपाचिन्ह सत्कीर्तिमाळा,
तदा घालुनी, त्यावरी राजबाळा;

करी उत्सवें तो पुरींत प्रवेश,
प्रजा हर्षली पाहुनी तो नरेश. ॥ १०२ ॥
ध्वजा, तोरणें, भव्यरंगी पताका,
पुरस्थ प्रजा हर्षमूर्तीच ह्या का ?
स्त्रिया आदरप्रेमपूर्णेक्षणांनीं
नृपीं वर्षल्या पुष्पलाजाकणांनीं. ॥ १०३ ॥
किती भाट गाती यशें सुस्वरांनीं,
दिलीं मंगलाशीर्वचें भूसुरांनीं;
अशा वैभवीं पातला मंदिराशीं,
तिथें भेटण्या माय ये इंदिराशी ! ॥ १०४ ॥
त्वरें भूप लागे प्रसूच्या पदासीं,
म्हणे ' त्वत्प्रसादें रमा चापदासी. '
तदा वर्षुनी हर्षबाष्पां अनेक
करी वाटतें माय पुत्राभिषेक ! ॥ १०५ ॥
अहा ! काय तो वर्णु भव्य प्रसंग,
क्रमी अंतरिक्षास कैसा पतंग ?
' अहो ! धन्य ती माय ! तो पुत्र धन्य !
अहंमन्यता दाविती शब्द अन्य ! ॥ १०६ ॥

बाळकृष्ण अनंत भिडे.

---

## ३४ कुबडी तीर्थ.

घेऊनि एक दिवशीं शिव भूपतीस,
गेले वनांत फिरण्या गुरु रामदास.
जायास सांगुनि समस्त जनांस मागें;

ते चालले हळु हळू विपिनांत दोघे. ॥ १ ॥
होती तदा कितितरी रमणीय वेळा,
तेजोनिधी दिनमणी गगनीं उदेला.
नानापरी विकसलीं कुसुमें सुरेख,
यद्रूप पाहुनि वरी मन फार तोख. ॥ २ ॥
पुष्पांतला मधुर सेवुनि गंध सारा,
होता वहात गगनीं बहु मंद वारा.
वृक्षावरी बसुनि पक्षि समस्त होते,
रम्य स्वनें करित मंजुल गायनातें. ॥ ३ ॥
चाले प्रभात समयीं गुरु–शिष्य जोडी,
ओढे नद्या गहन लंघित खोल खिंडी.
होत्या जरी उपलकंटकयुक्त वाटा,
त्यांच्या परंतु चरणीं रुतला न कांटा. ॥ ४ ॥
मार्गी शिवास शिकवी गुरु राजनीती,
नाना कथा कथुनि दाखवुनी प्रतीती.
ऐकूनि शब्द गुरुचे बहु दिव्य गोड,
चित्तामध्यें नृपतिच्या पडला उजेड. ॥ ५ ॥
हर्षोदधींत शिवभूपति मग्न झाला,
केला प्रवास किति तो कळलें न त्याला.
मार्गं क्रमीत असतां भरली दुपार,
चालूनि फार थकला नृपती अखेर. ॥ ६ ॥
संताप दे वरुनि दारुण अंशुमाली,
धूलीमुळें चरण पोळति फार खालीं.
लागे तहान नुरलें बल चालण्याचें,

कोमेजलें वदनपंकज भूपतीचें ॥ ७ ॥
' थांबा ' म्हणूनि वदवे गुरुतें न त्याला,
होता सुशिष्य, गुरु मागुनि चाललेला.
कैसा तरी हळुहळू उचली पदातें,
तों पाहिलें वळुनियां गुरुनें तयातें. ॥ ८ ॥
' कां रे हळू उचलसी शिवबा पदातें
गेलास काय दमुनी तुज काय होतें ? '
ऐसें पुसे सदय सद्गुरु त्या शिवाला
देई परी न नृप उत्तर तें तयाला. ॥ ९ ॥
ज्यांचीं पदें स्मरुनि किंकर मुक्त झाले,
ज्यावांचुनी नच चराचर विश्व चाले
त्या जाणिलें गुरुवरें नृपतिस्थितीतें,
बोले सगद्गद म्हणूनि गुरू शिवातें. ॥ १० ॥
" वत्सा मनीं तिळभरी नच खेद मानी,
देतों तुला त्वरित सुंदर गोड पाणी;
ऐसें वदूनि अपुला उचलून पाणी,
भूमीवरी शिवगुरू कुबडीस हाणी. ॥ ११ ॥
तों वर्तलें नवल, भूमि दुभंग होई;
आंतूनि निर्झर मनोहर एक येई ,
आकंठ तज्जल पिऊनि नृपाल धाला,
चित्तीं स्मरे गुरुचिया विमलां पदांला. ॥ १२ ॥

माधवानुज.

## ३५ महाश्वेतेची कथा.

चंद्रापीड निघे मग दिग्विजया राजनंदनांसहित,
जिंकून पूर्व, दक्षिण, पश्चिम, ये उत्तरेकडे त्वरित ॥ १ ॥
तिकडे हिरण्यनगरीं किंपुरुषांचा विलोकुनी जोडा,
लागे त्याच्या मागें नृपसुत वेगें पिटाळुनी घोडा ॥ २ ॥
त्यांनीं आशा दावुनि, मागें लावुनि बराच दूरवर,
नेऊन, गुप्त होउनि, अंतीं केला निराश भूपवर ॥ ३ ॥
मार्गश्रमें तृषेनें पीडित होऊनि धुंडिता तोय,
अच्छोदाख्य सरोवर पाहुनि तो हृष्ट मानसीं होय॥ ४ ॥
तद्दर्शनेंच त्याच्या चित्तांतिल खेद सर्वही हरला,
प्याला यथेच्छ जलही स्वाद सुधेचाच ज्यामधें भरला ॥ ५ ॥
पाणी पिऊन नृपसुत बसला असतां तटीं तटाकाच्या,
पडता झाला कर्णीं मधुर मनोहारि गीतरव त्याच्या ॥ ६ ॥
कोणीकडून येतो गाण्याचा नाद तो पहाया हें,
हरिणामागुनि जातां सिद्धालय रम्य एक तो पाहे ॥ ७ ॥
शशिशेखरास भावें अर्चुनि वीणा धरूनिया हातीं,
तिकडे एक कुमारी शिवमहिमा गात बैसली होती॥ ८ ॥
चंद्रप्रभेप्रमाणें यत्तनुची गौरकांति लखलखित,
ऐशा त्या तरुणीला पाहुनि नृप होय मानसीं चकित ॥ ९ ॥
तद्रूपसंपदेतें तेविं तिच्या त्या मनोहरें गीतें,
पावून मोह, पाहे वृत्त तिचें तो पुसावया तीतें॥ १० ॥
गायन समाप्त होतां वंदुनि ईशा प्रदक्षिणा करुनी,
फेंकी नृपाकडे ती अमृतोपम दृष्टि आपली तरुणी ॥ ११ ॥
'या आश्रमीं' म्हणे ती 'पूज्य अतिथि मज तुम्ही, बरें आला!'

तद्वागमृतें होउनि तृप्त नरेश्वर तिच्यासवें गेला ॥ १२ ॥
ती स्वाश्रमीं सुकेशी नेउनि बसवुनि सुखासनीं त्याला,
विधिवत् पूजुनि बोले ' कोण असां? कोठुनी इथें आलां? ' १३
तो किन्नरानुगमनापर्यंत तिला स्वजन्मवृत्त कथी,
तेव्हां स्नेहें तीहि द्रवली तद्गुणविमोहिता सुदती ॥ १४ ॥
सरुनि पुढें मग विनयें नमुनि तिला तो विचारिता झाला,
' निजजननें आर्येनें भूषित सुरवंश कोणता केला? ॥ १५ ॥
' निःशेष लाजवावी लावण्यें चांद्रिका जिच्या ऐशी,
' कांति प्रकट शरीरीं आर्येच्या होय ही तरी कैशी ।१६॥
' सर्वहि सुखोपभोगीं विरक्ति नवयौवनींच कां घडली ?
' इतकी कां आर्येची प्रीति तपस्येवरी असे जडली? ' ॥१७॥
पुसतां असें नृपें ती मौनें निःश्वास दीर्घ टाकून,
भिजवी निजाश्रुपातें धरणी स्वकरें मुखास झांकून ॥ १८ ॥
पाहुनि तिची दशा ती, अपराधी आपणास भावून,
तन्नयनें क्षाळाया नृप जल आणी स्वयेंच जाऊन ॥ १९ ॥
प्रक्षालुनि निजमुख निजजन्मकथा ती कथीतसे त्याला,
' ऐक ' म्हणे ' कथितें मी तुज संक्षेपें स्ववृत्त भूपाला! ।२०।
असती कुळें चतुर्दश सुरगणिकांचीं प्रसिद्ध जीं भुवनीं,
शशिकरज त्यांतलें जें, माझी त्यामाजि जन्मली जननी ॥२१॥
गंधर्वांपासुनि जो झाला दाक्षायणी अरिष्टेला,
तो हंस तात माझा; गौरी म्हणती मदीय मातेला ॥ २२ ॥
राजा गंधर्वांचा झाला मत्तात किंपुरुषवर्षीं,
क्रीडा विलास गौरी-सह चिर करुनी दिन क्रमी हर्षीं ॥ २३॥
पोटीं त्या सुभगांच्या दुर्भाग्या मीच एकटी दुहिता,

मज्जन्मीं बहु उत्सव करुनि दिलें नाम मज महाश्वेता ॥ २४॥
गेलें बाल्य सुखानें, यौवनपद्वीस पावती झालें,
स्नानार्थ एकदां ह्या अच्छोदीं माउलीसवें आलें ॥ २५ ॥
करुनी स्नान सखीसह लीलेनें हिंडतां सरोरोधीं,
पुष्पसुगंध तिथें ये कोठुनि ह्याच्याच लागलें शोधीं ॥ २६ ॥
तों पाहिला पथीं म्यां एक तरुण मदनमूर्ति मुनितनुज,
जी मंजरी वसे तत् कर्णीं मोही तिचाच गंध मज ॥ २७ ॥
बघतांच त्यास निजशर मजवर तात्काळ पंचशर मारी,
तेणें व्यथित न हृदयाचि विव्हळ अंगेंहि जाहलीं सारीं ॥ २८॥
जवळी होता त्याचा मित्र तया मी करोनियां नमन,
वदलें ' कोण असे हा गुनि! कैसें ह्यास हें मिळे सुमन ॥२९॥
' कुतुकें पुससि ' म्हणे तो ' ऐक तरी श्वेतकेतुनाम मुनी,
पुरला काम रमेचा रूपश्रीलाच त्याचिया बघुनी ॥ ३० ॥
' तत्काळ श्री प्रसवे सुत, ती मुनिचा म्हणून त्या तो दे,
' स्वीकारुनी मुनीश्वर नाम तया पुंडरीक दे मोदें ॥ ३१ ॥
' तो लक्ष्मीचा नंदन विद्वान् झाला पितृप्रसादें हा,
' कैलासाहुनि मजसह येतां परतून आज निज गेहा ॥ ३२॥
' ठेवी ह्याच्या कर्णीं ह्याला बघतांच नंदनश्री ही,
' मंदारमंजरी, जी स्वसुगंधें सुंदरी तुला मोही ॥ ३३ ॥
तंव तो तरुणहि कुतुकें मज बोले ' स्पष्ट काय तें सांगें !
'तुज पाहिजेच तरि ही घे, मग संकोचहा कशाला गे ? ॥३४॥
वदुनि असें निजकर्णा-वरुनी काढून मंजरी त्यानें,
सस्पृह पहात मन्मुख मत्कर्णीं ठेविली स्वहस्तानें ॥ ३५ ॥
त्याच्या करांगुलीचा होतांचि स्पर्श माझिया गाला,

दोघांच्याही हृदयीं कामाग्नीच्या धडाडल्या ज्वाला ॥ ३६ ॥
भान नसे त्या गळली स्मरणी हातांतली जरी खालीं,
झेलुनि वरचेवर ती प्रेमें मी आपल्या गळां घालीं ॥ ३७ ॥
आईच्या आज्ञेनें जातां मी परत तो मला वदला,
' स्मरणी हरूनि माझी पदहि पुढें टाकणें न योग्य तुला' ॥ ३८ ॥
परिसुनि ह्या तद्वचना ' ही घ्या ' ऐसें वदोनिया त्यातें,
मुक्तावली स्वकीया दिधली म्यां त्यास आपल्या हातें ॥ ३९ ॥
ये मम सखी तरलिका मजमागें, तो पुसे तियेस म्हणीं,
'कोण ?-कुणाची कन्या ? कोठें ही आज जातसे तरुणी ?' ॥ ४० ॥
मद्वृत्त मत्सखीनें कथितां, सप्रेम तीस सांगे तो—
' एकांतीं स्वसखीला दे हा जो लेख मी तुला देतों' ॥ ४१ ॥
लेख तमालरसें तो वल्कलपट्टावरी लिहुनि देई,
तो घेउनी सखीही माझी मजमागुनी त्वरित येई ॥ ४२ ॥
' झुरसी यद्विरहें हें पत्र तयानें दिलें ' म्हणे आली,
विरहानलतप्तेला मज ती संजीवनी तयीं झाली ! ॥ ४३ ॥
पानपुड्यांतुनि काढुनि देतां मज तें तिनें, यदा पाहें,
तों त्यांमध्यें आर्या आर्यानें एक ही लिहिलि आहे ॥ ४४ ॥
" बिससित मुक्ताहारें लागुनि लोभास हंस जो गेला,
" तद्वन्मानसजन्मा माझाही दूर गे तुवां नेला ! " ॥ ४५ ॥
हा पत्राशय कळतां पुनरपि कामाग्नि मन्मना जाळी,
मी कोण, कोणती, मी आहें कोठें, कळे न त्या काळीं ॥ ४६ ॥
तों छत्रधारिणी मम मज सांगे—'मुनिकुमार कासारीं,
' जे दोघे पाहियले, त्यांपैकीं एक पातला द्वारीं' ॥ ४७ ॥
' जा शीघ्र घेउनी ये त्याला'—ही ऐकतांच मम वाणी,

ती जाउनी त्वरेनें मजजवळी त्या कपिंजला आणी ॥ ४८ ॥
बघतांच त्या मुनिसुता सत्कारुनि, काय बोलतो तो हें,
ऐकावया तयाच्या सन्मुख मी जाउनी उभी राहें ॥ ४९ ॥
' वांचीव त्वद्विरहानलविकला मम सख्यास '—तो वदला,
' कर जोडितों पहा हे, ह्यावरि करि योग्य जें दिसे तुजला ५०
सांगून पाठवावें काय तया ह्या विवंचनेमाजीं
असतां मी, मम सदनीं इतक्यांताचि माय येतसे माजी ॥५१॥
पाहुनि मज्जननीला मजाशि न पुसतां निघून तो जाई,
कुशल प्रश्न करोनी मजला, माझीही जातसे आई ॥ ५२ ॥
माता जातां, रात्रीं जिकडे मद्विरहतप्त तो होता,
मुनिसुत तिथें सखीसह मीहि निघें जावयास विरहार्ता ॥ ५३॥
मार्गीं परिसुनि रोदन-रव, मी दचकून काय हें घडलें,
बघतां, रडे कपिंजल, तत्सखशवही महीवरी पडलें ! ॥ ५४॥
कारण तन्मरणा ' मी होय ' असें गणुनि फार ही रडली ,
सहगमनास निघें तों कर्णीं ही दिव्यपुरुषगी पडली ॥ ५५ ॥
' साहस न करीं वत्से पुढति समागम घडेल तुज याचा '
आश्वासुनी असें मज, तो स्वर्गीं देह नेतसे त्याचा ॥ ५६ ॥
' काय प्रकार हा ' ही पृच्छा मी त्या कपिंजलास करीं,
त्या माझ्या प्रश्नाचें उत्तर कांहींच देउनी न तरी, ॥ ५७ ॥
' कोठें तूं मन्मित्रा घेउनि जातोस ? ' दिव्य पुरुषाला,
ऐसें पुसताचि तोही निज मित्राच्या समागमें गेला ॥ ५८॥
तेव्हांपासुनि मी त्या दिव्य गिरेचा धरोनि विश्वास,
बसलें वनीं प्रियातें चिंतित सोडुनि सुखोपभोगांस ॥ ५९ ॥

**गं. रा. मोगरे.**

## ३६ पानपतचें युद्ध.

वाग्देवते ऊठ न अश्रु गाळीं
आलें चुके हें न तुझ्या कपाळीं
लाखों बळी जो तव पूर्वजांचे
संग्राम घे तो वद सारवाचे ॥ १ ॥
सोळा पुढें ब्यायशि अंक वास
सेवी अशा ये शाकिं पौष मास
जो आठवा तद्दिन तों न खास
मृत्यूच वाटे उघडी मुखास ॥ २ ॥
हो जें यमाचें नरयज्ञवाट[1]
रणांगणीं पानपतीं अफाट
सेना मराठी परकीय येती
परस्परां संमुख ठाण घेती ॥ ३ ॥
सदाशिवाधिष्ठित एक साजे
स्वामी दुर्रांचा अबदालि गाजे
हे दोन सेनापति सिद्ध झाले
त्यांच्या करींचें रणसूत्र हाले ॥ ४ ॥
प्रचंड झाला रणवाद्यघोष
हाले धरित्री घुमला खकोषें[2]
वीरांगसुप्ता झणिं शौर्यदेवी
ऐकूनि त्यातें प्रतिबोधें[3] सेवी ॥ ५ ॥
रांगा रणा उद्यत सैनिकांच्या
लाटाच कीं विक्रमसागराच्या

१ नरयज्ञास्तव तयार केलेली जागा. २ नभोमंडल. ३ जागृती.

सिंहध्वनीनें करुनी सलामी
आरंभिती तुंबळ युद्ध नामी ॥ ६ ॥
खिंकाळती वीर्यवशें तुरंग
चीत्कारती कुंजर युद्धि दंग
हुंकारती वीर रणोत्सवानें
नादावती सर्व दिगंत त्यानें ॥ ७ ॥
बीभत्स हिंसा यमखाटिकाची
झाली सुरू ती बघवे न साची
म्हणूनि वाटे रवि दृष्टिआड
ओढी धुळीचा पट फार जाड ॥ ८ ॥
युद्धांगणीं तोफ यदा दणाणे
कर्णस्थ देवी त्यजिती स्वठाणें
संतप्त गोळे जणु लाल रागें
संहार कर्मीं बघती न मागें ॥ ९ ॥
गर्भाशयापासुनि बंदुकांच्या
सीत्कारशब्दें गुलिका शिशाच्या
निघूनि जाती सुजवें अलक्ष्य
न भेदण्याला चुकती स्वलक्ष्य ॥ १० ॥
सणाणती बाण रणीं अपार
खणाणती खड्ग सुतीक्ष्णधार
चकाकती पट्टिश भोंवताले
भरारती भासुर तेंवि भाले ॥ ११ ॥
जशी झरारा झड पावसाची
तशीच शस्त्रास्त्रसमुच्चयाची

रणांगणा वृष्टि अखंड ह्याणी
सुटे परी मृत्युमुखासि पाणी ॥ १२ ॥
कायेन वाचा मनसा तसाच
दोन्ही दळांचा व्यवसाय साच
चाले जयश्री-परितोषणार्थ
त्यां तो गमे एकचि उत्तमार्थ ॥ १३ ॥
जीं कंठनाळां व्यतिरिक्त झालीं
घर्में नव्हे वीररसेंचि न्हालीं
असंख्य त्या वीरशिरोऽबुजांनीं[1]
वाटे जयश्री पुजिली तयांनीं ॥ १४ ॥
सर्वत्र वाहे समरांगणांत
खळा खळा लाल दिसे नितांत
पाहोनि तो रक्तरसातिरेक
वाटे तिचा होत महाभिषेक ॥ १५ ॥
युद्धांगणीं गंध विचित्र फांके
दोन्ही चमूंचे भटसिंह बांके
ओवाळिती धूप अनेक भावें
तिच्या पुढें कीं मनिं हेंच यावें ॥ १६ ॥
शस्त्रास शस्त्रें घडतां प्रहार
जो संभवे अग्नि पवित्र फार
तेणें तिचा भासतसे मनाला
पंचारतीचा जणु थाट झाला ॥ १७ ॥
लक्षूनि युद्धस्थळ पूज्यतीर्थ

---

१ कमलांनीं.

तिथें तनू ठेउनि जे कृतार्थ
झाले तयांच्या पडल्या सुराशी
तिच्या निवेद्या जणु सोय खाशी ॥ १८ ॥

प्रचंड नादें भट गर्जताती
तिचा जणू ते स्तुतिपाठ गाती
मनीं तिचा ध्यास तयांस लागे
तद्रूपची होउनि वृत्ति वागे ॥ १९ ॥

संग्राम ऐसा घनघोर चाले
कोणी न कोणा लव हार आले
आर्यांकडे ना यवनांकडे ना
कोठें जयाचा कल तें कळेना ॥ २० ॥

साहे न हा त्यां अतुलोपमर्द
म्हणूनि कीं आर्य जवानमर्द
सर्सावले चावुनि दांत ओंठ
विध्वंसिण्या तो रिपुसैन्यकोट ॥ २१ ॥

झपा झपा हात उठे तयांचा
सपा सपा हाणिति वार साचा
चरा चरा कापिति कंठनाळ
तटा तटा तोडिति सैन्यजाळ ॥ २२ ॥

जो जो कुणी वीर कुठें कसाही
युद्धार्थ त्यां संमुख सिद्ध राही
तो तो यमाच्या गृहिं नीट जावा
तद्देह विच्छिन्न रणीं पडावा ॥ २३ ॥

"अल्ला खुदा क्या गति हो हमारी"
बुंबों अशी म्लेंच्छसमूह मारी
पाणी मुखींचें उतरोनि जाई
मागें हटे धीर सुटे अगाई! ॥ २४ ॥
मराठियांनीं बहु शर्थ केली
ती पाहण्या वृत्ति घडे भुकेली
म्हणूनि वाटे स्थिर सूर्य राहे
ख-मध्यभागीं रण चित्र पाहे ॥ २५ ॥
संतोषली पाहुनि युद्धरीती
माळा जयश्री करिं घेउनी ती
आर्यांसि आली वरण्यास रागें
हा! हा! कशी ती परि जाय मागें ॥ २६ ॥
देखे रणीं भारत-वीर-पत्नी
माझ्यापुढें होतिल या सपत्नी
या कारणें कीं खवळोनि रागें
जाई जयश्री परतोनि मागें ॥ २७ ॥
गर्वें बहू ताठुनि वीर आर्य
गेले अवज्ञा दिसते अहार्य
शंका तिच्या ही मनिं कीं उदेली
वाटे जयश्री परतोनि गेली ॥ २८ ॥
आर्यां अविंधांपरि डामडौल
जुना नसे, तो उसनाच फोल
रुचे न हा कीं वरकांति थाट

१ बॉंब. २ प्रेमानें.

आर्यांकडे ती फिरवी स्व पाठ ॥ २९ ॥
हे झुंजले सोडुनि पूर्वरीती
मार्गांत आली तिस ही प्रचीती
न भ्रष्ट हे योग्य वरावयास
म्हणूनि का ती फिरवी मुखास ॥ ३० ॥
साम्यासि ज्याच्या अभिमन्यु साजे
विश्वास जो बाळ रणीं विराजे
तो पाठिराखा मृत लाभतांच
गेली त्वरें ती निघुनीच साच ॥ ३१ ॥
पर्जन्यतोयें सुकल्या तळावा
जसा पुन्हा जीवनलाभ व्हावा
तसा दुराणी दळभार शेष
नव्या बळें धीर धरी विशेष ॥ ३२ ॥
कृतांतसा भेसुर आरडोनी
हिंदूवरी तो पडला तुटोनी
विश्वास जातां क्षणिं अर्ध मेले
ते दीन चित्तीं चरकूनि गेले ॥ ३३ ॥
आविंध ते निर्दय जे स्वभावें
आरंभिती कत्तल एकभावें
आला मराठ्यां मुखिं घालण्यास
कल्पांतींचा काळचि मूर्त खास ॥ ३४ ॥
करा करा चावुनि ओंठ दांत
सटा सटा हाणिति शस्त्रघात
धडा धडा धावति धृष्ट जेथें

पटा पटा पाडिति आर्य तेथें ॥ ३५ ॥
कटा कटा काटुनि कंठबंध
थया थया नाचविती कबंध
छटा छटा छाटुनि हिंदुछाग
भरा भरा याजिति युद्धयाग ॥ ३६ ॥
धनुष्य पट्टा समशेर भाला
बंदूक इत्यादि रणायुधाला
घेऊनि जो वीर रणार्थ आला
कृतांत दे पाहुणचार त्याला ॥ ३७ ॥
गजाश्रया वा तुरगाश्रया वा
जोडूनि जो आर्य रणार्थ यावा
तो अध्वखेदप्रशमार्थ वाटे
लागे स्वयानासह मृत्यु वाटे ॥ ३८ ॥
तरंगती वीरशिरें असंख्य
नभीं पहाया जणु घोर संख्य
असंख्य हस्तें रणरंगदेवी
भासे मना कंदुककेलिसेवी ॥ ३९ ॥
छाया वरी हिंस्र विहंगराय
करी निजांकीं शिर भूमिमाय
असे रणश्रांत कितीक वीर
अखंड निद्रा निजती सुधीर ॥ ४० ॥
महातरूंचा गण टोळधाड
येतां जसा जर्जर हो उजाड

१ डोक्यावेगळें धड. २ बकरे. ३ यज्ञ.

तसा मराठी दळभार झाला
अविंधसेना मथितां तयाला ॥ ४१ ॥
चारी दिशां वाढुनि आब्धि भेट
देतां जसें लोपत जाय बेट
तसें मराठी बळ शीघ्र आटे
जेव्हां सभोतीं परसंघ दाटे ॥ ४२ ॥
जसा धराकंपमहाप्रहार
विध्वंसितो रम्य पुरी उदार
त्या आर्यसेनेस तसा परांचा
हल्ला महादुर्धर होय साचा ॥ ४३ ॥
युद्धार्थ लक्षावधि सैन्य आलें
भूयिष्ठ त्यांतील अहा ! निमालें
सदाशिवाच्या निधड्या मनास
शिवे न चिंता अणुमात्र खास ॥ ४४ ॥
कृतांत घे ऐकुनि जीस धाक
क्रोधें अशी फोडुनि दीर्घ हाक
निर्वाणिचें युद्ध करावयाला
तो सूर्यपुत्रासम सिद्ध झाला ॥ ४५ ॥
दावी प्रतापी भट तो अपूर्व
रणीं चमत्कार अभूतपूर्व
शत्रूसही कौतुक पाहुनी तें
वाटे, मुखीं घालिति अंगुलीतें ॥ ४६ ॥
क्षण क्षण-क्षीण-सहाय-भार
तो शोच्य पूज्य स्पृहणीय फार

दिसे रणीं संनिहितांस्तकाळ
रवी जसा क्षीणमयूख[1]जाळ ॥ ४७ ॥
कुडींतुनी जीव जसा निघावा
गेला कसा कोठ न तो कळावा
तसा त्यजोनी स्वचमूशरीर
तो जाहला क्षिप्र अदृश्य वीर ॥ ४८ ॥
" माझ्यावरी कां रुसलीस आजी "
" म्लेंच्छांवरी कां दिसतेस राजी "
असें जयश्रीस पुसावया तो
जाणो तिच्या मागुनि गुप्त जातो ॥ ४९ ॥
उच्छेद हा निस्तुल युद्धकाळीं
माझ्या असे का लिहिला कपाळीं
विचारण्या हें चतुराननास
सदेह गेला जणु तद्गृहास ॥ ५० ॥
सदाशिवाला अशिवागमाचा
होतां असा स्पर्श अगम्य साचा
जी हीन दीन स्थिति तद्बळास
आली, न ती गोचर वाग्बळास ॥ ५१ ॥
गेलें जयाचें शिखरासि दैन्य
तें शीघ्र काढी पळ शेष सैन्य
करी दुराणी-दळ पाठलाग
तदा उणे त्या दशदिग्विभाग ॥ ५२ ॥

**राधारमण.**

---

१ किरण.

## ३७ भीमकर्मा राघोबा.

शा. वि.–झालें युद्ध विरुद्ध पानिपतचें प्राणापहारी महा
माजे शुद्ध अशुद्ध-सागर रणीं उत्पात निस्सीम हा
सव्वालक्ष बळी धुळीस मिळुनी गेले जयाच्या भरी
अद्यापीहि थरारती परिसुनी रोमांच आंगावरी ॥ १ ॥
सेवाचोर हरामखोर फसव्या खोटा पुरा घातकी
मोठा नीच कृतघ्न कीचक बरा ऐसा महा पातकी
पावे मान नजीबखान करुनी कर्मे अशीं ओखटीं
झाला धन्य जगत्रयीं बुडवुनी देशास चिंतातटीं ॥ २ ॥
अफ्गाणीं निजसूत्र लावुनि क्षणीं कापट्यचिंतामणी
वाणी गोड वदूनि खोडकर तो आणी दुराणी रणीं
बांधोनी बळ हिंदुच्या खळ कसा पाळांमुळांतें खणी
प्राणी हिंसक ह्याहुनी बहु बरा वाटे विषारी फणी ॥ ३ ॥

शिखरिणी–अहा! दत्ताजीचा चरचर पहा कंठ चिरला
मराठ्यांचा देवा हर हर! कसा काल फिरला
कसा एकाएकीं प्रियकुमर विश्वास पडला
कसा श्रीमंतांच्या निरुपमयशा रोग जडला ॥ ४ ॥
कसे भाऊ नेटें यवनसमुदायांत घुसले
जयश्री ही झाली पतित म्हणुनी काय रुसले
पळाले बाकीचे त्वरित फुटली वाट तिकडे
प्रसंगीं पोटाला मिळति कितिकांच्या न तुकडे ॥ ५ ॥
नसे कोणा बंडी कुडकुडत थंडींत पडले
अरी मागें लागे म्हणुनि किति झाडींत दडले

हजारों लोकांचे सतत पळतां पाय सुजले
कितीकांचे मार्गीं रुधिर गळुनी काय भिजले ॥ ६ ॥
अरीनें कापोनी अगणित शिरें ढीग रचले
महा योध्यांचेंही बिकट समयीं धैर्य खचलें
चलो भागो आगे म्हणत कडवे शत्रु उठले
चमू वाटे फाटे चहुंकडुन आकाश फुटलें ॥ ७ ॥
स्रग्धरा—खाना तोडी न माना अति करुणरवें प्रार्थिती लोक नाना
त्राता ना बायकांना घळघळ रडती पाहुनी अंतकांना
यानावांचूनि नाना फडणिस पळती सोडुनी देहभाना
प्रार्थीती प्राणदाना विकलजन पुसे कोण मानापमाना ॥ ८ ॥
नाना कष्टें उपाशीं निशिदिनिं फिरले लावुनी राख अंगीं
देशाचें भाग्य मोठें म्हणुनिच समजा वांचले त्या प्रसंगीं
दुर्दैवानें परंतु प्रियतम जननी बापुडी नष्ट झाली
मोठ्या कष्टांत पत्नी परतुनि नगरा प्राण घेवोनि आली ॥९॥
शा० वि०—झाला घोर अनर्थ थोर पडला घाला मराठ्यांवरी
होते शूर बलाढ्य होळकरही झुंजार शिंद्यापरी
झाले भग्न हताश वीर, अवघें खालीं बसे पारडें
दुःखाग्नी बहु चेतला पसरलें देशांत साऱ्या रडें ॥ १० ॥
स्रग्धरा—तेजस्वी दोन मोत्यें अवचित गळलीं मोहरा सातवीस
गेला सांडोनि खुर्दा अगणित पुतळ्या मोजवेना कवीस
ऐशी संकेतवार्ता प्रथमच कळली देशिंच्या सावकारा
दुःखाचा पूर आला प्रळय उसळला थोर झाला पुकारा ११
भाऊ विश्वास ह्यांचा परिसुनि समरीं निश्चयें काळ झाला
शोकाग्नी पेशव्यांच्या हृदयिं भडकला झोंबला काळजाला

देहाचें भान गेलें क्षितिवरि पडले जाहले फार खिन्न
आली निस्तेजताही रुचिरतरमुखा टाकिलें गोड अन्न ॥१२॥
राघोबा तों भरारी सकल परिसुनी बंधुची मात कानीं
हा रे! हा रे! कसा रे झळफळत वदे घात केला ठकांनीं
बोले गर्जोनि; केव्हां करिन निजकरें शत्रुची सर्व होळी
बोटें मोडी कडाडा रदन करकरां चावुनी हात चोळी ॥१३॥
भाऊ गेलासि कोठें रिपुकर धजले रे कसे प्राण घ्याया
आम्ही झुंजार योद्धे म्हणवुनि समयीं जाहलों सर्व वायां
दत्ताजी भीम साचा अतुलबलनिधी तोहि युद्धीं निमाला
झाली कैसी जयश्री च्युत यवनगळां घालुनी कीर्तिमाला ॥१४॥
जाऊनी काय वेगें धरुनि कडकडां शत्रु दाढेंत चावूं
संग्रामीं त्यास दाऊं यमपुर अथवा देह फाडूनि खाऊं
घालू रक्तांत न्हाऊं तनुवरि वसनें बांधुनी अग्नि लावूं
तीव्रें शस्त्रें करू कीं तिळतिळ तुकडे सांग रे सांग भाऊ॥१५॥
आणा त्या रोहिल्याला त्वरित मजपुढें दाखवा एकवेळ
दुष्कर्मी आगलाव्या कुटिल मसलती सर्व त्याचाचि खेळ
कोठें गेला दुराणी खळ बळ वळवा एकदां त्यास दावा
वक्षप्रांतीं बसोनी चिरुनि नरडिचा वाटतें घोट घ्यावा ॥१६॥
दुःखें सर्वांग पोळे अनलसम करी भैरवाकार डोळे
शत्रू दंडूनि कंडू शमन करुं बरा हेंचि चित्तांत घोळे
केली सारी तयारी निवडुनि पथकें नेमिले शस्त्रधारी
स्वारीचा थाट भारी सबळ सकळही पातले साह्यकारी ॥१७॥
बंधूची घेत आज्ञा बहु बहु विनयें सांगुनी चार गोष्टी
नानासाहेब भाऊ स्मरुनि पुनरपी जाहले फार कष्टी

वंदोनी श्रीगणेशा बहुधन वसनें वांटुनी ब्राह्मणातें
आवेशें सिद्ध झाले रिपुजनहनना जाउनीयां रणातें ॥ १८ ॥
तोडे घालूनि घोडे ठुमकत निघती उंट सांडा उदंड
हस्ती दावूनि मस्ती गगनिं उडविती शुंडदंड प्रचंड
हातींचीं दिव्य खड्गें विविध चमकती शोभती उंच भाले
वीरश्रीयुक्त बाहू स्फुरति रणपटूवीर सारे निघाले ॥ १९ ॥
झाल्या तोफा धडाडा फडफड सुटले बंदुकी हस्तनाले
शिंगें कर्णे तुताऱ्या झडति खणखणा दुंदुभीघोष चाले
मध्यें पुष्टांग दंती धरि जरिपटका शोभला जो झुलीनें
जातांना सैन्य वेगें गगन दशदिशा धुंद झाल्या धुलीनें २०
जातां मार्गांत लागे जयपुर नगरी वैभवें जेविं लंका
नाना विद्या कलांचें भुवन बहु बरें तोषवी रावरंका
वेढूनी तीस दादा हटकुनि नृपती सिद्ध झाला रणाला
वाटे उड्डाण साधी मृगपति विपिनीं पाहुनी वारणाला ॥ २१ ॥
शा. वि.—आम्हां द्या करभार हार म्हणुनी किंवा लढा या उठा
काटा पाहुं बरें प्रताप तुमचा हा लावितों बाहुटा
आला कोप निरोप ऐकुनि असा राणा बहू तापला
बोले सैनिकहो पराक्रम तयां दावूं चला आपुला ॥ २२ ॥
योद्धे साठसहस्त्र केसरिपरि वस्त्रें बरीं केशरी
पुर्भय्ये रजपूत वीर निधडे कोणी न पावे सरी
खासे स्वार हजार घेउनि सवें राणा उठे संगरा
वाजी वारण धावतां बहुबळें कांपे थरारा धरा ॥ २३ ॥
शस्त्रें घेउनि सिद्ध युद्ध करण्या उद्युक्त दोन्ही दळें
क्रोधाग्नी डहुळे समुद्र खवळे जैसा महावादळें

राणा चिंतित मानसीं मजपुढें हा कोण येतो रणा
अश्वारूढ सशस्त्र संगरमणी तों देखिलें ब्राह्मणा ॥ २४ ॥
स्रग्धरा—होवोनी खिन्न बोले करिन नच कधीं मी अशा घोर कृत्या
येथें चालूनि आली उघड दिसतसे रोकडी ब्रह्महत्या
छे छे हें कर्म खोटें अनुचित म्हणुनी टाकिल शस्त्र खालीं
आज्ञेनें सर्व सेना त्यजुनि समर तैं शीघ्र मागें निघाली ॥२५॥
हाका मारोनि दादा अडवुनि अरिला बोलिला वीर बाका
आवांका सोडुनी कां सुयश मळवितां घेउनी थोर धाका
ठाका युद्धास किंवा झटपट अपुलीं आयुधें सर्व झुंका
नाका घांसोनि वांका शरण म्हणुनियां खंडणी शीघ्र टाका २६
शा. वि.—धर्मे उक्त नव्हेच भूप वदला संग्राम हा ब्राह्मणा
भूदेवांवरि शस्त्र हें न उचलूं आम्हांस कांहीं म्हणा
देण्याचें करभार नांवच नको हें राज्य संरक्षणा
कांहीं घेत असाल दान तरि मी देतों तुम्हां दक्षणा ॥ २७ ॥
राघोबा समयास जाणुनि वदे नाहीं अम्हाला हट
घ्यायाला प्रतिबंध दान कसला आम्ही कुळाचे भट
ऐकोनी मखमालि स्वर्णकळशी डेरा नृपानें नवा
अर्पोनी दशलक्ष रोख रुपये सन्मानिलें राघवा ॥ २८ ॥
साधी कार्य कसेंतरी धरुनिया डोळ्यावरी कातडी
जायाची पुढची खऱ्या रिपुवरी होती बहू तांतडी
स्नेहाची मिळवूनि जोड निघता घेवोनि सेना सर्व
अब्दालीविण कामकाज दुसरें कोणासही नाठवे ॥ २९ ॥
लागे अन्न न गोड तोड न सुचे कोठें न कांहीं रुचे
सारे उत्सुक धीर वीर उसणें फेडावया शत्रुचें

घेती झोंप न कोपयुक्त यवना गांठावया धांवले
टाकोटाक बुभुक्षु केसरिपरी दिल्लीप्रती पावले ॥ ३० ॥
दिल्ली जिंकुनि दांडगा यवन तो गेला पुढें सांगती
चिंतामग्न समस्त बोलति कशी आतां करावी गती
आलेली उमदी शिकार चुकते देवा अशी रे कशी
गेला कोठवरी म्हणोनि पुसुनी केली पुरी चौकशी ॥ ३१ ॥
वैरी फार न दूर तोंच कळलें आला मनाला दम
घेऊं जाउनि गाठ पाठ पुरवूं फेडूं भिडूचा भ्रम
हाडें पूड करूनि सूड उगवूं संकल्पिलें राघवें
बोले गर्जुनि यावया स्फुरण तैं तो सैनिकांतें नवें ॥ ३२ ॥
हे माझे सरदारहो! अनुगहो! घोड्यास द्या चाबुक
नित्याचा तुमचा पराक्रम मला आहे पुरा ठाउक
केलेली छळणा स्मरा रिपुवरा माना खरा काजरा
थोडा नेट धरा प्रसंग निकरा आला करा साजरा ॥ ३३ ॥
निद्रा भूक तहान सर्व विसरा बांधा उठा कंबरा
नाहीं अन्य उपाय पाय उचला चिंतूनि विश्वंभरा
स्वामीनिष्ठ अभिष्ट चिंतक तुम्ही सारे शिपाई गडी
मागें घ्याल न मद्यशार्थ अनलीं टाकावयाला उडी ॥ ३४ ॥
मी तों केवळ नामधारक असे माझी न कांहीं कथा
गादीचा अभिमान मान सकलीं सांभाळणें सर्वथा
ईशाचें तुमचें सहाय असतां काळासही मी न भी
हो अस्मत्पतितध्वजा वर उभी गर्जो यशोदुंदुभी ॥ ३५ ॥

कृ. ना. आठल्ये.

## ३८ दुर्योधनास अर्जुनाचा जबाब.

( पांडवांनीं बरीच पड खाऊन दुर्योधनास कळविलें कीं, ' जरी तूं आम्हाला पांच गांव दिलेस, तरी आम्ही संतोषानें राहूं. ' परंतु दुर्योधनानें तसें न करितां उलट प्रतिज्ञा केली कीं, ' सुईच्या अग्राएवढीही जमीन पांडवांस मिळणार नाहीं ! ' व कृष्ण आणि पांडव यांत बिघाड पाडण्याचा प्रयत्न करून पांडवांस भिवविण्याकरितां संजयाबरोबर एक अत्यंत उद्धट निरोप पाठवून त्यांस युद्धाचें आव्हान केलें. यावर अर्जुनानें जो बाणेदार जबाब दिला तो पुढील आर्यांत गुंफिला आहे. )

आर्या :-आधींच तप्त होता क्लेशें गांडीवधर अगाध मनीं
तत्क्रोधाग्निज्वलनीं रिपुवाणी त्यांत होय ती धमनी ॥ १ ॥
करुनी नयन असे कीं हीनद्युति रक्त-कंज यापरिस
अर्जुन गर्जुन बोले " नयनिपुण गुणाढ्य संजया ! परिस ॥२॥
असतां सन्निध तो, जो वांछी मज सूत कर्ण झगडाया
हाणी मम वाक्टंका अंधसुता जडकठोर दगडा या ॥ ३ ॥
गोपाळपांडवांचा योग, करूनी उपाय, तोडावा
म्हणुनी दुर्योधन हा गुप्तपणें विविध मांडितो डावा ॥ ४ ॥
यानें ये मज, जैसें रवितेजोविरहचिंतनें हास्य
हिणवाया मंद परा यततो मळवून आपुलें आस्य ॥ ५ ॥
परिमळ सुम, कीं गोडी मधुरस, कीं तेज दीपकज्योती
कीं भक्त देव, सांगें, कोण्या यत्नें विभक्त हे होती ॥ ६ ॥
कपटप्रयोग करितो, मर्मच्छिद बोल बोलतो कितव
ते परि केशवपांडव यांत न करितील संजया ! फितव ॥ ७ ॥

---

१ शठ.

आम्हांस विभांडाया जे जमवी भक्तयोध नर समरीं
त्यांसह हा मूढ गणो मद्बाणीं व्यक्त-योधन-रस मरी ॥ ८ ॥
जरि अंधपुत्र अर्पिल न न्यायें भू अजातरिपुराया
खणिली गर्ता त्यानें आत्मा सकुळ स्वतां तरि पुराया ॥ ९ ॥
अजमीढकुलज धर्मा देतां भू, यन्मती उलट पडती
त्याच्या पूर्व अघांची पुरती होणार आजुनी झडती ॥ १० ॥
जे न खवळले, सतिच्या जैं हिसडी अघखनिखळ निरयांतें
ते हे पांडव नाहीं; उलथूं शठ आज निखळ निरया ते ॥११॥
कपटानें आकळिले, छळिले, खिळिले मृगेश चापांत
तेच स्वतंत्र होतां, चुकती करितां न शत्रुचा पात ॥ १२ ॥
रे संजया ! स्ववदनें मूढें प्रज्वळुनि खादिरांगारा
आंगा ' राखो ' म्हणुनी लिपतां, तो होय शीत कां गारा ?
युयुधान, भीम, मी, यम, पांचाळ, रमेश जो गजा तारी
या नरहरींसह यदा समरीं ठाकेल हा अजातारी ॥ १४ ॥
तेव्हां ओढवलें बा ! पूर्व दुरित घोर धार्तराष्ट्रांचें
धूळित निजतिल पशुसम हे दुष्ट पति क्षतार्त राष्ट्रांचें ॥ १५ ॥
जीं जीं पूर्वीं केलीं, तीं तीं दुरितें समस्त फळतिल कीं
' पेराल तेंच उगवे ' हें तत्व दिसेल लिखित खळ तिलकीं ।१।
सामें झालों असतों तुष्ट हतबळां नरांसम ग्रामीं
परि दुर्योधनयुद्धें गणितों लब्धा धरा समग्रा मी ॥ १७ ॥
हांकून वनीं धर्मा जो निजवी शुष्कपल्लवावरती
गृध्र रणीं टोंचुन तो दुर्योधन मलिनगल्ल, वावरती ॥ १८ ॥
ही ज्ञानतपोनिग्रहधृतिधर्मौदार्ययुक्त पंच कसे
हे पांडुपुत्र केलों कुर्वधमें हद्दपार वंचकसे ? ॥ १९ ॥

होता कपटी रिपुच्या मोहक वचनांत भरवसा याचा
म्हणुनी अकपट धर्मा ये समय वनांत भर वसायाचा ॥ २० ॥
परि हा धर्म न पूर्विल, गाजत हा आजकाळ राजवर
पुरतें उसनें फेडिल, जें ज्यांचें सोसिलेंचि आजवर ॥ २१ ॥
धर्माचा विमल यदा हृदयीं कोपाग्नि कोंडला वाया
उसळेल तदा कौरव लागेल धुळीस तोंड लावाया ॥ २२ ॥
धर्माचा क्रोध दहन उबविल जैं ग्रीष्मभीष्मतरणीतें
करणीतें आठवुनी रडतिल, पडतिल कुरू हत रणीं ते ॥ २३ ॥
भीष्म, क्रोधविषातें वमतां, तळपेल जैं गदापाणी
अंतकधामा बघ ते कुरु नयनां आणितिल तदा पाणी ॥ २४ ॥
भीष्म करीं कठिण गदा इंद्राशनि-शनिगति-स्वसा राहे
जैं गिरिकूटोपम गज रज करुनी दाविल स्वसारा हे ॥ २५ ॥
जैं वाहेल कुसुंबी करि-कुंभीमांसकर्दमा सरिता
तैंच क्षतहत कुरुंचा रणमद होणार हा रिता सरिता ॥२६ ॥
प्रलयाग्निज्वालेसम भीमगदा रणमहात संचरती
अपकीर्तीशीं कराविल खलांस, देऊनि धूळिमंच रती ॥ २७ ॥
परशुधर तरूंस वनीं, किंवा करिवर सरांत नलिनातें
भीम तसा खंडिल खल-बल शीर्षातें रणांत मलिनातें ॥ २८ ॥
खलबल भीमक्रोधा, शुष्क तृण जसें महोग्र वणव्याला
पश्चात्तप्त न होतों मूषक गांठूनिया कवण व्याला ॥ २९ ॥
अनयें बुडतो खळधी जळधींत तरे न भग्ननौफलकें
रणवातें पडतिल हे आपज्ज्वालेंत तूलसे हलके ॥ ३० ॥
सहदेव नकुल यांशीं लढतां येतिल कुरूंस नव नाकीं
नवनाकीं यश आम्ही मिरवूं, खळ निरखु मृत्युभुवना कीं ३१

श्रीकृष्णाचा भाचा मत्सुत बाणें करील आंधारी
अश्रुस्नापिता, मलिना कलिनाशें विव्हळेल गांधारी ॥ ३२ ॥
धृष्टद्युम्नविराटद्रुपद असे वीरवर असामान्य
आम्हां सहाय असतां, कौरव कां म्हणति रण असा मान्य ३३
छेदुनि कुसंग शस्त्रें आधार विचार सारबंधाचा
रणकंटकीं वमविता पद साजे सार्थ पुत्र अंधाचा ॥ ३४ ॥
समरोद्भट सात्यकिला वज्रधनुष्पाणि-वृष्णिकुलतिलका
बघुनी, न कौरवांचे नामांकित वीरहीर उलतिल कां? ॥ ३५ ॥
त्रिजगन्मोहन झाडी जो दैत्यांचा सलील दृढ माजा
राजा विश्वगणाचा, मधुसूदन, सांवळा सखा माजा ॥ ३६ ॥
शिशुपालकंसहंता जो उखळीं सकळखळबळाहंता
विश्वभवस्थित्यंता करितां ज्या भजकप्रीति अत्यंता ॥ ३७ ॥
स्वभजकरक्षण-लक्षण-दक्ष जरी जो धरी न हातेरा
हातें राखी सुष्टा, दुष्टा करुनी दवांत पातेरा ॥ ३८ ॥
कंदर्पकोटि सुंदर, कुंदरदन, वदन सदन तेजाचें
ते ज्याचे रविसोमा संतत अकलंक भासतें ज्याचें ॥ ३९ ॥
तो लक्ष्मीपति ज्यावर शोभे वाग्दार आकळोन करें
ज्यानें बळजळधीला ढवळावें चपळगति जसें मकरें ॥ ४० ॥
शशिबिंबाचा सोलिव गाभा कीं धवल शैल कैलास
कीं शंकरहास्य, तसे हय ज्याचे विलसतात सविलास ॥४१॥
बघतां दृष्टि न ठरते भ्रमतां जो चपळ दामिनीमानें
ज्या जाणावें केवळ चक्रकृतगभीरधीरनादानें ॥ ४२ ॥
ऐशा विजयरथाच्या नीडीं मांडून अचळसें ठाण
या गांडीवें खरतर सरतर सोडीन दाहकर बाण ॥ ४३ ॥

गर-घर-वर-से परहर शर पुरविति, हीन जे क्षयें, भाते
सणसणसण सण सुटतां करितिल विच्छिन्न नरहयेभातें ॥४४॥
हृदयीं घुसतां नेटें विशिख, जसें वारुळांत कालाही
काय कुरुकथा तेथें? चळचळ येईल कांप कालाही! ॥ ४५ ॥
जा, साग आंधळयाला, 'आवर सुत' तद्विनाश ठाके वा!
साधूपुढें न दे या मिरवूं पुण्याविना शठा केवा ॥ ४६ ॥
लोभाला लोभ, तसा क्षोभाला क्षोभ देतसों आम्ही
सामीं सुख न जयाला, त्याला भेटों सुखेंचि संग्रामीं ॥ ४७ ॥
जो कल्पवृक्षमूळीं बसुनी इच्छिल चढावया शूळीं
तो आत्मसौख्यतूळीं अग्नी ओतुन करील रांगूळी ॥ ४८ ॥
ये, ये, अंधसुता! ये होमाया आत्म नवनवति भाऊ
अंधा गांधारीला सुतशोकाचा बरा भरिंव खाऊ ॥ ४९ ॥
भीष्मद्रोणामरतरु विटवुनि, ज्या हंत! सभ्रम भ्रमरें
समरविषम-विषकुसुमीं या केली झेंप, तो न काय मरे?॥५०॥'

**बा. अ. भिडे**

## ३९ आंबा आणि बाभूळ.

श्लोक ( पृथ्वी. )

आम्रउवाच–वदे सहज आम्र तो विनयभाषणीं बाभुळा
गड्या तुजविना नसे मजसि मित्र तो आगळा
म्हणूनि वद सत्य गा वच मदीय मिथ्या असे
किती असति भूवरी कुजन, दुष्ट या ते कसे ॥ १ ॥
मला स्मरत ना कधीं दुखविलें कुणाला कसें
असें असुनि लोक हे मजसि दुःख देती असें

नसे शरम त्यां कशी नच दया तयां अंतरीं
मला नवल वाटतें बघुनि लोकरीती खरी ॥ २ ॥
मला मधुरशीं फळें बहुत येति हें पातक
असे मम खरोखरी; म्हणुनि होति तीं घातक
असें अहित कोणतें ममकरीं जनांचें खरें
सख्या त्वरित सांग तूं उघड जाहलें कीं बरें ॥३॥
फळें मधुर हीं अशीं प्रभुवरें कशाला दिलीं
मनीं गमत जीं मला सतत दुःखदायी भलीं
यदर्थ मज होतसे बहुत खेद तो मानसीं
म्हणूनि मजला नको फुकट हीं अशीं गोडशीं ॥४॥
नको विफल थोरवी मजसि ती जगीं या पहा
लहान बहु थोरही सतत दुःख देती महा
जगीं स्थिति बघूनियां खचित जीव हा त्रासला
म्हणूनि वदतों खरें सुख न लाभतें कीं मला ॥ ५ ॥
मला रुचिर मंजरी प्रकटतां करें छेदिती
फळें तसिच लागतां दगड मारुनी पाडिती
स्वचित्त रमवावया मजसि लोक हे तोडिती
खुडूनि नव पल्लवा विफल जाण कीं पीडिती ॥ ६ ॥
बाभूळः–असें वचन ऐकुनी कथि तयास बाभूळ,रे
मला खचित वाटतें तुजशि लागलें खूळ रे
सकोप मन तूं नको करुं धरीं मनीं शांतता
करूनि सुविचार रे परिस मद्वचातें अतां ॥ ७ ॥
फळें मधुरशीं तशी सुखद थंड छाया वनीं
दुरूनि तुज पाहतां सकल येति कीं धावुनी

बळी असासि द्यावया म्हणुनि बैसती आश्रया
तुझ्याजवळि सर्वही इतर वृक्ष सोडूनियां ॥ ८ ॥
जरी सतत मारिती निजकरंचि पाषाण ते
तया स्वहितता बळें .व पदीं पहा आणिते
म्हणूनि अवघ्या जना विफल जाण शापूं नको
गमे न तुज ही स्थिती सुखद? वीट मानूं नको ॥९॥
पिकद्विज तझ्या शिरावरिं सुखें सदा बैसती
तसे मधुप हे फुलातिल सुधारसा सेविती
सदा स्वमनिं हर्षती श्रवुनि येति जे पाथिक
मुखें सतत गाति ते निजपथीं तुझें कौतुक ॥ १० ॥
वसे सतत मी जरी रुचिर राजमार्गावरी
कधीं न जन येति ते क्षणभरी बसाया तरी
मम स्थिति बघूनिया तुज गमे खरी का बरी
दिल्या स्थितिंत तूं रहा मुदित होउनी स्वांतरीं ११
परोपकृति ही तुझ्या करिं न यत्न होतां घडे
तयात सहजीं तुला सुफल पुण्य मोठें जडे
" शिळेस नच येइ कीं सहन घाव कल्पाविना
प्रभुत्व; " गमतें न कां? वचन सत्य हें त्वन्मना १२

काणेण.

## ४० आश्रम.

गेलों मी सहजीं मनोरम अशा एके दिनीं काननीं
पाहूनी विधिची विचित्र करणी साश्चर्य झालों मनीं
तेथें जे मजला विचार सुचले ते येथ वर्णावया
द्यावी सन्मति ईश्वर म्हणुनिया प्रार्थीतसे मी तया ॥ १ ॥

विश्रांतिस्तव बैसलों क्षणभरी गंगातटीं मी वनीं
धालों पाहुनि सृष्टिवैभव खरें नानाप्रकारें मनीं
वर्णू मंदमती अगाध हरिची लीला मुखानें किती
अर्वाचीन तसे पुरातन कवी जी वर्णितां भागती ॥ २ ॥

झाडी तिथें विविध रम्य दिसे तटाकीं
जी झांकुनी तपन दीप्तिस नित्य टाकी
कोकील चाष शिखि त्यावरि मत्त रावे
बैसूनि गान करिती सुखद स्वभावें ॥ ३ ॥

ऐशा रम्य वनीं पुरातन असा मी पाहिला आश्रम
देई सौख्य मला हरूनि बरवें तो तेथ माझा श्रम
गेलों आंत सकाम मी नमियलें प्रेमें मुनीला तदा
जो ध्यानस्थ पवित्र ईशभजनीं राहे सदा सर्वदा ॥ ४ ॥
शिष्यांचा बहु वेदघोष बरवा जो तेथ मी ऐकिला
तेणें पावन जाहलों म्हणुनियां संतोषही वाटला
अभ्यासादिक पाठ सारुनि नदी-तीरासि माध्यान्हिं ते
आले सर्व सुशिष्य मेळवुनियां साहित्य जें योग्य तें ॥ ५ ॥
स्नानालागिं नदींत ते उतरले घाटावरूनी किती
गेले पोहत ते जलांत सुसरी मच्छापरी भासती
लाटा येति शिरीं जरी तरि तयां लोटोनियां चालले
धैर्यानें; परतीरिं जाउनि कसे मोदें उभे राहिले ॥ ६ ॥
लावूनी पण पोहती पुनरपी ते एकमेकांत कीं
जातां एक पुढें तया धरुनिया होती पुढें हस्तकीं
ऐसें क्रीडति जों जलांत दिसला नक्रेंद्र तैं भीषण
तों त्यातें बघतांच ते परतले व्हाया स्वसंरक्षण ॥ ७ ॥

जटामुकुट बांधुनी कटि कसूनियां मेखला
विलेपन करूनियां धवल भस्म आंगीं, टिळा
ललाटपटिं लावुनि स्फटिक हार कंठांतरीं
करें सकल घालिती बघुनि मोद हो अंतरीं ॥ ८ ॥
संध्याकर्म करूनियां पुनरपी ते आश्रमीं पातले
वेदाभ्यास करावया स्वगुरुतें वंदूनियां लागले
त्यांतें सोडुनियां चमत्कृति पहायासी पुढें चाललों
तेथें तापसि-संघ देखुनि हृदीं आनंद मी पावलों ॥ ९ ॥
कोणी तापसि राहिले तरुतळीं एक्याच पायावरी
कोणी हस्त तपार्थ उंच धरिती घेऊनि माळा करीं
कोणी टांगुनि घेति थोर तरुच्या स्कंधीं धुम्या लावुनी
कोणी कष्टविती सुखें स्वतनुतें पंचाग्नितें साधुनी ॥ १० ॥
कोणी कोमलपल्लवाशन कुणी वायू मुखें भक्षिती
कोणी राहति धूम्रपान करुनी कोणी फळें सेविती
कोणी झांकुनि नेत्र बसति सुखें ध्यानस्थ दर्भासनीं
कोणी प्रार्थिति भक्तिनें प्रभुपदीं उद्धार व्हाया जनीं ॥ ११ ॥

काणिण.

## ४१ साऱ्या जगांत फुलेंच फुलें.

शार्दूल वि०:—आकाशांत फुलें ! धरेवर फुलें ! वाऱ्यावरीही फुलें !
माझ्या गेहिं फुलें ! मनांतहि फुलें ! भूगर्भि सारीं फुलें !
माझें चित्त भुले सुगंधित भलें हें विश्व हो जाहलें
कोणाला कळलें किती पसरलें उद्यान हें शोभलें ! ॥ १ ॥
नक्षत्रें, सुमनें, विहंगम, मुलें, काव्यें, मणी हीं जरी
नांवें भिन्न, तरी फुलें सकल हीं रूपें निराळीं तरी

घेतों ह्यांतुन थोडका रस पुन्हा त्याच्याकडे धावतों
देवाला स्तवितों सदा भ्रमर मी पुष्पांमधें राहतों ॥ २ ॥
जातीच्या भ्रमरास " सोडुन फुलें ये फांड हीं लांकडें "
ऐसें कोण म्हणेल, कोण भलतें घालील हें सांकडें!
देवानें जयास पुष्पहृदयीं खेळावया निर्मिलें!
त्याला अन्य कृती रुचेल कुठुनी प्राणा जरी घेतलें! ॥३॥
बोला " चंचल, हा क्षणांत गगनीं धावे क्षणें भूवरी
ठायीं एक कदापि हा न वसतो, ही वृत्ति नाहीं बरी ! "
हासा मानुनियां निरर्थ मम हो ह्या गोड गुंजारवा
विश्वेशा स्मरुनी फुलांत रमतों, भीतों न मी मानवा ! ४

द्रुतविलंबितः फुलवितो अवघ्याच जगाप्रती
मज गमे मजसाठिं जगत्पती
मजसमान रसज्ञ नसे कवी
भ्रमर मी रस चाखुन सांठवीं ॥ ५ ॥

दोधकः—जाइन सोडुन ह्या जगताला
ठेवुन हा मधुकोश तुम्हांला
दिव्य मला भ्रमरा सुविलोला
स्वर्गिं मिळेल नवी सुममाला

ना. वा टिळक.

## ४७ मेषपेषण.

अनु०—वातापि इल्वल असे होते दैत्य निशाचर
मुनिवृंदांस पीडाया सदा ते सिद्ध सोदर ॥ १ ॥
तच्छरीरस्थ सामर्थ्य सत्य सर्पमुखीं गर
साधुपीडाफल बहु अधमाचें खरोखर ॥ २ ॥

तपश्चर्यारत असा साधू त्यांस न पाहवे
मृत्तिकेचा कण जसा लोचनांस न साहवे ॥ ३ ॥
क्षिप्रभूमिसे दंडाया लाविजे बल तें बल
बल तें न प्रशंसार्ह करी जें साधुचा छळ ॥ ४ ॥
ह्या दैत्यांचें बल सदा पीडादायक सज्जना
न तें वंद्य न तें स्तुत्य न योग्य अभिवादना ॥ ५ ॥
दंडकाननिं हे दोघे राहिले दैत्य दुष्टधी
मुनींतें छद्मयोगें ते लोटिती व्यसनामधीं ॥ ६ ॥
धरोनी द्विजरूपातें वदे संस्कृत इल्वल
विविधच्छद्मयोगानें करी तो ब्राह्मणच्छळ ॥ ७ ॥
श्रद्धाकर्मनिमित्तानें आमंत्री द्विज इल्वल
वातापी मेषरूपातें धरी मायाबल खल ॥ ८ ॥
हा मेष इल्वल चिरी, करी आस्वाद्य वन्हिनें
आघ्राण सुखदायी तो द्विजा वाढावयासि ने ॥ ९ ॥
मेष हा मिष्ट भक्षोनी तृप्तिते द्विज पावती
परंतु नकळे घोर परिणाम तयांप्रती ॥ १० ॥
द्विजांच्या उदरीं खाद्य हें गेल्यावरि इल्वल
सोदरासि समाव्हान करी " बाहेर ये चल ॥ ११ ॥
वातापे! निजरूपानें ये बाहेर सहोदरा!
द्विजोदर निवासातें सोडीं गा! ये करीं त्वरा " ॥ १२ ॥
ऐकतां हें समाव्हान निजरूप धरी खल
फाडी द्विजोदर न जों लागावा एकही पल ॥ १३ ॥
करोनी कपटें ऐशीं वातापील्वल पापधी
पीडिती सर्वदा विप्र दंडकाविपिनामधीं ॥ १४ ॥

घोरें हीं अतिघोरें हीं दैत्यकृत्यें खरोखर
आश्रमीं आश्रमीं झाला हाहाकार भयंकर ॥ १५ ॥
ह्या दैत्यांच्या कुकर्मांनीं वन उध्वस्त जाहलें
" हाय हाय " असा नित्य विलाप करिती भले ॥ १६ ॥
बहु वर्षें क्रम असा चालला ह्या वनामधीं
गांजले पीडले भारी दंडकावनिं पुण्यधी ॥ १७ ॥
देवही जाहले त्रस्त दैत्यताप न थांबला
उपाय न सुचे त्यांना वारावें केविं तद्धला ॥ १८ ॥
गेले शरण ते देव अगस्त्य ऋषिला तदा
कर जोडोनि वदले " वारीं ह्या जगदापदा ॥ १९ ॥
मान्य केली अगस्त्यानें तेधवां देवयाचना
बोलला " मी पुरवितों तुमची शीघ्र कामना " ॥ २० ॥
निरोप मुनिनें देतां गेले देव निजालया
दैत्यद्वय मरे आतां म्हणोनी हर्ष हो तयां ॥ २१ ॥
स्थविरद्विजरूपातें अगस्त्यें धरिलें तदा
यष्टि घेवोनियां गेला हळू टाकित तो पदा ॥ २२ ॥
इल्वलें मुनिचें केलें व्याजस्वागत तेधवां
बाहिलें भोजना त्यातें प्रेमा दावोनियां नवा ॥ २३ ॥
भोजनामंत्रण तिथें स्वीकारी मुनि निर्भय
हर्षला इल्वल अती, वातापीहि दुराशय ॥ २४ ॥
त्यांसि तेथें बसवुनी दैत्य गेले महानसीं
कराया पाकनिष्पत्ति हर्ष पावोनि मानसीं ॥ २५ ॥
मायानिपुण तो दैत्य वातापी मेष जाहला
कळला न तदा भावी परिणाम तया खला ॥ २६ ॥

पचतां एक दुष्कर्म दुजें मूढ करावया
सिद्ध होतो असें नित्य पाहतोंच जगांत या ॥ २७ ॥
एक दुष्कृत्य पचतां दुसरेंही पचेलसें
मूर्खाला वाटतें, त्याच्या विवेक हृदयीं नसे ॥ २८ ॥
दुष्कर्मसिद्धि दुष्टाला उत्तेजित करीतसे
आज्यधारा कृशानूला प्रवातीं बळ देतसे ॥ २९ ॥
लाभार्थ वा विनोदार्थ पापें खळ करीतसे
धरोनि ऐसा क्रम तो परिणामीं सदा फसे ॥ ३० ॥
शांतवृत्ति प्रजा सोशी किंप्रभूचा महाच्छल
परि ता दंड्य दंडातें पावतो शेवटीं खल ॥ ३१ ॥
असो हा विस्तर पुरे, चिरिला मेष इल्वलें
शिजवोनि अगस्त्यातें खाद्य तें अर्पिलें खलें ॥ ३२ ॥
भक्षितां खाद्य मुनि हा " सुसंपन्न " असें वदे
" तृप्तोस्मि" हा शब्द त्याचा इल्वला बहु तोष दे ॥ ३३ ॥
मग हर्षसमाविष्ट इल्वलें त्या दुराशयें ।
वातापि बाहिला " ये रे ! शीघ्र बाहेर शीघ्र ये ! ॥ ३४ ॥
मेषरूपासि सोडोनी, जोडोनी निजविग्रहा
फोडोनि ऋषिचा देह ये, आंत न मरुया ! रहा " ॥ ३५ ॥
अगस्त्य तेधवां मंद करोनी स्मित बोलिला
" तुझा भ्राता जिरविला उदरें मम इल्वला ! ॥ ३६ ॥
दैत्यता वा मेषता वा मुकला तव सोदर
पावला पंचता मात्र मरणार्ह खरोखर ॥ ३७ ॥
मेषपेषण म्यां केलें, मेषता नष्ट जाहली
निःशेष म्यां जिरविली तच्छरीरकणावली ॥ ३८ ॥

गांजी विप्रास जो मर्त्य तो पावे नित्य हे स्थिती
आम्हेरिती तया साधु, न तया बहु मानिती ॥ ३९ ॥
तुमचें छद्म मी जाणं, शठ दोघे तुम्ही खरे
माझ्यापुढें परि कसें तुमचें शाठ्य तें ठरे ॥ ४० ॥
तुम्ही कांच हिरा मीही, तुम्ही पर्वत मी वट
दोघे मतंगज तुम्ही, मी मृगाधिप उत्सट ॥ ४१ ॥
महाशठा मज कसे फसवाल तुम्ही शठ?
मृगेंद्राच्या पुढें कैसा कलभांचा टिके हट! ॥ ४२ ॥
शब्द हे ऐकतां धांवे अगस्त्यावरि इल्वल
परि त्यासि मुनिश्रेष्ठें जगों नच दिलें पल ॥ ४३ ॥
नेत्रवन्हिबलें दैत्या जळी तो मुनिनायक
पुरांतकें जसा पूर्वी जाळिला पंचसायक ॥ ४४ ॥
दैत्यनाशें हरपल्या मुनींच्या घोर आपदा
दंडकारण्य ह्यायोगें योग्य वासास हो तदा ॥ ४५ ॥
वातापील्वलनाशातें बघतां देव हर्षले
कल्पपुष्पसुगंधाढ्य जलातें मेघ वर्षले ॥ ४६ ॥
जिकडे तिकडे झाला तदा आनंद निर्भर
सर्वांचीं दिसलीं वक्त्रें फुल्लपद्मविकस्वर ॥ ४७ ॥
मुनिपीडा जयां गोड पहाया वा करावया
पळाले सर्व ते नीच राहिले न वनांत या ॥ ४८ ॥
दैत्यांच्या निधनें झालें दंडकावन निर्भय
स्वाश्रमीं राहते झाले सुखें मुनि महाशय ॥ ४९ ॥
शार्दूल वि.-पीडादायक यत्पराक्रम असे तो दंड्य होतो नर
हा जो इल्वलवृत्त बोध करि, तो पावो जनीं आदर

साधुक्लेश सरो, सुखें जग भरो, हो प्रेम वृद्धिंगत
हा विद्याधरही उमात्मजकवी लाहो शमा संतत ॥१०॥

विं. वा. भिडे.

४३ जरठविलास.

मालिनी.:—धनुसम बहु झाली वक्र ही देहयष्टी
मुखरस बहु ओष्ठीं, जाहली मंद दृष्टी
परि नर अविवेकी मी; कमा दंग रंगां
वरियलि नव-वर्षा बालिका कामलांगी ॥ १ ॥
सकल मम मनीषापूरिका कल्पवल्ली
मज विधिबलयागें आज संप्राप्त झाली
म्हणुनि भरुनि राहे हर्ष देहा विवाहां
क्षणिकचि सुख देवीं भोगग अल्प नाहीं ॥ २ ॥
असित अलक केले लावुनीयां कलाप
मधुनिमधुनि गानीं थोर घेतों अलाप
तरि मज रमणी ती ना विलोकी हंसून
सतत वदन-पद्मीं म्लानता ये दिसून ॥ ३ ॥
नवि नव दिवसांची नावरीही अजाण
म्हणुनिच अजवरीं राहिलां स्तब्ध जाण
परि अजुनि न सोडी प्रेमदृक्पात बाण
क्षुभित मि बहु त्यांचा, ना उर देहभान ॥ ४ ॥
निरखुनि रुचिरांगीं स्पष्ट तारुण्यचिन्हें
कहर मम शरीरीं मांडिला मन्मथानें
तदुपशमनकार्यालागिं जातां समीर
गुरु गुरु करि रागें! मालची सौख्यशेष ॥ ५ ॥

मधुतर फलभारें भारली वल्लिका ती
फुलवि कुमुदिनी ते यौवनादित्यकांती
बहर विफल जातो, मी असोनी सुभोक्ता
अहह! रमणि होई आत्मछंदप्रसक्ता ॥ ६ ॥
बहुविध कनकांच्या लेवुनी भूषणातें
चमकत चपला तें रूप दावी जनातें
रुळति उरजभागीं मुक्तमाला विशाल
परि निज न रुचे ही जीर्णसौभाग्यशाल ॥ ७ ॥
अहिमणिसम सारें व्यर्थ लावण्य भासे
व्यथितचि हृदयीं मी सर्वकाळीं निराशें
मुदितहृदय जावें प्रेमकेली कराया
प्रकुपित झिडकारी, त्याज्य मानी मला या ॥ ८ ॥
अमुप रस असोनी सारसीं अ फुल्लां
परि नच मधुपांच्या बिंदुही तो कपाळीं
तशि गत हतदैवें जाहली, ना उपाय
करुनि सुखनिधाना, भोगितों दुःख हाय! ॥ ९ ॥
स्मितमुख निजछंदें लुब्ध गानांत झाली
गलितवसन बैसे एकली सौधजालीं
बघुनि समय, जातां प्रेमसंवादनार्थ
भ्रुकुटि चढवुनीयां नष्ट होई क्षणांत ॥ १० ॥
अवचट करपाशीं बद्ध केव्हां करोनी
मृदुतर मम अंकीं बैसवीतां धरोनी
स्थित पळहि न राहे, स्वस्थचित्तें रमेना
सतत वनविहारी पंजरीं जेंवि मैना ॥ ११ ॥

नकळत पद मंदें टाकुनी पार्श्वभागीं
अधर सुरसपानीं पातलों मी अभागी
मुरकवि मुख वेगें, चंचला मानिनी ती
हर हर! रमणींनो! योग्य ही काय नीती? ॥ १२ ॥
घडिघडि अवमानीं, यापरी नित्य धामीं
म्हणुनि सहज हेतू शोधिला एकदा मीं
उघड कळुनि आला दोष माझ्याच माथीं
विफल नडविली म्यां मर्कटें मोहना ती! ॥ १३ ॥
अवयव मम सारे हीन तेजें मलीन
रमणिय सखिगात्रें होय वारीज लीन
विपरित बहु केलें, पाप हें काय सानें?
रुचिर कुसुममाला सेविली वायसानें! ॥ १४ ॥
अतितर सुकुमारा, यौवनें पूर्ण बाला,
तरुणचि निज साजे, चंद्र जैसा नभाला
जरठ खुरटहस्तीं अर्पितां कोमलांगी
अहह! दहन केलें मालती वल्लिलागीं ॥ १५ ॥
प्रबल बहु दुरेच्छा मानसीं होय नीचा
म्हणुनि अधिर झालों सेवनीं मोहिनीच्या
अनुसरुनि कुबुद्धा नाडिली बालयोषा
उघडचि मग कैशी पूर्ण व्हावी मनीषा ॥ १६ ॥
तळमळ जलहीना दीन मीनासमान
करुनि विफल आतां अर्थ वाटे मला न
तरुण युवतिहत्या पाप हें साच वाटे
कधितरि विभु आतां लाविशी स्वर्गवाटे? ॥ १७ ॥

सुकताचि मम आतां चालला जीवितौघ
छळिति सतत देहा तो[illegible]ता दुष्ट रोग
पुढतिच दिसताहे काल विक्राल चिन्हीं
अहह! करिल भार्या दग्ध वैधव्यवन्हीं ॥ १८ ॥
मदनुभव पहा हा वृद्ध हा जांबुवंत!
खचितचि समयीं या योग्य संन्यासपंथ!
त्यजुनि सकल कांता-संमृती मोहपाश
सतत भजत जावें ईश विश्वाधिपास ॥ १९ ॥

बा. ल. जोशी.

## ४४ मूर्तिकार.

दिंड्या—दृष्टि फेंकित आपुली सभोंवार
फिरत असतां स्वच्छंद मूर्तिकार
शिला दिसली मार्गांत भव्य त्याला
बघुनि तीतें थांबला मुग्ध झाला ॥ १ ॥
काय द्यावा आकार त्या शिळेला
विचारीं या तो कुशल मग्न झाला
मनीं आकृति काढूनि कल्पनेनें
करी सुस्थिर ती शांत चिंतनानें ॥ २ ॥
करीं एकया टांकीस धरुनि वेगें
शिळेवर तो आघात करूं लागे
स्वकर्तव्यीं संलग्नचित्त होत
इतर सारें विसरला वस्तुजात ॥ ३ ॥
करायाचें ज्या असे महत्कार्य
वचन त्यानें हें सदा शिरोधार्य

जरी उत्तम वाटतें कार्य व्हावें
स्वकार्यातें सर्वस्व तयें द्यावें ॥ ४ ॥
शिलेवर जे हळहळू होत घाव
दिसूं लागे सत्वरी तत्प्रभाव
रूप पूर्वींचें जाउनी लयाला
शिला लागे साकार दिसायाला ॥ ५ ॥
दूर सारे जें कृष्णमेघ होती
रम्य तारे चमकती नभःप्रांतीं
शिलाशकलें त्यापरी निघुनि गेलीं
सुभग सत्वर बाहेर मूर्ति आली ॥ ६ ॥
मूर्तिकारें काढिली शिलेंतूनी
मूर्ति सुंदर संपन्न अवयवांनीं
तीस पाहुनि कृतकृत्य मनीं झाला
हर्षरंगीं नाचला! गृहा गेला ॥ ७ ॥
सफल होतां सयत्न मानवाचे
मूढ जन जो नच हर्षभरें नाचे
शीण त्याचा सकलही लया जाई
कार्य करण्या सामर्थ्य नवें येई ॥ ८ ॥
त्याच ठायीं मग भक्त एक आला
मूर्ति पाहुनि आनंद तया झाला
रम्य देवालय एक रचुनि तेथें
मूर्ति नेउनि ठाविली तयें हातें ॥ ९ ॥
शिला पूर्वीं जी एक रूपहीन
तीस देऊं लागले लोक मान

विजन होती जी भूमि एककालीं
तीच पुण्यक्षेत्रभू पुढें झाली! ॥ १० ॥
क्षुद्र दगडा देवत्व द्यावयातें
असे मनुजा! सामर्थ्य तुझें साचें!
कसा दीनाहुनि दीन असा होसी?
मूर्तिकाराचा कां न धडा घेसी? ॥ ११ ॥
तुझ्या मार्गीं जे दगड आड येती
घाव त्यांवर आपुल्या घाल हातीं
काढ त्यांतुनि रमणीय दिव्य मूर्ति!
करिल मग ती तव सर्व कामपूर्ति! ॥ १२ ॥

'माधवानुज.'

## ४५ शिबिसौहार्द.

मणिबंध—श्रीशिबिरायाची सुकथा
ऐकियली द्यावील पथा
संमृतिखेदानें रहिता
नंदनसौख्यानें सहिता ॥ १ ॥

वंशस्थ—उशीनराचें यश यज्ञसंभव
स्थिरत्वनाचें परिसोनि वासव
अमर्षमात्सर्यविनष्टसन्मती
म्हणे 'असे कां भुवि भूप जन्मती ॥ २ ॥
धरोनि मत्कीर्त्यपहारहेतुतें
करोनि हे भूपति सप्ततंतुतें
पदासि पावू बघताति मामक
म्हणोनि होती मम शांतिशामक ॥ ३ ॥

यशा मदीया शिबि तो हरावया
पदच्युताही मजला करावया
करी प्रयत्ना; म्हणुनी कलंकित
करीन मी तद्यश आजि निश्चित " ॥ ४ ॥
म्हणोनि तो श्येन-तनूसि घेउनी
कपोत-काया अनलासि देउनी
त्वरें निघाला शिबिच्या पुराकडे
गती तदीया न नभोंतरी अडे ॥ ५ ॥
कपोतकायाधर वान्हि ये जवें
बसे नृपाच्या करिं; त्यासि वासवें—
धरावयाला बहु वेंचिलें बल
तदीय झाला परि यत्न निष्फल ॥ ६ ॥
नृपें कपोतासि करींच राखिलें
खगेश्वरें त्यासि तदा न भक्षिलें
शरण्य लाभे स्थिरबुद्धि जेधवां
शके न देऊं रिपु कष्ट तेधवां ॥ ७ ॥
कपोत भूपा प्रणती करूनियां
मनुष्यवाचा मधुरा धरोनियां
वदे असें तो खग कोमलाकृती—
" शरण्य तूं रक्षुनि हा मला कृती ॥ ८ ॥
धरावयाला मजला नृपोत्तमा
उशीनरा! श्येन करी सुमद्यमा
प्रयत्न त्याचाचि मदंगभक्षणीं
समर्थ राया! मम तूंचि रक्षणीं ॥ ९ ॥

समग्र भूतांसि शरण्य तूं नृपा
न अन्य रक्षी मजला करीं कृपा
मला हताशा जरि सोडिशी खगा
कलंक तूं क्षत्रकुला खरा अगा" ॥ १० ॥
नृपाळ बोले कुरवाळुनी तया
" प्रशांत हो, सोडि खगा! भयास या
न मी खगा! प्राणविहीन जोंवरी
तुला नसे अल्पहि भीति तोंवरी" ॥ ११ ॥
नृपोत्तमाश्वासन तोषवी तया—
कपोतका, सोडियलें तयें भया
शरण्य रक्षापटु लाभतां जना
अणूहि दे क्लेश न भीति तन्मना ॥ १२ ॥
शशादना तो शिबि यापरी वदे
" कपोत हा सोड, अशीच जोड दे
असुप्रदाता त्रिदिवासि लाहतो
सुरत्व पावूनि सुरांत राहतो ॥ १३ ॥
कपोत निर्मंतु, सुकोमलांग हा
भयें कसा कापतसे करीं, पहा
कसा खगा! कोपविलासि तूं तयें
अमंतु जंतूसि तुवां वधू नये' ॥ १४ ॥
उशीनरोक्ती परिसोनि यापरी
खगेंद्र कोपें खवळे निजांतरीं
धरोनियां कोपज-कर्कशस्वरा
अशा वदे तो वचना उशीनरा ॥ १५ ॥

" न योग्य तूं राजपदासि भूपते
न जाणसी धर्म अधर्म दुर्मते
कपोतरक्षा करिशील तूं जरी
मरेन भक्ष्याविण शीघ्र मी तरी ॥ १६ ॥
निसर्गसंस्थापित भक्ष्य मामक
हरोनि होशी मज मृत्युदायक
करोनि हे साधु-विगर्हिता कृती
शिबे ! न होशील कधींहि तूं कृती ॥ १७ ॥
वधें मदीयें तुज घोर पातक
शिवेल; तें होइल कीर्तिघातक
कपोत दे; मामक अन्न पाखि तो
इथेंचि आतांचि तयासि भक्षितों ॥ १८ ॥
शशादनाच्या वचनासि ऐकतां
नृपाल कर्तव्यविमूढ तत्वता
कपोतदृष्ट्याकुल मानसें वदे
" खगेश्वरा ! ह्याप्रति जीवदान दे ॥ १९ ॥
कपोतका मी शरणागता कसा
त्यजूनि होऊं विहगा ! कृतांतसा
' शरण्य जो भूपति, तोचि भूपती ! '
असेंचि सारे वदताति सन्मती " ॥ २० ॥
नृपोक्ति आकर्णुनि फार कोपला
खगेश तो; तच्छम सर्व लोपला
कपोतरक्षाकरणोत्सुका नृपा
वदे " तुझी निंद्यतमा असे कृपा ॥ २१ ॥

नृपालधर्मे शरणागतावन
सुयोग्य ऐसेंचि म्हणेल सज्जन
मदंत हा किंतु मदन्नरोधनें
तुवां करावा न नृपा ! यशोधनें ॥ २२ ॥
न कृत्य हें धर्मविरुद्ध भूपते
तुवां करावें; बुधनिंद्यरूप तें
शिबे ! न नैराश्यकरी गिरा वदें
कपोत माझा मज खावयास दें ॥ २३ ॥
शरण्य अस्वर्थ असूंसि लोपवी
नृपाल तो धर्मनयासि कोपवी
कपोतकाचे असु रक्षिसी जरी
मदीय तूं लोपविशी असु तरी ॥ २४ ॥
विरुद्धधर्माकुल मार्ग हा यदा
अधर्म अल्पाग्रचि सेव्य हो तदा
सुतत्व हें सांगति धर्म जाणते
उशीनरा ! तत्व मनांत आण तें ॥ २५ ॥
प्रिया मदीया गदाविह्वला असे
सदैव ती नीडगृहामधें वसे
न पुत्र उद्भिन्नपतत्र जाहले
अजूनि; उड्डानबला न लाहले ॥ २६ ॥
मदन्य रक्षाकर लोकपालका
नसे प्रियेला, अथवा न बालकां
मदंत होतांचि तदंत निश्चित
कपोत दे, कारि आमुचें हित ॥ २७ ॥

न हा कुटुंबी मजसा कपोतक
तदंत होईल न अन्यघातक
मदंत होईल कुटुंबघातक
करूं नको हें बहुमृत्युपातक " ॥ २८ ॥
शशादनोक्ती परिसोनि भूपती
अशा गिरेतें वदला तयाप्रती—
" अभीष्ट तें माग शकुंतनायका
समर्पितों वर्जुनि या कपोतका ॥ २९ ॥
मृगा, लुलाया, खगनाथ ! गोवृषा,
किरी समर्पीन तुला, न हें मृषा
तदामिषानें शमवीं निजा क्षुधा
तदामिष स्वादु गमो तुला बुधा " ॥ ३० ॥
वचासि ह्या ऐकुनि तो शशादन
" वदे न पावेल मदीय हें मन
शमासि भक्षूनि लुलाय, पुंगव
वराह वा; दे मज ते न यास्तव ॥ ३१ ॥
कपोत रक्षार्ह गमे तुला जरी
उपाय हा एकचि सांगतों तरी
कपोतकायापरिमाणतोलिता
निजामिषा दे, करिं मामका हिता ॥ ३२ ॥
निजामिषालागिं कपोततोलिता
करीं, मला देउनि मामका हिता
क्षुधा मदीया स्वपलें शिबे ! हरीं
सुकृत्य सद्भूपति योग्य हें करीं ॥ ३३ ॥

वचासि ह्या ऐकुनि भूप हर्षला
तदा तपांतीं जणुं मेघ वर्षला
प्रभूततोयप्रद चातका तया
शके न मी हर्ष तदीय गावया ॥ ३४ ॥
शिबी म्हणे " हा गणितों अनुग्रह
शशादना! थोर; मदीय विग्रह
विदारुनी देइन मांस मामक
तुलेंत हा घालुनियां कपोतक " ॥ ३५ ॥
निदेश तो देउनि सेवकांप्रती
तदा त्वरें आणवि मेदिनीपती
सुतीक्ष्णधारा छुरिका, दयाघन
अशांत वा खिन्न न होय तन्मन ॥ ३६ ॥
कपोत घालोनि तुलेंत तोलिला
सहिष्णु भूपें निजकाय सोलिला
क्रमाक्रमानें पलखंड तोडिले
नृपें, तयाला धृतिनें न सोडिलें ॥ ३७ ॥
स्वपाणिनें क्रव्य कपोत तोलना
विदारिलें, सोसुनि तीव्र यातना
वदे न तो शब्द परंतु ' हाय ' हा
गमे न धैर्योच्चय थोर काय हा ॥ ३८ ॥
नृपें स्वमांसोत्कर भूरि काढिला
न किंतु तन्निश्चय जाहला ढिला
न ती नृपाची धृति वर्णवे मला
दृढा, अपूर्वा, अतुला, सुनिर्मला ॥ ३९ ॥

करस्थ, ऊरस्थ, पदस्थ काढिलें
उशीनरें मांस, तुलेंत ठाढिलें
कपोत तो किंतु उठेचिना वरी
स्वमांस भूपें बहु काढिलें तरी ॥ ४० ॥
स्वतांचि केलें निजमांस-कर्तन
नृपें; न दुःखोद्भवशंसिनर्तन
भिजे क्षितीचा तल शोणितोदकें
वदों न विद्याधर तद्धती शके ॥ ४१ ॥
कपोतकायाधर वन्हि तो वरी
उठेचिना, तो न नृपीं दया करी
तदा स्वबुक्का असिधेनुकाबळें
निवे चिरायासि करें अचंचळें ॥ ४२ ॥
जनासि हें पाहुनि भीति वाटली
परी शिबीची धृति नैव आटली
समस्त मूर्छा जन पावले तदा
विलोकितां तेथ उशीनरापदा ॥ ४३ ॥
तथापि तो घाबरला न भूपती
न सोडिलें धैर्यधनें तयाप्रती
शरण्य देतो शरणागताचिया
हिता असूही तृणसे गणोनियां ॥ ४४ ॥
तयाक्षणीं चारण सिद्ध गायनें
उशीनरस्तोत्रपरें प्रलोभनें
दिशा दहाही भरल्या सुखाचिया
भरें, भरी हें हृदया जनांचिया ॥ ४५ ॥

उशीनराच्या पडला शिरावरी
सुरद्रुपुष्पोत्कर जो मना हरी
प्रशंसिती अंबरिं अप्सरोजन
सनृत्यगानीं नृप तो यशोधन ॥ ४६ ॥
शरण्यता श्रेष्ठतमा, दृढा धृती
अदृष्टपूर्वा नयशालिनी कृती
उशीनराची बघतां पुरंदर
प्रहर्षला सांडुनियां स्वमत्सर ॥ ४७ ॥
तदा स्वरूपा धरिलें पुरंदरें
त्यजूनियां श्येन तनूप्रती त्वरें
हिरण्यरेताहि कपोतविग्रहा
त्यजी, विलोकूनि नृपालनिग्रहा ॥ ४८ ॥
उशीनरातें मग बोलला हरी
" अमर्षपारुष्य नसो त्वदंतरीं
तुला दिली मीं क्षणमात्र यातना
तुझ्या करो क्रुद्ध न ती शिबे! मना ॥ ४९ ॥
खगेंद्रकायाधर मी पुरांतक
कपोतकायाधर हाहि पावक
त्वदीयसत्वोच्चयदर्शनातुर
गृहासि आलों तव भूपते! सुर ॥ ५० ॥
भला भला रे! नृप तूं उशीनरा!
तुझा न येईल शिबे! सरी नरां
तुझेपरी तूंचि शरण्य नेतर
विवर्जिला मीं नृवरा! स्वमत्सर ॥ ५१ ॥

तुझेपरी तूंचि शिबे स्थिरव्रत
तुझेपरी नान्य, असेंचि मन्मत
अदृष्टपूर्वा धृतिही उशीनरा
भरे यशें योग्याचि तावकें धरा ॥ ५२ ॥
तुझ्या गुणा पाहुनि आजि सज्जना
प्रहर्ष झाला अतिवेल मन्मना
विनिंद्य मन्मत्सर लाजवी मला
तुझा यशोवर्धन तोचि जाहला ॥ ५३ ॥
विदीर्ण झाला तव देह आज जो
पुन्हा यथापूर्वविभाढ्य तो सजो
मनीं त्वदीयीं अणुमात्रही क्रुधा
उशीनरा ! मद्विषयीं नसो बुधा ॥ ५४ ॥
शिबे ! असो कीर्ति तुझी सनातनी
सुखोच्चय प्राज्य वसो प्रजाजनीं
सुयोग्यकालीं जलवर्षही पडो
न ईतिनीं शांतिविनाशही घडो " ॥ ५५ ॥
वदे असें तोहि शिबीसि पावक
" फलाढ्य हो अध्वर आजि तावक
तुझी प्रजारंजनकर्मदक्षता
सदा असो भो नरनाथ ! अक्षता " ॥ ५६ ॥
निलिंप गेले त्रिदिवा विचारुनी—
शिबीसि, तत्सत्कृतितेंहि पावुनी
पुरंदरक्रौर्यकृशानुसंयुती
नृपालहेमासि अपूर्व दे द्युती ॥ ५७ ॥

विलोकुनी हे जन फार हर्षला
कृपा हरीची, नयनांबु वर्षला
जनप्रहर्षध्वनिनें दिशा दहा
भरोनि गेल्या; न असत्य हर्ष हा ॥ ५८ ॥

" यशें प्रभूतें भुवनीं शिबीहुनी
न अन्य साजे " म्हणतां असें मुनी
न किंप्रभूतें मुनिवृंद वानितो
पटु प्रजेला प्रभु दुःखदायि तो ॥ ५९ ॥

उशीनराची गुणशालिनी कथा
सदा जनांच्या पुरवो मनोरथा
मलाहि ती शांत्युचिता उमासुता
करो कवीला स्थिरशांतिसंयुता ॥ ६० ॥

रचिली मिळवावया शमा
शिबिसौहार्दकथा मनोरमा
दिधली विबुधां उमात्मजें
शिरिं घेउनि तदंघ्रिनीरजें ॥ ६१ ॥

त्रि. वा. भिडे.

---

## ४६ एका पुष्पाच्या नाशावर.

मालिनीः—फिरत गमत तीरा पातलों मी नदीच्या-
हरित तृण तटाकीं वाढलें दाट तीच्या;
मृदु अति पदपातीं लागतो स्पर्श मातें,
मन कितितरि हर्षे सांगतांही न येतें ॥ १ ॥

हळुहळु अनवाणी चाललों मी पुढारा,
पवनहि अतिवेगें वाहताहे भरारा ;
सजलजलदजालें व्यापिलें व्योम सारें,
समय न कवितेला योग्य ऐसा दुजा रे. ॥ २ ॥
नजर वर करूनी चालतां रक्तवर्ण—
सुमन सहज पादें जाहलें छिन्न भिन्न !
नयन करुनि खालीं पाहतां पुष्प बोले
" अदयहृदय तूं हें कायरे हाय केलें ? " ॥ ३ ॥
विगलित सुमनाच्या पाकळ्या वेंचुनीयां
त्वरित हृदयदेशीं ठेविल्या घट्ट मी या;
कुसुम मृदु तयाचा नाश मीं व्यर्थ केला,
फिरुनि फिरुनि याचा खेद होई मनाला ! ॥ ४ ॥
परिमल पसरोनी मोद होई मनाला,
रुचिर अरुण वर्णें तोषवी लोचनाला,
रिझवित तरुणांतें कामिनी केशपाशीं—
बसुनि सुमन, त्यातें मी कसा क्रूर नाशीं ! ॥ ५ ॥
कुसुमसमचि भासे जन्म हा मानवाचा
परिमल मधु होई व्यर्थ रानांत त्याचा;
सुकुनि कुजुनि जाई योग्य कृत्यांविणें तो,
व्यसनजनिततापें दग्ध होऊनि जातो ॥ ६ ॥
तुडवुनि गुण जाती अंध कित्येक लोक,
परिमल समजोनी घ्राण घेती अनेक;
करुनि अमित पापें साधु कित्येक होती,
कितिक विमल आत्मे व्यर्थ कष्टांत येती ! ॥ ७ ॥

बघ किति जगतीं हें पाप अज्ञान नांदे,
मजसि विजन देशीं वास ईशा सदा दे
क्षितिधरतटिं कोठें वृक्षराजींत किंवा—
विमलजलनदीच्या रम्य तीरावरी वा ॥ ८ ॥

विहग मृग पशूही प्रेम देतील मातें,
सुमन तरुलताही हर्ष तैसा मनातें,
विकट वनपशूंचा घोर हुंकार कानीं,
खचित मधुर गीतासारिखा रम्य मानीं ॥ ९ ॥

उगिच बहकलों हा बोलतां जें सुचे तें,
भ्रमण करित जातां लागतें वेड मातें;
सुखकर परि आतां टाकुनी वेड देतों,
झडकरि निजदेहा येउनी शांत होतों ॥ १० ॥

**मार्गण.**

## ४७ दिवाळी.

शार्दूल वि०—विश्वेशें करुनी कृपा सकरुणें दुष्काळ दैत्यावरी
पर्जन्यास्त्र नियोजुनी पळविलीं आहेत दुःखें दुरी
आतां मंगल पातले दिवसही दीपोत्सवाचे भले
गाणें सुस्वर पाहिजे तर तुवां हे शारदे गाइलें ॥ १ ॥

दीनें ज्यांविण वाटतात सुदिनें साऱ्याहि वर्षांतलीं
नांवानें जरि दुर्दिनें सुखद जीं होतीं पुढें चांगलीं
तीं येउनि बरींच, वृष्टि करुनी त्यांहीं दिली भूवरी
तेणें सांप्रत पाहतां दिसतसे सृष्टी अहा साजिरी ॥ २ ॥

सस्यांचा बरवा अनर्घ्य हिरवा शालू असे नेसली

जाईची जुईची गळां धरितसे जी रम्य पुष्पावली;
ती भाळीं तिलकांकिता शशिमुखी आतां शरत्सुंदरी,
माथां लेउनि केवडा विचरते घेऊनि पद्मं करीं! ॥ ३ ॥

जो गोपाळ गमे प्रभातसमयीं गाई वनीं चारितां,
वाटे रव्युदयीं नदीवर मुनी अर्घ्यास जो अर्पितां
जो भासे दिवसा कृषीवल शिरीं खोंवूनियां लोंबरें,
तो आतां ऋतु शारदीय बहुधा शेतांतुनी संचरे ॥ ४ ॥

राजा जो धनधान्यदायक असे साचा कुबेरापरी,
त्या श्रीमंडित शारदीय ऋतुची राणी दिवाळी खरी;
रूपैश्वर्यगुणाढ्य ती जवळ ये; द्याया तिला स्वागता.
सारेही शुभ योजनांत गढले कांहीं नुरो न्यूनता ॥ ५ ॥

भिंती रंगविल्या नव्या, फिरुनियां केलीं नवीं अंगणें
वीथी झाडुनि, रान काढुनि, दिसे सर्वत्र केराविणें,
दारीं उंच दिले दिवे चढवुनी, हंड्या घरीं लाविल्या,
लोकीं शक्त्यनुरूप आत्मसदनीं भूषा नव्या जोडिल्या ॥ ६ ॥

बाजारांत जमाव फार मिळुनी गर्दी उडाली असे,
गंध्याला निज संग्रहास विकितां विश्राम कांहीं नसे;
उंची कापड, दागिने सुबकही, मेवे, फटाके चिनी,
यांचा विक्रय होतसे धडकुनी वस्तू न चाले जुनी ॥ ७ ॥

माहेराप्रत कन्यका स्मितमुखी उत्कंठिता पातल्या,
त्या मातापितरां सहर्ष दुहिता, भावां स्वसा भेटल्या;
आले सांप्रत भेटण्यास वडिलां दूरस्थ ते पुत्रही,
सोहाळे श्वशुरालयीं अनुभवूं आले नवे जावई ॥ ८ ॥

बाळांहीं निजपुस्तकांस अवश्या आहे दिलेली रजा;
कांहीं काढुनि खेळ नाचवि मुलें तीं मारिताती मजा;
तों गेहामधुनी खमंग निघुनी ये वास, तेणें उगी
तीं होऊन, हळूच आंत शिरती: " दे माउली वानगी ! " ॥९॥
आतां भौमचतुर्दशी पुढलिया वारीं असे पातली,
तों रात्रीं निजतां बनी छबकुली मातेप्रती बोलली
" माला आइ उथीव लौकल बलें, अंगास मी लाविन
दादाच्या, म्हनुनी गले ! उथव तूं हांका मला मालुन " ॥१०॥
सारेही पाहिल्या दिनीं उठुनियां मोठ्या पहाटे जन,
स्नानें मंगल लौकरी उरकिती सौगंधिकें चर्चुन;
ज्या ठायीं असती दिवाळसण ते, तेथून वाद्यें पहा !
निद्रेंतून दिवाळिला उठविण्या तीं वाजताती अहा! ॥११॥
त्यांच्या मंजुरवें न जागृत म्हणीं होईल ती वाटलें,
यालागीं शिलगावुनी जणुं गमे देती फटाके मुलें;
' ठो ठो ' आणिक ' फाड फाड ' उठती तों नाद अभ्यंतरीं
त्यांहीं सत्वर जाहली हंसत ती जागी दिवाळी पुरी! ॥१२॥
रांगोळ्या रमणीय काढुनि पहा, त्या मांडल्या पंगती !
पक्वान्नें कदलीदलांवरि अहा ! नेत्रांस संतोषिती;
पाटांच्या मधुनी जलार्थ असती पात्रें रुप्याचीं, तिथें
नेसूनी जन मोलवान वसनें होतात कीं बैसते ॥ १ ॥
घेऊनी घृत, दुग्ध तें, विपुल ते गोधूमही, साखर
प्रेमानें महिलाजनीं बनविलीं खाद्यें किती सुंदर;
त्यांची सांप्रत रेलचेल अगदीं पात्रांत जी होतसे,
तुष्टी आणिक पुष्टि ती वितरुनी प्रीती दुणावीतसे ॥ १४॥

रांगोळ्या दिसती प्रदोषसमयीं दारांपुढें काढिल्या,
दीपांच्या सदनापुढें उजळुनी पंक्ती तशा लाविल्या;
त्यांच्या ज्योति असंख्य त्या बघुनियां वाटे असें अंतरीं,
तारा या गगनांतुनी उतरल्या कीं काय भूमीवरी! ॥ १५ ॥
बाळें सर्व फटाकड्या उडविती चित्तांत आनंदुनी,
जाडे बारहि लाविती, धडधडां त्यांचा उठे तो ध्वनी;
मोठे बाणहि चंद्रज्योति मधुनी त्या फूलबाज्या नळे,
दारूकाम असें अनेकविध तें दृष्टी पडे लाविलें ॥ १६ ॥
लक्ष्मीपूजन तें द्वितीय दिवशीं रात्रौ जधीं होतसे,
सोनें आणि वह्या धनीजन तधीं मांडून अर्चीतसे,
साध्याला विसरून लोक करिती भक्ती कसे साधनीं—
ये हा आशय अर्थहीन कविच्या चित्तांत तें पाहुनी! ॥१७॥
आतां भार नसे कुणास, पण तो शिंक्यास भारी असे,
हातां काम नसे, परंतु पडतें तोंडास तें फारसें;
कोणा मार नसे, तरी पण शिरीं तो सोंगट्याच्या बसे,
कोणा त्रास नसे, परंतु नयनां तो जागरें होतसे ॥ १८ ॥
भ्राते ते भगिनीगृहांप्रत सुखें जाती बिजेचे दिनीं,
त्यांचा बेत सुरेख ठेवुनि तयां ओंवाळिती भामिनी;
तेही त्यांस उदार होउनि मनीं ओंवाळणी घालती,
प्रेमग्रंथिस दाढर्य बंधुभगिनी या वासरीं आणिती ॥ १९ ॥
खाणें आणि पिणें, विनोद करणें, गाणेंहि, वा खेळणें,
जैसें ज्यांस रुचेल त्यापरि तुम्हीं या उत्सवीं वागणें;
मी संध्यासमयीं खुशाल गिरणातीरावरी बैसुनी,
कालक्षेप करीन उन्मन असा वेड्यापरी गाउनी! ॥ २० ॥

केशवसुत.

## ४८ ऐक्य.

भु. प्र.---पहा पंचभूतें निराळीं निराळीं
विरोधासी सोडोनियां एक झालीं
म्हणोनि अशी सृष्टि हे शोभताहे
अशी एकतेची असे शक्ति पाहे ॥ १ ॥

असे जीवनाधार वायु त्रिलोकीं
विरोधी तिन्ही वायुंचा मेळ तो कीं
परी एकतेनें असू रक्षिताहे
अशी एकतेची असे शक्ति पाहे ॥ २ ॥

पडे बिंदु बिंदू, जळें एक झालीं
निघे तेथुनीयां झरा सूक्ष्म खालीं
असंख्यात ओढा नदीरूप वाहे
अशी एकतेची असे अशी शक्ति पाहे ॥ ३ ।

नद्या सान मोठ्या असंख्यात लोकीं
समुद्रामध्यें एक होती विलोकीं
तयांच्या गुणें सागरा थोरता हे
अशी एकतेची असे शक्ति पाहे ॥ ४ ॥

तनू जीव हे संगतीनें रहाती
खटाटोप जंगी म्हणोनी करीती
तनू स्वार्थ मोक्षासहि साधिताहे
अशी एकतेची असे शक्ति पाहे ॥ ५ ॥

अणूला अणू खेटुनी लोह झालें
अशानेंच काठिण्य त्याच्यांत आलें

क्षणें मारित्याच्या करा फोडिताहे
अशी एकतेची असे शक्ति पाहे ॥ ६ ॥
तृणाची शलाका निराळी निराळी
नरें रज्जुरूपें जयीं एक केली
महामत्त हत्तीसही बांधिताहे
अशी एकतेची असे शक्ति पाहे ॥ ७
पति स्त्री अशीं दोन चक्रें भवाचीं
जगीं एक भावें सुधी चालतांची
स्वयें श्री तिथें येउनी नांदताहे
अशी एकतेची असे शक्ति पाहे ॥ ८ ॥
जिथें बंधुबंधूमधें वैर नाहीं
ढळे ऐक्य ज्यांचें कधींही न पाहीं
तिथें काय लोकीं उणें राहताहे
अशी एकतेची असे शक्ति पाहे ॥ ९ ॥
पिता माय बंधू भगीनी समस्त
सदा एकरूपें कुटुंबीं प्रशस्त
तिथें संतती संपदा नांदताहे
अशी एकतेची असे शक्ति पाहे ॥ १० ॥
कुटुंबें कुटुंबें तशीं गांव गांवें
सुखें नांदती एकतेनें स्वभावें
महावैभवें राष्ट्र तें दीप्त राहे
अशी एकतेची असे शक्ति पाहे ॥ ११ ॥
भवीं निर्मिलें ईश्वरें जें समस्त
तिथें योजिली एकता हे प्रशस्त

बहू दाखले देउनी काय सार
असे एकता हा प्रभूचा विचार ॥ १२ ॥

नंदुरबारकर.

## ४९ अमरत्व.

व. ति. :—जीवाजिनें वरियलें मृति-नोवरीतें
हें सत्य सत्य कळलें जंव मन्मतीतें
चिंतानलें अतनुदाह तनूंत केला
माथा तदा करतलांवरि टेंकियेला ॥ १ ॥
आत्म्यास आत्मगत दुःखभरें म्हणालों
स्वामिन्! विनष्टचि निरंतर मी जहालों
उद्धार हा परिसुनी मम देहधारी
देवोनि धीर वदला मज निर्विकारी ॥ २ ॥
रे! श्वास एकहि फुका दवडीं न शोकें
तेणें विनाश न तुला समजे विवेकें.
जीवाजि आणि मृति नामक दंपतीतें
होईल सत्य अमरत्व अपत्य कीं तें ॥ ३ ॥

चंद्रशेखर.

## ५० जीवितकर्तव्य.

अभंगः—झाले आजवरी बहु साधु संत,
दावाया सत्पंथ जनांलागीं;
पुस्तक विस्तार कोट्यावधि केला
जेणें हेलावला ज्ञाननिधि;
त्यांतील तत्वार्थ सुचवितों दिव्य,
जीवितकर्तव्य नाम जया ॥ १ ॥

विवेककवच सुदृढ लेवोनी,
वावरावें जनीं मुमुक्षूनें;
न घडे कदापी तेणें स्तुति हेवा,
जीवात्म्याशीं दावा तैसा कधीं;
मग भवभीति विलय पावेल,
मोक्ष तो येईल सहज हातीं ॥ २ ॥
मनो-विकारांचें न गणीं प्राबल्य,
मानोनी दौर्बल्य स्वतांचें तें;
तेणें कीर्तिपाश किंवा लोकनिंदा,
करील न बाधा लव त्यासी;
सायंमेघावरी रंग जो सुंदर,
त्यापरी अस्थीर असती जीं ॥ ३ ॥
सत्याचें सातत्य मनासी बाणावें,
शील तेंचि व्हावें निदानीचें;
मग मायापाश कोठोनी जाचील
चरिता लागेल डाग कैसा!
सुखदुःखादिक इंद्रियांची सारी,
फसवणूक बरी उमगेल ॥ ४ ॥
रात्रंदिन भाव ईश्वराचे पायीं,
ठेवोनियां राहीं शुद्ध पूर्ण;
तयानें होईल फलाशेचा त्याग
तोचि सुविराग स्तवितात,
जेणें निर्बंधत्व येईल आत्म्यास
पुनर्जन्म खास चुकेल तो ॥ ५ ॥

जन्मवरी ऐसें राहोनीयां शुद्ध,
मरणासी सिद्ध व्हावें प्रेमें;
तेंचि एक आहे सत्य दिव्य शांत
अशाश्वत अंत करणारें,
कल्पना प्रभा ही ऊजळो अंतर,
म्हणे कविवर राजहंस ॥ ६ ॥

राजहंस.

## ५१ यमाशीं गाठ.

ओंव्याः—रेडा आसन पाश हातीं । भाळीं मळवट भयाण मूर्ती ।
येवोनि ठाकली माझ्या पुढती । यमाजींची ॥ १ ॥
यमासि पाहतां कांपरें । माझ्या सर्वांगीं भरे ।
बोलावयासी शक्ति नुरे । कांहीं शब्द ॥ २ ॥
कृतपापें सर्व समोर । येऊन ठाकलीं भराभर ।
मना लागली हुरहुर । पुढील शिक्षेची ॥ ३ ॥
माझा प्राण कुडींतुनी । घेई यमधर्म हरूनी
पाही वही काढोनी । पाप पुण्याची ॥ ४ ॥
तों अनंत पापाच्या राशी । पडल्या त्याच्या दृष्टीसी ।
' शिक्षा देणेंच योग्य तुजसी ' । बोले यम ॥ ५ ॥
पुण्याईचा नाहीं लेश । केलेंस पाप विशेष ।
आतां भोग नरकवास । मुकाट्यानें ॥ ६ ॥
हांका मारोनि दूतांसी । न्या म्हणे त्वरित यासी ।
लावा शिक्षा भोगायासी । नाना दुःखाच्या ॥ ७ ॥
तेथें गेल्यावरी । वाटलें भय अंतरीं ।
कोणी न आलें बरोबरी । कर्माविण ॥ ८ ॥

मोठ्या कढया तप्त तेथें । तैसे उंच उंच सूळ होते ।
पसरले गळफांस भोंवते । त्याच स्थळीं ॥ ९ ॥
पुढें निरनिराळीं कुंडें । नाना जातींचीं त्यांत हाडें ।
नरकांतिल त्यांत किडे । वळवळती ॥ १० ॥
आली दुर्गंधी मोठी । भडाडून आलें पोटीं ।
झाली लागलीच उलटी । मजला तेथें ॥ ११ ॥
ओकतां ओकतां हो गाळण । डोकें गेलें भणाणून ।
तें मजशीं न साहून । ओरडलों ॥ १२ ॥
ओरडून झालों जागा । तों तेथें कांहीं न दिसे बघा ।
मनानें घातला पिंगा । केवळ स्वप्न ॥ १३ ॥

करमणूक, वर्ष १२ अंक २४.

## ५२ दीपविसर्जन.

( एके दिवशीं संध्याकाळीं नर्मदातटाकावर कांहीं मुली नदीच्या प्रवाहांत दिवे सोडीत होत्या; तो प्रसंग स्मरून खालील कविता लिहिल्या आहेत. )

करीं आरती घेउनी आर्यबाला
त्वरें पातल्या नर्मदेच्या तटाला
करूनी तयांनीं सरित्पूजनाला
प्रवाहीं दिली सोडुनी दीपमाला ॥ १ ॥
अहा काय शोभा वदूं त्या क्षणाची
तृषा शांत झाली मदीयेक्षणाची
तदा अस्तगामी जरी अंशुमाली
मना वाटलें यामिनी काय झाली ॥ २ ॥

सरित्पात्र तें स्वच्छ तैसें विशाल
परी भासलें कीं दुजें अंतराल
तती त्यावरी शोभली दीपिकांची
उदेली जणों पंक्ति कीं तारकांची ॥ ३ ॥

जशी अंतरिक्षीं फिरे चंद्रकोर
प्रवाहीं करी चारु नौका विहार
नभीं स्वैर संचारती मेघखंड
जळीं खेळती वीचि तैशा उदंड ॥ ४ ॥

अशी दिव्य शोभा पहातां पहातां
मनीं शांत झालें लया जाय चिंता
क्षणीं सूचली कल्पना एक चित्ता
असे सर्व सृष्टीस जी सारभूता ॥ ५ ॥

दिले सोडुनी दीप जैं बालिकांनीं
दिला सारखा वेग सर्वां तयांनीं
तयांची स्थिती तत्क्षणीं भिन्न झाली
वरी दृश्य कोणी कुणी जाय खालीं ॥ ६ ॥

कुणी गुंतुनी राहिले भोंवऱ्यांत
जलौघासवें जाय कोणी वहात
तयांतील कांहीं तटा अन्य गेले
पुढें जाउनी अल्प मागेंच आले ॥ ७ ॥

जसे दीप तैसे असंख्यात जीव
प्रभू निर्मितो थोर ज्याचा प्रभाव
तयां सोडुनी देत काल-प्रवाहीं
वहाती तदोघासवें सर्व देही ॥ ८ ॥

कुणी रंक होई कुणी होय राजा
दुजा देखणा तो तिजा हीनतेजा
कुणी मूर्ख होई कुणी हो शहाणा
कुणी धैर्यशाली तसा दीनवाणा ॥ ९ ॥

तसें कां करावें ? असें मी करीन
वृथा वल्गना मानवाच्या अजाण
स्थितीचा असे किंकर प्राणिमात्र
स्थिती त्या करी पात्र किंवा अपात्र ॥ १० ॥

जरी राहिलें नर्मदातीर दूर
जरी आज बाला न माझ्या समोर
स्मरोनी तरी दीपसर्ग प्रसंग
क्षणीं हर्षयोगें भरे अंतरंग ॥ ११ ॥

माधवानुज.

## ५३ मेघराजास नोटीस.

मालिनीः—सकल जन तुम्हाला बाहती मेघराज
भवदुपगमनानें तोषवा त्यांस आज
सकल कृषिवलांच्या वक्त्रकांतीसमेत
जलधर तव रोषें जाहलें शुष्क शेत ॥ १ ॥

प्रखररविकरांही तापल्या भूमिकेला
स्वजल-विपुलदानें तोष देऊनि केला
अखिल जगतिमाजी थोर ऐसा वदान्य
अजवरि मज सांगें कोण झाला त्वदन्य ॥ २ ॥

उपकृतिपर ऐशी तूमची चित्तवृत्ती
असुनि धरियला हा आजि कां कोप चित्तीं

अनुभव तरि ऐसा ठाउका नित्य आर्य
त्वरित करिति अंगें जाणते दीन-कार्य ॥ ३ ॥
तव चिरविरहानें भूमिला तापलीला
हरुनि जलददानीं सर्व संतापलीला
तिजवरि रसवृष्टी प्रेमदृष्टी दयाल
करिं हरित तृणाची नेसवीं तीस शाल ॥ ४ ॥
तुजशिं कलह झाला काय बा चातकांचा?
म्हणुनि सहज आला कोप तूतें तयांचा
कलह न तुमचें हें केवळ प्रेमयुद्ध
परि सकळ जगाचा होतसे नाश शुद्ध ॥ ५ ॥
तुजसिं गगन-मार्गी पाहुनीयां समोर
प्रमुदित हृदयानें नाचती खास मोर
परि अजि अवध्यांना पाहिजे एक तोय
करिं सदयमनानें एवढी अल्प सोय ॥ ६ ॥
परिसुनि गरिबांची खेद-दुःखार्त वाणी
जलधर ! सदया त्वां ढाळिजे बाष्पपाणी
नियतिहतजनांच्या दीन आलापबोलें
नयन न कवणाचे सांग होतात ओले? ॥ ७ ॥
श्रवण करुनि माझी एवढी दीन हांक
झडकरि चल बापा पावलें चार टाक
परि नच हळु चाली चाल; होतो उशीर
पवनगति निघावें फार आम्ही अधीर ॥ ८ ॥
जलधर तुज ऐशा फार होऊनि कष्टी
जरि बहु विनयानें सांगतों चार गोष्टी;

तरि मन करुनीयां प्रस्तरप्राय घट्ट
पुरविशि अपुला तूं निर्दया काय हट्ट ॥ ९ ॥
जरि नच वळसी तूं पूर्ण सामोपचारें
तरि उघडचि कोर्टीं प्राप्त जाणेंच आलें
म्हणुनि तुजसि देतों येथ नोटीस एक
क्षणभरि धरिं मेघा सांगतों शांति ऐक ॥ १० ॥
मज नच वकिलांचा आवडे त्रास खोटा
मज पुढति नको तो कोर्टफीचा लखोटा
लढुनि लढुनि ऐसें सातशेंपांच तंटे
खचित जन भिकेला लागले कीं करंटे ॥ ११ ॥
मृदुमृदु पहिल्यानें बोललों चार शब्द
हितगुज परि तूतें सांगतों ऐक अब्द
जरि करित असें मी कायद्याचा उपाय
बहु वचन वदाया वेंचतें सांग काय? ॥ १२ ॥
प्रथम जग विधीनें नूत्न निर्माण केलें
हळुहळु मग तेथें लोकही नेमियेले
नव नव अधिकारी देउनी योग्य दाम
तयिं तुज दिधलें रे वारिवर्षावकाम ॥ १३ ॥
बहुदिनवरि केली एकनिष्ठें सुवृष्टी
तव सुरसरसानें पावली सृष्टि पुष्टी
परि दिवसगतीनें मंद झालासि कर्मीं
कटुक वचन माझें आज झोंबेल मर्मीं ॥ १४ ॥
अनुचरगण भावें स्वामिसेवा करीती
नविन तंव वरीही ठाउकी लोकरीती

म्हणुनि तव उपेक्षा होय कामांत कोठें
कथिन तुज तुझें जें कर्म अत्यंत खोटें ॥ २५ ॥
अवचित पडले हे घोर दुष्काळ तीन
सकलजन जहाले त्यामुळें हीन दीन
नर मरति उपाशी हायरे! दुष्टकाळीं
खचित खचित याचें पाप तुझ्या कपाळीं ॥ १६ ॥
वद जरि बहु काळें त्रासलासी स्वकामा
झडकरि तरि बापा पाठवीं राजिनामा
फिरफिरुनि जरी का होय कामांत चूक
तरि उघड दिसे ती सर्व लोकां अचूक ॥ १७ ॥
जलधर करिं किंवा पेन्शनीचाच अर्ज
गलित शरिर होतां वृद्ध कामास वर्ज
पुनरपि घडतां कीं एक कामांत चूक
समज मग दुजाची जाहली नेमणूक ॥ १८ ॥
धरुनि दृढ मनीं जे नोकरीचीच आशा
कितितरि शिकलाती नेटकी आंग्लभाषा
तरुण तरुण बी. ए. हे भरायास पोट
करितिल बघ मेघा नोकरीचा रपोट ॥ १९ ॥
मिळवुनि वशिलाही थोरशा साहिबाचा
फसवितिल तुला हें सांगतों मी खिवाचा
तरि झणिं उघडीं रे आपुले वारिकोष
करुनि निजनियोगा दे जनां पूर्ण तोष ॥ २० ॥
जलद जलद यावें घेउनी शीत वारी
जलतृणमय भूमी ही करीं आज सारी

पुनरपि न करीं हा निर्घृणत्व-प्रमाद
तरिच मग जगाचे पावशी धन्यवाद ॥ २१ ॥
न करिशि जलवृष्टी येवढ्यानेंहि तूर्ण
दिवस भरत आले कीं तुझे जाण पूर्ण
प्रभुवर- दरबारीं घेउं लावून दाद
करुं महिवरि सारी रे अबादीअबाद ॥ २२ ॥
भजक-शिखि-गणांला जो दयावारिवाह
नव-भव-दव-तप्ता मूर्तिमंत प्रवाह
हरि जरि वळला तो आमुच्या भक्तिभावें
तरि मग तुज मेघा तेथ कोणीं पुसावें ॥ २३ ॥
जगिं करमणुकीचा थोर आहे प्रसार
परिस तुजसि आतां सांगतों क्षिप्र सार
म्हणुनि दिलि असे ही त्यांत नोटीस तूज
चल झडकरिं येईं आपुली राख बूज ॥ २४ ॥

——— गोपाळ अनंत ओगले.

### ९४ बालविधवा.

पृथ्वीः–रवें करुण हंबरे सुरभि पंकमग्ना जशी
विलाप करिते सदा विगतभर्तृका ती तशी
अनन्यगतिका तिला जगिं कुणी न वाली खरा
तिला गमतसे जगीं नरकवास हा दूसरा ॥ १ ॥
जरी गमन ती करी नृपपथातुनीं एकली
तरी हंसति दाउनी खल तिच्याकडे अंगुली
अवाच्य वचनें तिला वदुनि पीडिती दुर्मती
कवींसहि न वर्णवे सकरुणा तिची ती स्थिती ॥ २ ॥

समूर्तच पुढें उभी विरहयातना ती खरी
म्हणून हतभागिनी दिसतसे सदा बावरी
स्वदेह अवमानिते तृणसमान ती अंतरीं
कसे अशन पान तें मग सुचेल चित्तीं तरी ? ॥३॥
तिला अशुभकारिणी गणुनि जाइ निद्रा दुरी
सचिंतहृदया निशा सकल घालवी जागरीं
रडे, शयनिं ती सदा तळमळे, अभागी खरी
गमे तिज भयावहा रजनि कालरात्रीपरी ॥ ४ ॥
छळी वदुनियां तिला वच कठोर सासू बळें
न शब्द कधिंही तिला किमपिही सुखाचा मिळे
तनू झिजविते सदा लव कदन्न सेवून ते
अभागि गृहकर्मिं ती पशुपरी सदा राबते ॥ ५ ॥
परी परगृहा करी गमन काल काढावया
कठोर वचनें तिला वदति मैत्रिणी निर्दया—
" कपाळकरंटी अम्हां वदन दावि ही कासया "
गिळून पतितें मुखा कशि न लाज दावावया ? ॥ ६ ॥
अशी चहुंकडे तिची बहु विटंबना होतसे
जगीं सतत सोशिते छल तयास सीमा नसे
जिवंतपणिं हा तिला भयद मृत्यु वाटे खरा
' विमुक्त करिं सत्वरी !' म्हणुनि प्रार्थिते ईश्वरा ॥७॥
जरी परम दुःसहा मरण यातना-ती खरी
तरी गमत याहुनी लघुतमा तिला अंतरीं !
जरी मरण दुःख देइ-तरि देतसे एकदा
जिवंत परि मृत्यु हा तनुस जाळितो सर्वदा ! ॥ ८ ॥

अपार छळ सोशिती विगतभर्तृका जो असा
विदीर्ण नच होतसे हृदय पाहुनी तो कसा ?
तटस्थ बसुनी जरी बुध समस्त तो पाहती
तयां असुख-सागरा मग निराश्रया ही क्षिती ! ॥ ९ ॥
तरी बुधजनांस ही विनति अल्प माझी असे
तटस्थ बसणें असें उचित आपणांतें नसे
विमुक्त अबला करा निबिड दुःखपंकांतुनी
न कीं उचित मार्ग हा सुकृतिचा ? विचारा मनीं ॥ १०
'उपाय नच सूचती !' उचित हें नसे आपणां !
न व्हा सुजन हो असे विमुखवृत्ति सत्कारणा
करा झटुनि सर्व जें उचित आपणांतें दिसे
तुम्हांविण तयां जगीं इतर कोण वाली असे ? ॥ ११ ॥
अहा अनय काय हा !—पति जरी मरे यौवनीं
तनू झिजविणें तिनें नियमनव्रतोपोषणीं
सुखासुख विमानुनी, नियमुनी मनोवासना
सदा अहह ! सोसणें परमघोर ही यातना ! ॥ १२ ॥
कदन्नकण सेवुनी, त्यजुनि सर्वही मंडनां
अहा ! करित राहवें अनुदिनीं वपुर्दंडना
कषायवसना,—जणों जगिं खरीच संन्यासिनी
सदाहि वसणें तिनें असिसमव्रतोपासनीं ॥ १३ ॥
पुरे न पतिचें जिनें मुखहि देखिलें एकदा
जरी तिजवरी महा भयद येइ ही आपदा
विमानुनि सुखाऽसुखां नरकयातना ही पहा
तिनें सतत सोसणें ! अहह ! काय अन्याय हा ! ॥ १४ ॥

स्त्रियांस पुरुषापरी नसति का मनोवासना
न का असुखकल्पना? विविध त्यापरी कामना
जगीं जनन घेति का असुख मात्र भोगावया
पशूहुनिहि नीच का असति दुर्भगा या स्त्रिया? ।१५ ।
कशी ऋषिजनीं अशी असम नीति ही बोधिली
कशी नयपरायणा अतुलदृष्टि ती लोपली
कशी सदयता तरी सकल जाहली नष्ट ती
कशी नयपराङ्मुखां विहित वाटली ही कृती ॥ १६ ॥
विमुक्त करणें तयां निबिड दुःखपंकांतुनी
अवश्य दिसतें जरी सकल सुज्ञ लोकां मनीं
उपाय गमतो बरा विगतभर्तृकोद्वाह हा
विचार करुनी मनीं उचित होय तो का पहा! ॥१७॥
असे विफल सुज्ञ हो, गतधवाशिरोमुंडन !
करील तरि तें कसें विषयवासनाखंडन ?
सुनीतिपथसेवनीं उपजवील कां तें रती
उगाच विधवाजना छल करावया ही कृती ॥ १८ ॥

श्री. ना. मुजुमदार.

## ५—तुतारी.

एक तुतारी द्या मज आणुनी,
फुंकिन जी मी स्वप्राणानें,
भेदुनि टाकिन सगळीं गगनें—
दीर्घ जिच्या त्या किंकाळीनें; अशी तुतारी द्या मजलागुनि ॥१॥
अवकाशाच्या ओसाडींतिल
पडसाद मुके जे आजवरी

होतिल ते वाचाल सत्वरी
फुंक मारितां जीला जबरी; कोण तुतारी ती मज देइल? ॥ २ ॥
सारंगी, ती सतार सुंदर,
वीणा, बीनहि, मृदंग, बाजा,
सूरहि, सनई, अलगुज माझ्या—
कसची हीं हो पडतिल काजा? एक तुतारी द्या तर सत्वर ॥ ३ ॥
रूढी जुलूम यांची भेसुर
संतानें राक्षसी तुम्हांला
फाडुनि खाती, ही हतवेला—
जरशाची का? पुसा मनाला! तुतारिनें ह्या सावध व्हा तर! ॥ ४ ॥
अवडंबरलीं ढगें कितीतरी,
रविकिरणांचा चूर होतसे,
मोहर सगळा गळुनि जातसे,
कीड पिकावरि सर्वत्र दिसे! गाफिलगिरि तरि हि जगावरि! ॥ ५ ॥
चमत्कार ! ‘ तें पुराण तेथुनि
सुंदर, सोज्वल, गोडें, मोठें! ’
‘ अलिकडलें तें सगळें खोटें! ’
म्हणति, धरुनी ढेरीं पोटें; धिक्कार अशा मूर्खांलागुनि ॥ ६ ॥
जुन्या नवीं या तांजें तारक,
जुन्या भूमिवर नवी टवटवी,
जुना समुद्रहि नवरत्नें वी;
जुन्यांतून जी निष्पत्ति नवी—काय नव्हे ती श्रेयस्कारक? ॥ ७ ॥
जुनें जाउं द्या मरणालागुनि,
जाळुनि किंवा पुरूनि टाका,

सडत न एकया ठायीं टाका
सावध! ऐका पुढल्या हाका! खांद्यास चला खांदा भिडवुनि! ॥ ८ ॥
प्राप्तकाळ हा विशाल भूधर,
सुंदर लेणीं तयांत खोदा,
निजनामें त्यावरती नोंदा,
बसुनी कां वाढवितां मेदा? विक्रम कांहीं करा, चला तर! ॥ ९ ॥
अटक कशाला बसलां घालुनि ?
पूर्वज वदले त्यां गमलें तें
ऐका खुशाल सादर चित्तें;
परंतु सरका विशंक पुढते- निरोप त्यांचा ध्यानीं घेउनि ॥ १० ॥
निसर्ग निर्घृण, त्याला मुर्वत—
नाहीं अगदीं पर्वा कशाची !
कालासह जी क्रीडा त्याची,
ती सकलांला समान जाची–चुरूनि टाकी प्रचंड पर्वत ! ॥ ११ ॥
त्याशीं भिडुनी, झटुनी झगडत
उठवा आपुले उंच मनोरे,
पुराण पडक्या सदनीं कां रे !
भ्याड बसुनियां रडतां पोरें ! पुरुषार्थ नव्हे पडणें रखडत ! ॥ १२
संघशक्तिच्या भुईंत खंदक
रुंद पडुनि शें तुकडे झाले,
स्वार्थानपेक्ष जीवीं अपुले
पाहिजेत ते सत्वर भरले–ध्या त्यांत उड्या तर बेलाशक ! ॥ १३ ॥
धार धरिलिया प्यार जिवावर
रडतिल रडोत रांडा पोरें,

गतशतकांचीं पापें घोरें—
क्षालायाला तुमचीं रुधिरें—पाहिजेत रे ! स्त्रैण न व्हा तर ! ।।१४।।
जाऊं बघतें नांव लयाप्रत,
तशांत बनलां मऊ मेंढरें
अहह ! घेरिलें आहे तिमिरें,
परंतु होऊं नका बावरे—धीराला दे प्रसंग हिंमत ! ।। १५ ।।
धर्माचें माजवूनि डम्बर,
नीतीला आणिती अडथळे,
विसरुनिया हें जातात खुळे,
नीतीचें पद जेथें नढळे—धर्म होतसे तेथेंच स्थिर ।। १६ ।।
हल्ला करण्या तर दंभावर-तर बंडांवर,
शूरांनो ! या त्वरा करारे !
समतेचा ध्वज उंच धरारे !
नीतीची द्वाही पसरारे, तुतारिच्या ह्या सुराबरोबर ! ।। १७ ।।
नियमन मनुजासाठीं, मानव—
नसे नियमनासाठीं जाणा,
प्रगतिस जर तें हाणी टोणा—
झुगारून तें देउनि, बाणा-मिरवा निज ओजाचा अभिनव ! १८।।
घातक भलत्या प्रतिबंधांवर
हल्ला नेण्या करा त्वरा रे !
उन्नतिचा ध्वज उंच धरा रे !
वीरांनो ! तर पुढें सरा रे—आवेशानें गर्जुन ' हर हर ! ' ।। १९।।
पूर्वीपासुनि अजुनि सुरासुर
तुंबळ संग्रामाला करिती;

संप्रति दानव फार माजती,
देवांवर झेंडा मिरवीती ! देवांच्या मदतीस चला तर ! ॥ २ ॥

केशव-सुत.

---

## ५६ सांत्वन.

( कवीचें प्रियबालक वारलें त्या प्रसंगीं त्यानें आपल्या दुःखाकुल पत्नीस केलेला उपदेश. )

द्रुतविलंबितः–प्रियकरे, रडशील किती तरी
कर विवेक जरा हृदयांतरीं
प्रिय जरी तुज बालक तें अती
रडुनि का परते वद संप्रति ? ॥ १ ॥

उगवतां गगनीं नव चंद्रिका
मुदित हो मन पाहुनि ती न कां
क्षणभरें मग जाय लयाप्रती
रडुनि काय पुनः परतेल ती ॥ २ ॥

चमकतां चपला बहु चंचला
कवण हर्षभरें न बघे तिला
झडकरी परि जाय लया द्युति
रडुनि काय पुनः परतेल ती ॥ ३ ॥

सुचविते कवितें नव कल्पना
विपुल होय तदा सुख तन्मना
क्षणभरें न उरे जरि तत्स्मृती
रडुनि काय पुनः परतेल ती ॥ ४ ॥

उमलतां कलिका लतिकेवरी
मधुर रूप तिचें नयना हरी
विकसुनी मुकली जर मागुती
रडुनि काय पुनः फुलणार ती ॥ ५ ॥
बहुत सुंदर जें असतें तया
स्थिरपणा असणार कुठूनिया ?
नच करी स्थिर सुंदर संगती
रडुनि काय बरें घडणार ती ॥ ६ ॥
असुनि सुंदर अल्प बरें जिणें
नच कुरूपपणें बहु वांचणें
समजतों तुज भाग्यवती सती
प्रसवतीस अशी रुचिराकृती ॥ ७ ॥
मृदु मना तव होय जरी क्षती
करुनि शोक कशी भरणार ती
प्रभु भिषग्वर गे सखये सुधी
स्तव तया तुज देइल औषधी ॥ ८ ॥

माधवानुज.

## ५७ स्फूट अभंग.

सोंवळ्याच्या रीति दोन, अंतर्बाह्य अशा जाण ।
स्वच्छता तेंचि सोंवळें, मलिनता तें ओंवळें ।
शारिरीक सोंवळ्याचें, नेणती हें तत्व साचें ।
मुक्टा घामट नेसतो, सोंवळ्यानें मिरवतो ।
नाहीं ठावा स्वच्छपणा, सोंवळ्यांत नाहीं उणा ।
नाना आचरी आचार, घेना विचाराचा भार ।

काल्पनिक बंधनांनीं, घेई आपणा बांधोनी ।
कष्ट सोशी, नेणे वर्म, म्हणे पाळितों मी धर्म ।
कवि म्हणे हो विचार, सांडुनि मांडिला आचार ॥ १ ॥
देह सोंवळा करणें, त्याला कशासाठीं रणें।
बाहेरच्या सोंवळ्यांत, घालविती दीनरात ।
बसूनियां एकीकडे, लोकां ' दूर व्हा ' ओरडे ।
द्वैतभाव मनीं वसे, तो का सोंवळा होतसे ।
कामक्रोध अंगीं दाटे, तयातें लावीना वाटे ।
मन करीना निर्मळ, व्यर्थ करी तळमळ ।
षड्रिपूंचें तें काहूर, उठे, करवेना दूर।
स्नानें केलिया हजार, होई शरीर बेजार ।
मग्न बाह्य उपचारीं, शुद्ध होईका अंतरीं ।
नाहीं सोंवळें सोपें रे, जेणें अहंपणा जिरे ।
ऐसें करावें सोंवळें, बंध होताती मोकळे ।
ज्याचें असे शुद्ध मन, कवि करी त्या नमन ॥ २ ॥

विचित्र पोषाख कृत्रिम भाषणें।
वरपांगी जिणें नको मज ।
सजीव तूं करीं अंतरींची आशा ।
हृदयाची भाषा ऐकूं येई।
जिवंत राहू दे अंतर्दीप सदा ।
देहाशीं आपदा काय होई ।
बाह्य जिणें मज काय करायाचें ।
अंतरीं मृत्यूचें राज्य जरी ।
कवि म्हणे पाहीं पडद्याच्या आंत ।

कासया भ्रमांत गुंग होशी ॥ ३ ॥
निशिदिनीं आम्ही कष्टवितों काया ।
नेणों हेतू, वाया श्रम घेतों, ।
येथें तेथें जातों, नेणों कोठें जाणें ।
वाटाड्याहीविणें व्यर्थ श्रमू ।
सुकाणूं असेना, हेलकावे घेई ।
वाऱ्यासंगें जाई तारूं जेवीं ।
दिसेना आम्हांस जें जें पहायाचें ।
असे, ऐकायाचें ऐकूं येना ।
कवि म्हणे नेत्र देई पहायाला ।
कर्ण ऐकायाला बोल तुझे ॥ ४ ॥

ल. वि. परळकर.

## ५८ ऐतिहासिक बोध.

आर्या:—क्रोधातें वश होतां सुज्ञहि होतो अकीर्तीला पात्र
ध्वंसुनि चितोड रागें अकबर दुष्कीर्तिपात्र हो मात्र ॥ १ ॥
थोर असो दीन असो त्याची बाधा करूं नको निंदा
निंदूनि पेशव्यातें निजामवजिरें वरीयलें बंदा ॥ २ ॥
मोहूनि मद्य मनुजा, सर्वस्वाची करीतसे हानी
अवरंगजेबें धरिलें पाहूनि संभाजि वारुणीपानीं ॥ ३ ॥
सुजनावरि उपकारा करितां तो आठवीतसे नित्य
घोरीस मुक्त करितां पृथ्वीराजास मारि तो सत्य ॥ ४ ॥
सर्वांचें वैर जगीं संपादुनि वांचला असे कोण ?
जातीशींही लढतां अवरंगजेबीं न राहिलें त्राण ॥ ५ ॥
नर दुःसंग करी तरि कुलजहि पावे सदा जगीं पतन

संभाजी शिवसुतही कलुशासंगें सतांस हो मत न ॥ ६ ॥
निस्पृहतेनें वागे त्या इहपर मानिती न सामान्य
तो रामशास्त्रि सचिवा कटु परि हित बोधिता कसा मान्य ॥७
गृहकलहाग्निज्वाला जाळी सर्वस्व कीर्ति वपुहि तसें
रघुनाथें कलह करुनि, राज्या नेलें लयास कुरुपतिसें ॥ ८ ॥
गर्विष्ठा ' मीच ' गमे ' थोर ' परी जेविं सूज रोग्यातें
गर्वं राणिं आचवला भाऊसाहेब थोर भाग्यातें ॥ ९ ॥
स्वातंत्र्यधर्म मानी पावे नर तो खरी खरी पदवी
धर्मस्वातंत्र्याची प्रीति शिवा श्रीनरेश हें वदवी ॥ १० ॥
समतेनें वागवितां अरिही त्याच्या वचास आदरिती
अकबर हिंदू-यवनां सम यास्तव सर्व तत्पदा धरिती ॥ ११ ॥
लोभा अनिवार धरी, जाउनि सर्वहि हताश तो होय
अवरंगजेब अंतीं मेला राज्याधिनें करित हाय ॥ १२ ॥
मानस परस्परांचें मिळतां देती तदर्थ जन जीव
तानाजि मावळा परि मानी शिव त्यास आपुला जीव ॥ १३॥
गुण रावरांकिं असला तरि बुध देती तयास संमान
तुकया वाणी परि जन ऐकुनि नामास डोलविति मान ॥१४॥
केला परघात तरी परही करितो स्वघात हें जाण
अल्लाउदिनें चुलत्या वधिलें, काफर तदीय घे प्राण ! ॥ १५॥
ऐश्वर्यलोभ सोडीं, त्याचे ठायींच मानि ऐश्वर्य
शिवभूप राज्य अर्पी, न स्वीकरि रामदास परि आर्य ॥ १६ ॥
स्वप्नींही न धरीं तूं परदारांची स्पृहा मनामाजी
पद्मिनिचा काम धरुनि अल्लाउद्दिन पळे जरी गाजी ॥ १७ ॥

थोरांच्या सहवासें नीचहि होती तयासम ख्यात
शाहूपदसंगतिनें फत्तेसिंगास राज्य हो प्राप्त ॥ १८ ॥

——— बा. सि. जोशी.

## ५९ पक्कपंडित.

सोडोनियां निजपुराप्रति विप्र तीन
वित्तार्थ अन्य नगराप्रति वित्तहीन
पाथेय बांधुनि पटांत सवें निघाले
संभाषणें श्रम तदीय पथीं निमाले ॥ १ ॥
मंत्रश्रुतिस्मृतिपुराणकलाकलाप—
पारंगतत्वयश मेळवुनी दुराप
झाले बृहस्पतिसमान जनांत मान्य
त्यांचेपरी निपुण तेचि जगांत, नान्य ॥ २ ॥
विद्वच्छिरोमणि तरी कमला तयांस
दावी न सुंदर अशा अपुल्या मुखास !
देखों असें सतत कीं, विबुधांस लोकीं
लक्ष्मी प्रसन्ननयनें न कधीं विलोकी ॥ ३ ॥
ठावें तयां कनक पीत जशी हरिद्रा
नेत्रीं दिसे कनक त्यां न कधीं दरिद्रां
देशाटनें कनक तें मिळवावयाला
जावें असा मनिं तदीय विचार आला ॥ ४ ॥
चंड, प्रचंड, परिचंड अशीं सुवर्ण
नांवें तदीय बहु तोषवितात कर्ण
नामाक्षरानुमित पंडितता तयांची
ग्रंथावलोकनविकस्वररूप साची ॥ ५ ॥

होती वनांतुनि अरुंद तदीय वाट
तीभोंवतीं उगवले तरुखंड दाट
वल्ली तिथें कठिनरज्जुसमानसार
देती सदैव पथिकांप्रति कष्ट फार ॥ ६ ॥
आला रवी गगनमध्यपदासि जेव्हां
हे तीन पांथ थकले अतिमात्र तेव्हां
विश्रांतिसौख्य मग ते मिळवावयाला
प्रच्छायरम्य तरुच्या बसले तळाला ॥ ७ ॥
अभ्याशवर्ति मधुरोदक पल्वलासी
जावोनियां मग तयीं चरणांकरांसी
प्रक्षाळिलें, फिरुनियां तरुच्या तळाला
आले तिथे, श्रम तदीय गदा गळाला ॥ ८ ॥
पाथेय सोडुनि पटांतुनि खावयाला
ते बैसले, मधुर ते गमलें तयांला
जिव्हा कदन्नहि सुधेपरि गोड मानी
भागे यदा नर उदंड तनुश्रमांनीं ॥ ९ ॥
पाथेय खाउनि तयां बहु तोष झाला
कांतारसंचरणजश्रमही निमाला
आरंभिलें मग तयीं विविध प्रकारें
संभाषणा; विषय गोड तयांसि सारे ॥ १० ॥
आसन्नदेशगत देखुनि कीकसांतें
बोले सदर्प वच चंड सुहृद्द्वयातें
“ अभ्यस्त मंत्रबल दाखवितों पहा हें
माझेपरी कवण मंत्रबलासि वाहे? ॥ ११ ॥

हीं कीकसें हरिशरीरगतें, तयाचें
देहावसान घडलें शिशिरांत साचें
हें मंत्रयोगपटुता मज जाणवीतें
म्यां त्या जरी बघितलें न कधीं हरीतें ॥ १२ ॥
मन्मंत्रयोगबल दाखवुनी तुम्हांतें
आश्चर्य वाटविन जोडुनि कीकसांतें
कंकाल अस्ति जुळवूनि करीन आतां
मी लाविल्याविण तयांसि मदीय हातां " ॥ १३ ॥
ऐसें वदोनि जल घे मग चंड हातीं
त्याचा प्रचंड परिचंड विधी पहाती
मंत्राक्षरें मग तयें प्रबलें मुखानें
उच्चारिलीं, बल दिलें सलिला तयानें ॥ १४ ॥
हें मंत्रपूत जल सिंचियलें तयानें
अस्थींवरी वरुनि मंत्रवचा मुखानें
कंकालरूप धरिलें हरिकीकसांनीं
तो चंड शक्ति अपुली मग फार वानी ॥ १५
" माझेपरी कवण मर्त्य समर्थ आहे ?
माझेपरी कवण मंत्रबलासि वाहे ?
मीं लाविल्याविण करा हरिकीकसांतें
तीं जोडिलीं; बल मदीय अहो पहा तें " ॥ १६ ॥
दर्पोक्तिही परिसुनी वदला प्रचंड
तारस्वरें, उठुनि ठोकुनि बाहुदंड
" मच्छक्ति बाढतर सत्य तुझ्यापरीस
मांसोपपन्न करितों बघ ह्या हरीस " ॥ १७ ॥

बोले प्रचंड वच हे, मग अल्प तोय
घेऊनि मंत्रपठनांत निमग्न होय
तोयें तदा मिळविलें बल मंत्रजन्य
मानी प्रचंड अपणासि अतीव धन्य ॥ १८ ॥
हें पंजरावरि तयें जल सिंचियेलें
मांसोपपन्न निमिषांत तयासि केलें
चर्मेंहि आवृत मृगेंद्रशरीर झालें
तें ठाकलें भुवि उभें, परि तें न हाले ॥ १९ ॥
हर्यक्ष उग्रतनु तो उभला विशाल
वायुप्रवाहपरिकंपितकेशजाल
त्यातें प्रचंड अवलोकुनि फार हर्षें
मानी स्वतास अतिधन्य बलप्रकर्षें ॥ २० ॥
मित्रांस दावुनि मृगेंद्र समांसचर्म
वर्णी प्रचंड निज अद्भुतरूप कर्म
" माझेंचि मंत्रनिपुणत्व जनांत मान्य
होईल, सत्य मजसा भुवनांत नान्य " ॥ २१ ॥
ह्या दर्पगर्भ न वचा परिचंड साहे
बोले " तुम्हांपरिस मद्बल थोर आहे
प्राणोपपन्न मृगराज करावयाला
मी शक्त, हें उघड दाखवितों तुम्हांला " ॥ २२ ॥
बोलोनि हें वच, जला परिचंड हातीं
घे, तत्सुहृद्द्वय तदीय विधी पहाती
मंत्रोद्भवें जल बलें उपपन्न केलें
तेव्हां, तयें मग हरीवरि सिंचियेलें ॥ २३ ॥

आश्चर्य हें मग घडे अतिमात्र, तोय-
स्पर्शे मृगेंद्र असुनी उपपन्न होय
तो सामु पाहुनि तदा परिचंड हर्षे
केकी जसा घनघटानववारिवर्षे ॥ २४ ॥
वात्यारयाहतपयोधिरवासमान
तो गर्जना हरि करी उभवोनि मान
पांथत्रयश्रुतिवरी बसवूनि टाळी
हे गर्जना सकल तद्धृतिही पिटाळी ॥ २५ ॥
गुंजाफलोपम विलोचन शोणवर्ण
प्रेरोनि चंचल तदा, उभवोनि कर्ण
वासोनि तीक्ष्णरद आनन अश्वनींनां
तो श्वापदेंद्र भिववी अति मात्र दीनां ॥ २६ ॥
पांथांवरी मग मृगाधिप झेंप घाली
पाडी तयां नवबळें निमिषांत खालीं
ज्याचा गजावलिविमर्दन नित्य खेळ
लागे मनुष्यहननीं न तयासि वेळ ॥ २७ ॥
चंड प्रचंड-परिचंड मृगाधिपानें
केले विदीर्णतनु; तद्बल तें न सानें
हा हंत! त्या क्षणिच दंडित ते निमाले
ते जीर्ण त्या पशुचिया जठरांत झाले ॥ २८ ॥
हा हंत! मंत्रपटु पंडित ते निमाले!!
पांडित्यही विफल सर्व तदीय झालें!!
हो ज्ञान निष्फल सखा न जया विवेक
तें क्लेश देइल सदैव नरा अनेक ॥ २९ ॥

ज्ञानावलिप्त नर देखतसों, स्वशर्मा
जे स्वप्रिया, बुडविती स्वजना, स्वधर्मा
त्यांचा धरोनि हृदयांत असा दुरंत
जागो सदैव सदसन्मननांत संत ॥ ३० ॥
'पक्कपंडित' कथा मनोरमा
वामनात्मज मिळावया शमा
हे रची; सशम त्या करो हरी
अन्य काम हृदयीं न तो धरी ॥ ३१ ॥

वि. वा. भिडे.

## ६० मूर्तिभंजन.

गेलों एक दिनीं स्वयें उपवनीं आणावया वेंचुनी
माल्यें मंगल भक्तिनें प्रभुवरा अर्पावया पूजनीं
कांहीं लाल निळीं तयांत पिंवळीं कांहीं तशीं श्वेतही
दूर्वा बिल्वदळें पवित्र तुळशी घेऊनि आलों गृहीं ॥ १ ॥
गेलों देवगृहांत पूजनविधी भावें कराया क्षणीं
बैसें आसन घालुनी मन बळें एकाग्रते आणुनी
मूर्ती तों सहसा उपास्य मम ती भंगूनि गेली पुरी
कैचें पूजन? शून्यता सभयता माझ्या शिरे अंतरीं ॥२ ॥
गेलें घाबरुनी सुचे न मजला तेव्हां करावें कसें
चित्ताची समता समग्र ढळली तें होय वेडें पिसें
केला कोप असा कसा मजवरी देवा कळेना मला
ऐसें मी वदलों ध्वनि प्रकट तों मूर्तीतुनी जाहला ॥ ३ ॥
" आकारास वृथा भुलूनि रडसी मूढा कशाला बरें
नाहीं शाश्वत नामरूप अवघें जाई लयाला त्वरें

जें चैतन्य चराचरीं विलसतें पूजी तया शोधूनी
आहे निश्चल, पूर्ण, अव्यय, खरें तें ऐकलें या जनीं ॥४॥
राहे ते हृदयांतही तव, न कां त्या पाहसी शोधुनी "
ऐशी जागृति देउनी मम मना तो लीन झाला ध्वनी
आत्माराम कसा दिसेल मजला हा मंत्र रात्रंदिनीं
माला घेउनि मी करीं जपतसें भावें मनापासुनी ॥ ५ ॥

——— माधवानुज.

## ६१ दया

पृथ्वी:-घनांबु उतरे नभींहुनि सुखें तशी हो दया
न कष्ट पडती तिला प्रकट सत्वरी व्हावया
जयावरि घडे दया, करित जो दया ती स्वयें
सवें उभय पावती सुखकृतार्थता निश्चयें ॥ १ ॥
बलिष्ठ बलिमाजिही, वितरते नृपालांप्रती
जशी द्युति तशी न ते मुकुटकुंडलीं पावती
सुचिन्ह नृपयाष्टिही, खचित ऐहिका शक्तिचें
म्हणूनि भय वाटतें जनमनास भारी तिचें ॥ २ ॥
दयागुण बलाहुनी परि नृपाचिया श्रेष्ठ तो
परेशगुणधर्म हा, नृपहृदासनीं शोभतो .
जधीं सदयमानसें नृप खलां करी शासना
नरेंद्रबल तेधवां, खचित दिव्य भासे जनां ॥ ३ ॥

——— कवितावनविहारी.

## ६२ मित्रा विहंगा !

दिंड्या:—कुठें आतां जाशील ? विहंगा रे
यत्न मित्रा खुंटले तुझे सारे

पंख फडफड कां व्यर्थ करीतोसी
चंचु माराया उगीच कां पहासी? ॥ १ ॥
पुरे झालें तव यत्न उगा राहें
मृदुल तनुला दुखविणें उचित कां हें?
तुला नाहीं देणार मुळीं त्रास
सुखें माझ्या करिं, करीं सख्या वास ॥ २ ॥
नांव सांगें तव काय असे राया
कुणीं केली ही मृदुल तुझी काया?
रंग अनुपम अगणीत चमकती रे
अम्हां दुर्लभ तुज कुणी दिले सारे? ॥ ३ ॥
भ्रमणशक्ती ही, चपलता तुझी ही
कुणीं सांठविली सांग तुझ्या देहीं?
मधुर सुस्वर तव कंठ कुणी केला?
सांग ऐकाया जाहलों भुकेला ॥ ४ ॥
दिली ज्यानें मज श्रेष्ठ मनुजकाया
करी माझ्यावरि नित्य दया माया
त्याच देवानें काय तुला केलें?
होय म्हणशी? लाडक्या पुरे झालें ॥ ५ ॥
सवें माझ्या चिमुकल्या गड्या राहीं
भीति शंका नच धरीं मनीं कांहीं
सुबक पंजर आणीन तुझ्या साठीं
तुला नाहीं होणार कधीं दाटी ॥ ६ ॥
तुला देइन मिष्टान्न सदा खाया
उद्यां नूपुर बांधीन तुझ्या पायां

सर्व सौख्यें देईन नित्य तूतें
सवें माझ्या चल सोनुल्या घरातें ॥ ७ ॥
कांपसी कां गोजिऱ्या थरारोनी
नेत्र गेले कां अश्रुनीं भरोनी?
दीनवाणी कां पाहसी मला तूं?
सांग मनिंचा निःशंक काय हेतू? ॥ ८ ॥
नको उघडूं तव चंचु, नको बाळा
हेतु अंतरिंचा तुझा ओळखीला
सर्व सौख्यें तुज मृत्युच्या समान
जरी पडशी पंजरीं बंदिवान ॥ ९ ॥
नको राहूं पंजरीं दीनवाणी
भोग स्वातंत्र्यानंद सुखें रानीं
पारतंत्र्याचें दुःख मला ठावें
मीच तुजला पंजरीं कसें न्यावें? ॥ १० ॥

**द. कों. घाटे.**

## ६३ माशांची तरुणीस विनंति.

( एके दिवशीं एक तरुण स्त्री गंगातटाकावर क्रीडा करण्यासाठीं गेली. तेथें तिनें कोळी लोकांकडून पुष्कळ मासे धरविले व ते एका करंडींत घालून त्यांच्याकडे ती मोठ्या कौतुकानें पहात बसली. त्यावेळेस दीन माशांनीं तडफड करून तरुणीची प्रार्थना केली; म्हणून खालील पद्यांत मासे तरुणीस उद्देशून बोलत आहेत, अशी कल्पना केली आहे. )

द्रुतविलंबित.---करुनि वास सदा सलिलोदरीं
कमितसूं निजजीवित सुंदरी

पद कधीं नच टाकित भूवरी
झगडती नर जेथ परोपरी ॥ १ ॥
सकळ सोडुनि भीति मनांतली
इकडुनी तिकडे फिरतों जळीं
न कवणास उपद्रवितों तिळ
करिसि कां ललनें अमुचा छळ ॥ २ ॥
बल जरी दिधलें विधिनें तुला
उचित का छळणें वद दुर्बला
असति जे बहु दीन जगांत या
करिसि कां न सहाय्य बरें तयां? ॥ ३ ॥
अधम ते जन हाय! तरी किती
प्रभु मनोरथ जे अवमानिती
अबलरक्षण हें बलकार्य गे
करिसि कर्म कसें मग वाउगें ॥ ४ ॥
फसविणें स्वहितास्तव गे परा
खचित मार्ग न हा दिसतो बरा
फुकट सुंदरि आमिष दाउनी
हरिसि कां अमुचे असु या क्षणीं ॥ ५ ॥
तरुवरी विधिनें सृजिलीं फळें
विविध गोड सुकंद तशीं मुळें
पुरति कां न तुझ्या उपजीवना
म्हणुनि देसि अम्हाप्रति यातना ॥ ६ ॥
करिसि पातक कां आपुल्या करें
कुमति सोडुनि दे असली त्वरें

अनुचित प्रमदाहृदयास या
कृति, सदैव जयांत वसे दया ॥ ७ ॥
कृति कठोर गडे करुनी अशी
निजयशास कशास कलंकिशी
वरुनि कोमल तूं दिससी परी
कठिण कां इतुकी वद अंतरीं ॥ ८ ॥
तडफडून झपीं बहु यापरी
विनविली ललना, न तदंतरीं
उपजली करुणा लवही परी
त्वरित जाय तयांसह ती घरीं ॥ ९ ॥
वसंततिलका:—पुष्पासमान मृदु जो बनवी शरीर
निर्मी विधी हृदय त्यांत किती कठोर
वाटे असें बघुनि निर्दय त्या स्त्रियेला
झाला विषाद कवि-कोमल-मानसाला ॥ १० ॥

माधवानुज.

---

## ६४ शोकक्षोभ.

( कवीच्या एका प्रिय मित्राची पत्नी वसंत ऋतूंत निवर्तली. त्या-वेळीं व तदनंतर त्या विधुर मित्राच्या मनांत आलेल्या कल्पना, ह्या पद्यांत गोंविल्या आहेत. )

श्लोक पृथ्वी:—वसंत कुसुमोद्गमें मदन-मित्र हा रंगला,
निशापतिसवें निशा विमल शोभते मंगला,
सुगंध लुटितो सुखें पवन मंद पुष्पांतला,
सुरोपवन-साम्य ये समयिं शांत या क्ष्मा-तला ॥ १ ॥

न दाह अणु राहतो, विधु करी सुधा-स्यंदन,
मही तनुस लावितो निजकरें जणूं चंदन;
जलाशय-जळीं उडु-ग्रह-शशी भले रंगले-
जणूं गगन-भाग हे वरुनि भूतळीं भंगले ! ॥ २ ॥
परी समय अंतका! तुज असा कसा लाभला-
गृहांत मम चालण्या अवचितांचि घाला भला?
शिरोनि अदया खळा! न कळतांचि चोरासम—
कसें सदनरत्न हें सहज चोरिलें त्वां मम? ॥ ३ ॥
सखी नयवती दया-गुणवती सुशीला सती,
तुवां अहह ! चोरिली, मजसि देउनी त्रास, ती
मनस्तिमिरनाशिनी शशिकला निमाली अहा !
प्रिया न हरिसी यमा! मम बहिश्चर प्राण हा ॥ ४ ॥
तितीर्षु शिरलों बळें भव विशाळ सिंधू-दरीं
परी अहह! सत्वरीं यम हरी सु-भार्या-तरी;
गरागर फिरावतो मज मनोरुजावर्त रे!
सुदीन बळहीन हा विकळ मीन तैसा तरे? ॥ ५ ॥
सखीसहित अंतरे मज मनःसमाधान तें,
निधान, मम भानही हरपलें सुखस्थान तें;
सखा परम भंगला, सदन-देवता मंगला
मला विजन जंगलासम गमे भला बंगला ॥ ६ ॥
वसंत उधळी असा सुमनसां, रसा ही नटे !
विटे मन परंतु हें, सुखपयोधि सारा अटे;
जरी कुसुमवृक्षहो! सुमभरें बरे डोलतां,
फुले हृदय-वृत्ति ही मम न, जेवि वंध्या लता! ॥ ७ ॥

न वायु मज भासती सुरभि पुष्प-गंधामुळें
मदीय वपु हें अति प्रखरशा उसासें जळे;
रसेवर असे जरी धवल शीत ही चंद्रिका
न हंत! परि ती हरी मम मनःस्थिता तंद्रि कां? ॥८॥
सुरम्य मुख, केश ते असित शोभले ज्यावरी,
जणूं मधुप-संहती सुरभि शुभ्र कंजावरी;
परी मृतिकळा अजी पसरुनी तयाच्या वरी
हरी मम धृती, करी हृदय-वृत्तिला बावरी ॥ ९ ॥
प्रसन्न-मुखभा सखे! विटलि लोपुनी चित्कळा
करी फटफटीत ही स्फटिकशी मृतीची कळा;
मिटोनि तव लोचनें, गमसि तूं समाधिस्थ गे!
प्रशांतहि तुझ्या मुखा बघुनि मद्धृती ना तगे ॥१०॥
जसेंच धरिलें तुवां निजाशिरीं ममाज्ञे मुदें
तसें न वरिलें कधीं रुचिरवर्तने गे मुदे;
परी अळवितों अजी दयित नाथ हा कामुक
तरी न तव बोलतें मुळिंच शब्द हा! कां मुख? ११
अतीव रुचले तुला गुण, न ते अलंकार जे—
न चित्त तव दूषिलें सखि! कधीं कु-शंका-रजें;
असे तव सदा ‘ वदों मशि सखा ’ परी काम हा,
तरी सुमणि जाहला निरस खापरी का महा! ॥१२॥
मृदू कच- कलाप हा विखुरला कपोलीं पहा,
प्रिये पदर सांवरी, श्रम तुला पडे काय हा?
अहा! श्रम तुला न गे! मजचि तो पडे सुंदरी!
विनीत, अविनीत वा, तुज समान दोन्ही परी ॥१३॥

त्यजूनि मजसी, तसें सकल आप्त-वर्गी जनां !
करीसि गमनास, हें अनृत वाटलें मन्मना;
तशांत तनुही तुझी बघुनि चित्त मोहें भ्रमे,
सजीव तुज कल्पुनी, अविनयें प्रिये! मी श्रमें ॥१६॥
विवर्ण अधरोष्ठ हा मज गमे हले ह्या घडीं,
मधून मग भासतें हळुच वाजली बांगडी;
तरंग उठती असे, क्षण मनीं भरे उत्सव,
त्वरें सकल तो विरे, पसरतो निराशोद्भव ॥ १५ ॥
किती वदन पांडुता! सकल रक्त हें आटलें,
शरीर किति थंड हें! अवयव प्रिये! ताठले,
मधून मृदु वायु हा करि शिरोरुहां चंचळ
सजीव गमसी तयें मनिं भरोनि आशा-बळ ॥ १६ ॥
सरोज-मृदु अंग हें, दडदडीत ही घोंगडी,
गडे! अहह! हा घडे उलट योग कां ह्या घडीं?
परंतु तिरडीवरी निरवितील गे काय हा!
विरागिजनही तदा न म्हणतील गे काय 'हा!'!
न काढिति तुझी तनू आजि गृहांतुनी सुंदरी!
त्यजून मम जीव हा, तनुस सत्य ये बाहिरीं!
दिसे सदन शून्य हें, गुततसेंच माया तमीं,
गडे! धडपडे, पडें, दृढ अडें, बुडें यांत मी ॥१८॥
म्हणालिस, 'अखेरिच्या हळदकुंकुवातें घरीं
करीन' तरि आणिले सुमदळांस नानापरी;
परी तदुपयोग हा अजिं घडेल निर्वापणा
न दैव-लिखितास ये फिरवितां कधीं आपणा ॥ १९॥

तुझी तनु अखेरिच्या हळदकुंकुमा लाभली !
गळ्यांत सखि ! घातली तुलसिपत्र-माला भली;
असें वसन पीत हें, सुवलयें, पदीं जोडवीं,
सुदैव तव शोभतें ! तुज सती-यशा जोडवी ॥ २० ॥
न हीं हळद लाविली तुज, परंतु हालाहलीं—
मदीय तनु माखिली, प्रखर जाहली काहिली;
सुकुंकुम न चांगली तुलसिपत्रमाला गलीं,
सशोणित मदीय गे असिलता गळीं लागली ॥ २१॥
न ओटिंत तुझ्या सखे ! रुचिर घातलें श्रीफळ
शिळाच मम ती शिरीं ! सकळ जन्म हा निष्फळ
सदा सुजन बोलती अमित- मंगळ श्रीफळ
अमंगळाचि जाहलें, प्रखर दुर्विधीचें बळ ॥ २२ ॥
करी तुजसि शीतही जनन कां प्रिये ! त्रास तें,
अहा ! खचित मूढ मी, स्वमति ती मला हांसते;
चिता—ज्वलन-दाहही तुज जरी अजीं सोसती,
कथा हिमजलाचि ही मग कितीक भासो ? सती !॥२३
जिला कवळिलें सदा सपुलकीं रसें ज्या करीं,
रचीति कर तेच हे अधम लांकडें तीवरी !
गणूनि जिस जीवितासम विसंबलों ना कधीं
स्वतां दहन ती तनू करुं कशी चिताग्नीमधीं ? ॥२४॥
न पुण्य मम होय तें, दिसत जेंच त्या लांकुडीं,
अखेरिस शिवे तुझी, सुतनु हंत ! ज्याला कुडी;
सुखी खचित मानितों जरि हि काष्ठ होतों गडे !
तुझ्यासहित जें पडे दहनिं; दग्ध तेवीं घडे ॥ २५ ॥

स्मशान जरि सोडुनी परतलों, न होई चिता,
अदृष्ट नयनापुढें धगधगे सदा निश्चिता!
न येइ मन हाय! तें जरि शरीर आलें गृहीं,
चिता तनु तुझी करी मम मनासवें भस्म ही २६
सचक्षु असुनी, दिसे न मज, जाहलों अंध, हा!
तुझा विरह तोडितो सकल-सौख्य-संबंध हा;
तरंगसम चंचला अखिल संसृती हें कळे,
परी उमळतें मनीं, करुनि यत्न ही नाकळे ॥२७॥
भरे उदक लोचनीं, स्मरुनि ती सदाकाळ जी
मदर्थ शिणुनी तुवां प्रबळ वाहिली काळजी;
न रूप बहु मानिलें, सुगुण मात्र हे मानसें
असे गुणगणास तें अमित मोल, हेमा नसे ॥ २८ ॥
कितीक दिसती खुणा, तव गुणांस ज्या दाविती,
बघून मन त्यां जळे, उमळुनीहि येतें किती!
मना सतत मोहितीं पसरलीं तुझीं स्मारकें,
सखे! गुणचि ते तुझे रडविती अरी सारिखे ॥ २९ ॥
प्रभातिं मज संप्रतीं उघडितां स्वनेत्रां कधीं
दिसे न मुख सस्मित प्रमुदित प्रिये! संनिधीं;
मृदुस्वर वदे न वा ‘ अजुनि कां न निद्रा पुरे?’
खरें सकल लोपुनी, स्मृतिज हंत! आतां उरे!॥३०॥
सदा मुदित वृत्तिनें स्वगृह-कर्म आटोपिलें,
प्रसन्न तव चित्त ना दगदगीत ही कोपिलें;
सुधावच तुझे कधीं नच कुणास ही झोंबलें,
हृदब्ज फुललें भलें, कधिं न देखिलें कोंबलें ॥३१॥

धुवोनि तनु उज्ज्वळा, विमल नेसुनी अंचळा,
शिरीं तिलक लाविला, अवरुनी कचां चचळा,
समोर तव मूर्ति ती जणुं दिसे मला लोचनीं —
असे बसालि पूजिण्या तुळस रम्य वृंदावनीं ! ॥ ३२॥
समीप गडवा, गडू, सजळ अर्घ्य, नीरांजन —
सुकुंकुमकरंड तो, सुरभि पांढरें चंदन,
सुरेख गुडपात्र तें, तबक त्यांत पुष्पें दलें,
सुभक्ति-माणितें असे हृदय-कोंदणीं कोंदलें ॥ ३३ ॥
‘ असो पति सुखी ’ अशी तव असे शुभा मागणी
यशोद्युतिगुणें खरी असासि रत्न भामा-गणीं;
कसें असासि बोललों, भ्रमतसे मती ही मम
सती मज अलभ्य ती, अभ्र-नगास मुक्तीसम ॥ ३४ ॥
फुलें, सुबक आसनें, गळपटे चिजा बारक्या
क्षणक्षणिं न जाचती परि दुज्या तयांसारिख्या;
व्यवस्थिति घरांत ह्या तव गुणाचि दे साक्ष, ते
करी हृदयिं जीं, न तीं शमविते सुषुप्तीक्षतें ॥ ३५ ॥
सुषुप्ति मज दाविते असह नित्य दुःस्वप्न तें
समूळ खणितात जे अहह ! मन्मनः शांतते
कधीं अनुभवीन गे ! सरस रम्य सुस्वप्न मी
तरी त्वरित जागृती ढकलि दुःख-शोक भ्रमीं ॥ ३६ ॥
जगांत असुनी सखे ! तुजविणें जगावेगळा !
सजीव असुनी गमे सकळ लोपली चित्कळा !
स्वतंत्र असुनी कसा जखडलों गुलामासम ?
प्रकाश असुनी दिसे मज समस्त झालें तम ! ॥ ३७॥

असे हृदय शून्य हो विजन सर्व झालें गृहीं
सकोश गतसत्व ही विरस भासते हो मही;
नसे मजासि संगती, पसरला तमोभार हा,
सुमित्रसम तूं तरी मम समीप शोका ! रहा ! ॥३८॥

—— बा. अ. भिडे.

## ६५ परमेश्वर पूजा.

अभंग——व्यापूनी विश्वातें । राहे नारायण ॥
तया आवाहन । करूं कोठें ॥ १ ॥
आधार सर्वांचा । आसन तयातें ॥
कोठें द्यावें मातें । समजेना ॥ २ ॥
स्वच्छ जो सदाही । अर्घ्यपाद्य त्याला ॥
व्हावें तें कशाला । समजेना ॥ ३ ॥
शुद्ध जो स्वभावें । तया आचमन ॥
निर्मलातें स्नान । कासयाला ॥ ४ ॥
विश्व हें जयाचे । सांठविलें पोटीं ॥
तयातें चिंधोटी । कासयाला ॥ ५ ॥
जो का निराकार । तयातें जानवें ॥
कैसें म्यां घालावें । समजेना ॥ ६ ॥
सौंदर्याचा हेतू । तया भाराभर ॥
व्हावे अलंकार । कासयातें ॥ ७ ॥
आहे जो निर्लेप । त्यासि गंध कैंचें ॥
हार कुसुमाचे । निर्वासना ॥ ८ ॥
नित्य तृप्त त्यातें । नैवेद्य कशाचा ॥
तांबुलहि साचा । कासया तो ॥ ९ ॥

ब्रह्मांड–नायका । केशाची दक्षीणा ॥
केंची प्रदक्षीणा । अनंतातें ॥ १० ॥
अद्वय जो आहे । तया नमस्कार ॥
कैसा घालणार । समजेना ॥ ११ ॥
ज्याचे गुण गातां । वेद घेति मौन ॥
तयाचें कीर्तन । काय करूं ॥ १२ ॥
परंज्योति जो का । तया नीरांजन ॥
आणूं मी कोठून । ओवाळाया ॥ १३ ॥
अंतर्बाह्य पूर्ण । विसर्जन त्याचें ॥
कोठें करायाचें । समजेना ॥ १४ ॥
षोडशोपचार । विधी हा पुजेचा ॥
चंद्रशेखराचा । अभंग हो ॥ १५ ॥

चंद्रशेखर.

## ६६ चैतन्यदूत.

ओव्या—गा ! सकलज्ञानानिधाना !, चैतन्या ! परम पावना !,
ह्या देहीं होतासि पाहुणा, आजवरी ॥ १ ॥
परी यमधर्म दंडपाणी, होवोनि ठाकला सन्निधानीं
उ उक्त झालासे हननीं, शरीराचिया ! ॥ २ ॥
घडीभरें हेंचि कलेवर, निश्चयें ताडील दंडधर,
होईल तें जडतर, त्वद्वियोगें ॥ ३ ॥
जाणोनि तुझी तुटातुटी, खेद संचरे हृदयपुटीं,
परी जे जे होणार गोष्टी, कदाही ते चुकेना ॥ ४ ॥
देही म्हणविती तयांची, मरणही प्रकृतीच साची,
उक्ती ऐशी कविरायाची, रघुवंशीं प्रसिद्ध ॥ ५ ॥

तीअन्वयें सांडोनि मोह, ठेविलाचि पाहिजे हा देह,
यामाजीं नसे संदेह, तिळमात्र ॥ ६ ॥
आजवरी तुज संगतीं, काळ कंठिला म्यां जगतीं,
नाना अनुभवांहीं मती, परिपाकातें पावली ॥ ७ ॥
हा तूझा उपकारगिरी, लंघूं येईल मातें तरी,
पंगूही धवलगिरीवरी, अनायासें चढेल कीं ! ॥ ८ ॥
असतां इतुकाही तव ऋणी, लज्जा झुगारुनी वैरिणी !
संप्रति संदेश तुज लागोनी, देतों कांहीं ॥ ९ ॥
सोडोनि माझें कलेवर, घेवोनि माझा निरोप भार,
तो सांगाया धरणीवर, ठायीं ठायीं विचरावें ॥ १० ॥
मातें आलें बोलावणें, निरुपाय झाला या कारणें,
नातरी मीच जातों जातीनें, झडती घ्याया सकळांची ! ।११।
जगीं राहोनि आजवरी, खोटीं नाटीं जाणिलीं सारीं
तीं ज्यांचीं तयांच्या पदरीं, नेवोनि घालितों साचार ! १२
परी, काळें धरिले हातपाय, तेणें अगदींच जाहलों गाय !
तरी सिद्धीस नेवोनि हें कार्य, तूंचि पुरवीं मनोरथ ॥ १३।
यद्यपि असला महाजन, तथापि न भ्यावें त्यालागुन,
कीं, सत्यमेव ज्याचें प्रमाण, अभय जाणिजे तों लोकीं ॥१४
प्रथम जाई राजसभेतें, निरोप सांग तूं तियेतें,
कीं दावितेस अवडंबरातें, असतां पोकळ अंतरीं ! १५
ते मिरविसी वरवर, आंतोनि साराचि अंधार !
देऊं लागतां प्रत्युत्तर, ‘ मिथ्या ’ म्हणोनि गर्जावें ॥१६॥
पुढें जावें तयाप्रती, जे वक्ते म्हणोनि गाजती;
धिक् तुमचीं व्याख्यानें तीं, पुरे करा ! म्हणावें ॥ १७ ॥

वक्तृत्वांची घालोनी दळणें, धर्मनीतीचीं लाविता वळणें,
लोकोपदेशकांचा आव तेणें ! व्यर्थ कींहो दाविता ॥ १८ ॥

' क्रियेवीण वाचाळता, व्यर्थ आहे ' जाणतां;
पुन्हां तसेंच वागतां, जन तेणें निंदिती ! ॥ १९ ॥

ऐसे शब्द पडतांचि कानीं, ठिणग्या लागोनियां मनीं,
ताडूं येतां प्रतिवाग्बाणी, ' मिथ्या ' म्हणोनि गर्जावें ! २०

पुढें जे जे सत्ताधारी, जावें तयांच्या मंदिरीं,
पाणी पितां इतरां करीं, म्हणोनि त्यांतें सांगावें ! ॥ २१ ॥

परकीयांच्या भरोनि मुठी, प्रियता संपादिता मोठी,
भिन्नभाव धरोनि पोटीं, दुर्बळ होवोनि बैसतां ! ॥ २२ ॥

ऐसें ऐकोनि सत्ताधारी, उलटोनी बोलती तरी,
' मिथ्या ' म्हणोनि ते अवसरीं, अंगीं तयांच्या लागावें ॥ २३

पुढें जे जे राजपुरुष, चाळिती राज्यसूत्रें अशेष,
त्यांतें बजावूनि विशेष, निरोप ऐसा सांगणें ॥ २४ ॥

श्रेष्ठपदाची हाव मनीं, द्वेषपूर्ण तुमची करणी;
यावरी बोलतां प्रतिवचनीं ' मिथ्या ' जल्पतां म्हणावें २५
पुढें जावें त्यांप्रती, जे शौर्याची शेखी मिरविती;
म्हणोनि उधळोनि संपत्ति, महती तुम्ही याचितां ॥२६ ॥
आज्ञा चालावया आपुली, तुम्ही निजसर्वस्वें विकिलीं !
यावरी उत्तरें त्यांही दिलीं, तरी तीं ' मिथ्या ' म्हणावीं ! २७

आतां प्रत्येकातें वेगळा, संदेश देतां उणा आगळा,
बा ! चैतन्या ! तुझिया गळां, ग्रंथकथा पडेल कीं ! ॥२८॥

जाणोनि कथितों संक्षेपानें, अनुभवासि आलें जें जें उणें,
तें ज्यांचें तया निर्भिडपणें, सांगणें गा, उदारा ॥ २९ ॥
भक्तींमाजीं भाव नसे, प्रीति विषयांधत्वेंचि वसे
काळ केवळ धांवतसे, देह म्हणजे मृत्तिका ॥ ३० ॥
घडोघडी आयुष्यनाश, सन्मान पावे विपर्यास,
अपाय होई सौंदर्यास, कृपेची हो अवकृपा ! ॥ ३१ ॥
कोटिक्रमाचें भाषण, उकरोनि काढी भांडण,
शहाण्याचें शहाणपण, अतिरेकातें जातसे ! ॥ ३२॥
बलवंतांठायीं अविनय, चतुरांठायीं कापट्यविजय,
धर्मबुद्धीतें औदासिन्य, कायदे जाहले वाग्युद्ध ! ३३ ॥
दैवें धरियली अहंता, सृष्टीनें धरिली नश्वरता,
मित्रगणही निर्दयता, न्याय झाला दीर्घसूत्रि ॥ ३४ ॥
कळाकुसरींत सार नसे, कीं, लोकीं रुचिभिन्नता वसे
विद्यार्थी झाले निःसत्वसे, पोपटपंची शिक्षणें ! ॥ ३५ ॥
नगरांतोनि विश्वास गेला, जनपद अज्ञानांत बुडाला
मानव मानभाव जाहला, दया दूर झुगारिली ॥ ३६ ॥
गुणांची पारख नसे लोकीं, जाणतीं राहिलीं थोडकीं,
बाकी सारीच गाजरपारखी, सद्गुण तेणें लोपले ॥ ३७ ॥
बा चैतन्या ! जे जे आतां, निरोप झालों निरोपिता,
ते तूं लोकीं बोलतां, रहस्यस्फोट होईल कीं ! ॥ ३८ ॥
तेणें चवताळोनि दुर्जन' करूं येतील तव हनन,
परी ऐसा होय कवण, कीं जो तुझा घात करी ? ॥ ३९ ॥
" शस्त्रें तुजला न छेदिती, पावक न करीत आहुती,
जळें तुजला न बुडविती, पवनही शोषूं शकेना ॥ ४० ॥',

ऐसें अभयाचें वचन, जेथें बोलिला सच्चिद्घन,
तेथें पामरां नरांकडोन, काय व्हावें वांकुडें ! ॥ ४१ ॥

चंद्रशेखर.

---

### ६७ इंद्रधनुष्य.

उपजातिः—मेघोदयें नील नभस्तलाला
विभूषवी वासव-चाप-लीला
करी तिचें सुंदर चित्र रूप
आश्चर्ययोगें जन चित्ररूप ॥ १ ॥
नभस्तला माणिक पाच नील
यांचें जणुं कोंदण रम्य-शील
कोणी करी शिल्पकला-विहारी
मयासुराचा मद जो निवारी ॥ २ ॥
पयोधरीं भासुर चित्रहार
नभःश्रियेच्या करितो विहार
अनंगचापप्रतिमाच किंवा
घेई नभश्चित्रपटीं विसावा ॥ ३ ॥
परोपकारीं निज जीवनाला
वेचावया अंबुदराज आला
तदादरा इंद्रधनुःस्वरूप
शोभे जणूं तोरण रम्यरूप ॥ ४ ॥
अनेकरत्नावलिबद्धसेतू
मंदाकिनीमंडनमुख्यहेतू
असे, दिसे भव्य कमान त्याची
न मूर्ति ही इंद्रशरासनाची ॥ ५ ॥

मुकुंदवक्षस्थलवासलोला
विचित्रवर्णा वनपुष्पमाला
पूर्वी कशी शोभलि हें जनांला
आली धनुश्री जणुं सांगण्याला ॥ ६ ॥

नभःपटा उज्वल वर्णलेप
भरूनियां सुंदर इंद्रचाप
रेखी करांनीं सविता स्वकीय
ही मानवां साध्य न गोष्ट होय ॥ ७ ॥

रविप्रभेची शुचि बाह्य काया
तशीच कीं आंतहि हें पहाया
प्रकाशवर्गीकरणक्रियेचा
प्रयोग होतो गगनांत साचा ॥ ८ ॥

" परस्परस्नेहवशें स्वताची
शोभा चढे सर्वहि सहंतीची "
हें सांगण्या तत्त्व गमे जगाला
शोभे नभीं सुंदर वर्णमाला ॥ ९ ॥

दिव्यप्रभाभूषित चापकांती
पहावया उन्मुख लोक होती
अधिष्ठितां उच्चपदा जनांची
कोणाकडे दृष्टि वळे न साची ॥ १० ॥

धनुष्य हें निर्गुण वक्रशील
टिके जरी केवळ अल्पकाल

१ रंग पक्षीं अक्षरें. २ ज्या हीन पक्षीं गुणहीन,

तरी तयाला वश लोक होय
अतुल्यसौंदर्यरसें तदीय ॥ ११ ॥

**वसंत ति०**—होतां पयोदपटलीं क्रमपूर्व लोप
सांगे जनां घनरवें जणुं इंद्रचाप
" आयुष्य अल्पचि असो परि लोकमान्य "
" होवोनि जा मिळविण्या परलोक धन्य" ॥ १२ ॥

—— राधारमण.

**६८ जाळ्यांत सांपडलेला मासा धीवरास म्हणतो.**

**द्रुतवि०**—अजि सांपडलों तुझ्या करीं,
करिं कांहिं सुविचार अंतरीं
सदया ! मज जीवदान दे
न करिं मद्वध धीवरा ! मदें ॥ १ ॥
तुज दे जगदीश सन्मती
करिसि कां मग नीच ही कृती
तुज यांत न लेश भूषण
वरिसि जाणुनि पाप दारुण ॥ २ ॥
बल थोर वसे तनूंत या
तरि दिनावनिं लावणें तया
अथवा लघुजीवपीडनीं
बरवा मार्ग ? विचार तूं मनीं ॥ ३ ॥
जगिं धन्य तशा वनस्पती
जगदिशें बघ निर्मिल्या किती
परि मानवावर्ग-जीवना
पुरति त्या नच हाय ! हाय ! ना ? ॥ ४ ॥

घडतां अपराध कोणता?
तरि अम्हांकडुनी न जाणतां
म्हणुनी अमुचा असा वध
करितां राहुनि हाय! सावध ॥ ५ ॥
सुखरूप जलांत राहतो
मल सारा हुडकोनि भक्षितों
म्हणुनीच तुम्हांस निर्मल
मिळते कीं नच सांगा बा जल? ॥ ६ ॥
लघुमीन न ताप देतसे
उलटा तो उपयोगिं येतसे
वधणें मग त्यास, धीवरा
बहु अन्याय न मार्ग हा बरा ॥ ७ ॥
धरुनी हृदयांत अज्ञता
त्यजितां हाय! कशी कृतज्ञता
करणें लघुजीवभक्षण
सदया! हें न महत्वलक्षण ॥ ८ ॥
'परपीडन घोर पाप दे'
बरवी सज्जन वैखरी वदे
नकळे परि केंवि हें तुला
त्यज आतां तरि दुष्ट हेतुला ॥ ९ ॥
असु कंठिं धरोनि आदरें
करुणा मी तुज भाकितों बरें
सदया! धरुनी दया मनीं
मुक्ततातें मज साधि सोडुनी ॥ १० ॥

मालिनी—करिल तुजवरी तो सत्कृपा विश्वपाल
उघड उघड आतां धीवरा ! शीघ्र जाल
करि मजसि खुला मी त्वद्गुणा गात गात
करिन जलविहारा, धीवरा, सत्सुखांत ॥ ११ ॥

—— करमणूक, वर्ष ११ वें अंक २१.

## ६९ स्वप्न.

इंद्रवज्रा—चैतन्य जो ओतित जीव लोकीं
तो पावला भास्कर अन्यलोकीं
होई क्रमें दैनिक मिश्र घोष
संधि प्रकाशासह नाम शेष ॥ १ ॥
स्थलीं स्थलीं दीपलतावलीला
ज्योतिर्मयी पुष्पविकासलीला
विभूषवी चालविण्यास साचा
व्यापार जो जागृति-माळिणीचा ॥ २ ॥
विनाशुनी दीपपरंपरेला
आधार जी जागृतिजीविताला
सुषुप्ति शांतिप्रद सिद्ध होय
वर्चस्व लोकीं करण्या स्वकीय ॥ ३ ॥
कंठीं जिवांच्या मृदुबाहुपाश
करूनियां अर्पण सावकाश
मोहूनियां इंद्रियवर्ग सर्व
निद्रा स्वसत्ता मिरवी सगर्व ॥ ४ ॥
हळूहळू बालदशा त्यजोनी
नक्षत्ररत्नीं तनु भूषवोनी

तारुण्य-भावें रजनीं विराजे
सुषुप्तिचा अंमल पूर्ण गाजे ॥ ५ ॥
शुभंकर श्यामल शांत शान
सुषुप्तीचें राज्य हरीत भान
पराजिता जागृति दे उसासे
कोणासही दास्य न गोड भासे ॥ ६ ॥
" मातें मिळे आश्रय कोण आतां "
चिंतेस ही पातली थोर चिंता
विचारपंक्तीस पडे विचार
करीतसे दुःखचि दुःख फार ॥ ७ ॥
निद्रा विनिद्रा निजराज्य तंत्र
पाळी जरी दक्षपणें सुयंत्र
तरी तया ऱ्हास कदा चुकेना
लाभे न वास स्थिर संपदांना ॥ ८ ॥
साधावया योग्य रिपूंस वैर
सुषुप्तिचा दीन दशाप्रकार
करीतसे उत्सुक जागृतीला
तदीय राज्यस्थिति दर्शनाला ॥ ९ ॥
चारावलीशी बहुरूपधारी
मार्जारिशी केवळ मंदचारी
राज्यीं शिरे जागृतिवैरिणीच्या
छाया जशी अंतरिं आरशाच्या ॥ १० ॥
विचार नैसर्गिक नित्यमित्र
जाई दिनश्रीसह जेंवि मित्र

संगें तिच्या तीसम ज्या हुरूप
स्वीकारण्याला विविध स्वरूप ॥ ११ ॥
अन्योन्यकंठार्पित बाहुपाश
सुषुप्तिचा आक्रमिती प्रदेश
विचार तो जागृति तीच अंतीं
सुषुप्तिच्या सं-मुख नीट येती ॥ १२ ॥
नरेंद्रशी जागृति जे विशाल
निर्मी तदा अद्भुत इंद्रजाल[1]
त्या स्वप्न हें नांव मिळे जनांत
लाभे पदा अग्र चमत्कृतींत ॥ १३ ॥

—— राधारमण.

## ६९ पुराणनीतिमाला

आर्याः–मुदित बिभीषण सांगे धिक्कारी त्यास रावण स्वैर
तेणेंच नाश केला- 'बंधूशीं गैर बा असे वैर' ॥ १ ॥
सुर-वर-पदस्थ नहुषहि अहि होई लंघुनी मुनी सर्व
गेला अधोगतीला,-'येतां वैभव धरूं नको गर्व' ॥ २ ॥
नेई खल, अकलंका, लंकापति, पंकजाक्ष-राम-सती
पात्र बंधन अंबुधि,-'दुर्जन संनिध नको नको वसती' ॥ ३ ॥
कण्वें प्रेषित स-सुता स्वस्त्री जी, ती शकुंतला राजा
चिर करुनि विचारा घे,-'सहसा कोणी करूं नये काजा' ॥४॥
'अश्वत्थामा समरीं मेला' हें अनृत बोलुनी धर्म—
अनुतप्त मात्र झाला, 'पाप करी ताप दे न तें शर्म' ॥ ५ ॥
सुत-यौवन घेउनियां ययाति भोगोनि भोग भरपुर ते

१ जादुगार.

तृप्त न तिळही झाला,-' विषयाशा ही कधीं न हो पुरते'॥६
भार्गव न धीर साही,जधीं रसाही , न ही न-भूपाल ।
रण-रत निरंतर असे-' स्वीकृत कार्य त्यजीं न चिरकाल ॥ ७ ॥
हाणुनि टांचा साचा कालिंदीवासि कालिया चंड ।
तो नंद-नंदन वधी,-' दुष्टातें योग्य योजणें दंड ' ॥ ८ ॥
' पार्थाशीं न कर समर ' ह्या विदुर-वचास ठेवितां नांवें ।
धृतराष्ट्र-क्षय झाला,-' सुहृदुक्तीला सदैव मानावें ' ॥ ९ ॥
जरि पुच्छ जळे, प्रबळें असुरबळें बांधिलाहि निःशंक ।
लंका मारुति जाळी,-' पाळीं विपदींहि शौर्य अकलंक '॥ १० ॥
दुर्योधन-कर्ण-शकुनि-कपटें द्यूतांत धर्मराज हरे ।
वन-वास-त्रास घडे,-' खलांसवें द्यूत खेळणें न बरें ' ॥ ११ ॥
मख रक्षणार्थ गाधिज मागे सुत त्यास देउनी भावें ।
दशरथ वदान्य तोषवि,-' प्रियही अभ्यागतांस अर्पावें' ॥ १२ ॥
शिशुपाल क्रतुकालीं हरिला निंदी, जयास जन वंदी ।
तत्क्षण तत्क्षय होई,-'महाजनांतें कधीं न तूं निंदी. ' ॥ १३ ॥
कपटद्यूतीं रुक्मी बळरामा जिंकुनी तया हांसे ।
परि सत्वर वध पावे ,-' द्यूतिं हरे त्या न चिडविं उपहासें' ॥ १४ ॥
प्रबळ नृप-कार्तवीर्यासह रावण गर्व-मत्त करुनि रणें ।
मृगसम बंधन पावे,-' स्पर्धा थोरासवें न ती करणें' ॥ १५ ॥
' उचित न अतिचार ' अशा धन-द-वचें येइ रावणा क्रोध,
बांधी त्यातें युद्धीं,-'हत बुद्धीतें नको करूं बोध ' ॥ १६ ॥
वसुदेवें शांतविला मधुर-वचें कंस, जो धरी स्वकरीं-
असि देवकी वधाया,-' सामानें मूर्ख वश सदैव करीं ॥ १७ ॥
रुक्मांगद स्वपुत्रा सुधी वधी धीर मोहनी-वचनें

सत्यप्रतिज्ञ झाला,–‘ व्यसनींही शब्द मोडणें न जनें ’ ॥१८॥
सत्राजित मणिसाठीं दूषी, हरि तरि जिणूनि रघु-दास
त्या देइ आणुनी मणि,–‘ भ्यावें लोकीं जनापवादास ’ ॥ १९ ॥
राज्य हरी कुरू कपटें शक्ति असे तद्वधार्थ जरि साची
तरि वनि पांडव गेले–‘ वाट बघे धीर योग्य समयाची ’ ॥ २० ॥
वीर-शिरोमणि पार्थहि होई जाउनि विराट- नृप-देशा
नृप-तनयेचा नर्तक, ‘कालोचित ठेवि नित्य निजवेशा ’ ॥ २१ ॥
लंघुनि मारुति अब्धि, त्यजुनी, लंकेंत जो प्रविशला, भें
वीर-पुरः-सर झाला,–‘ करितां साहस सदैव यश लाभें ’ ॥२२॥
सुग्रीवास शुकासुर रावण संदेश आणितां धीट
कपिकरिं बंधन पावे,–‘ खळ जन-दूतत्व फार वाईट ’ ॥ २३ ॥
हर जिंकाया जाई प्रमद मदन तो परंतु निमिषांत–
देहांत अंत पावे,–‘ दुष्कर कार्या न घालणें हात ’ ॥ २४ ॥
करुणा-वरुणालय हरि साश्रु रडे बघुनि अंध अविवेकी–
सुतशोकदग्ध नृपती,–‘ दुःखित पाहोनि कळवळावें कीं ’ ॥२५॥
हीन रुचि क्षीण परी श्रीभवभालस्थ वंद्य चांद कसा
न तसा पूर्ण असे जो,–‘ श्रेष्ठाश्रय जगिं महत्व साधकसा ॥२६॥
दशमुख–दुष्कृति जाचे असुरां लंकेंत राहणारां ही
सदन–धना–त्यां मुकले–‘ दुष्ट नृप–पुरीं न शाहणा राही २७
स्त्रीसक्त पूर्ण होतां अंकित नृप अग्निवर्ण विषयांतें
त्या ग्रासिलें क्षयानें,–विषय न हे, तीव्र जाण विष यांतें २८
द्रुपदसुतेतें देतां कीचक कामांध तो खल त्रास
भीमकरीं मृत झाला,–‘ मातेसम मान पर-कलत्रास ’॥ २९ ॥
व्यूहिं लढे एकाकी नर-सुत खरशर अनेक टाकोनी

सर्वांनीं वधिला परि,–अरिनिकरीं शिरो न एकटा कोणी ३०
दुर्वासा मुनि शापी नृपांबरीषास त्या निरागास
हरि-चक्र ताप त्या दे,–‘ अस्थानीं दाखवीं न रागास ’ ॥३१ ॥
कंसें हंत! नृशंसें भगिनी-सुत बहुत मारुनी खळगा !
खणिला निजपतनार्थ,–‘ प्रारंभीं शाहणा न कृति खळ गा!’ ३२
मद्योद्धत ते यादव परस्परांचा करोनियां अंत,
हंत! प्रनष्ट झाले,–‘ कधीं सुरेतें शिवे न जो संत ’ ॥ ३३ ॥
ज्यांनीं कोपविला मुनि कपिल मदें शोधितां जनक-तुरगा,
ते सगर-पुत्र मेले,–‘ शांत मुनिस चेतवीति न चतुर गा! ’॥३४॥
सुमति चतुर मुनि गाधिज गेला श्वावृत्ति धरूनि ही स्वर्गीं,
त्या अप्सरेस भुलुनी,–‘ काम असे प्रबळ खळ षडरि-वर्गीं ’ ३५
भीमासी अवमानी मानी कुरुपति कुधी सभेमाजी,
तें नाशबीज झालें,- शत्रुत्वा हेतु न स्वतां व्हाजी! ’ ॥ ३६ ॥
जननि-वचन-तप्त वनीं तपुनी तप निश्चयें शिशुहि झाला,
ध्रुव तो की ध्रुवलोकीं,–‘ घाली सत्कीर्ति निश्चया माला ’॥ ३७॥
हरि घे ती पृथुकांची पुरचुंडी भेट दे सुदामा जी,
अर्पी सुवर्ण नगरी,–‘ सुमित्र दे साह्य आपदां माजी’ ॥ ३८ ॥
तापार्त पार्थ वांछी समरीं मोडूं निज प्रतिज्ञा त्या,
कृष्णोपदेश परि घे,–‘सुहित विचारीं जनाप्रति ज्ञात्या ’ ॥ ३९ ॥
पूजी हर, मागे वर नक्तंचर-वर वृकाभिधान परी,
गौरी हरण्या इच्छी,–‘ विश्वासीं दुर्जनीं न, नमन परी’ ॥ ४० ।

बा. अ. भिडे.

## ७० घनाभिनंदन.

### श्लोक–अश्वधाटी वृत्त.

आलास तूं ऐन वेळेस हें छान केलेंस, मोदा न सीमा, घना
रीतीच ही श्रेष्ठ लोकींच जो कष्ट-भोगी तया हृष्ट कीजे पुनः
पीकांस तूं खास संजीविका आस बा धन्य झालास वृष्टी करीं
तुष्टीस दे थोर होतील आभार भारी सुधाधार तूझी खरी ॥ १ ॥
साध्वीस जैशी न शोभा पतीवीण होईल ती क्षीण येई जरा ।
भेटे न जों कांत साराच आक्रांत नाहीं तिला भ्रांत काहीं जरा ॥
सारे अलंकार त्यांचा तिला भार अंगास अंगार निस्तेजही ।
नाहीं महीं कांहिं होई तिचा लाहि वाही पतीपायिं स्वत्वासही ॥२॥
सारा समारंभ व्हायास आरंभ जों जीवितास्तंभ भेटे पुनः
लाहो दुणावेल लावण्य वाढेल सौंदर्य येईल; तैसें घना ॥
सृष्टी-सती-चित्र झालें न हें चित्र आतां मुदें मात्र हांसे नटे ।
माता-मुखीं मोद बालांस दे नोद लीलेस ना रोध चिंता मिटे ॥ ३
तैसा सुता-पुत्र ओढे नद्या मूर्त लीलांस संसक्त आतां किती ।
त्यांच्या तटीं वृक्ष संफुल्ल ते साच गंधर्व ऐसेच मानी मती ॥
वातासवें गाननृत्यीं न ज्यां भान तेही प्रमोदूत त्यांच्यावरी ।
वृष्टी सुमाचीच तुष्टी-मुळें साच देती करोनीच धन्या खरी ॥ ४ ॥
ती माउली पुत्र जीचे बघोनीच संतोष तो मात्र अन्याप्रती
कैसें दिसें चित्त हें रम्य सर्वत्र सोत्साह मद्भाव तोषीं रती
आनंद सद्गंध वाहोनि आमंद सर्वत्र गोविंद लागे दिसूं
संसार-दुष्बंध त्याचा न संबंध आशास मी अंध कां विश्वसूं॥ ५ ॥
योगीश्वराकार अंभोद हे सार देशी सुखागार सर्वांविशीं

यावें मनीं मात्र तों हें जगन्मात्र आत्मस्वरूपांत तूं आणिशी
गावी तुझी कीर्ति होई मना स्फूर्ति शंसी तुझो मूर्ति शुद्धांतरें
ठेवीं कृपा नित्य हे विश्वसाहित्य योगीं जनीं सत्य ना अंतरें ॥ ६॥

———— त्र्यंबक.

## ७१ प्रश्नोत्तरमाला.

आर्या- सूर्या, स्वयंप्रकाशा, प्रातःकालीं कशास तूं येसी?
जनहो, कर्तव्य करा, व्हा जागे, वचन हें वदायासी ॥ १ ॥
रंजितरंजनशीला चंद्रा, तूं क्षीण कासया होसी?
देवासही चुकेना नीचोच्चदशा जगा कथायासी ॥ २ ॥
बोला, नवग्रहांनों, कवण तुम्हां दावितो तरी पंथ?
दिव्या शक्ति चिरंतन दृश्य न नयनांस कल्पनातीत ॥ ३ ॥
नक्षत्रांनों, बोला, कां तुम्ही चमकतां सदा गगनीं?
स्वर्गाची वाट तुम्हां दावावी स्पष्ट कोणती म्हणुनी ॥ ४ ॥
मेघांनो, भरुनि रिते वर्षाकालीं कशास हो होतां?
कथण्या कीं द्रव्याचा संचय विनियोग दुर्दशा येतां ॥ ५ ॥
कोठुनि वहात येतां, वायूंनो चाललां कुठें त्वरित?
स्वर्गींचा मर्त्यांना सांगुनि संदेश चाललों परत ॥ ६ ॥
सुंदर हिमबिंदूंनो, कां येतां, काय भूवरी आहे?
चमकुनि पृथ्वीवर या स्वर्गा जन हो चला कथाया हें ॥७॥
सांगाहो मजलागीं कुसुमांनो कासया तुम्ही फुलतां
सौंदर्याची तुम्हां मर्त्यांना कळविण्यास भंगुरता ॥ ८ ॥
उठसी क्षणांत फुटसी कां सलिलीं लीन, बुडबुड्या, होसी?
जें जें सृष्ट तयाची गति अंतीं यापरी वदायासी ॥ ९ ॥
काळा, झरझर कोठें जासी पळुनी सदैव वदयातें?

अक्षयता देवीच्या दिव्योज्वल मंदिरा पहायातें ॥ १० ॥
अक्षय ते, असती तूं न कळे मज देवता तरी कोण
गतवर्तमान भावी कालाची माउली मला जाण ॥ ११ ॥
प्रश्नोत्तरमाला ही, वाचकहो, करितसे तुम्हां बोधा—
वस्तूंत गूढ असती ईशाचे भाव काय ते शोधा ॥ १२ ॥

माधवानुज.

## ७२ प्रमाण.

भुजंगप्रयात:—अती कोपतां कार्य जातें लयाला
अती नम्रता पात्र होते भयाला
अती काम तें कोणतेंही नसावें
प्रमाणामधें सर्व कांहीं असावें ॥ १ ॥
अती लोभ आणी जना नित्य लाज
अती त्याग तो रोकडा मृत्यु आज
सदा तृप्त नेमस्त सर्वां दिसावें
प्रमाणामधें सर्व कांहीं असावें ॥ २ ॥
अती मोह हा दुःख शोकासि मूळ
अती काळजी टाकणें हेंहि खूळ
सदा चित्त हें सद्विचारें कसावें
प्रामाणामधें सर्व कांहीं असावें ॥ ३ ॥
अति ज्ञान अभ्यासिल्या क्षीण काया
अती खेळणें हा भिकेचाचि पाया
न कष्टाविणें त्वां रिकामें बसावें
प्रमाणामधें सर्व कांहीं असावें ॥ ४ ॥
अती दान तेंही प्रपंचांत छिद्र

अती हीन कार्पण्य मोठें दरिद्र
बरें कोणतें तें मनाला पुसावें
प्रमाणामधें सर्व कांहीं असावें ।। ५ ।।
अती भोजनें रोग येतो घराला
उपासें अती कष्ट होती नराला
फुका सांग देवावरी कां रुसावें
प्रमाणामधें सर्व कांहीं असावें ।। ६ ।।
अति स्नेह तेथें अवज्ञा उदंड
अतिद्वेष भूलोकिंचें पंक कुंड
अती मत्सरें त्वां कशाला कुसावें
प्रमाणामधें सर्व कांहीं असावें ।। ७ ।।
अती आळशी वांचुनी प्रेतरूप
अती झोंप घे तोहि त्याचाचि भूप
सदा सत्कृतीमाजि आत्मा विसावे
प्रमाणामधें सर्व कांहीं असावें ।। ८ ।।
अती द्रव्यही जोडितें पापरास
अती घोर दारिद्य तो पंकवास
धनें वैभवें त्वां न केव्हां फसावें
प्रमाणामधें सर्व कांहीं असावें ।। ९ ।।
अती भाषणें वीटती बुद्धिवंत
अती मौन मूर्खत्व तें मूर्तिमंत
खरें तत्व तें अल्पशब्दें ठसावें
प्रमाणामधें सर्व कांहीं असावें ।। १० ।।
अती वाद घेतां दुरावेल सत्य

अती ' होस हो ' बोलणें नीचकृत्य
विचारें तुवां ज्ञानमार्गीं घुसावें
प्रमाणामधें सर्व कांहीं असावें ॥ ११ ॥
अती औषधें वाढवीतात रोग
उपेक्षा अती आणिते सर्व भोग
हिताच्या उपायास कां आळसावें
प्रमाणामधें सर्व कांहीं असावें ॥ १२ ॥
अती दाट वस्तींत नाना उपाधी
अती शून्य रानांत औदास्य बाधी
लहुग्राम पाहोनि तेथें वसावें
प्रमाणामधें सर्व कांहीं असावें ॥ १३ ॥
अती शोक तो देतसे दुःखवृद्धी
अती मानितो हर्ष तो क्षुद्रबुद्धी
ललाटाक्षरां सांग कोणी पुसावें
प्रमाणामधें सर्व कांहीं असावें ॥ १४ ॥
अती भूषणें मार्ग तो संकटाचा
अती थाट तो वेष होतो नटाचा
रहावें असें कीं न कोणीं हसावें
प्रमाणामधें सर्व कांहीं असावें ॥ १५ ॥
स्तुतीला अती बोलती श्वानवृत्ती
अती लोकनिंदा करी दुष्ट चित्तीं
न कोणा उगें शब्दसर्पें डसावें
प्रमाणामधें सर्व कांहीं असावें ॥ १६ ॥
अती भांडणें नाश तो यादवांचा

हट्टानें अती वंश ना कौरवांचा
कराया अती हें न कोणी वसावें
प्रमाणामधें सर्व कांहीं असावें ॥ १७ ॥
अती गोड खाणें नसे रोज इष्ट
कदन्नें अती सेवणें हें कनिष्ट
असोनी गहूं व्यर्थ खावे न सावे
प्रमाणामधें सर्व कांहीं असावें ॥ १८ ॥
जुन्याचे अती भक्त ते हट्टवादी
नव्याचे अती लाडके शुद्ध नादी
खरें सार शोधोनियां नित्य घ्यावें
प्रमाणामधें सर्व कांहीं असावें ॥ १९ ॥
सदा पद्य घोकोनियां शीण येतो
सदा गद्य वाचोनियां त्रास होतो
कधीं तें कधीं हेंहि वाचीत जावें
प्रमाणामधें सर्व कांहीं असावें ॥ २० ॥

कृ. ना. आठल्ये.

---

## ७३ स्वप्नांत पाहिलेलें शारदामंदिर.

शा. वि.—होतों जात कुठें स्मृती न मजला त्याची असे कांहिंही,
वीथ्या होति विशाल विस्तृत अशी, तेथें नसे कोणिही
दोहीं बाजुस वृक्ष रम्य सुरुचे जाती नभीं उंचसे
दीपस्तंभ तसे सुदिव्य जळती तेजें ताडिद्दीपसे ॥ १ ॥
गोलाकार-सुखंड-मंडल-तती स्तंभावरी काय त्या
भासे इंद्रधनुष्यपंक्ति रचिल्या स्तंभावरी काय त्या

वेळा शांत, तशांत रम्य धवला ती चांद्रिका मौक्तिका
वाटे मौक्तिकहार काय रचिते त्या तोरणां कौतुका ! ॥ २ ॥
ऐसें वैभव हें पहात हळु मी गेलों पथांतूनि त्या
तों तेथें मज एक रम्य नगरी दृष्टी पडे तत्वता
होतीं रम्य सुमंदिरें रचियलीं गच्च्या तयांचेवरी
ज्या होत्या स्फटिकेंचि सर्व खचिल्या गेल्या नभाभीतरीं ॥३॥
त्यामध्यें नवकौमुदी प्रकटली ताराहि त्या बिंबल्या
वाटे रत्ननिधी हरिन्मणितती कीं येथ कोंदाटल्या
भिंती स्वर्णमयी तयावरि प्रभा त्या चंद्रिकेची पडे
तो त्या टाकिति दिव्यभा उलटती जी जात चोंहींकडे ॥ ४ ॥
जेथें देखिलिं सप्तभूमिक गृहें उत्तुंग ज्या गोपुरें
नेत्रांतें फिरवूनियां वरि तदा मीं पाहिलें आदरें
तों व्योमीं मज दिव्यशी सुरुचिरा चंद्रावली दीसली
तीतें पाहुनि जाहलों चकित मी तैं मन्मती गुंगली ॥ ५ ॥
आलों कोणिकडे ? कसा ? नगरि ही रम्या कुणाची असे ?
तारामंडल कोठचें दिसतसे ? हें चंद्र येथें तसे
आले कोठुनि दिव्य ? इंद्रधनुचीं हीं तोरणें कोठलीं
मुक्ताहार तयास कोणि रचिले ही तेंवि दीपावली ॥ ६ ॥
झालों भ्रांत विचार सर्व विलया गेले मती कुंठली
आश्चर्यांत निमग्न पूर्ण मन हो वृत्तीहि आनंदली
आला एक विचार अंतरिं तदा प्रेरी मनीं कौतुका
जाण्या हर्म्यतलावरी रुचिर त्या ती पाहण्या चंद्रिका ॥७॥
मी जों पाउल टाकिलें सुभवनद्वारीं वरी जावया
तों तेथें मज द्वारपाळ दिसले भव्याकृती, त्यांचिया

मुद्रेतें बघतांच अंतर भयें संप्राप्त तैं जाहलें
झालों भीतिवशें विकुंठितगती मन्नेत्रही झांकले ॥ ८ ॥
" हां हां जाशि कुठें शठा ! अधमता स्वीकारिशी कां अशी
" राहें द्वारिं उभा, तुझ्या हृदिं मुळीं ती ये न शंका कशी
" निःशंकापरि मंदिरीं घुससि कां ? मज्जाव सर्वांसही
" आहे येथ, " म्हणून दंड हपटे, हो कंपिता ती मही ॥९॥
झालों चित्रित मी, सकंपित तदा झाली तनू सर्वही
अंगीं घर्म सुटे फुटे हृदयही आंदोलतां ती मही
तेव्हां मंदिर तें क्षणांत क्षितिशीं सोडुनि जाई वरी
वाटे अद्भुत, केंवि हें निरवकाशीं स्थैर्य ऐसें धरी ॥ १० ॥
द्वारीं तों भुवनाचिया सुरुचिरा दिव्यांबरा सुंदरा
कोणी ये कनकांबरा, मधुगिरा, बिंबाधरा, अप्सरा
वाहे कोमलशा करें मजसिं ती, भासे जणूं इंदिरा
मीही भ्रंशित पूर्ण गूढ मज हें जावें कसें मंदिरा ॥ ११ ॥
तों ती सुंदरि मंजुवाणि वदली मंजुस्वना प्रेमला
" होशी शंकित कां असा ? चढ वरी घे हस्त देतें तुला
" ये ये काव्यविशारदा ! भिउं नको, मी जाणरे शारदा
" ये ह्या मंदिरिं सत्वरीं, रचि नव्या काव्या महा तोषदा" ॥ १२
आनंदें कर मीं मदीय सहसा केला वरी सत्वरी
ती तो घट्ट धरूनियां उचलती झाली मला अंबरीं
मीं तीचे चरणारविंद धरिलें, वंदूनि सानंद ते
ती दावी कविचें सुमंडल-मला जें तद्यशा वर्णितें ॥ १३ ॥
वाग्देवी वदली " अगा कविवरा! मन्मंदिरा देखिलें
" तैसें ह्या कविमंडलासहि असे त्वां आज रे पाहिलें

" झालें कार्य तुझें कवे ! परतुनी तूं जाई पृथ्वीवरी
" जेव्हां येइल पात्रता तुजशि तूं येई सुखें मंदिरीं ॥ १४ ॥
" माझ्या मंदिरिं यावयास न असे द्वारांतुनी मार्ग तो
" जी सोपानपरंपरा दिसतसे ती भ्रामका, भास तो
" द्वारीं राहति द्वारपाळ बनुनी जे मंदबुद्धी कवी
" द्वारीं येति तयास भेवडविती, यांची कृती दानवी ॥१५॥
" जी दिव्य प्रतिभा नभा क्रमितसे, तद्भास्वता-मंडलें
" ते सारे कवि सिंह वेष्टित उभे राखोनि दिग्मंडलें
" त्यांतें अंबरगामि तीव्र प्रतिभा मन्मंदिरीं आणिते
" जेव्हां आणिल ती तुला पुनरपी येई कवे तूं इथें ॥१६॥
ऐशी कर्ण-मनोहरा वदुनियां मंजुस्वना सद्गिरा
एकाकी मज सोडि भूमिवरती ती शारदा सुंदरा
मी येतां अवनीवरी दचकलों अंगींहि मत्कांपलीं
झालों जागृत, मावळे सदन तें, ती सृष्टिही भंगली ! ॥१७॥

'किरात'

---

### ७४ प्रियविषयक वस्तु लोपल्यावर.

गेली ज्योति विझोनियां; मग फुका फुंका तयाला किती;
ओता आंत घृता; रचोनि समिधा, प्रार्था फुलें वाहुनी;
झालें स्थंडिल थंडगार मृत तें; ज्योती नये आंतुनी !
चालूंद्या मग वेदघोष तुमचा; तो वेदिशाला रिती !
गेली ती शुचिता; पवित्र झळके कोठोनि कांती तिथें !
लावा दीपशतां; मशाल उजळा; कर्पूर जाळा; उठा
घंटा घूर्ण पिटा; फुका मग फुका शंखा; नगारा पिटा;
थट्टा ती मग वस्तुची ! सकलही कीं फोल छायाचि तें !

प्रीतिज्योति विलासिनीच हृदया टाकूनि गेल्यावरी,
सारी भूप्रमदावली मग झटो! पेटेल का ती तिथें?
गेली जाऊ; पिशाच्च विश्व मग हें निःसत्व छायेपरी
इंदू, इंदु न तो! पिशाच्च विधुचें; तारे न तारे, भुतें!
'जातां मी रवि, चंद्र येतिल जसे तैसेच;' कां गे अशी
कांते! निष्ठुर बोलुनी हृदय हें फाडूनियां टाकशी?

——— भा. रा. तांबे.

## ७९ शारदेची प्रार्थना.

भुजंग प्रयात.—मनोरंजनें शारदे! देवि! पावें
दयाळे! कृपाळे! मला धैर्य द्यावें
चढाया पहातों, जिथें वाट नाहीं;
जिथें शक्ति माझी न चालेचि कांहीं ॥ १ ॥
सवें रंगसी कालिदासादिकांच्या
मला प्रेर, गे! दास मी होय साचा
जसा थोर वाल्मीक साधी रसातें,
तसें काव्य यावें रचायास मातें ॥ २ ॥
तुवां दाविला मार्ग त्याला भला, गे!
महाकाव्य त्याचें जनां गोड लागे
निघे जेंवि योद्धा मराठा लढाया
रणीं तीक्ष्ण तर्वार बांधून जाया; ॥ ३ ॥
जिताया, मराया, मनीं शौर्य वागे;
पुढें वीर चाले; हटेनाचि मागें;
मला तेंवि हें काव्य यावें रचाया
अगे शारदे! धैर्य चातुर्य द्याया, ॥ ४ ॥

नसे अन्य कोणी पुरा शक्त वाटे
मला लाव, गे! देवि! निर्विघ्न वाटे
तुला थोर मानी शिवाजी भवानी
तुझें रूप तूं देवि! देशाभिमानी ॥ ५ ॥
कधीं शस्त्र हातीं वधायास वैरी;
कधीं गायनीं मारशी तूं भरारी;
तुम्ही सर्व रूपें जगाच्या धन्याचीं;
करा कामना पूर्ण माझ्या मनाची ॥ ६ ॥

म. मो. कुंटे.

## ७६ वृक्षोपदेश.

सत्वस्थ विप्र कोणी संसारातें करोनियां दमला;
द्यावी म्हणे समस्तां साधुगुणांची करोनि याद मला. ॥ १ ॥
यात्रा करीत ऐशी तीर्थ-क्षेत्रें समस्तही फिरला;
सद्गुरु मिळेल म्हणुनी धैर्यें गिरिगव्हरांतही शिरला. ॥ २ ॥
बैरागी, संन्यासी, आश्रम मठ, देव धुंडिले सगळे;
सर्वत्र दंभ आशा ओतूं येऊन शुद्ध फेस गळे. ॥ ३ ॥
कोणी न पात्र देण्या मोक्षप्रद मज गुरूपदेशास;
ऐसें चिंतुनि चित्तीं शीघ्र निघे जावया स्वदेशास. ॥ ४ ॥
मार्गीं चालत जातां उष्णाचा ताप लागला कडक;
पायहि थकून गेले नेटें उल्लंघितां महा खडक. ॥ ५ ॥
क्षुद्बोध होय पोटीं उदकाविण फार धोपला प्राण;
मार्गक्रमण कराया स्वल्पहि अंगीं न राहिलें त्राण. ॥ ६ ॥
देवा! दे स्नानाला पानाला उदक फार गार मला;
प्रार्थी तो तों पुढती निर्झर तरु पाहुनी मनीं रमला. ॥ ७ ॥

बहु रम्य आम्र तरुवर ज्याच्यावरि दाटला भला पाला;
तापाला दूर करी कोकिल वरि काढिती अलापाला. ॥ ८ ॥
तरुतलिं जाउनि एका टेंकुनि बैसे खुशाल पाळाला;
चित्तीं म्हणे अहाहा! येइल हें सौख्य का नृपाळाला. ॥ ९ ॥
काढुनि वस्त्रें सारीं लावुनि पडशी वरी निवाऱ्यातें;
क्षणभरि विश्रांतीस्तव आनंदें घेइ गोड वाऱ्यातें. ॥ १० ॥
मग पांथस्थ पडे तो छायेला घोंगडीस पसरोनी;
बहु जीव तृप्त झाला, गेला तो पथिक कष्ट विसरोनी. ॥ ११ ॥
जवळाचि ओढा होता, निर्मल जल ज्यांत खळखळा वाहे;
लाहे बहु सुख चित्तीं उत्सुकतेनें तयाकडे पाहे. ॥ १२ ॥
स्वच्छंदें स्नान करी, भावें अर्घ्यप्रदान दे रविला;
संध्यावंदन करुनी स्तोत्रांनीं वासुदेवहि स्तविला. ॥ १३ ॥
षट्कर्मे संपवुनी सत्वर पूर्वस्थळीं पुन्हा परते;
क्षुत्पीडाशमनार्थें विप्राचें लक्ष वेधलें वरतें. ॥ १४ ॥
तों वाऱ्यानें पडले पक्क फळांचे घडाघडा घड ते;
सुख, दुःख, लाभ, हानी दैवानें जीवजंतुला घडते. ॥ १५ ॥
आंबे यथेच्छ भक्षी पाडाचे बहु रसाळ मधुरतम,
समयीं कदन्न लागे क्षुद्विकला तें सुधारसासि सम ॥ १६ ॥
घट घट पाणी प्याला फिरवी उदरावरोनि तो करही;
तृप्तीची खूण महा देउनि दावी असंख्य ढेंकरही ॥ १७ ॥
आली मना हुषारी पुनरपि तद्देह जाहला ताजा;
पहुडे विशंक तेथें पसरुनियां पाय तो जसा राजा ॥ १८ ॥
क्षणमात्र बिचाऱ्याला झालीं सुखसाधनें पहा गोळा
छायेमध्यें झुळझुळ वारा येतांच लागला डोळा. ॥ १९ ॥

तों विद्युत्पातासम कड कड कड कड करोनि तरु फुटला;
सुटला तुफान वारा दाहि दिशेला प्रतिध्वनी उठला. ॥ २० ॥
तरुमूलांतूनि निघे सिंहध्वनि मनुजशब्दगंभीर;
रे रे द्विजा! उठें तूं ऐकाया शब्द हे करीं धीर. ॥ २१ ॥
खडबडला गडबडला आश्चर्यें चकित जाहला विप्र!
उठला बसला वेगें जागा झाला भयामुळें क्षिप्र. ॥ २२ ॥
झाला तटस्थ पाहे नयनाची पापणीहि नच हाले;
तों अतनुध्वनि पुनरपि गर्जोनी शांतवृत्तिनें चाले. ॥ २३ ॥
देहीं अमृत भरलें म्हणुनि मला म्हणति आम्रतरु लोकीं;
तो तुज उपदेशाया आलों मी मूर्तिमंत अवलोकीं! ॥ २४ ॥
बापा भिऊं नको तूं मजकडुनी तुज घडेल बाधा न;
सत्योपदेश कथितों श्रवणें होईल बा समाधान. ॥ २५ ॥
रे ब्राम्हणा! कशाला जगभरि तूं कष्ट खात फिरतोस?
वेड्या! मनीं वृथा कां सद्गुरु नाहीं म्हणूनि झुरतोस? ॥ २६ ॥
उपदेशाया एकचि ब्रह्मांडीं मनुज कायरे उचित?
भरल्या अनंत वस्तू देतिल उपदेश त्या तुला खचित. ॥ २७ ॥
अभिमानी पुरुषाहुनि निर्जिव आम्ही पदार्थ फार बरे;
लोहहि टिके न जेथें होइल तेथें कसा नफा "रबरें?" ॥ २८ ॥
सत्यविचारें बघतां आहे जरि बुद्धिमंत नर कुलिन;
नाना विकार पावुनि पुढती तद्‌बुद्धि होतसे मलिन ॥ २९ ॥
काम-क्रोधविकारें मानव हस्तें घडे महापाप;
आम्हीं उद्भिजसाधू शून्याविकारी असों अपोआप ॥ ३० ॥
शत्रू, मित्र, महात्मा, आम्हां ना राव, रंक, हा भेद;
सौख्याचा गर्व नसे दुःखाचा लेशही नसे खेद ॥ ३१ ॥

माझ्यासमान ठेवीं तूंही समबुद्धि सर्व भूतांत;
येणेंच चित्तशुद्धी होइल कीं सुप्रसन्न भूतांत ॥ ३२ ॥
झंझावात मला रे धक्के मारी कितीक ताठ्यानें;
देवोनि पाठ त्याला सर्वहि मी सोशितों मुकाट्यानें ॥ ३३ ॥
तैसा तूंहि जगीं या राहें लोकापवाद सोसून;
सासूचे बोल जसे खडतरही सोशिते बरी सून ॥ ३४ ॥
पर्जन्याच्या धारा, झोंबे अंगास तीव्रतर वारा;
गारांचा वर मारा, उष्णाचा प्रखर तापही सारा ॥ ३५॥
पंचमहाभूतांच्या सांपडतों मी सदा सपाट्यास;
शिरसावंद्य करीं मी जे जे येतील भोग वांट्यास ॥ ३६ ॥
केला कधीं न त्यांचा कंटाळा मुरडिलें न मीं नाक;
तूंहि तसा वाग; मिळे इहलोकीं सौख्य, शेवटीं नाक ॥३७॥
विद्युत्पात शिरावरि अदळे, कीं दुःसह प्रभा फांके
धाके भीति धरोनी तरिहि कधीं संकटीं न मी वांकें ॥ ३८ ॥
तूंहि तसें धैर्य धरीं, संकटसमयीं भिऊं नको लेश
धैर्याच्या शांतीच्या मागें आहे सदा हर्षांकेश ॥ ३९ ॥
लोकीं परोपकारा ऐसें नाहींच पुण्य बा अन्य
जोडूनि धन्य होतों, तरुवर आम्हीं जरी असों वन्य ॥ ४० ॥
लावुनि मजला रक्षी पशुपासुनि शिशुसमान जो रानें
तोडुनि काढी हस्तें कीं जो मारी कुठार जोरानें ॥ ४१ ॥
दोघांवरही माझी आहे बा समसमान कीं माया
फळ पुष्प पर्ण देतों दोघांनाही करीं बरी छाया ॥ ४२ ॥
हा माझा शत्रु असे, येइल हा मित्र भाउ कामातें
ऐसा भाव दुजा हा नाहीं स्वप्नांत ठाउका मातें ॥ ४३ ॥

शोषुनि दुर्गंधीतें वायूंतुनि सोडितों बरा वास
रंकास फार कामीं येतों मी तेविं थोर रावास ॥ ४४ ॥
क्षुधिताला फल देतों, तप्ताला देतसें बरी छाया
गेला प्राण तरीही सर्पण होवोनि जाळितों काया ॥ ४५ ॥
ऐसें परोपकारीं मजसम तूं झिजविशील जरि अंग
तरि तुज मोक्ष मिळेलचि विश्वंभर दूर का? द्विजा सांग ॥४६॥
सद्गुरु नाहीं ऐसा झालासे व्यर्थ बा तुला भ्रम हा
स्थिरचर पदार्थ असती ज्याया उपदेश कीं समर्थ महा ॥४७॥
हा स्थीर मंदबुद्धी म्हणुनी मानूं नको तरूस मज
हृदयीं धरूनि ठेवीं उपदेशामृत, मला गुरू समज ॥ ४८ ॥
मत्सम जगांत वागें, स्थीर करी आत्मसंयमें मतिला
तेणें साधुत्वाला पावुनि होशिल पात्र सद्गतिला ॥ ४९ ॥
उत्तम बोल तुला हे कथिले याचा विचार करिं नीट
सद्बोधामृतपानें सुज्ञजनाला कधीं न ये वीट ॥ ५० ॥
आश्वासुनि भूदेवा ती अंतर्धान पावली मूर्ती
सत्यज्ञानें विप्रा वैराग्याची घडे महा स्फूर्ती ॥ ५१ ॥
सद्गदित कंठ झाला अंगीं वैराग्य दाटलें फार
साष्टांग विप्र तरुतें पूज्यत्वानें करी नमस्कार ॥ ५२ ॥
उल्हासवृत्ति झाली, मनिंचें औदास्य सर्वही सरलें
पुरली सर्व मनीषा, ज्ञानाचें तत्व अंतरीं भरलें ॥ ५३ ॥
झाला थोर महात्मा, साधुगुणाचीच लागली भक्ती
इहलोकीं सुखि झाला, अंतींही पावला पहा मुक्ती ॥ ५४ ॥
तात्पर्य जें कथेचें समजुनि वर्तन जगांत करितील
साधुत्व पावूनी ते सहजीं भवसिंधुलाहि तरतील ॥ ५५ ॥

कृ. ना आठल्ये.

## ७७ कृपणाचें स्वप्न.

(एक कृपण आपणांस पडलेलें स्वप्न आपल्या मित्रास सांगत आहे.)

हव्यास चित्तीं धरुनी धनाचा
द्वीपा सुवर्णाख्य निघावयाचा
विचार होतां पडला विचार
मला कसा थोर मिळेल नोर ॥ १ ॥
कंटाळुनी संतत याचनेतें
त्वां अर्पिला नोर समग्र मातें
नौकोदरीं टाकुनि हें शरीर
स्वीकारिला सागरमार्ग घोर ॥ २ ॥
सर्व प्रवासीजन फार कष्टी
भूमीकडे लाविति दीन दृष्टी
जातां दुरी मातृमुखानुरागें
पुनः पुनः कोण बघे न मागें ॥ ३ ॥
नभस्तला भेदित नीट जाय
त्या पर्वताग्रीं स्थिर भूमिमाय
तिचीं मुलें जीं बहु दूर जाती
परस्परां प्रेमभरें पहाती ॥ ४ ॥
क्षण क्षण क्षीण दशेस पात्र
परस्परप्रेक्षणसौख्यसूत्र
गेलें तुटोनी वरती नभाचा
खालीं सुविस्तार दिसे जलाचा ॥ ५ ॥
शृंगारुनी शुभ्र शिडें शुभांगा
दावूनियां सुंदर अंगभंगा

पृष्ठावरी सागर-रंगभूचे
नौकानटी निष्पद नाच नाचे ॥ ६ ॥
तदंगलग्ना कणिका जलाच्या
ओळीच कीं स्वेदलवावलीच्या
आकाश त्यांचा करण्यास लोप
पंखा गमे हालवि वायुरूप ॥ ७ ॥
समुद्र-नौका-नव-कौतुकांची
गोडी क्रमें वाट धरी लयाची
समुद्र तो नीरस शून्य झाला
नौका गमे जंगम बंदिशाला ॥ ८ ॥
जातां असे निष्क्रिय वीस वार
दृष्टी पडे अंधुक बेट दूर
तद्दर्शनें किंचित ताडिली म्यां
कोलंबसाची परितोषसीमा ॥ ९ ॥
सुवर्णसे द्वीपविभाग पीत
जसे जसे स्पष्ट दशेस येत
तशी तशी रम्य विकासलीला
मन्मोदरूपी फुलवी कळीला ॥ १० ॥
जातां असे आणिक याम चार
मी इष्ट देशीं पद ठेवणार
तों घोर आकस्मिक वादळाची
होई पथीं बा सुरवात साची ॥ ११ ॥
प्रचंड वेगें सुटला समीर
अभ्रें ख-भागीं घुसती अधीर

दणाणवी वीज दिगंत सारे
समुद्र सारा खवळे तसा रे ॥ १२ ॥
समीर रत्नाकर मेघभार
असे तिचे राक्षण दुष्ट फार
नौकावधूच्या अडवूनि वाटे
तत्प्राप्तिला मांडिति वाद वाटे ॥ १३ ॥
पूर्वीं जशी क्रूरपणें सभेला
दुःशासनानें द्रुपदात्मजेला
नौ-बालिके तद्वत चंडवारा
वाटे तिथें ओढित ने फरारा ॥ १४ ॥
अंगावरी टाकुनि वीचिहस्त
विटंबवी सागर तीस मस्त
बळेंचि ओढी हृदयप्रदेशीं
द्रव्यास मी अन्य भिती जिवाशीं ॥ १५ ॥
प्रचंड लाटांसह उंच जातां
वाटे विकर्षी तिज मेघ आतां
मी एकचित्तें जपलों धनाला
अन्या गमे स्वर्ग समीप आला ॥ १६ ॥
नौका अशी उंच नभांत जात
तों पातले सत्वर देवदूत
सर्वां अम्हां घालुनि ते विमानीं
झाले सख्या तत्पर शीघ्र यानीं ॥ १७ ॥
मन्मानसीं वित्तवियोगरूपी
पेटे महाग्नी प्रलयस्वरूपी

नौकेंत येण्या बहु यत्न केले
ते सर्वही निष्फल पूर्ण झाले ॥ १८ ॥
यत्संपदेचें निरखोनि मान
संख्यावलीही लववी स्वमान
लोकीं अशा येउनि तें विमान
गांठी कुबेरगृह दीप्यमान ॥ १९ ॥
आम्ही सख्या सर्व ! उभे समोर
दिव्यासनीं शोभतसे कुबेर
तो चित्रगुप्ता पुसुनी विचार
विचित्र दावी पुढला प्रकार ॥ २० ॥
एक प्रवासी धनपाल नाम
जो दानधर्मीं दवडोनि दाम
परोपकारीं झिजवी शरीर
त्या लक्ष पद्में धन दे कुबेर ॥ २१ ॥
दुजा जया साधुनियां निजार्थ
रुचे, स्ववित्तें करणें परार्थ
करीं तयाचे शतपद्म वित्त
सख्या पडे बा धनद-प्रदत्त ॥ २२ ॥
सर्वां असें देउनि अर्थ फार
स्व-स्वस्थळीं पाठविण्या कुबेर
दूतां कथी; या कवडी न एक
वर्णूं कसा मी मम तीव्र शोक ॥ २३ ॥
द्रव्यार्जना जोडुनि हात दोनी
गयावया दीन मुखें करोनी

मीं फोडिला दुःसह दीन टाहो
" प्रभो धनेशा मज वित्त द्या हो " ॥ २४ ॥
माझी परी त्या करुणा न आली
सक्रोध मुद्रा बहु लाल झाली
वाग्वज्र तो चावुनि दांत ओंठ
सोडी मदाशागिरि होय पीठ ॥ २५ ॥
" पापिष्ठ तूं पूर्ण अ-दानशील
तुला न येथें कवडी मिळेल
जशी जशी बा सरणी कृतीची
तशी तशी प्राप्ति घडे फलाची ॥ २६
नाहीं तुला माहित दान धर्म
ध्यानीं मनीं ना उपकार- कर्म
परी न तूं लाजशी याचनेस
मिळे न येथें तुज एक रेस ॥ २७ ॥
दुष्टा धनेच्छामय थोर खांच
भरावया चौर्यवधादि साच
अघोर पापें रचिलीं अनेक
येथें मिळेना तुज दाम एक ॥ २८ ॥
जिवंत रे भूदरिं आत्महस्तीं
लक्ष्मी तुवां गाडिलि निर्दया ती
तुला कशी येथ मिळेल मूढा
तुझ्याकडे लेश तिचा न ओढा ॥ २९ ॥
सेवूनियां संतत सत्पथास
करूनियां जो धनसंचयास

त्याचा करी सद्व्यय भूमिलोकीं
त्या द्रव्य लाभे बहु अन्यलोकीं ॥ ३० ॥

संपत्प्रियेचा सहवास येथें
जरी गमे इष्ट तुझ्या मनातें
अमोघ तूतें कथितों उपाय
जेणें तुझी इच्छित-सिद्धि होय ॥ ३१ ॥

धरूनियां चित्तिं ममोपदेश
छेदूनियां सर्वहि मोहपाश
दे दान धर्मीं निजसंपदेतें
मिळेल वृद्धिंगत येथ तूतें" ॥ ३२ ॥

बोलोनि हे शब्द धनाधिनाथें
दिलें मला लोटुनि भूमिपंथें
आकर्षणें थोर गमे धनाच्या
मी प्राप्त झालों उदरांत नौच्या ॥ ३३ ॥

सुदैवयोगें मम संपदेचा
झाला पुनर्लाभ मला सुखाचा
अन्याचिही मद्दश पूर्ण झाली
वा शर्करा दुग्धरसीं मिळाली ॥ ३४ ॥

संपत्तिचा पाहुनि तो पसारा
धनप्रभूचा उपदेश सारा
सोडी मला देखुनि मेनकेला
जसा मनो-निग्रह गाधिजाला ॥ ३५ ॥

टाकोनि गेले दुसरे प्रवाशी

एकत्र मी त्या धनसंचयासी
करोनि जों मग्न असें सुखांत
तों नौ फुटे वित्त पडे जलांत ॥ ३६ ॥
अधःशीर्ष मी सागराच्या जलाला
विदारीतसें काढण्या संपदेला
शिलेचा शिरीं लागला तीव्र घाय
भयानें मला जागृती प्राप्त होय ॥ ३७ ॥

राधारमण.

---

## ७८ मातृप्रेम.

आर्याः—जन हो ! मातृप्रेमा सीमा नाहींच या जगावरती
हें बावनकशि सोनें हीण नसे यांत एक पाव-रती ॥ १ ॥
स्वापत्यसुखासाठीं कष्टवुनी सर्वकाळ जीवा हे
सर्वोपरी तयाची स्वप्राणांपरिस काळजी वाहे ॥ २ ॥
निर्व्याज, अचल, निस्तुल, निष्काम, पवित्र मातृहृत्प्रेम
चिंती अनन्यभावें पुत्रातें वित्तवैभव-क्षेम ॥ ३ ॥
सुत तोचि वित्त तीचें; जें सुख तिस तत्समीप राहोनी
तैसें सुसौख्य न गमे केवळ धनलुब्ध ही नरा होनीं ॥ ४ ॥
मातेच्या उत्सगीं सुत काळा लोहसदृश जरि चढला
तत्क्षणिं सुवर्ण होई म्हणुनिजणों परिस लाजुनी दडला ॥५॥
अवलोकितांचि तनया ये मातृ-प्रेम-सागरा भरती
छी, छी ! परि उदधीची उपमाही तत्कृपेसि नच पुरती ॥ ६ ॥
सागर लवण असोनी तो वारंवार ओसरे वाढे
मातृप्रेम मधुर बहु असुनी अक्षय तुडुंबलें गाढें ॥ ७ ॥

वेलेनें मर्यादित म्हणुनि म्हणति त्या समुद्रें कवि लोकीं
परि या मातृप्रेमा मर्यादा जगतिं नाहिंच विलोकीं ॥ ८ ॥
वडवाग्निवासभाजन हालाहलजनक जलधि तो दिसतो
कोपाग्नि येथ न वसे, दुर्वचन क्ष्वेड-लेश ही नसतो ॥ ९ ॥
चंद्राचीही उपमा जरि द्यावी तरिही वाटती कष्ट
तो क्षय कलंक भोगी; अक्षय हें, निष्कलंक ही स्पष्ट ॥१०॥
अमृत-तुलाहि न साहे कीं सुरवर-मात्र-लभ्य तें आहे
तत्तुल्य मधुर असुनी हें नर-पशु-पक्षि-कीटकहि लाहे ॥११॥
ऐशी निरुपम माया मातेची, अन्य तुल्य पद न तिला
यास्तव अम्ही करावें नित्य तियेच्या अमूल्य-पद-नतिला॥१२॥
माता-रूपें जाणो साक्षात् ‘ माया ’ चि होय अवतरती
ऐसें भावुनि ‘ माया ’ हेंचि उचित नाम जन तिला देती १३
तरि मातृदेव होउनि सेवुनि त्या इष्टदैवता परमा
जन हो ! त्या पुण्यानें निरसूनि अनिष्ट दैवताप रमा ॥१४॥
क्षुत्तृष्णाही विसरे निजनंदनलालनांत जी आर्या
तीच्या सन्महिम्यातें वर्णाया अक्षमाचि हे आर्या ॥ १५ ॥

ना. ल. खांबेटे.

---

### ७९ एका स्त्री-पुत्रशोकाकुल गृहस्थाच्या सांत्वनार्थ के. अभंग.

पुत्रदाराशोक आतां न करावा, हृदयीं स्मरावा दत्तराज ॥ १ ॥
धनसुतकांता जाणोनी नश्वर, सर्वदा ईश्वर आठवावा ॥ २ ॥

---

१ वेला ह्म० समुद्राचें पाणी वाढण्याची मर्यादा. २ मुद्रा=मर्यादा तिनें युक्त तो समुद्र.

पूर्वकर्मवशें मृत्युलाभहानि, भोगिताती प्राणी सकळिक ॥ ३ ॥
प्रत्यक्ष कृष्णाचा सखा जो किरीटि, अभिन्यूसाठीं शोक करी ॥ ४ ॥
प्रत्यक्ष श्रीकृष्ण जीच्या पोटीं आला, त्याही देवकीला महादुःख॥ ५ ॥
तरी देवावरी कासया रुसावें, प्रारब्ध सोसावें पूर्ण धैर्यें ॥ ६ ॥
मिथ्या हा संसार, नरदेह भ्रांति, जाणोनिया शांति आदरावी ॥ ७ ॥
देह म्हणजे काय करितां विवेक; उरेचना शोक तुम्हांपाशीं ॥ ८ ॥
पंचमहाभूतें विशिष्टप्रकारें, त्यांत प्राणवारें शिरोनियां ॥ ९ ॥
देहरूपें तुम्हांसमीप नांदलीं; आजी भिन्न जालीं ईशेच्छेनें ॥ १० ॥
सागरामधूनि लवण निघालें, तें पुन्हा विरालें त्याजमध्यें ॥ ११ ॥
देह गेला परी तत्व अविनाशी, जाणोनी मनाशीं दुःख सोडा ॥ १२ ॥
संपत्ति विपत्ती सम माना चित्तीं, समाधानवृत्ति आदरोनी ॥ १३ ॥
संयमधनासी नाहीं चौर्य नाश, म्हणोनियां त्यास संचवावें ॥ १४ ॥
संसारीं राहोनी गिळितां संताप, प्रभु मायबाप तोष पावे ॥ १५ ॥
सोसोनी आघात अलिप्त तें मन, गगनासमान असों द्यावें ॥ १६ ॥
सदा सर्वकाळ स्मरा नारायण, भक्तिपरायण चित्त भावें ॥ १७ ॥

**ना. ल. खांबेटे.**

---

## ८० बन्धच्छेदन, आणि शंकराचार्यांस विनंती.

श्लोक—देहाचीं दृढ बंधनें तुटति तैं क्षीणत्व येतें नरा
भंगे शक्ति तसेंच तेजहि लया जाऊन येते जरा
राष्ट्रांतील समाजबंध तुटतां त्यां शक्ति कैंची उरे
कैंसें तेज असेल शांतिसुखही लाभेल कैसें बरें ! ॥ १ ॥
तोडा बंध तुम्हांस जे दुखविती ज्यां तोडितां सौख्य हो

राखा बंध तुम्हांस जे सुखविती त्यां तोडितां घात हो !
देहीं ग्रंथि उगाच जी उठलिसे ती कापितां हानि न
योग्यायोग्य बघून वर्तन असे त्या भीति ये कोठुन? ॥ २ ॥
छेदा ग्रंथि उगाच जी उठलि ती ऐसें म्हणालों जरी
ती भारी जर वाटली तरि नसे छेदावयाला बरी
कोणी उत्तम शस्त्रवैद्य जरि ती छेदावया सांगतां
च्छेदा ना तरि भीतिकारक असे ये दुःख हो पूढतीं ॥ ३ ॥
ग्रंथीची जर गोष्ट यापरि तरी त्या अस्थिबंधा किती
वाटावी अपणांस सुज्ञ जन हो ! च्छेदावयाला भिती
राष्ट्राचीं दृढ बंधनेंच म्हणतों या धर्म चाली रिती
धर्मावांचुन चाल जी जडतसे म्यां कल्पिली ग्रंथि ती ॥ ४ ॥
ज्ञाते उत्तम शस्त्रवैद्य, म्हणतों, घ्या त्यांचि हो संमती
सोडा रीति जुन्या नव्या सकलही तुम्हांस ज्या जाचती
थांबाः—घाइ नका करूं प्रथमता आचार्य जे आपले
त्यांची संमति घेउनी मग अम्हीं कामास लागूं भले ॥ ५ ॥
कां कीं सर्वच मानितात अपणा ज्ञाते असें सांप्रत
जो कोणी उठतो सभेंत वदतो हें ग्राह्य माझें मत
नाहीं निर्णय होत, वाद झगडे होती जरी संतत
आचार्यांकरवींच कृत्य करितां होईल वाटे हित ॥ ६ ॥
धर्माचा नच बंध कांहिं उरला निर्बंध झाले जन
ज्याला जें गमतें तसेंच वदण्या लज्जा नसे भीति न
संध्याही न करी निमाज न पढे येशूसही ना भजे
वक्तृत्वीं बहु नीति नेम वदुनी त्यां मोडण्याला सजे ॥ ७ ॥
धर्माख्यान नसे कधींच दिधलें हे शंकराचार्य हो !

तुम्हीं एकिकडे बसून करितां आहां तरी काय हो
होता नास्तिक शिष्यवर्ग तुमचा हा दोष लागे कुणा?
आहे चालत हेंच ठीक गमतें कां हो प्रभो! आपणा! ॥ ८ ॥
धर्माचे पथ लोपले समजलें त्या आंग्लविद्याबलें
आतांचे बुध सुज्ञ यास्तव तयां धुंडावया लागले
स्वीकारूं मत हें नवीन अथवा सोडूं नको मागलें
सांगा सत्वर सप्रमाण गुरुजी! यांतील जें चांगलें ॥ ९ ॥
हा तो पंथे[1] तुम्हांस युक्त दिसतां आम्हांस तैसें वदा
द्यावा एक सुरेखसा करुनिया आम्हां तुम्हीं कायदा
किंवा पंथ तुम्हांस त्याज्य गमतां त्याचें करा खंडण
लावूं या मग यां समस्त मिळुनी खासें भलें दंडण ॥ १० ॥
राष्ट्रांतील समस्त बंध गुरुजी! धर्मामधें गोंवले
यासाठींच समस्त निर्णय गुरो आहेत खोळंबले
कां लावीत असां उशीर गुरुजी! या सत्वरें निर्णया
अंदाधुंद समाज सर्व दिसती जातील वाटे लया ॥ ११ ॥
मद्यप्राशन थोर पातक असें जें पूर्वजीं मानिलें
विद्येचें जणु थोर चिन्हच असे आतां आम्हीं वानिलें
पूर्वींचे नच ब्रह्मचर्य उरलें संगीं मुलें दंगली
काळाचा महिमा विचित्र! सुखदा संस्था जुनी भंगली ॥ १२ ॥
बंधुप्रेम न भक्तिही नच मनीं मातापित्यांची मुलीं
तीं आम्हां पुढतीं आम्हांस गमती वृद्धें पिसाटीं खुळीं
" नाहीं शोभत बाप हा मज " असें बोलावया लागलों
त्यांचीं स्वानुभवाप्त बोधवचनें ऐकावया भागलों ॥ १३ ॥

---

१ प्रार्थना समाज पंथ.

ज्ञातीभेद, पुनर्विवाह, प्रतिम–पूजा, मधुप्राशन
तैसा बालविवाह निर्णय करा हे सद्गुरो ! आपण
पथ्यापथ्य बघूनिया गुरुवरा ! जें जें दिसे चांगलें
तें तें स्थापुन; जें दिसे अहितसें तें पाहिजे त्यागिलें ॥ १४ ॥
माझी ही विनती कृपा करुनिया चित्तामधें आणुनी
शास्त्री पंडित वैदिकांसह गुरो ! यावें त्वरें धांवुनी
शिष्यांची स्थिति आणखी नच कथी प्रत्यक्ष तूम्ही पहा
पेठे केशव वामनात्मज तुम्हां घाली नमस्कार हा ॥ १५ ॥

**केशव वामन पेठे.**

---

## ८१ सह्याद्रि-वर्णन.

श्लोक–पृथ्वीला व्यापणारा भयंकर सकलां भासतो जो समुद्र
ग्रासाया विश्व सारें जणु पसरित ' ऑ ' अन्य हा काय रुद्र !
या अत्युग्रा निधीचे प्रखरतर महा–चण्ड आघात साही
लाभे तैं सह्य ऐशी अभिमत अभिधा अद्रि हा वज्रदेही ॥१॥
वाटे सागर हार पावुनि बहू लाजोनि गेला दुरी
सह्याच्या शिखरांवरोनी दिसतो तो चंद्र–कोरेपरी
भासे घालिल हा उडी त्वरितची त्या सिंधु वेंग्यावरी
चन्द्राला गिळण्यास राहु टपतो पावे तयाची सरी ॥ २ ॥
तापी माथां बैसली विन्ध्य–कन्या
पायीं लागे ती कुमारी सुधन्या
कोठें तापी दूर कोठें कुमारी
सह्याद्रीचा देह विस्तीर्ण भारी ॥ ३ ॥

---

१ सर्वमान्य. २ नांव.

महाराष्ट्राचीं जो गिरिवर करी दोन शकलें
वरी संज्ञा देश प्रथम दुसरें कोकण भलें
शरीरा ये दार्ढ्य प्रबल असतां पृष्ठ-मणके
महाराष्ट्रा तैसे करिति गिरिचे घाट टणके ॥ ४ ॥
पान्थांना रडतोंडिचा रडवितो फोडीच फोंडा उर
आणी प्रेतकळा मेढ्या दिसतसे काळापरी भासुर
सह्याचे सगळेच घाट असती लंघावया दुर्घट
होती वन्हिरथामुळें सुखद ते लोकां बहू चोखट ॥ ५ ॥
व्याघ्रीची काय धाडी घडकत सुटली गव्हरांतूनि गाडी
घाटांची उंच माडी भयकर वरती खालती कीर झाडी
दावोनी खोल खिंडी सकलहि मनिंचा त्यामधीं गर्व गाडी
आश्चर्यीं फार पाडी भंवतिं निरखितां माणसें होति वेडीं ६
सह्याची बहु रांठ धीट धरिती घाटे मराठी गडी
शौर्यें लाविती हारवूनि अपुल्या वैऱ्यांस देशोधडी
राज्यस्थापन या गिरीवरी महा-राजा शिवाजी करी
स्थापी धर्म तसाच सज्जन-गडीं तो रामदासा करीं ॥ ७ ॥
लावी जो जयतोरणें सुविजयी त्या तोरण्या आपले
ज्याचे सिंहगडींच सींगडि महा सिंहापरी गाजले
देई ताप बहू प्रतापगड हा किल्ला अविंधा सले
हा हा! हे गड भंगुनी दगड या अद्रीवरी झोंपले! ॥ ८ ॥
शीर्षीं धोम-महाबळेश्वर धरी कैलासलोकापरी
गंगाशी शिवमस्तकांतुनि निघे कृष्णानदी साजिरी
गानीं नर्तनिं गौरकाय नहरीं सौख्योपचारीं रत

---

१ महाबळेश्वराजवळील घाट २ कोल्हापुराजवळचा ३ महाडाजवळचा.

सांबासान्निध यक्षकिन्नरचि ते आहेत हो नांदत ॥ ९ ॥
कृष्णा सह्यसुता गभीर दिसती तैशीच गोदावरी
नांदे, सन्मुख पश्चिमाब्धि म्हणती हा तो पित्याचा अरी
त्या धिक्कारुनि पूर्वसिंधु वरिती स्वीकारिती दूरता
बापाच्या रिपुला अधीर मिळती क्षुद्रा मनस्वी सुता! ॥१०॥
वेगें धांवत जो कड्यावरुनिया टाकी उड्या खालतीं;
वातें हालवितां जणो धरितसे जो नागमोडी गती;
फेंसानें गरलास उग्र वमतो; जो फार फोंफावतो;
सह्याचा गिरसापचा धबधबा सापापरी भासतो ॥ ११ ॥
रोगांना हारवाया गिरिवर असती वृक्षवल्ली अपार
भाण्डारीं सांठवाया नव निधि भरले सह्यगर्भांत फार
भंगाया दुःख वारे सुखकर नहरीं वाहती थंडगार
विश्वाची भव्य शोभा लवकर निरखा सह्य हा एकवार ॥१२॥

**केशव वामन पेठे.**

---

## दुःखच सुखाचें मूळ.

श्लोक—दुःखावांचुनि सौख्यलाभ घडणें दुष्प्राप्य आहे जना
" आहे दुःखच सौख्यमूळ " दिसते ही ईश्वरीयोजना
बोलें बालक बोबड्या रिझविते मातेस नानापरी;
वाहावा नव मास गर्भ उदरीं लागे तयाचा परी. ॥ १ ॥

---

## ८२ प्रेम.

श्लोकः—जीवित्वाकाश चिंताजलधरिं भरलें; घोर काळोख झाला.
आशेचा रम्य होता तळपत गगनीं चन्द्रमा तो निमाला.

दृष्टीला वस्तु कोठें भुवनिं न पडते एकही सौख्यदायी.
भासायाला मनाला सहज मग दिशा लागती शून्य दाही ॥१॥
सों सों सों संकटांचें किति तरि जगतीं वाहतें घोर वारें
मृत्यूविद्युल्लतेनें कहर उसळिला. पीडिले लोक सारे.
दुःखाचा कोसळे हा बहु रंवसडुनी नित्य पर्जन्य थोर.
नाहीं आश्चर्य ऐशा खडतर समयीं होय धैर्याद्रि चूर ॥ २ ॥
ऐशाही वादळाला मनुज न गणितो, काल कण्ठी सुखांत;
नाहीं हें काय मोठें नवल मज तयें पाडिलें विस्मयांत!
प्रेमाचा भानु येई प्रतिदिनिं उदया; दूर सारी तमाला;
देई आनन्द देई जनमनकमलां; घालवी आपदेला ॥ ३ ॥
प्रेमामुळें संसृति गोड वाटे
प्रेमामुळें सौख्य मनांत दाटे
प्रेमामुळें दुःख लयास जातें
प्रेमाच हें जीवन मानवातें. ॥ ४ ॥

---

## ८३ जुनें मत आणि नवें मत-संवाद.

जुन्या मताचा गृहस्थ म्हणतोः—
श्लोकः—बोलूं काय तुला? सुधारक भला झालास तूं चांगला
सोडूनी दिधला सुधर्म अपुला जो पूर्वजां मानला,
तैशा ज्या सकला रिती सुविमला[1] तुच्छाचि झाल्या तुला[2]
मित्रा! दोष तुला न हा कलियुगा कीं शिक्षणाला भला ।१।
भाला[3] गंध न भस्म तें कुठुनिया संध्याच ते कासया?
आला ब्रह्मकुलांत शीण अपुल्या मातेस रे! द्यावया

---

१ निर्मल २ तुला तुच्छ वाटतात ३ कपाळास

आधीं पोटपुजा न देव पुजितां आसोनि एकादशी
मित्रा ! फारच फार वाइट अहा लज्जा न तूंते कशी ? ॥ २ ॥

**नवीन मताचा गृहस्थ म्हणतो:—**

होई शान्त, करीं विचार बरवा, कोपास दे टाकुनी,
सोडी हा अभिमान, सत्य स्मरुनी, मद्भाषणा ऐकुनी
पूर्वीचें अवघें न निंद्य म्हणुनी त्यांतून जें चांगलें
घेती नूतन कां न उत्तमहि जें सारज्ञ[1] रे चांगलें ॥ ३ ॥
प्रातःकाळीं उठोनी तृण मिळवुनियां बाळकें अंगणांत
थंडी वारावयातें शिशिरसमयिं तीं केवि त्यां जाळतात
ग्रीष्मीचा ताप त्यांतें सुखद न म्हणुनी शीत तीं वांछितातीं
जैसा ये काळ तैसे सकल महिवरी लोक या नांदतातीं ॥ ४ ॥
खेळूं बाळपणांत खेळ कसले आतां कशाची रती
जें झालें प्रिय फार तैं[3] रुचत तें आतां न आम्हांप्रती
नाहीं बोलत बाहुली म्हणुनिया मारूं किती रे तिला
हांसे कोसळतें स्मरूनि असल्या गोष्टींस आतां मला ॥ ५ ॥
होतें अज्ञ खेरीचे जें जगत हें तेव्हां बहू रानटी
झाले लोक पुढें सुशिक्षित जरा त्याहून आतां किती
अज्ञानांधतमास दूर करितां हा शास्त्ररूपी रवी
अज्ञानांतच राहिलों तरि अम्हां अंधोपमा[4] साजिरी ॥ ६ ॥
नीतीधर्म[5] खरा असोनि दुसरा व्हावा कशाला अम्हां
नाशाकारणभूत[6] रीतिहि अशा व्हाव्या कशाला अम्हां

---

१ जुन्या नव्यांतील साराग्रहण करणारे २ गवतास ३ बालपणांत ४ अंधळे उपमा ५ नीति हाच सत्य धर्म ६ नाश करणाऱ्या.

बालांचा करितां विवाह सखया ! हो लाभ रे कोणता
स्त्रीतें अज्ञतमांत ठेवुनि तुम्ही सौख्यास कां इच्छितां ॥ ७ ॥
ज्यांचा प्राण, सुखाब्धि जो प्रसविता जो जीविताचा धनी
नेतां धर्म तयांस, वक्ष पिटिती जैं विव्हला भामिनी
तेव्हां त्या अबलांस नापितकरीं जो द्यावया सांगतो
ईशाच्या कृतिनें तरी सकलही जावो लया धर्म तो ॥ ८ ॥

जुन्या मताचा गृहस्थ म्हणतोः—

रामा ! धर्मविरुद्ध भाषण नको ऐकावया कर्ण हे
विद्या इंग्लिश ही सुरा पिउनिया झाले कसे मत्त हे
कांता बाहिर, कांत इच्छित घरीं भाजावया भाकऱ्या
केलें ना वपनास होतिल तरी त्या नीतिमंतां बऱ्या ॥ ९ ॥

नव्या मताचा गृहस्थ म्हणतोः—

जीचें चित्त उदार ती न ढळते बा ! सत्पथापासुनी
येतां दुष्ट समीप दूर करिते लत्ता तया मारुनी
जीचें मानस दुष्ट ती निपजते दुष्टा सदा कामिनी
तेव्हां द्या झिडकारुनी म्हणतसे या साधना मी मनीं ॥ १० ॥
चित्ता स्वस्थ करावयास करितो गोष्टी जयांच्या सवें
संसारांतिल दुःख सौख्य सगळें भोगूं जयांच्या सवें
आम्हीं ज्यांस अधार चित्त सगळें ज्यांच्यावरी आमुचें
त्यांच्यावांचुन ज्ञान बा ! मिळवितां सत्तत्व हो कोणचें ॥११।
होतां अन्न विशेष तें न पचुनी जें मांद्य येते नरा
मोडावे म्हणुनी उपाय कथिता ऐकादशी हा बरा

---

१ यमधर्म २ इंग्रजीशिक्षणरूप दारू ३ बऱ्या होतील ४ नेहमीं पेक्षां जास्त
५ जडता ६ नाहींसं होण्यासाठीं ७ एकादशी वगैरे निर्शन

नाहीं स्वर्ग न वा पुनर्जननही वांन्यास वारा मिळे
सौख्याला मुकता पुढील धरुनी आशा न कैसें कळे ॥ १२ ॥

जुन्या मताचा म्हणतो:—

झाला त्रास बहू, पुरे करि अतां बोलूं नये वाटतें
देवो ईश तुला सुबुद्धि करणें वाटेल जें योग्य तें
ऐसा बा! जरि धर्मभ्रष्ट बनुनी वागावया लागशी
पश्चात्तापसुदग्ध होशिल गड्या! धर्मा जरी दूषसी ॥ १३ ॥

**गो. गो. टिपणीस.**

---

## ८४ सांदीपनाचा शिष्यत्रयीस उपदेश.

आर्या:—द्वादश-वर्षें ज्यांचा संगम ते आजि जाति हे बाल
देखुनि गहिंवरला गुरु नेत्र जलें भरुनि जाहले लाल ॥ १ ॥
घेई चुंबन त्यांचें गुरु तो अ-सकृत् परी न शम पावे
स्वादिष्टाऽन्नसुभोजी त-द्वासें केवि तृप्तता पावे? ॥ २ ॥
धरि हृदयीं, सोडि पुन्हां ढाळी अश्रू म्हणे ‘ बरें मरण ’
अन्योन्य-विरह-दुःखें रडतीं अन-सूंहि कर्दली-पर्ण ॥ ३ ॥
हृदय-विधृत-शिष्यांवरि सहस्रशा बाष्प-बिंदु तो गाळी
वाटे सु-मौक्तिकांनीं गुरु तो गमनेछु शिष्य आंघोळी ॥ ४ ॥
गहिंवर देखुनि गुरुचा सद्गद ते जाहले न शब्द निघे
चित्र जसें चित्र-पटीं स्तब्ध तसे राहिले तिघेहि उभे ॥ ५ ॥
तेव्हां येता झाला कंठापर्यंत शब्द सर्वांचा
परि बाहेरि न पडला कंठ असे व्याप्त गहिंवरें साचा ॥ ६ ॥

---

१ स्वर्ग लोकाची कल्पना खोटी आहे २ पुढील जन्माची कल्पना अज्ञानमूलक आहे ३ आंतील वायु बाह्य वायूशीं मिळतो ४ सांप्रत सुखास ५ होऊन.

रोमां–चित–तनु होउनि गुरु शिष्यांची सु–गात्र-शक्ति सुटे
स्मृति हरपे वदवेंचि न गहिंवर अंतीं फुटोनि अश्रु सुटे ॥ ७ ॥
खळखळ वाहे पाणी नेत्रांतुनि तें पडूनियां गालीं
नीलोत्पल उदकां-कित तशी शोभा तदा तया आली॥ ८ ॥
तार–स्वरें गुरु म्हणे ‘ होता विश्राम–धाम आजवरीं
जातां–ना आतां रे , बालांनो मजासि तुष्ट कोण करी ॥ ९ ॥
कोणां उपदेशूं मी कोण मला तोषवील सु–वचांनीं
कोण स्व–चेष्टितांनीं रमविल मम चित्त नित्य या स्थानीं ॥१० ॥
विधिच असा मम, तेथें माझा तुमचाहि काय अन्याय
सन्याय देव करितो मान्याऽमान्यावरी न तन्नचाय ॥ ११ ॥
कृष्णा, उगा रडुं नको, दामा तूंही उगा रहा बाळ!
मन्मूर्ति मनीं स्मरुनी न्याय–पथें वर्तुनी क्रमा काळ ॥ १२॥
पर–धन पर–दारा ही गरलासम मानुनी रहा दूर
ऐसें उपदेशी त्यां परि अश्रू लोटती जसा पूर ॥ १३ ॥
पर–धर्म हा भया–वह, निज–धर्म असे सुखा–वह, स्वर्ग
सत्य–त्व–तपें मिळतो हीं वाक्यें स्मरुनि चालणें मार्ग ॥ १४ ॥
कर्तव्य नका सोडूं , हित–कर मार्गा चुकूं नका स्वप्नीं
अध्ययना विसरुं नका, सत्य–व्रत बाळगा सदा स्व–मनीं ॥ १५ ॥
जरि शक्या पर–पुष्टी निज–हानीनें करा न दुःख वरा;
जैसा वृक्ष स्व–फलें अर्पुनि, करि तुष्ट सर्व–काल नरा. ॥ १६ ॥
जरि पर–पीडित झालां तरि पीडक–तुष्टतेसि यत्न करा
जरि पक्क परी ओदन देत असे पाचकासि तुष्टि वरा ॥ १७ ॥
माता पिता निज–गुरू गुरु–जन देवा–समान मानावे
पर–जनदोष त्यजुनी गुण त्यांचे ग्रहण करुनि वानावे ॥ १८ ॥

जें दत्त न वर्णावें श्रद्धेनें देय दान अर्पावें
कर्तृ-त्व आपणासी घेतां ईशा न दान तें पावे ॥ १९ ॥
करुनी उपकारातें व्हावें मनुजें सु-निष्कलंक-मन
जेवी जला समर्पुनि उपकारें-निष्कलंक होत घन ॥ २० ।
निज-काया श्रमवुनिया पर-दुःखाचें करा सदां शमन
जैशी सु-वर्तिका करि जाळुनि काया जनां प्रसन्न-मन ॥ २१ ॥
सुष्टासीं दुष्टासीं वागावें सर्व-काल समतेनें
जेवी धेनु-व्याघ्रां जल दे शांति न कदा वि-षमतेनें ॥ २२ ॥
ठेवुनि उपदेश मनीं वागा रे सर्व-काल संसारीं
होईल तुष्ट सुष्टा आचारा देखुनी अनंगारी ॥ २३ ॥
" पाथेय दत्त न पुरे, कथितां बुद्धिहि पुरे न कोणाला "
यास्तव आत्म-ज्ञानें वर्तुनि संतुष्टतेसि द्या मजला, ॥ २४ ॥
ऐसें उपदेशुनिया धरि तो गुरु हृदयिं शिष्य बळकटसें
तेव्हां वाटे त्यांना सुख-जल-धीमाजिं लोटिलें ऐसें ॥ २५ ॥
श्रम-नोदन करुनि असें, ' जा आतां ' म्हणुनिया निघे परत
करुनी कठोर मानस धन्य गुरू जो असे सु-शिष्यरत ॥२६॥
पितरांपरी गुरु असे, न तिळहि त्याचें उणें असे प्रेम
स-च्छिष्य मात्र व्हावा तनयासम पाळिती असा नेम ॥२७॥
गुरु माघारी फिरतां टाकिति ते मंद मंद पादातें
गुरु-हार्द-शृंखलेनें होते जणुं बद्ध-चरण मज गमतें ॥२८॥
चालति पंथ पदानें परि मन गुर्वा-श्रमीं तया शिशुंचें
बद्ध-प्रीति सु-वस्तू सोडीना मानसासि हें साचें ॥ २९ ॥
चालति पंथा फिरविति दृष्टि पुन्हां आश्रमाकडे गुरुचे
चरण-स्तेनें त्यांच्या वपुचें अप-हरण मांडिलें साचें ॥ ३० ॥

मदाक्रां०:–ऐसा मार्गे क्रमित असतां रम्य उद्यान–माला
लागे, जीचे तरु–वर मुखें चुंबिती कीं नभाला
पांथां पाचारिति करुनिया पल्लवां–गुष्ठ–संज्ञा
सेवायातें किसलय–करां जोडुनी घेति आज्ञा ॥ ३१ ॥

**गणेश–सुत गुणे.**

---

## ८५ श्री छत्रपति शिवाजी महाराजकाव्य.

## राजा विश्वासराय.

आर्या.

कार्यारंभीं नमितों अघहरणा अंबिका जगज्जननी,
जीच्या पदप्रसादें करि कविता--बंध मंदबुद्धि जनीं. ॥ १ ॥
देवो ती जगदंबा नव काव्य रचावया मला स्फूर्ति;
कोण समर्थ तिच्याविण करण्या दुष्प्राप्य कामनापूर्ति? ॥ २ ॥
नच काव्यशक्ति अंगीं, मी अति निर्बुद्ध, परिमित ज्ञान,
लंघाया गगनतला हृदयीं इच्छील कोण सज्ञान?॥ ३ ॥
सत्कवि–संत–महज्जन–चरणीं शिर केंवि नम्र न करीन;
श्रेष्ठ–प्रसाद--विमुखा उन्मत्त--जना कधीं यश वरी न. ॥४॥
धर्मोद्धार कराया अवतरला देवदेव जो जगतीं,
दुस्तर संसृतिसागरिं जो पतित जनास होय सत्य गति. ॥५॥
गीताभाष्य करुनियां ज्यानें अघनिधि अपार उद्धरिले,
नमिला ज्ञानेश्वर तो; ज्यानें त्रैलोक्य निजयशें भरिलें. । ६ ।
वेदान्तनभस्तरणी अमृतानुभवा रची विशाल-मति,
नमिलें मुकुंदराया; मन्मन तत्पदिं वरो अखंड रति. ॥ ७ ॥

भगवद्भक्त जनार्दनशिष्य ज्ञानार्क एकनाथाला—
नमितों आदरपूर्वक; जो सेतु भवार्णवीं अनाथाला. ॥ ८ ॥
ज्याची प्राकृत कविता देते संतोष बहु मुमुक्षु-वरां;
जीच्या श्रवणें होई दुस्तर संसृतितरंगिणी सुतरा; ॥ ९ ॥
त्या श्रीधर कविवर्या आदरपूर्वक करीतसें नमन;
त्याच्या चरणसरोजीं लीन सदा हो ढळो कधीं न मन. ॥१०॥
पावति अभंगवाणी ज्याची ऐकून भक्त आरामा,
त्या भक्तश्रेष्ठा मी नमितों अत्यादरें तुकारामा. ॥ ११ ॥
त्रिभुवनमहितशिवमहीनाथगुरु समर्थ रामदासाची,—
स्मृति होईल न कैशी ? मूढ कविजनास कामदा साची. ॥१२॥
सुखवी विश्वा सर्वा करुनी सुश्लोकमय सुरस कविता,
नमिला कवि वामन तो; अवतरला लोकिं काय जो सविता।१३।
वाग्देवीकंठस्थित--कविमालागतमहार्हमध्यमणी,-—
ज्याच्या काव्ययशानें भरुनी गेली समस्त ही धरणी; ॥१४॥
त्या श्री मयूरकविच्या कैशी स्मृति मज न होय पायांची,
नवकाव्यविरचनीं या सादर मी मूढ तत्कृपा याचीं. ॥ १५ ॥
भक्तश्रेष्ठ--महीपतिपद मी अत्यादरें मनीं स्मरतों,
काव्यग्रंथ विलोकुनि ज्याचे भवसागरीं विनत तरतो. ॥ १६ ॥
पुष्पपुरी नांवाची विलसे कृष्णा-नदीतटीं नगरी,
उन्नत-विस्तृत-मंदिर-शत-शोभित जी दिसे सुरम्य खरी. ॥१७॥
उपवन-परंपरांहीं आली शोभा अपार नगरीतें,
निवती घ्राणनयनमन पाहुनि कुसुमित-लतातरुश्रीतें. ॥ १८ ॥
वसती आनंदानें धन-धान्य-विभूतिमान् जन सकलही,
प्रेम परस्पर धरिती, कधींहि रमती न अल्पही कलहीं ॥१९॥

अमृतोपम-मधुर-जला कृष्णातटिनी वहात मंदगती
पीन-पयोधर-विनता अधिगत-नवयौवना जशी युवती. ॥२०॥
कृष्णातीरीं विलसे प्रस्तरमय घाट विस्तृत विशाल;
जेथें संध्यासमयीं बसुनी जन लोटिती सुखें काल ॥ २१ ॥
त्या नगरीचा अधिपति होता विश्वासराय परम हित;—
सत्कुलसंभव, धर्मन्यायपरायण, दयालु, परमहित. ॥ २२ ॥
भीति तया अरि थरथर, मदमत्त करी असे मृगपतीतें,
विध्वस्त-धैर्य होउनि, सोडुनि समरास दूर पळती ते. ॥२३॥
संरक्षी लोकांतें पुत्रांपरि विमल भाव मनिं धरुनी,
संकटपंक्ति निवारी, लावितसे सत्पथा तयां जपुनी. ॥ २४ ॥
अगणित धन देउनिया तुष्ट करी तो महीसुरां सकलां
सुखवी जीवां सर्वां, ज्यापरि घन वर्षुनी अपार जला ॥ २५ ॥
जो जो दुर्मार्गानें वागे अन्तक गमे तया हृदयीं
शत्रु असो मित्र असो, समभाव धरी मनीं तयाविषयीं ॥२६॥
पाहुनि दीन जनातें अनलें नवनीतसें हृदय वितळे,
तद्दुःख हरी वेगें, नच दुखवी अल्पही कुणांस बळें, ॥ २७ ॥
" परधन-परदारानिरत जन पावतसे विनाश; सबल जरी--
पडले व्यसनीं दशमुख, शक्र,शशी; मर्त्य-गोष्टि काय तरी ! २८
हें तत्व धरुनि हृदयीं धर्मात्मा करितसे सदाचरणा,
पूजुनि अनन्यभावें द्विज, त्यांच्या सेवि तो सदा चरणां.॥२९॥
विश्वासराय विश्वासास्पद तो होय सकल लोकांतें;
तातासमान सादर त्यातें सन्मानितील नच कां ते ? ॥ ३० ॥
गुणकुलसौंदर्ययुता असे खरी तदनुरूप तद्भार्या;
नामें सीताबाई, सीतेसम जी असे विमल आर्या. ॥ ३१ ॥

मानून देवतेसम पतितें सेवी सदा सती भावें;
लाजावें श्रीनें तिस, तद्वर्णनिं चित्त कां न लोभावें ? ॥३२॥
श्रान्तपतिस शान्त करी बोलुनि मधुरा सुधेसमा वाणी
तत्कोप न मनिं आणि, पतिचरणीं सतत लीन गुणखाणी.॥३३॥
वाखाणी विश्व तिला तिजसम दुसरी पतिव्रता न कुणी;
निर्मल जीची करणी, शोभे स्त्रीवर्गें नम्रतादिगुणीं ॥ ३४ ॥
अप्रिय जें निजपतितें साध्वी तें आचरी नच कदा ही
भर्त्यातें जें जें प्रिय तदन्य तिजला नसे सुखद कांहीं ॥३५॥
स्वसुख-निरभिलाषा ती; परोपकारीं सदा निमग्न असे.
दुःखितदुःखनिवारण हेंच तिला मुख्य सौख्य वाटतसे. ॥३६॥
दक्ष सदाही गुरुजनपदसेवनिं, कधिं न वीट ती मानी
ब्राह्मण-सुवासिनींतें धनदानें सर्वकाल सन्मानी ॥ ३७ ॥
विश्वासराय यापरि पत्नीसह सुचिरकाल राज्य करी;
इंद्रशचीसह जैसा त्याची अन्या नृपा नसेच सरी. ॥ ३८ ॥
होण्या कुलप्रतिष्ठा अपत्य कांहीं नसे परि तयास;
म्हणुनी रात्रंदिन तो झुरे सतीसह मनांत विश्वास. ॥ ३९ ॥
पूजिति गोविप्रांतें सुतवांच्छा धरुनि मानसीं सतत,
करिती व्रतोपवासां द्विजचरणीं होउनी परम विनत. ॥ ४० ॥
न परी अपत्यदानें ईश्वर त्यावरि करी कृपेला हो,
यास्तव खिन्न सदाही असती तीं; नच तयांस सुख-लाहो. ॥४१॥
अस्तंगत पूर्णपणें होई आनंदसूर्य सत्य तयां,
दुर्धर नैराश्यतम व्यापी संपूर्ण या जगद्वलया. ॥ ४२ ॥
एके दिवशीं सायंकालीं बसली सती विषण्णमुखी,
तत्खेदहेतु जाणुनि राव जहाला मनीं बहुत दुःखी ॥ ४३ ॥

बोले " सुहास्यवदने ! खेद असा हा नसे तुला उचित,
झालें दैव पराङ्मुख, आम्हांवरि ईश कोपला खचित. ॥४४ ॥
म्हणुनि न आह्मांकडुनी तों घडवी पुत्रमुखसुधापान,
लिहिलें विधिनें भाळीं, कीं भोगा सतत दुःख-संतान. ॥४५॥
झाले कपोल पांडुर, निष्प्रभ वदनेंदु जाहला फार,
जाळितसे अन्तर तव अग्निपरी गुप्त शोक अनिवार! ॥ ४६ ॥
शोक-दिवाकर-दुर्धर--करपीडित तनुलता तुझी विकला,
क्षीण प्रतिदिनिं होई निदाघसरितेसमान ही सकला! ॥ ४७ ॥
शिणले कमलनयन तव सखि ! अविरत बाष्पसलिलसेकानें,
कोमल तव बिंबाधर झाले गे ! कृष्णवर्ण शोकानें ! ॥ ४८ ॥
शोकानुबंध सोडीं, कां करिशी व्यर्थ अश्रुपात सती?
काय करावें येथें, गे ! दैवाधीन गोष्टि या असती. ॥ ४९ ॥
आचरिलें सखि ! आपण सुकृत खचित पूर्वजन्मिं नच काहीं,
म्हणुनी दुःखावस्था भोगितसों ही अशी सदा पाहीं. ॥५०॥
लिहिलें दैवें सदसत् मनुजाच्या एकवार जें भाळीं,
केलें प्रयत्न तरि तें शुभशीले ! नच टळे कदा काळीं. ॥५१॥
प्रबल सुरासुरगणही सर्वंकषनियतिचा असे दास,
सोडुनि राज्यसुखातें भोगी रघुकुलललाम वनवास. ॥ ५२ ॥
यापरि दैवदशा ही आहे सखये ! जरी महा प्रबल,
तरि मानवें करावे यत्न सदा शक्य तेवढे सकल. ॥ ५३ ॥
विश्वास देवतांवरि ठेवुनि निरपेक्ष सेविं तूं त्यांस,
होतां प्रसाद त्यांचा दुर्लभ जगिं काय सांग मनुजास! ॥५४ ॥
धनदानें शुद्धमनें सेवावें विप्रवर्य हे भावें,
भूभागीं विचरति हे सुर निःसंशय सखे मनिं गणावें. ॥ ५५ ॥

विप्र--प्रसाद--महती वर्णूं मी कवि एक वदनानें,
तारिति मारिति दुर्लभ वांच्छित ते पुरविती निज बलानें.॥ ५६॥
शृंगर्षि-वरें वृद्धाहि दशरथ भूपाल पावला चार--
गुणनिधिसुत, तद्वंशीं येई क्षीराब्धिवास साचार. ॥ ५७ ॥
घेऊन पुत्र अंकीं स्नेहें बसशील सुंदरी ! केव्हां,
क्रीडासक्त तयातें पाहुनि होइन धन्य मी केव्हां. ॥ ५८ ॥
पाहुनि मुग्ध मुखातें ऐकुनियां बोबडे वच रसाळ,
केव्हां सुखनिर्भर मी त्यासह नेईन सर्वही काळ? ॥ ५९ ।
ऐशी विचारमाला करिते कल्लोळ हृदयिं बहुसाल,
निद्रा नच येई मज, होई रजनी युगासम विशाल. ॥ ६० ॥
अनपत्यता--समुद्भव तुजपरि जाळी मलाहि हा शोक,
जीवित निष्फळ वाटे, गमतें मज शून्य हें जग विलोक ॥ ६१ ॥
परि काय करावें गे ! याला कांहीं उपाय नच रमणी,
दैवीं असेल जें जें भोगावें सर्व तें निमूटपणीं. ॥ ६२ ॥
ठेवुनि देवावरती धर्मावरती तसाच विश्वास,
धैर्यें वर्तत जावें, पुरविल हरि खचित आपुली आस ॥ ६३ ॥
शोकावेगा टाकुनि यास्तव मनिं चारुगात्रि ! धीर धरी,
सकल मनोरथ अपुलें निःसंशय करिल पूर्ण सदय हरी ॥ ६४ ॥
झाला यापरि वदुनी निजदयिता--सांत्वनास तो करिता;
वसनाचलें स्वयें तो सुकवी तल्लोचनाश्रुजलसरिता. ॥ ६५ ॥
त्या दिवसापासुनि ती साध्वी सोडून शोक अवघाही,
उत्साह धरुनि हृदयीं, देवद्विजसेवनीं निरत राही. ॥ ६६ ॥
देवावरि भाव विमल निजपति-वचनानुवर्तिनी ठेवी,
कोमल तनुलतिकेतें विगणुनि नानाविध व्रतें सेवी. ॥ ६७ ॥

धनदानें पूजितसे विप्रातें देवरूप गणुनि मनीं,
नेई शुचिष्मती ती सती सकल काल सत्कथा श्रवणीं. ॥६८॥
यापरि अनन्यभावें सेवा करितांचि देवविप्रांची,
भक्ति तिची पाहुनि हरि अनुकंपा तिजवरी करी साची. ॥६९॥
जातां कांहीं दिन ती धारण करि गर्भलक्षण स्पष्ट,
सहपरिवार नृपाचें बघुनी तें होय दुःखतम नष्ट. ॥ ७० ॥
पांडुरता अंगावरि पसरुनि मुख दिसत धूसरेंदुपरी,
मृगलोललोचना ती जड दृष्टि-प्रसर बहुत होय खरी. ॥ ७१ ॥
वाढे गर्भ जसजसा वाढे आनंदही तसा त्याचा;
पत्नीदेह दिसतसे सतेज, त्यापरि मुखेंदु रायाचा. ॥ ७२ ॥
ऐसे क्रमाक्रमानें जातां दिन लागला नवम मास;
पाहीन पुत्र केव्हां रायातें हाच सर्वदा ध्यास. ॥ ७३ ॥
शुक्लाष्टमी तिथि बरी निरसुनिया सकलही तमःप्रकर,
विलसे नभोंगणिं विधू, झालासे एक यामिनी-प्रहर. ॥ ७४ ॥
रमणीय सुतारत्ना ती साध्वी प्रसवली तया समया,
ऐकून ती सुवार्ता कवळी आनंद सकलजनहृदया. ॥ ७५ ॥
राव स्तिमितनयन तो, अवलोकी रुचिर कन्यकावदना,
मोद मनांत न माये टाकी व्यापून सर्वही गगना. ॥ ७६ ॥
पुत्रेच्छा वसत मनीं, तरिही पाहून कन्यकामुख तें,—
आनंद फार वाटे; पुत्राहुनि दे तया सुता सुख ते. ॥ ७७ ॥
कन्यारत्न सुभग तें दिधलें विश्वंभरें करून दया,
म्हणुनी कृतज्ञ चित्तें नृप स्तवी विश्वपालका सदया. ॥ ७७ ॥
श्लोक—जयास अनपत्यता—प्रभव शोक जाळी सदा,
मनीं विकल फार जो अनुभवी दशा दुःखदा;

गमे विजन काननापरि मही अशेषा जयां,
नितान्त सुख पावती जन अपत्य होतां तया॥ ७९ ॥
परोपरि महोत्सवां करिति सर्व आनंदुनी,
पुरी सजविती स्वयें धन अपार तें वेंचुनी;
पथीं सदनिं शोभती परम रम्य दीपावली,
गमे सकळिकांस ती खचित अन्य दीपावली. ॥ ८० ॥

——— श्री. ना. मुजुमदार,

## ८६ स्फुटप्रकरण.

—:*:—

### सुभाषितप्रशंसा—शार्दूलविक्रीडित.

पावे हा न विकार, नीरसपणा यातें न येई कदा,
होईना अणुही उणा बहु जनीं हा सेवितां सर्वदा
जोड्या हा हरितो, रुचीस करितो, देतो सदा तृप्तिला
तेणें सर्वरसीं सुभाषितरस श्रेष्ठत्व पैं पावला ॥ १ ॥

### विद्याप्रशंसा—गीति.

भारति ! कोश तुझा तो लौकिक कोशाहुनी अपूर्व असे
व्यय करितां वृद्धिस कीं संचय करितां क्षयास पावतसे॥ २ ॥

### शार्दूलविक्रीडित.

योजोनी पितयापरी हितपथीं, मातेपरी रक्षिते,
खेदातें हरुनी सदा रिझविते, कांता जशी ऐकते
कीर्तीलागिं दिगन्तरीं, पसरिते द्रव्यास कीं अर्पिते,
विद्या कल्पलतेपरी पुरविते जें जें असे इष्ट तें ॥ ३ ॥

मूर्खपणाला, पक्षी पोटांतलि जाड्याला. २ हे सरस्वती ! ३ ज्ञानकोश, पक्षी खजिना. ४ लोकांतील. ५ रमविते. ६ कल्पवृक्षाप्रमाणें.

### काव्यप्रशंसा—गीति.

कवणासि विचारावें ? काव्यरसचि गोड कीं सुधा गोड
नाकीं सुर, अवनीवरि आम्ही, पुरणार हें कसें कोड ? ॥ ४ ॥

### शार्दूलविक्रीडित.

मद्वाणीच मुळीं असे रसवती, वेधी जनांचीं मनें,
" द्यावें चित्त तुम्हीं " म्हणोनि रसिकां प्रार्थी कशाकारणें
सूर्यास्तीं मकरंदयुक्त कुसुमीं उत्फुल्ल जी मोगरी,
अन्योपायें नकोत तीजवरती संसक्त व्हाया अली ॥ ५ ॥

### कुकविनिंदा—शार्दुलविक्रिडित.

कष्टें शब्द जुळोनि एक दुसऱ्या श्लोकासि जो कां करी,
वाणी वश्य जया, अशा सुकविशीं स्पर्धा करी तो जरी
मृत्कुंभासि घडी, जगा अवघिया निर्मी तयाभीतरीं
या पापी कलिच्या युगीं अजि उद्या मातेल मोठा कली ॥ ६ ॥

### पंडितप्रशंसा—गीति.

सेवुनि काव्यें शास्त्रें, घालविती काल आपुला सुज्ञ
व्यसनीं, कलहीं, किंवा शयनीं तो वेंचिती सदा अज्ञ ॥ ७ ॥
विद्वानालाच कळे विद्वानाचा परिश्रम स्पष्ट
न प्रसववेदनेचें दुःसह वंध्येसि ठाउकें कष्ट ॥ ८ ॥

### प्रहर्षिणी.

विद्येनें आणि विनयेंहि युक्त जो कीं,
कोणाचें हृदय हरील तो न लोकीं !

---

१ स्वर्गात. २ प्रार्थना करण्याचें कारण नाहीं. ३ मधानें युक्त. ४ फुललेली. ५ उपाय. ६ आसक्त लुब्ध, ७ अनुकुळ. ८ त्यांमध्यें. कुंभार व ब्रह्मदेव यांमध्यें.

स्वर्णाचा अणि मणिंचा सुयोग झाला,
कोणाच्या रिझविल तो न लोचनाला ॥ ९ ॥

**सज्जनप्रशंसा—गीति.**

सुरसरितां दुरितं हरी, देवद्रुम दैन्य, चंद्र ताप हरी
एका सत्संगेंचि त्रय विलया जाय हें क्षणांत परी ॥ १० ॥
अनुकोरिती सुचीचा अग्रिम पाश्चात्य भाग खल सुजन
एक करी रंध्रातें, आच्छादी निजगुणें तया अन्य ॥ ११ ॥
अव्हेरुनि दोषांतें सज्जन केवळ गुणांसि आदरिती
क्षारांशा त्यजुनि जसे अंबुद शुद्धा जलांशची वरिती ॥ १२ ॥
आयकुनी अप्रियहि प्रियचि वदावें, अशी सुजनरीती
शोषुनि लवण जल जसे घन मधुरोदक जनांसि वितरीती १३
पडला राहुमुखीं तरि विकसवि रवि निजकरीं सरोजतती
अंगीकृत परकार्यां सज्जन विपदवसरींहि न त्यजिती ॥ १४ ॥

वसन्ततिलका.

हीं विस्मयावह पहा चरितें सतांचीं,
जीं मंडनेंच जणुं उज्ज्वल भूतलाचीं
लक्ष्मीस हे[१२] तृणसमानचि मानितात,

---

५ रत्नाचा. ६ गंगा. ७ पाप. ८ कल्पवृक्ष. ९ दुरित, दैन्य. ताप.तिन्हीं. १० नाश पावतें. ११ अनुकरण करितात. १२ सुईचा. १३ पुढचा भाग, अणी. १४ मागचा भाग, नेडें. १५ आपल्या दोऱ्यानें, पक्षीं गुणानें मेष.

१ खारें. २ मेघ. ३ देतात. ४ आपले किरणांनीं. ५ कमळांचा समूह. ६ स्वीकारिलेल्या. ७ संकटसमयीं. ८ आश्चर्यकारक. ९ जीं संतांचीं चरित्रें, भूतलांचीं जणुं उज्जवल मंडनेंच असा अ०. १० अलंकार. ११ तेजस्वी. १२ हे संत.

भारें तिच्या नमति[13] फार पुन्हा जनांत ॥ १५ ॥
केला जरी सदुपदेश न सज्जनांनीं,
सेवा तदीय[14] करणेंच[15] तरी जनांनीं
ते जें स्वयें सहज भाषण बोलतात,
तें शास्त्रतुल्य जन सर्वहि मानितात ॥ १६ ॥
संपूर्ण शुभ्र करितो जगतीं[16] शशांक,
कां घालवी न अपुला तरि तो कलंक
जे जाहले रत[17] सदा परकीय कार्यीं,
त्यांचा न आदर असे बहुधा स्वकार्यीं ॥ १७ ॥
उत्साह[18]वृत्ति विलसे वदनीं जयांचे,
जे नित्य सादर[19] परोपकृतींत[20] साचे
चित्तीं दया, अमृततुल्य वचें जयांचीं,
गातील कोण न जगीं चरितें तयांचीं ॥ १८ ॥

शार्दूलविक्रीडित.

व्हाया ख्याति नको पराक्रमि पिता, कीं उच्चवंशीं जनी[1],
ज्याचा तो आपुल्याच[2] शक्तिविभवें पावे प्रतिष्ठा जनीं
शोषाया असमर्थ कूपजलही जो कुंभ, त्यापासुनी,
ज्याचें जन्म, अगस्त्य तो जलधिला[3] टाकीतसे शोषुनी ॥१९॥
निंदीनाच परा, न निष्ठुर कदा बोले, न गर्वा करी,
कोणी बोललिया कठोर वचनें साहे, न कोपा धरी
झांकी दोषहि, मौन घे परिसुनी काव्यें सुदुर्लक्षण[4],

---

१३ नम्र होतात. १४ त्यांची. १५ करावी. १६ पृथ्वी. १७ तत्पर, निमग्न. १८ आनंद. १९ आदरयुक्त. २० दुसऱ्यावर उपकार करण्यांत.

१ जन्म. २ स्वतःच्याच सामर्थ्यानुरूप. ३ समुद्राला. ४ वाईट लक्षाची.

दोषांतें न करी स्वयें, सुजन जो त्याचें असें लक्षण ॥ २० ॥

## दुर्जननिंदा–गीति.

दुर्मति[5] अहित पराचें चिंती, तो तें स्वयेंच पावतसे
इच्छी निधन[6] हरींचें[7], पावे तें पूतना स्वयेंच जसें ॥ २१ ॥

## शार्दूलविक्रीडित.

आधीं येउनियां पदांसि लगटे[8], पृष्ठी[9] विकारा करी,
कर्णीं लागुनियां हळू गुणगुणे[10] सन्मित्र तैसा, परी[11]
छिद्रांतें[12] अवलोकितांच सहसा निःशंक तेथें शिरे
दुष्टाच्या अनुकारितो[13] मशक[14] हा[15] सर्वा चरित्रा बरें ॥ २२ ॥
नेदी पंजरकीरशब्द कुतुका मार्जार जें त्याप्रती,
कस्तूरीहरिणाचिया परिमळें न व्याघ्र संतोषती
हर्षें नृत्य करी मयूर, शबरां[16] तेणें नसे कौतुक,
दुष्टीं आक्रमिल्या[17] महींत बहुधा थोडे गुणग्राहक ॥ २३ ॥
जोडी हात दुरोनि, अश्रु नयनीं आणी, दृढालिंगन–
देई, बैसवि आसनीं, प्रियकथाप्रश्नीं समर्पी मन,
चित्तीं तीव्र विषापरी, अमृतसा बाहेरुनी भाषणीं,
हा हो कोण अपूर्व नाटकविधी अभ्यासिला दुर्जनीं ॥ २४ ॥

**म. ना. काळे.**

---

५ दुर्जन, ६ मरण. ७ कृष्णाचें. ८ पायापाशीं येतो, पक्षीं पाय धरतो. ९ पाठीला डसतो, पक्षी मागें घात करितो. १० गुणगुणतो, पक्षीं कानमंत्र करितो ११ परंतु. १२ छिद्र पक्षीं न्यून. १३ अनुकरण करितो. १४ डांस, चिलट, १५ मशक हा दुष्टाच्या सर्वा चरित्रा बरें अनुकारितो असा अ०, १६ पारध्याला, १७ व्यापलेला,

## ८७ वस्तुनिर्देश.

मंदाक्रां०:-सत्ता ज्याची जगतिं विलसे, जो न विश्वांत मावे,
नामोच्चारा बुधजन करी ज्याचिया प्रेमभावें,
ज्याचे ध्यानें सकळ जळतें पाप गेल्या दिसांचें,
तो आम्हांला प्रभुवर पदीं नित्य ठेवो सुखाचे. ॥ १ ॥

वसंत०:-हे शारदे भगवति प्रतिभालवातें
द्यावें मला मधुर काव्य करावयातें;
न्यावें हरोनि मम देवि तुवां तमाला,
व्हावें प्रसन्न वर हा मज द्यावयाला. ॥ २ ॥
जे जे तरंग उठती मनिं कल्पनेचे,
ते ते करोत लघुकाव्य मनोज्ञ साचें;
लागो अभिज्ञ रसिकां रुचि वाचनाची,
ही प्रार्थना सफल हो अयि वामनाची. ॥ ३ ॥

आर्या:-भट्टकुलोद्भवभूपां कथितों आधीं कथोग्र कळवाया;
तच्चरितामृत आहे योग्य बुधां कुतुक करुनि सेवाया. ॥ ४ ॥
सत्कीर्ति पेशव्यांची गाउनि, निधनप्रसंग वर्णीन
माधव नराधिपाचा; तत्संगें अन्य वृत्त कळवीन. ॥ ५ ॥

वसंत०:-ज्यांचा असे खलमनां यवनां दरारा,
ज्यां कांपती बघुनि शत्रु सदां थरारा,—
त्यांची कथा परम पावन तोषकारी
ऐकोनियां स्फुरतसे अभिमान भारी. ॥ ६ ॥
ज्यांच्यामुळें बहुत वैभव ये द्विजांला,
ज्यांची कृपा बसवि राजपदीं तयांला,—

त्यांची कथा मधुर सुंदर तोषकारी
ऐकोनियां स्फुरतसे अभिमान भारी. ॥ ७ ॥
जे भूपसूर्य उदयाचलिं येउनीयां
लोका प्रसन्न करिती किरणीं स्वकीयां,—
त्यांची कथा हृदयहारक तोषकारी
ऐकोनिया स्फुरतसे अभिमान भारी. ॥ ८ ॥

शार्दूल०—ज्यांची कीर्ति दिगंतरीं दशदिशा व्यापोनियां राहिली,
ज्यांची पुण्यपुरी करात्तकनकें शोभे तदां पींवळी;
ज्यांनीं शत्रुसमूहपर्वत महाशौर्यें निजें चूर्णिला;—
त्या भूपामधिं माधवाख्य पहिला प्रख्यात हो जाहला. ॥ ९ ॥
जे भूपाल महापराक्रमनिधी ऐसे जगीं गाजले;
ज्यापाशीं अरि हीनवर्ग शरणा मागावया पातले;
ज्यांचा शब्द जनें सदां वदुनिया 'जी जी अहो' पाळिला;—
त्या भूपांमधिं माधवाख्य पहिला प्रख्यात हो जाहला. ॥ १०
ज्यांनीं बाहुबळें अरीस समरीं मेंढ्यापरी मारिलें;
ज्यांनीं सौख्य दिलें प्रजेप्रति निकें; धर्मासही रक्षिलें;
ज्यांनीं सुज्ञजनां करीं धरुनियां राज्यार्थ संपादिला;—
त्या भूपामधिं माधवाख्य पहिला प्रख्यात हो जाहला. ॥ ११

**वा. दा. ओक.**

---

## ८८ शनवारचा वाडा.

पुढें भव्य वाडा पहा थोर आहे
पडोनी कसा पर्वतप्राय राहे ! ।

किती उंच भिंती, किती भार जंगी
न भंगे गमे अंग ज्याचें सुरंगीं * ॥ १ ॥
प्रबळ, थोर, विशाळ विराजती
बुरुज; वेष्टिति सर्व सभोंवतीं।
गमति दिग्गज रक्षिति त्या गृहा
भयद वर्णहि नील असा पहा ! ॥ २ ॥
किती आंत शोभा ! किती गार वाटे
जनांच्या मनीं, जाय जो त्याच वाटे।
चमत्कार जेथें असे सर्व ठाईं
तऱ्हेच्या मजेच्या किती थोर सोई ! ॥ ३
गजबजे जिकडे तिकडे किती,
अमित सेवक संतत राबती ।
भरुनि वैभव राहतसे सदा
करिति राज्य सुविप्र सुखें यदा ॥ ४ ॥
परि अहा ! स्थिति आज कशी घडे
न बघवे सुजनास तिच्या कडे ।
पळभरांत निवर्तति पेशवे
अहह ! कर्मदशा नच बोलवे ! ॥ ५ ॥
असे ध्वस्त सारें, न वाडा, न कांहीं
न हो पूर्विचा वासही आज राही ।
पडे थोर मैदान वारा झळाळे
मना त्या स्थळीं येति आतां उमाळे ! ॥ ६ ॥
स्थळीं राबती माणसें ज्या हजार

---

* सुरुंगांनींही न फुटण्यासारखें.

सदा सेवनीं स्वामिपादांसमोर ।
दिसे सर्व उध्वस्त पर्यन्त आतां;
न कोणी विचारी, पुसे तेथ जातां ॥ ७ ॥
महा शूर शिंदे तसे वीर अन्य
जिथें येउनी बोलती 'विप्र धन्य !' ।
जहागीरवाले, बडेजाव ज्यांची
घडे ज्या स्थळीं नित्य गर्दी अशांची ॥ ८ ॥
अहा ! त्या ठिकाणीं पहायास जातां
विके भाजिपाला ! पडे भूस आतां ।
बसे येथ काची तसा बागवान
विपत्ती सदा देइ काळास मान ! ॥ ९ ॥
आर्याः—कारंजावरती ज्या देहा अर्पी सवाइमाधव तो ।
हर ! हर ! आतां तेथें शुद्र तसा म्लेंच्छ कावडी भरितो १०
वाड्यांत सुंदर असे नृपराजयाचें
मंदीर, वर्णन न हो करवे जयाचें ।
लक्ष्मी प्रसन्न असुनी करि वास जेथें
राहे उणीव कसली मग सत्य तेथें ? ॥ ११ ॥
महाल नारायणराव यास
शोभे तसा तन्नवयौवनास ।
प्रत्यक्ष आनंद करी स्ववास
ऐसें गमे जेथ सदा जनास ॥ १२ ॥
सहस्त्र कारागिर त्या स्थळास
अनेकवर्षें करुनी प्रयास
समस्तचातुर्यबळें सुशोभा

देती, अशी अप्रतिमा यशोभा ! ॥ १३ ॥
कनकवर्ण मनोज्ञ चकाकती
बहुत यत्किरणें मग फांकती
किति विलक्षण हें चमके रुपें
धन अहा गणती न किती खपे ॥ १४ ॥
विलसणार सुरम्य रमापती
म्हणुनि लक्ष कुबेरच मापती
सतत तेथ मनोहर वा सती
जणुं रमा झिजुनी करि वास ती ! ॥ १५ ॥
समान्तरें स्तंभ उभे पहा हे
नक्षींत पक्षीजनसंघ राहे
वनांतुनी येति जणों घरा हे
ऐसें गमे प्रेक्षक यास मोहें ॥ १६ ॥
सकळ वृक्ष अहा ! सुरुचे कसे
रुचिर रंग तयां हिरवा असे
मधुनि राघु मनोहर कोरिले
जणुं जिवंत धरोनिच ठेविले ॥ १७ ॥
भिंतीवरी कसब दाविति ते चितारी
चित्रें विचित्र बहु काढुनि चित्तहारी
प्रत्यक्ष सर्व सजली जणुं सृष्टि अन्य
ऐसे गुणी करिति वास पुण्यांत धन्य ॥ १८ ॥
" हा जानकीसह वसे रघुराज येथें
वांके कपींद्र हनुमान् दृढभक्ति जेथें
ते दुःखभागि वनिं पांडव शोभतात

ती धर्ममूर्ति विलसे मनिं फार शांत ! ॥ १९ ॥
ती द्रौपदी; नकुल, तो सहदेव पार्थ
तो वीर सुंदर धनुर्धर भीम सार्थ[1]
तें घोर रान, अति उंच विशाळ शैल
जैं पांच बैसति अहा वनवासशील ॥ २० ॥
बसे रुक्मिणीही बसे सत्यभामा
स्वयें सेविती प्रीतिनें सर्वकामा
वनीं कृष्णजी सौख्यशाली विराजे
स्वयें धेनु चारी, मुखीं वेणु वाजे ॥ २१ ॥
दयार्द्र नारायण शेषशाई
लक्ष्मीसवें; त्यावरि दृष्टि जाई
समुद्रकन्या हरिच्या पदातें
सेवीतसे जो हरि आपदांतें ॥ २२ ॥
अशी चित्रमाला असे त्या महाला
घडावेंच कीं सौख्य नारायणाला
महा भक्तिनें नित्य चित्रें पहावीं
न खंती परी जोडप्याला गमावी ॥ २३ ॥

गो. वा. कानिटकर.

---

## ८९ बोधचषक.

आर्याः—प्रणति असो प्रभुला जो सदयमनें सर्व काळजी वाहे ॥
अंतीं राखिल तोची धरि चित्तीं सर्वकाळ जीवा हे ॥ १ ॥

---

१ भीम [ भयंकर ] या नांवास अनुसरून चित्र काढिलें होतें.

मनभृंगा हरिव तृषा सद्गुरुचरणारविंदमधु-पानें ॥
टाकुनि कमल-मरंदा प्राशावें उदक काय मधुपानें ॥ २ ॥
जा जीवा हरि-मंदिरिं पाही श्रीकृष्ण तेंवि नयनांहीं ॥
तादितर काय पहावें ! दान विफल तें जरी विनय नाहीं ॥३॥
स्पर्शि न पर-वनितेला[3] प्रखर अती अन्यदारकीलाभा ॥
रघुशरिं रावण पडला धरितां स्वमनांत जानकी-लाभा ॥ ४ ॥
प्रेम करीं स्वस्त्रीवरि धरि न मनीं परि तिचाहि विश्वास ॥
व्यसु झाला पत्नीकरिं विदुरथनृप विदित गोष्ट विश्वास ॥ ५ ॥
स्त्री-प्रेमा लुब्ध न हो कैकेयी-वचन-बद्ध-भूपाळ ॥
सुतविरहें मृत झाला; हृत्कमलीं गा ! सुवाक्य हें पाळ ॥ ६ ॥
' मद्य करी शक्त नरा ' प्राशिन तें धरुनि या प्र-भासाला
मधुपानमत्तयादव झाले व्यसु रणिं तृणें प्रभासाला ॥ ७ ॥
ईर्षा मूळ कलीचें करितां ती तव उरेल बा पत[10] न
पारिक्षित धरितां ती द्विज-वर-शापेंहि पावला पतन ॥ ८ ॥
येतां विघ्नशतें ही सोडीना धर्म त्यांत परम[11] हित
नीचगृहीं दास्य करी तारामति-कांत[12] धर्मपर महितें[13] ॥ ९ ॥
सत्संगीं निरत[14] रहा दुर्जन-सहवास फार भीषण तो
रघु-वर-सत्संगानें लंकापति[15] जाहला बिभीषण तो ॥ १० ॥
तुष्ट करी जननीला; दैवत तें कथिति थोर; सत्याहि तें
माताशापें झाले सर्पमखीं मरणकष्ट अत्याहितें ॥ ११ ॥

---

१ सद्गुरूच्या चरणकमळाचें मधु प्राशन करून २ भ्रमरानें. ३ परस्त्रीला ४ परस्त्री हीच कोणी एक ज्वाला तिची आभा म्हणजे तेज. ५ गतप्राण ६ जगाला. [ ही विदुरथ राजाची गोष्ट बृहत्कथासरित्सागरांत आहे ] ७ दारू ८ दृढ कल्पनेला. ९ प्रभास नांवाचें द्वारकेजवळ एक क्षेत्र आहे तेथें १० योग्यता ११ मोठें १२ राजा हरिश्चंद्र १३ पूज्य १४ आसक्त १५ लंकेचा राजा

पितराज्ञा पाळ सदा; देतां यौवेन पुरु स्वजनकाशीं
झाला साम्राड्भूपति, पितरोशीं गणिति सूज्ञ जन काशी ॥१२॥
होती तापद अंतीं अनुचित तीं सत्य जाण पां दानें
दान सपूर्ण कराया बलिनृप ताळिं जाय विप्र-पादानें ॥ १३ ॥
देतां दान फलाशा न धरावी ऐक नीट दे कर्ण
इंद्रा कुंडल देतां याचुनि हीनत्व पदरिं घे कर्ण ॥ १४ ॥
अवमानी द्विज न नरा तच्छापें अहि-मुखांत सांपडला
जनमेजयतात, फणी नहुषवनीं होउनी तसा पडला ॥ १५ ॥
दंभें हेतु न साधी, झाला जरि साध्य अंतिं असुख रेंची
द्विजरूपें लब्धास्त्रें, होउनि रणिं विफल, कर्ण असु खरची १६
परासुरक्षणतत्पर राही, दावी दयानतां राया
अर्पी शिबी स्वमांसहि श्येनविहंगा कपोत ताराया ॥ १७ ॥
न करी द्वेष कुणांशीं ठेवी मृदु सुमसमान सु-मनातें
देवासुर-भीषण-रणें झालें तापद न काय! सुमनांतें ॥ १८ ॥
नच हो कृतघ्न त्यातें उपकृति केली जयेंहि तुजवरती
धर्मोपकार भुलेता सिंधुनृपप्राण मृत्युते वेरती ॥ १९ ॥

---

१ तारुण्य ( पुरु हा ययातीचा मुलगा यानें आपल्या बापाला आपलें तारुण्य दिलें होतें. ) २ बापाचा आशीर्वाद. ३ वामनाच्या पायानें. ४ देतो ५ प्राण ( कर्णानें मी ब्राह्मण आहें असें सांगून परशुरामापासून अस्त्रविद्या मिळविली परंतु ती त्याला अखेरचे वेळीं उपयोगी पडली नाहीं.) ६ शरण आलेल्यास ७ बहिरीससाण्यास ८ कबूतर ९ फुलाप्रमाणें. आपल्या चांगल्या मनाला १० देवदानवांमध्यें झालेलें भयंकर युद्ध ११ देवांना १२ विसरून गेल्यामुळें १३ सिंधु देशाचा राजा जयद्रथ १४ पावले.

वाक्शर हानि न कोणा, तुडविति हृत्पद्म ते*मतंग[3]जसे ॥ ॥
दुःशब्द-तप्त-पांडव- दीपीं कुरु पडति ते पतंग जसे ॥ २०
अपमानत्रुटितमना सांधाया शक्य जो नमो त्याला ॥
हतभाग्यें फुटलेल्या येई कधिं जोडितां न मोत्याला ॥ २१ ॥
स्वामी-प्रिय साधाया इतरां छळण्यांत बुद्धि राहू न ॥
पैशानतत्परचंद्रा प्रतिवर्षीं पीडि काय राहू न ? ॥ २२ ॥
याञ्चाप्रसंग टाळीं कीर्ति तुझी बा ! करील वामन ते ॥
घेतां दान बळीचें प्रभु झाले तैं न काय वामन ते ॥ २३ ॥
दूषि न वा त्यागि न वा गर्वें तूं स्वाप्तबांधवालागी ॥
दक्षक्रतु विफल घडे वदतां निंद्या सुता-धवाला गी[10] ॥ २४ ॥
परनिंदा न करावी; नच का बा हा तुला नय ज्ञात ॥
शिशुपाल कृष्ण-निंदा करुनि मरे राजसूय यज्ञांत ॥ २५ ॥
अतिलोभा न धरावें; छळुनी लक्ष्म्यादिरत्नें[11]-दात्यातें ॥
देवासुर घुसळीतां; दिधलें विष खरें तयें तदा त्यांतें ॥ २६ ॥
दुष्टजनादर न करी निजसंगें तुज करील तो निर्धन[13]
सत्कारुनि आदरितां गाधिज[14] हरि मुनिवाशिष्ठ-धेनु-धन ॥ २७ ॥
विरहें धृतिविकल न हो; तापद तो अंतिं जाण सायंकसा
सुत-विरहें द्रोणाचा अहह ! रणीं जाहलाचि सोयं[16] कसा ! ।२८।
क्रोधद्रुमविषछायीं न घडो मनुजा तुझ्या मना वास
क्रोधें भीम प्राशुनि अरि-रुधिरा डाग लावि नांवास ॥ २९ ॥

१ शब्दरूपी बाण. २ मनरूपी कमल. ३ माजलेल्या हत्ती प्रमाणें, ४ अपमानानें तुटलेल्या मनास, ५ भिक्षाप्रसंग, ६ टेंगणी ७ बटु, ८ दक्षप्रजापतीनें केलेला यज्ञ, ९ पार्वतीपती श्रीशंकराला, १० वाणी, ११ लक्ष्मीकौस्तुभादि रत्नें देणाऱ्या क्षीरार्णवाला, १२ तीव्र. * तेम्हणजे ते वाग्बाण. १३ द्रव्यहीन १४ विश्वामित्र ५५ बाणाप्रमाणें १६ शेवट.

विद्येच्छुमानवा कर गुरु-सेवा एकनिष्ठ भावानें
सोसुनि दुःख कचें कवि तोषविला; तो तदीय भीवानें ॥ ३० ॥
स्वजना न त्यागावें भक्त हितद शक्त जो सदाचरणी
शोकें रघु विद्ध पडे, त्यजिता सीता नता सदा चरणीं ॥३१॥
लक्ष्मी अतिकृपणत्वें रक्षि न विद्युत्समान ती चपळ
व्याडींद्रदत्तें हरती नंदनृपश्री, न लाविती च पळ ॥ ३२ ॥
वेश्याकैतवकृत्यीं रति न धरी; बा ! तदक्ष-कुशरांनीं
शांतापति विंधियला, व्याध करी मृग जसा स्व-वश रानीं ॥३३
भुजबलदर्प न मिरवी दक्ष रहा अल्पशत्रुचे दमनीं
रामावमान करितां भृगुपति झाला तरी सखेद मनीं ॥ ३४ ॥
क्रूराचरणें साधि न वैर जगीं सदय बा! असावेंची
जगरिपुमागधनृपवर भीमकरीं प्राण तैं कसा वेंची ॥ ३५ ॥
स्वार्था नच साधावें अनयें वच हें मनीं नरा मानी
वालीवध करुनी का डाग यशा लाविला न रामानीं? ॥ ३६ ॥
उग्रतपोनिष्ठांच्या धृति-दमनीं तव न धी विशंक रतो
निजतपछेदनकर्ता-मनसिज जाळी न काय शंकर तो ॥ ३७ ॥
चार्वाकमतापासुनि वळिव सु-धी झटति जाण पां परत
स्तंभीं प्रकटुनि हरिनें वधिला प्रल्हाद-तात पापरत ॥ ३८ ॥

---

१ शुक्राचार्य २ कांति, ३ भक्तहित करणारा, सामर्थ्यवान सदाचरणी अशा आपल्या मनुष्याला, ४ व्याडी व इंद्रदत्त ५ नंदराजाची संपत्ति, ( व्याडी व इंद्रदत्त यांनी नंदराजाची संपत्ति हरण केली अशी कथा बृहत्कथासरित्सागरांत आहे ) ६ वेश्यांच्या कपटयुक्त आचरणावर, ७ नेत्रबाणांनी. ८ शांता ही श्रीरामचंद्राची बहिण. तिच्यापतीचें नांव ऋष्यशृंग. ९ श्रीरामाची उपेक्षा. १० परशुराम. ११ हिरण्यकश्यपु.

दैवें सुपदां[12] चढतां नच हो उद्युक्त[13] ताप लावाया
पूज्यां; सनका छलितां त्रैय[14]जन्में विजय तापला वाया ॥ ३९॥
दुष्कृति कधिं न करी बा थोर मनीं शल्यशीच जी शिरते
विध्यपराधें[15] सुदुःसह होतां शिव अहह! छेदि तात्शिर तें ४०
प्राज्ञ गुणादर करिती नच बघती लिंग जाति वा सु-कवी–
शूद्र विदुर मान्य जगा; द्रोण-जें परि तो बुधांतरा सुकवी ४१
स्व-क्षयकारक अंतीं होई तो वर न याचि दात्यातें
याची बाण[2] शिवा रण, परि तें मारक घडे तदा त्यातें ।४२ ॥
क्षोणें प्रबलांपुढती दावावें धाष्टर्य कीं न तोरा वा
कृतवीर्यज[3]-कर-पंजरीं पडला होउनि दशास्य तो रावा ।४३ ॥
कलहज[4] अक्षक्रीडासक्त नसावें अतीव हा नियम
द्यूतक्रीडनिं मुसलीकरिं[6] रुक्मीची करीच हानि यम ॥४४॥
झाला संधि रिपूंशीं तरिन नरा बा! रहा कधीं निसुर[7]
केल्यावरि हरि[8] संधिंहि[9] गतभय करि करुनि वृत्र-हानि[10] सुरें[11] ४५।
नृपतिकृपा स्वप्नासम; नंदनृपें प्रिय सुमंत शकटालों[12]
कारागृहिं सूदियलें[13], असतां सुधुरीणें[14] राज्य-शकटाला[15] ॥ ४६ ॥
जरठांग[16]शब्दकृतिचा करणें उक्त न विडंब माना कीं
अष्टावक्रें[17]विडंबें वैरूप्य[18]ाचि ये सुरोत्तमा[19] नाकीं[20] ॥ ४७ ॥

---

१२ उच्चस्थानीं १३ तयार १४ तीन जन्मांनीं १५ ब्रह्मदेवाचे अपराध [ पार्वतीचे लग्नाचे वेळीं तिचें पादांगुष्ठ पाहून ब्रह्मदेवाचे मनांत कामेच्छा झाली होती.]

१ अश्वत्थामा २ बाणासुर ३ कृतवीर्याचा मुलगा सहस्त्रार्जुन त्याच्या हातरूपी पिंजऱ्यांत. ४ भांडण उत्पन्न करणारी ५ जुगार ६ बळरामाचे हातून ७ स्वस्थ ८ इंद्र ९ तह१० वृत्रासुराचा वध ११ देव १२ शकट नांवाच्या आपल्या आवडत्या प्रधानाला १३ टाकिलें १४।१५ राज्यरूपी गाडा चालविण्याला योग्य नायक १६ वृद्धांच्या बोलण्याचा व कृतीचा १७ अष्टावक्र ऋषीचे चेष्टेनें १८ कुरूपता १९ इंद्राला २० स्वर्गलोकीं.

बोध न करि कधीं मूढा; व्यर्थ श्रमतो, कधीही संत-तति[1]
शुक्रोपदिष्ट[2]दानव-संतति पावे विनाश संतत[3] ती ॥ ४८ ॥
यद्द्वेष तीव्र दीर्घाहि डवचि अशा कधिं न मनुज-सापाला
चाणाक्यें चुरिला नृप नंद ससुत शुष्क[4]सा जसा पाला ॥४९॥
साध्वीक्रोधा[5]नल तूं दीप्त[6] कराया न होई पां पवन
वेदवती सीता हो, जाळाया दशशिराख्य पाप वन ॥ ५० ॥
जें देय तें स्वयें दे सर्वस्वा प्रबल ना तरी सुकवी
द्रोणार्थ द्रुपदातें नर[7] जिंकी वर्णि भारतीं सु-कवी ॥ ५१ ॥
साध गृहस्थाश्रमिंहि अन्योन्या[8]बाध धर्मकामास
सगरें पुमर्थ[9] गृहिं हे साधियले तपिं न वेंचितां मोक्ष[10] ॥ ५२ ॥
पूतोज्वल करि आत्मा शुद्धमनें करुनि तीर्थयात्रा त्या
पांडव कृतार्थ झाले करुनी ज्या कीं भवाचिये[11] त्राते[12]या ॥५३॥
स्वोग्रत्वें कुसुमासम[13]-मृदुचित्ता-योषितांस नच डरवी[14]
गतभय भार्या व्हाया झाला बहु शांततेज चंड रवी ॥ ५४ ॥
प्राप्त जरी बोधामृत भग्नघटा[15]सम नरा न टाकावें
गीतास्मृति[16]हतफाल्गुन रडला रणकालिं काय! सांगावें ॥ ५५॥
द्यावि न सत्ता कु-सुता नय हा, दुर्योधनेंहि धृत[17] राष्ट्र
करितां स्वकरीं झाला जनदृष्ट्या तृणसमान धृतराष्ट्र ॥ ५६ ॥
स्वामी-प्रसाद मिळतां चित्तीं तव नच फल-व्यथा राहो

---

१ सज्जनसमुदाय. २ शुक्राचार्यांनी उपदेशिलेले दानव पुत्रपौत्र, ३ नेहमीं, ४ वाळलेला असा. ५ पतिव्रतेचा कोपाग्नि, ६ प्रज्वलित. ७ अर्जुन ८ परस्परांना बाधा न करणारे, ९ पुरुषार्थ, १० काळ, ११ संसाराच्या, रक्षणकर्त्या, १३ ज्यांचें चित्त फुलासारखें कोमल आहे अशा स्त्रियांना १४ घाबरवी, १५ फुटलेल्यामडक्याप्रमाणें १६ गीतेची ज्याला विस्मृति पडली आहे असा अर्जुन १७ धरता झाला.

क्षीणांग चंद्र झाला, ईशें जरि शिरिं दिलाहि थारा हो ॥५७॥
श्रुत्युपपादित धर्मा पाळावें बा! न सोडिजे त्यातें
दैत्यें धर्म त्यजितां गेली लक्ष्मी तदीय जेत्यांतें[1] ॥ ५८ ॥
सद्गुणसंग्रह करि बा! बद्ध करायास चंचला[2] माला[3]
निर्गुण दैत्यां त्यजुनी श्रीनें देवांस घातली माला ॥ ५९ ॥
बांधव-केलि[4] वार[5], परी चेतवि नच काय ताप सामान्य?
वाली-कलिवर्धकरेंद्यु[6] निंद्य ठरे जरिहि तापसां मान्य ॥ ६० ॥
असुवधयुताभिचारा[7] न करी त्यांतहि अमूप[8] बा त्रास
सौमित्रें शरिं वधिलें अभिचाराग्रणि दशास्य-पुत्रास ॥ ६१ ॥
भौतिक-वपु जावो परि यशरूपें वस सुकर्म साधून
यशमय देह उरले जगतीं व्यासादि काय साधू न ॥ ६२ ॥
संसार-सार सारें हेंचि नरा नित रमा-धवा गावें
झिजवित परोपकारीं चंदनशी तनु जगांत वागावें ॥ ६३ ॥
निरुपाधिक ऐस भवीं धरि न मनीं रति, ममत्व अघ-जनक
निर्लेप जेंवि उदकीं पद्म; तसा राजिय राहिला जनक ॥६४॥
महदाश्रय नित्य करी, नीचांची परि न घेइ वारा ही
मदिरानामा पावे शौण्डिक निजकरिं जरी पया वाही ॥६५॥
स्त्रीधनें[9]-भोग अधम तो, बंधुश्री[10] गौण ती न भोगावी
मध्यम जनकार्जितही स्वार्जितधनें[11]कीर्ति, काय भो गावी ॥६६॥

---

१ जिकणारांना २ चपळअशा ३ लक्ष्मीला ४ भायांचा तंटा. ५ निवार ६ वाली सुग्रीवाचा तंटा चेतविणारा श्रीराम ७ ज्यांत प्राणांचें बलि द्यावे लागतात अशीं जारणमारणादि कर्में ८ पुष्कळ ९ पत्नीच्या संपत्तीचा उपभोग, १० भावाची संपत्ति. ११ बापानें मिळवून ठेवलेलें धन.

अजरामरवत्प्राज्ञें[1] धनविद्या नित्य तींवि साधावें
धर्म करावा त्वरितहि धरुनि मनीं ‘ मृत्यु पाठिसी धावे ’ ।६७।
प्रत्यहिं[2] मना विचारीं पशुसम दुष्कर्म[3] आज तव कारिं तें
घडलें सुजनांसमहीं[4] कर्म तसें जें अघ-क्षया[5] करितें ॥ ६८ ॥
ओखट[6] वस्तु किती जरि देते थोरास सद्य शोभा ते
जें विष मारक इतरां वाढवि परि शंभु सद्यशोभा[7] तें ॥ ६९ ॥
उत्तम वस्तु जरी बहु तापद नीचांप्रती नरा होते
मृतितारकमधुरसुधा[8] झाली मारक न काय राहोतें[9] ॥ ७० ॥
‘ अतिपरिचयादवज्ञा[10] ’ होते, तैसा अमूप[11] तोटा कीं
टाकुनि गंगा स्नाना गंगापुलिनस्थ[12] शोधितो टांकीं[13] ॥ ७१ ॥
साक्षर[14] नराहुनी ही सरसें[15] गमे मन यदीय कीं सरसें[16]
साक्षर उलटा करितां राक्षस हो सरस राहतो सरस ॥ ७२ ॥
ऊनें[17] न दूरपणानें होतें हो! प्रेम जेंहि साहजिक
हर्षवि चकोरनयना इंदूदय तो जरी नसे नजिकें[18] ॥ ७३ ॥
सज्जन-निंदा करि जो नर त्या निंदेंत तोंच सांपडतो
व्योमीं भस्मसमुच्चय फेंकुनि देतां शिरीं जसा पडतो ॥ ७४ ॥
वेळीं हितकर्ता नर कारण ही आपदेस[19] होतो कीं

१ आपण जरा व मृत्यु विरहित आहोंत असें कल्पून शहाण्यानें, २ दररोज, ३ केवळ पशूनांच शोभणारें वाईट वर्तन, ४ साधूंना शोभणारें सत्कर्म, ५ पापाचा विध्वंस. ६ वाईट ७ शंकराच्या उत्तम यशाची कांति ८ मृत्यु दूर करणारें गोड अमृत; ९ राहूला १० अति परिचयापासून अपमान ११ पुष्कळ १२ गंगेच्या कांठीं राहणारा १३ तळीं १४ विद्वान १५ उत्तम १६ रसांनीं युक्त; १७ कमी १८ जवळ १९ विपत्तीला,

दोहनसमयीं गोष्पदं पाहीं स्तंभासमान हो तोकीं ॥ ७५ ॥
पादोनशतार्यांचा बोधामृतचषक गोड हा घ्यावा
प्रेमानंदें प्राशुनि खाऊसा सुतसुताकरीं द्यावा ॥ ७६ ॥

अनंततनय.

---

## ९० चंद्रावरील कलंक.

आर्या :—अमृतकर कलानिधि हा याला लागो न दृष्टि कोणाची
म्हणुनी तज्जननीनें चंद्रा ही तीट लाविली साची ॥ १ ॥
दिक्कामिनी कपोलचि हा न निशापति न डाग त्यावर हा
परि तिलकबिंदु आहे कामुकजनमानस प्रमोदि पहा ॥ २ ॥
आकाश नदींतिल हें कनक कमल होय हा नसेचि शशी
अथवा तत्कमलस्थित अलिवांचुनि कालिमा दिसेल कशी ॥३॥
किंवा कल्पलतेचें हें सुंदर पक्वपीत फळ आहे!
काळें जें तेथ दिसे तें त्याचें डेंख वाटतें राहे ॥ ४ ॥
अथवा शिवें चुकूनी न शशी देतां दिला परत भाळीं
जो नेत्र असे साक्षी कनीनिका मात्र ज्यांत ती काळी ॥५॥
अभिसारिका जनाला जीवितपतिसदनमार्ग दर्शि जळे
कज्जलकृष्णवदन हा दीप असे कीं शशांक हें न कळे ॥ ६ ॥

मार्कंद.

---

१ दूध काढण्याचे वेळीं २ गाईचा पाय ३ खांबासारखा ४ आपल्या वासराचे ठायीं (कांहीं कांहीं ठिकाणीं गाईचें दूध काढतांना तिचें वासरूं तिच्याच पायाला बांधण्याची चाल आहे) ५ पाऊणशें आर्यांचा ६ बोधरूपी अमृतानें भरलेला पेला ७ मुलांच्या व मुलींच्या हातीं.

## ९१ मार्कंडेयोपदेश.

आर्या:—गिरिवरसुगंधमादनिं असतां पांडव मृकंडुनंदन तो
आला, येतां सदनीं सज्जन जो मूर्ख मानि नंदन तो ॥ १ ॥
आदरुनी धर्म वदे बोधसुधा हे सुजाण ! पाजीव
भवसागरपरतीरा उतरो हे अज्ञ जाण पां जीव ॥ २ ॥
मुनिवर सहर्ष बोले तत्पर परमेशभक्तपदनमनीं
नित्य असावें धर्मा यावें कधिं मीपणास पद न मनीं ॥ ३ ॥
प्रेम करी दीनजनीं सत्य वदे स्वमन सज्जना कर्षी
सन्मानाया तुजला स्वर्गीं असतील सज्ज नाकर्षी ॥ ४ ॥
त्यज गर्वा विनत रहा धर्मा मी तुजसि काय सांगावें
आसनिं शयनीं पानीं भगवद्यशगुण निशीं दिसां गावे ॥ ५ ॥
पाळीं प्रजा सुतासम, साधुजनांतें सदैव वान तसें
व्हावें निष्कामत्वें किंवा तच्चरणपंकजीं नतसे ॥ ६ ॥
अज्ञानजन्य पापा जाळी स्वसुवर्तनें यदा राही
वारिल निजप्रतापें पतिव्रता बा ! त्वदीय दारा ही ॥ ७ ॥
चित्तांतरीं असावी निर्मलता नित्य जाण ती आर्या
नसतां चित्तीं शुद्धी तत्फल तव सत्य जाणती आर्या ॥ ८ ॥
जरि नच चित्त सुनिर्मल विफल पहा जपतपादि साधन तें
सूज्ञ म्हणुनि करावा मिळवाया यत्न विमलता-धन तें ॥ ९ ॥
जरि कटुवलांबु वरुनी पयादि पंचामृतेंहि सारविला
अंतरिचें कटुपण वद जाई का शर्करीं तसा रविला ॥ १० ॥

---

१ मृकंडु ऋषीचा पुत्र मार्कंडेय २ आनंद ३ सूज्ञा ! ४ स्थान ५ ओढी ६ देव ऋषी. ७ जेव्हां किंवा जर ८ पत्नी ९ हे श्रेष्ठा ! १० पत्नी ११ कडू भोपळा १२ खुपसला १३ गाढव १४ कुत्र्याचें शेंपूट.

विषधारी सर्पातें प्राशविली नित्य दूध साखर ही
जाइ न विष, शुद्ध न हो तीर्थीं प्रक्षालितां तसा खर ही ॥ ११
वक्र श्वा-पुच्छाचि का घालुनि नलिकेंत सरलता पावे
मलिनमनें मोक्षार्थीं उपवासें व्यर्थ काय तापावें ! ॥ १२ ॥
अस्थी श्वा टाकिल कां तत्पुढती षड्रसान्न वेगरलें
गंगोदकीं मिसळतां त्यागावें का कटुत्व वे। गरलें ॥ १३ ॥
प्रत्यहिं मिष्टान्न जरी विष्टा-भक्ष त्यजी न सूकर तें
होता निर्मल मन बा! योगादिक सकल धर्म सूकर ते ॥ १४॥
कायामनवाचेनें जो न करी पापयुक्त आचरण
तापस तोचि गणावा कोणी दुखविति उगीच बा! चरण ॥१५॥
योग न साधे कधिं ही मलिनमनें व्यर्थ देह दंडन तें
अघ न जळे येणें जरि करिती ढोंगी स्व-पक्ष-मंडन ते ॥ १६॥
यज्ञाहुनि धर्माचें पुण्य बहुत जाण खाचित हा नियम
'धर्मस्य गतिस्त्वरिता' नेणो कधिं तो करील हानि यम १७
अन्योपकार पुण्याचि परपीडन पाप सांगि विश्वास
भागवतीं व्यास, धरि या स्वपितामहगिरतें विश्वास ॥ १८ ॥

**अनंततनय.**

---

## ९२ कन्या.

आर्या:—रुचिरे बाले! असती, तूं फल गे! आमुच्या प्रमोदाचें
त्वत्फुल्ल नेत्र पाहुनि, आनंदित हृदय होय गे! साचें ॥ १ ॥
देखुनि तुजला तनये प्रेमाच्या ऊर्मि मानसीं येती
होशिल कुलद्वयाचें तूं मंगल हे विचार मन हरिती ॥ २ ॥

होई दुःखतमानें माझें हें व्याप्त हृदय गे सकल
परि तें तव मुख–चंद्रें विकासित होतें न लागतांचि पळ ॥३॥
स्मितमुखकमला तंव मी बाले चुंबोनि सेवि जें सुख तें
पीयूषरसीं न वसे ऐसें वर्णावया न भय गमतें ॥ ४ ॥
कोमल आनन वत्से शोभे तव रुचिर दंतपंक्तीनें
बाले हिरकणि त्यांशीं तुलना पावेल केविं कांतीनें ॥ ५ ॥
होशिल विवाहयोग्या देऊं तैं चतुरधी वरा बघुनी
श्वशुरश्वश्रू गृहिंचें सुख सेवुनि राहसील तूं स्वजनीं ॥ ६ ॥
जाशिल पतिसदनाला संगें घेवोनि लाडक्या बाला
पाहिन तुजला तैं मम आनंदा केविं वर्णवे कविला ॥ ७ ॥
पतिची गांठ पडोनी प्रेमें घेइल सुहास्य तोकाला
गालीं हंसतिल तेव्हां दावुनियां रूपसाम्य गे त्याला ॥ ८ ॥
देखुनि तनयक्रीडा कुतुकें जो हर्ष होय तव पतिला
तो लाजवीली वाटे नंदनवनिंच्याहि सौख्य संततिला ॥ ९ ॥
होइल पुत्र तुझा मुलि लोकीं विद्वान् सुधी धर्मा कुशल
देईल तुम्हां दोघां वाहुनि संसारभार सुख विपुल ॥ १० ॥

**वामन दाजी ओक.**

---

## ९३ पद्यमंजुषा.

श्लोकः—वृत्तें मनोहर विचित्र मला न येती
एक्या रसांतहि गती न असे अहो! ती
वाणी रसाळ मधुरा जनरंजनाला
नोहे, दिसे कृति अशक्याचि ही मनाला ॥ १ ॥

जसें जन तिला पहा स्वशिशुचें नवें बोबडें
निरर्थक तथापि ते वच कसें बहू आवडे
तसेंच मम कृत्य हें जरि विचक्षणाला न तें
रुचेल तरि माउली प्रतिस काव्यदेवीस तें ॥ २ ॥
आहे निर्मल वारिपासुनि तुझें हें जन्म पद्मा पहा
वास श्रीहरिच्या करामधिं मनोहारी सुरां वास हा
जात्या सुंदरता पहा किति असे रामामुखा स्पर्धिनी
यःकाश्चिद्भ्रमरानुराग धरिशी आश्चर्य वाटे मनीं ॥३॥
सदा चिंती रामा परि न कधिं रामा सुविमला
सदा प्यावें रामाधर परि न रामांध्रिसलिलां
नमी रुष्टा रामा परि न कधिं रामास विनती
अहा गेलें सारें वय सरुनि कैशी मम गती ॥ ४ ॥
अशोकाला आला रुचिर घन पाला बघ कसा
अपूर्वा कांतीनें बहुत विलसे येथ सरसा
फुलें कांहीं कांहीं मधुनि दिसती सुंदर वरी
मृगाक्षी नारींचा पदयुगलसंपर्क न तरी ॥ ५ ॥
कर्पूर केतक तसे चल हो अनंग
मंदाकिनी विमल फेन विमुक्त–भृंग
कुंद त्रिनेत्र शिरिं इंदुकला सुरेख
याहूनियां धवल कीर्ति तुझीच देख ॥ ६ ॥
भागीरथी बहुत पावन पाप हारी
तापास शीतकर इंदु पहा निवारी
दैन्यास कल्पतरु तोहि वदान्य वारी
हे तीन ताप परि एकचि साधु सारी ॥ ७ ॥

ललाटीं कस्तूरीतिलक नयनीं कज्जल रुची
दिसे अंगीं पाहे सतत नव दिग्यांबर शुची
गळां मुक्तामाळा बहुतचि विशाळा सुविमला
धरी नारी कर्णीं विमल मणिताटंक युगळा ॥ ८ ॥
आला वसंत बव संताप दे बहुत संतास संतत खरें
वाटे पसंत बहु कामीजनांस परि आनंद सौख्यद हि रे
मंदानिलेंहि अति कंपायमान तरु वंदावयास भुवनीं
स्रष्ट्यास काय जणुं हर्षे स्वमस्तकाचि खालीं करी निशिदिनीं ९
आधींच हें वपु किती रमणीय साजे
तैसाचि सस्मित मुखेंदु तुझा विराजे
वेणी नवीन नयनें नलिनासमान
सालंकृता मग तुला उपमा न जाण ॥ १० ॥
संसाररूप कटु पादप यास दोन
आहेत सुंदर फळेंचि सुधेसमान
आस्वादन प्रतिदिनींच सुवाग्रसाचें
तैसें दुजें सुजनसंगति सौख्य साचें ॥ ११ ॥
पुरविला गीरिकंदरिं वास हो
वनचरांसह तोचि सुवास हो
परि नको कधिं मूर्खजनांसह
अहह संगति नाकिंहि दुःसह ॥ १२ ॥
जयीं दिनमणी पहा उदय शैलसानू वरी
हळूं हळुं चढे तया बहुत ताम्रता तोंवरी
तशीच वरि ताम्रता जरिहि जाय अस्ताचळा
असे सतत सारखी सुजनवृत्ति ना चंचळा ॥ १३ ॥

बघ जलधिंत जातसे पतंग
बघ नवतामरसांत मत्त भृंग
बघ पादपकोटरीं विहंग
बघ कामीजनमानसीं अनंग ॥ १४ ॥
श्रीरामचंद्ररमणी बहु वैभवांत
तीतें निवास दशकंधर मंदिरांत
तेव्हां पहा उलट कीं परिणाम होतो
हें सत्य पूर्वकृतकर्मवशें अहो तों ॥ १५ ॥

लक्ष्मण गणेश लेले.

---

## ९४ कविरत्न परलोकवासी कृष्णाजी केशव दामले.

श्लोक.—कृष्णा तृष्णा पुनरपि करी जीव हा घाबरा रे !
ह्या लोकींचे अमृतनिधि हे आटले आज सारे.
लाही झाली ! तळमळ करीं दूर ये ऐक अर्जी
सोडीं पाहूं पुनरपि गड्या ! गोड तूझा " झपूर्झा " ॥१॥
झाली आतां हळु हळु तया पूर्ण तेवीस वर्षें,
जेव्हां तूं मी बसुन कविता गायिल्या रम्य हर्षें.
भासे आतां परि जणुं सख्या ! काल ती मौज केली !!
जेणें झाली फिरुनि मति ही आज भारी भुकेली. ॥ २ ॥
ये ये कृष्णा ! चढव अपुला सूर जो भौतिकाला,
विंधी जाई वरति वरतीं भेदुनी अंतराला.
टाकीं मागें मज बघुं सख्या गाउं ये एंकवार,
नाहीं माझी तुजविण कुणी हौस ही फेडणार. ॥ ३ ॥

जें जें कांहीं दिसत मजला भूतलीं व्योममार्गीं,
तें तें सारें दिसत मजला आज मित्रा अभागी;
भाषा ह्याची विशद करुनी कोण आतां कथील.
आतां ह्याला तुजविण कवी कोणता गौरवील. ॥ ४ ॥
कृष्णा भिक्षा इतुकि तरि तूं घाल आह्मांस आतां,
ह्या हृत्कोशीं वसुन अपुलें गान हो नित्य गाता.
आली आतां कळुन पुरती ती तुझी वृत्ति सारी,
मारूं देतो कवण तुजला येथुनीया भरारी ! ॥ ५ ॥

टिळक.

## ९५ थकलेल्या भटकणाराचें गाणें.

पद.

किती रहावें तुजविण आतां ! धीर न मजला क्षण धरवे !
गेलें गेलें वय हें वायां !-मरणहि तें वाटे बरवें !
काय करावें मज न सुचे,
मुळीं न मजला किमपि रुचे,
हृदयीं सगळें धैर्य खचे;
भणभण वणवण करित अधिक मज आळ्यांहि जगीं नच फिरवे!
किती रहावें तुजविण आतां ! धीर न मजला क्षण धरवे ॥१॥
कितिक योजिले यत्न यावया तुजशीं मी उत्सुकतेनें !
व्यर्थ जाहले अवघे ! दुर्धर कसें न व्हावें मग जगणें ?
पुष्पांनो ! तर दूर सरा !
कण्टक हो ! मार्गीं पसरा !
प्रकाश नलगे-तिमिर बरा !

सर्व चांगलें व्हावें होतें तुजसाठीं—पण लभ्य नव्हे !
किती रहावें तुजविण आतां ! धीर न मजला क्षण धरवे ! ॥२॥
शूळ कपाळीं, कण्डण हृदयीं, कंप शरीरीं भरलासे,
सलिल लोचनीं, शीण अवयवीं; उदासीनता मनीं वसे !
तरि, माझी ती भेटेल का,
पांग जिवींचा फिटेल कां ?
आलिंगू ती झटेल कां ?
क्षमा करिल का मला चुक्यांची ?—पुसतों मी माझें बरवें !
किती रहावें तुजविण आतां ! धीर न मजला क्षण धरवे ! ॥३॥

केशवसुत.

## ९६ वस्तूचा उपयोग.

श्लोकः—तें द्रव्य जें समयिं दे दुबळ्यांस खाया
ती शक्ति जी करि अशक्त जनांस साह्या
तें ज्ञान जें अबुध त्यांप्रति बोध देतें
ऐसें नसे तरि तयां विफलत्व येतें ॥ १ ॥
दामाजिनें समयिं धान्य दिलें द्विजातें
अद्याप नाम निघतें सकळां मुखीं तें
भूमींत वित्त पुरुनी जरि ठेवियेलें
कामा नये तरि कशास्तव जोडियेलें ! ॥ २ ॥
होती उदारचरिता दयिता अहल्या
गेली निघून, कृति चांग तिच्या न गेल्या
सत्रें तिचीं मिरवती बहु जागजागीं
देवालयें विलसतीहि पवित्रभागीं ॥ ३ ॥

गेली समूळ विलयाप्रति पेशवाई
ग्रंथांत शब्द उरला, हृदयास ग्वाई
सर्वांस गोष्ट तरि विश्रुत दक्षिणेची
अद्याप तृप्ति करिते किति याचकांची ॥ ४ ॥
जेव्हां पडे चतुरसालहि संकटांत
बाजी तया त्वरित धांउन देइ हात
त्याला करून भयमुक्त विशेष शोभे
तेव्हां स्वपुत्र समजे नृप त्यास लोभें ॥ ५ ॥
स्थापी स्वराज्य बहु कष्टुनियां शिवाजी
गाजी स्वतांस म्हणवी सुजनांस राजी—
राखीतसे, स्वबळ खर्च करी अशांत
तेणें तयास बहु मान मिळे दहांत ॥ ६ ॥
जें ज्ञान नित्य शिकवी स्वमनां विचार
सर्वांस तें सुगम हो म्हणुनी अपार—
ग्रंथां लिहून बुध ठेविति आदरानें
ज्ञानेश वामन मयूरकवि श्रमानें ॥ ७ ॥
ज्ञानेश्वरी जनमना परमार्थ सांगे
गीतार्थ वामन करी उघडाहि आंगें
सांगे मयूरवर भारत या जनांस
बोधीतसे जनमनाप्रति रामदास ॥ ८ ॥

मोरो गणेश लोंढे.

———

## * ९७ पश्चात्ताप.

नारायणा ! आइस बोलवाया,
काकादिकां येथचि आणवाया
झाली तयारी, जन योग्य गेले;
त्यां पाहुनी हे निवतील डोळे ॥ १ ॥
रे एकदां किमपि विप्रिय मी प्रसूचें
केलें ह्मणोनि रुसली न वदे मुखाचे
शब्दांस दोन मजशीं; न रुचे तियेला
माझा विचार म्हणुनी बहु राग आला ॥ २ ॥
गेली निघोनी मग नाशिकाला.
येथें पहा येइल ती कशाला ?
ऐसें मनीं येउनि पातकांचा
वाटे विभागी बनलोंच साचा ॥ ३ ॥
अधन्य माझ्यापरि अन्य थोडे
प्रसूवचा मोडुन पाप जोडे—
हा मानसीं कां न विचार केला
भूपाळ मी हा भ्रम काय झाला ॥ ४ ॥
कां मी दिला तद्वचना न मान
नाहीं कुणी दुर्भग मत्समान!
मातेस हो! देवसमान माना
आज्ञा अशी पाळिलि मीं अहा ना ! ॥ ५ ॥
पाजी पया मधुर जी मज काळजीनें

---

* मरणकाळीं श्री. माधवराव पेशव्यानीं नारायणरावाजवळ जें पश्चात्तापपूर्वक भाषण केलें तें पुढील उताऱ्यांत आहे.

जी पाळण्यांत निजवी, हसवी स्मितानें,
जी थोपटूनि मजला रिझवी करानें —
केलें तिचें अहह इष्ट न या सुतानें ॥ ६ ॥
घेई मुके बहुत जी मृदु या मुखाचे
जी हिंडवी, करि उगा मज गोड वाचे,
जी चालवी हळुहळू धरुनी करानें—
केलें तिचें अहह इष्ट न या सुतानें ॥ ७ ॥
दुःखें मला रडविती अनिवार जेव्हां
जी बा करी विविध नित्य उपाय तेव्हां
जी बैसुनी जवळि गाइ मृदुस्वरानें—
केलें तिचें अहह इष्ट न या सुतानें ॥ ८ ॥
जी औषधें उगळुनी दुखण्यांत देई
जी प्रेमभाव धरुनी करि सर्व सोई
जी मत्सुखार्थ विभुला विनवी मुखानें
केलें तिचें अहह इष्ट न या सुतानें ॥ ९ ॥
लावूनिया सुरभि तैल मदीय अंगीं
न्हाणी मला सदय जी अमित प्रसंगीं
जी भूषवी ममतनू बहु भूषणानें —
केलें तिचें अहह इष्ट न या सुतानें ! ॥ १० ॥
युद्धप्रयाणसमयीं मजला अनेक
रामायणांतिल कथा अति निष्कलंक
धैर्यप्रदीपक कथी मृदुलस्वनानें
केलें तिचें अहह इष्ट न या सुतानें ! ॥ ११ ॥
गोदावरी उतरुनी पुढतीं रणातें

जावें, असा समरहेतु कळे जनांतें
जी तेधवां चतुर बोलुनि धैर्य देई
केलें तिचें अहह इष्ट न मीं अगाई ॥ १२ ॥
जी धोरणें समजुनी करुनी विचार
राज्यार्थसाधक कथी मज बोधसार
हा ! हा ! तिला किमपि आदरिलें न यानें
ह्या पातका अहह फेडुं तरी कशानें ! ॥ १३ ॥
नारायणा ! बहुत माय अशी श्रमातें
घेई. तया स्मरुनि तुष्ट करीं तियेतें,
कोपा तिच्या त्वरित दूर करावयाला
त्वां पाहिजे सतत यत्न विशेष केला ॥ १४ ॥
नारायणा ! वचन हें मम आठवून
पायां पडूनि तिजला बघ आणवून
दे सौख्य वागुनि तिशीं पदसेवनानें,
केलें न तें कधिंहि दुर्भग या सुतानें ! ॥ १५ ॥
राहो तुझ्याशीं तरि तुष्ट आई !
तेणें तुला स्वास्थ्य अपार होई
मी हा अभागी मुकलों सुखाला
जें मातृसेवेंत मिळे मुलाला ! ॥ १६ ॥
पश्चात्ताप अतां मला स्वकृतिचा होतो अवा जाणुनी !
माता दैवत हें कसा विसरलों बालापरी वागुनी !
राज्यैश्वर्यमदें अहा भुलुनियां केलें महा पाप मी !
यासाठीं तिजला तसें हरिपदां मी अंजलीनें नमा ! ॥ १७ ॥
बाळाही अमुची सुशील चुलती मातेपरी बा जपे;

कोणाशीं न कधीं उगाच वदते, तेणें न नेत्रीं खुपे;
आहे साधुसमान शुद्ध करणी ह्या पार्वतीकाकुची;
सेवा बा करितां घडेल तुजला कल्याण जाणों तिची ! ॥१८॥
चित्तीं शांत पवित्र निर्मल असे; देवार्चनीं घालवी
काळा ती अपुल्या; सदा सुकृतिनें देहास बा शोभवी;
स्वार्थी दृष्टि नसे, घरांत बसते सांगोनि सद्बुद्धिला;
यासाठीं तिस मान मातृसम तो त्वां पाहिजे दीधला. ॥१९॥

नारायणा ! ही तव माय जाण !
ओटींत तीच्या तुजला लहान
होतास तैं घातियलें, म्हणोनी
बा रे सदा माय खरीच मानी ॥ २० ॥
गंगूशिं तैशी तिजशीं घरांत
सन्मार्ग सांगोनि असे प्रशांत
ती फार साध्वी सरलस्वभावा,
लाधे तुला एक अमोल ठेवा ॥ २१ ॥
तिची गोड वाणी, सदा सत्य बोले,
तुझे लाड नारायणा ! फार केले;—
असें बोलतां कंठ आला भरोन
न त्या बोलवे अश्रु आले गळोन ॥ २२ ॥

वामन दाजी ओक.

—·—

## ९८ कविसंदेश.

—०*०—

( खालील कविता, पुणें येथें ग्रंथकारांच्या १९०७ च्या संमेलनांत वाचण्या-साठीं कवीनें पाठविल्या होत्या. )

आर्या:—देवी सरस्वतीचे प्रिय नंदनहो! तुम्हां असो नमन.
हा देह दूर आहे तुमच्या संमेलनीं असोन मन. ॥ १ ॥
प्रत्यक्ष तुमच्या हा समागमाच्या सुखास अंतरला,
हरला उपाय यद्यपि याचा वाटे महा विषाद मला! ॥ २ ॥
संसारांतील कोडीं सोडवुनी युक्तिनें तुम्ही आलां,
एकत्र--पुण्यनगरीं—सरस्वतीच्याच मंदिरीं—झालां ॥ ३ ॥
संमीलित विदुषांनीं खचित महाराष्ट्र-देश—भाषेला
न्यायास उन्नतीतें बहु दिन यत्न-प्रयत्नही केला. ॥ ४ ॥
आतां, तिची समुन्नति व्हावी, करितां म्हणोनि आयास,
हेतु प्रशंसनीयचि! अनुमोदन हें मदीय हो त्यास. ॥ ५ ॥
स्वीकृत कार्यामाजीं असणारीं संकटें निवाराया
योजालचि सदुपायां, सांगू अल्पज्ञ काय मी वांया? ॥ ६ ॥
तरि, जो चिटनीसांच्या विनंतिपत्रें मनास आठविला,
संदेश एक तो हा विनय प्रेमासमेत पाठविला. ॥ ७ ॥
तो सावधान ऐकुनि, होइल कांहीं विचार त्यावरती
तरि मग आनंदाची भरती येइल मना अनावर ती. ॥ ८ ॥
अर्वाचीन कवींचा आदर नाहीं. नसो! परी लोकीं
त्यांच्याविषयीं संप्रति अनुकंपाही नसेच अवलोकीं! ॥ ९ ॥
संभावना तयांची दुसरी ऐकूं न येतसे खास,
परि गरलासम टीका, व्याजस्तुति, वा यथेष्ट उपहास ॥ १०॥

प्राचीन कवींपासुनि कोणी लागति पिळ्याच तोडाया।
अर्वाचीन कवींच्या, पिळ्या न वाटे उरेंच फोडाया ॥ ११ ॥
वर्तवितात भविष्यहि, कोणी जोशी असें खुलाशाचें
कीं, कवि सांप्रत कालीं पूर्वांच्या सारखे न व्हायाचे ! ॥१२॥
अर्वाचीन कवींवरि साक्षर वर्गांतले अभिप्राय–
यापरी सांगुनि वदतों तद्विषयीं मजसि वाटतें काय. ॥ १३ ॥
कवि, तत्वज्ञहि, पंडित, कलानिधि, राजकारणी, वीर,
गुणवान आणि योगी ह्यांचें हें भरतखंड माहेर. ॥ १४ ॥
धर्मचि ह्या भूमीचा नरमणि हे तिजमधूनि निपजावे,
त्यांनीं निज किरणांनीं अन्यांचे नयनसंघ दिपवावे. ॥ १५ ॥
निर्मुनि कुसुमित वन तें, भ्रमर जरी घातला न जन्माला,
फुलवुनि रसाल, कोकिल न निर्मिला, दोष ये विधात्याला !।१६
माझा समानधर्मा होइल निर्माण भूवरी कालें,
सिद्धान्तवाक्य*ऐसें कानीं भवभूतिचें न का आलें? ॥ १७ ॥
भासादि कवि पुरातन, ह्यांच्या कृतिचा धरोनि अभिमान,
जन मम नव वस्तूचा बहुधा करितील आज अवमान +॥१८॥
प्रारंभीं ही शंका आली ज्या तरुण कालिदासाला,
तोच महाकवि,–नोहे सर्व कवींचा शिरोमणी–झाला ! ॥१९॥
तोच पुरातन नूतन काव्यांविषयीं अपक्षपातानें
काय अभिप्राय पहा लिहितो निज नाटकांत हातानें:–॥२०॥

* " उत्पत्स्यतेऽस्ति मम कोऽपि समान धर्मा । कालोह्ययं निरवधिर्विपुला च पृथ्वी ॥ '—भवभूतिः।

+ " पारिपार्श्विकः-मातावत् । प्रथित यशसां भाससौमिल्लककविपुत्रादीनां प्रबन्धानतिक्रम्य वर्तमानकवेः-कालिदासस्य क्रियायां कथं बहुमानः- ।

सुत्रधारः—अयि, विवेकश्रान्तमाभिहितम् । पश्य ।

पुराणमित्येव न साधु सर्वम् । न चापि काव्यं नवमित्यवद्यम् ॥ कालिदासः।

प्राचिन म्हणुनी जितकें तितुकें नामी न सर्व मानावें,
केवळ नवीन, यास्तव न काव्य लोकांत निंदिलें जावें ॥ २१ ॥
अर्थात् परंपरेनें पूर्व कवींची धरोनियां कांस
एकसहा नव कविचा न करावा केधवांहि उपहास ॥ २२ ॥
कविराज, राजयोगी, राजगुरु, हे स्व–'दासबोधांत
" आतां आहेत, पुढें होणार कवी " तयांस नमितात ॥२३॥
ह्यावरुनि सिद्ध होतें, स्वामींच्या मानसा विकार नसे
समकालीनहि भावी कविविषयीं तन्मनांत मान वसे ॥ २४ ॥
" होणार " पदावरुनी स्वामींची निश्चयोक्ति समजावी;
' कवि होणें शक्य नसे ' भ्रामक वचनें अशीं न बोलावीं ॥२५॥
आशीर्वाद समर्थें दिला, न तेथें कदा निराशा हो.
तद्वचन सिद्ध, तैसा सिद्ध न होईल आमुचा टाहो ! ॥ २६ ॥
यत्काव्यगायनानें सारा बंगाल आज हालविला,
आर्वाचीनाचि कवि तो, मग कां पंक्तींतुनी न घालविला ॥२७
जरि वंगांत निपजला, न महाराष्ट्रांत काय निपजेल ?
' कवि होणें शक्य नसे ' अविचाराचेंच वाक्य साजेल ॥२८॥
पाश्चात्य कल्पनांनीं नव काव्या लागलें नवें वळण,
मुरल्या न कल्पना त्या, गमेल नव काव्य तोंवरी दळण ॥२९॥
जेव्हांहि कल्पना त्या कवि हृदयामाजि पूर्ण पचतील,
तेव्हां अधिक मनोहर नवीन रचना कवीहि रचतील. ॥ ३०॥
संप्रति भाषावृद्धी, होत असे नव्य कल्पना पचन,
ऐशा स्थितींत कविला कां बोलावें उगीच कटु वचन ॥३१॥
ज्या काव्यानें लोकीं तुडुंबुनी स्वाभिमान राहील,
ज्या काव्यानें त्यांच्या देहीं देशाभिमान वाहील ॥ ३२ ॥

ज्या काव्यानें द्वैतें जनहृदयांतून शीघ्र ओसरती,
ज्या काव्यानें येते ऐक्यरसाची तया महा भरती. ॥ ३३ ॥
ज्या काव्यानें मोठे मोठे प्रतिबंध तेहि फोडून–
ती संघशक्ति धो धो वाहे सीमा स्वकीय सोडून, ॥३४॥
ज्या काव्यानें उसळति त्या शक्तीचे तरंग मोठाले,
देशोद्धार–सुधाकर मग आकर्षी तया यथाकालें, ॥ ३५ ॥
ऐशीं उदात्त, उज्वल, काव्यें केवल अहो ! समाधीनें
साध्य कवींना होती, परि नच; ते ग्रासल्यास आधीनें ॥३६॥
कविचा आधी दुसरा, अठरा विश्व्यांशिवाय काय असे ?
तो जन्मसिद्ध आहे ! कविताशक्ती जशी तयांत वसे. ॥३७॥
निरसन ह्या आधींचें राजाश्रय एकला करूं शकला.
परि त्या समाश्रयाला कविजन हत-दैव आजला मुकला ! ३८
आतां, रचावया कवि बसेल केवल समाधिची कविता.
तोंवरि लोकाश्रय तरि आहे काहो तयास वांचविता ? ॥३९॥
नुसती सहानुभूती नाहीं ! आश्रय कशास बोलावा ?
टीका उपहासांनीं उलटा तत्पृष्ठभाग सोलावा ! ॥ ४० ॥
काबाडकष्ट दिनभर करोनियां रूक्ष अन्न जेवावें,
रात्रींहि जागुनी निज काव्यांनीं देशबंधु सेवावे; ॥ ४१ ॥
आणि तयाचा विनिमय घ्यावा पूर्वोक्त बांधवांकरवीं !
किति कठिण ही कसोटी ? ! तुमच्या हृदयां न काय पाझरवी।
बोला हो ! बोला हो ! स्थिति ही अनुकंपनीय का नाहीं ?-
अर्वाचीन कवींची ? ऐकुनि सोडूं नकाच कानांहीं. ॥ ४३ ॥
संप्रति अवर्षणानें, तापानें, कोळपून जे गेले,
त्या पारिजातकावरि फुलतिल वर्षाऋतूंत हो झेले ! ॥ ४४ ॥

जाया करूं नका हो! हिमकालीं खुंट हे प्रहारानें
लवतिल हेच वसंतीं, द्राक्षांच्या गोड गोड भारानें ॥ ४५ ॥
शैलोशैलीं माणिक, गजोगर्जां जरि न जाहलें मोतीं,
सर्वत्र साधु, चंदन, नसेल, तरि ते मुळीं न का होती! ॥४६॥
ह्याच कवींतुनि कोणी प्रभुसत्तेनें लिहील हो कविता!
काव्यासह विजयध्वज निज देशाचा दिगंत फडकविता. ॥४७॥
ह्यास्तव सहानुभूती ठेवा! कांहीं करा अशी सोय
कां कविची, भाषेची, देशाचीही समुन्नती होय. ॥ ४८ ॥

———— चंद्रशेखर.

## ९९ नानासाहेब पेशव्यांचा शेवटचा विलाप.

श्लोकः—हा ईश्वरा! दिवस आज कसा उदेला
आली पहा अवकळा सगळी घरेला
हें सर्व शून्य दिसतें सुख यांत नाहीं
लोकीं जिणें गमतसे यमयातना ही. ॥ १ ॥
चांडाळ दुष्ट यवनीं कपटीं प्रयासीं
नेले खरे निज मनोरथ शेवटासी
मातें अहा बुडविलें खर दुःखडोहीं
कोणा तरी जवळ गोष्ट अतां वदों ही ॥ २ ॥
विश्वास ही प्रिय सदाशिव धैर्यशाली
वांछा तयां समर काय करूं जहाली!
तीच्या भरी भरुनि काय अनर्थ झाला
हें काय गोड गमलें तुज विश्वपाला. ॥ ३ ॥
ते धाकुटे वडिल मीं पहिलें मरावें
तें जाहलें उलट काय पुढें करावें

ज्यांहीं मदीय दिवस स्वकरीं करावे
त्यांचे करूं दिवस काय मला पडावें ॥ ४ ॥
मीं धाडिलें समर घोर तयां कराया
कोणी खरोखर म्हणेल रणीं मराया
चांडाळ मत्सम दुजा त्रिजगांत नाहीं
निंदू नये मज कसें सकळां जनांहीं. ॥ ५ ॥
चांडाळ मी अधम मी खळ पापराशी
थोरा कुळीं उपजलों नकळे कशाशी
शोकार्णवांत जन मज्जित सर्व झाला
मी होय कारण खरोखर कीं तयाला. ॥ ६ ॥
ज्याच्या कृतीवरुनि दुःखित राष्ट्र होतें
तें काय माणुस कशास हवें अहो तें
विश्वेश्वरा मरण दे मज शीघ्र आतां
ना तूं म्हणें न वर हा व्यथिता अनाथा. ॥ ७ ॥
हर हर जगीं ऐश्वर्याचा किती भ्रम हा तरी
खलु सुख तयामध्यें नाहीं अहो तिळही भरी
मम अनुभव पाहा वाहा मनीं हरिच्या पदां
सुख न दुसरें कोठें लाधे खरें समजा सदा. ॥ ८ ॥

त्रि. कों. ओक.

### १०० लक्ष्मीमाहात्म्य.

आर्याः—हे लक्ष्मी तव महिमा मोठ्यांमोठ्यांसही नये गाया
तेथें इतरजनांचा प्रयत्न जाईल कां न गे वांया. ॥ १ ॥
तुजवर जीव जनांचा सुखसाधन म्हणुनि लागतो जितका
स्त्रीवर सहोदरांवर आईबापावरी नसे तितका. ॥ २ ॥

त्वत्प्राप्त्यर्थ श्रमती खटपटती झगडती रणीं मरती
वदती असत्य नानाविध दुसरीं घोर पातकें करती. ॥ ३ ॥
कीं तुझिया ठायीं जो गुण तो इतरीं न आढळे कोठें
त्याचा प्रभाव पाहुनि चित्ताला नवल वाटतें मोठें. ॥ ४ ॥
तुझ्या योगें होती अवगुण ते गुण समस्तहि जनांत
याचा अनुभव येतो खुपतो तो नित्य शिष्टनयनांत. ॥ ५ ॥
ज्याच्या येथें वससी तो असला कोळसा तसा काळा
तरि सांवळा म्हणुनियां करिती गौरव कधीं न कंटाळा. ॥ ६ ॥
खादाड भला असला तर भोक्ता तो म्हणोनि वानीती
कृपण जनाला म्हणती सावध बहु दूरदृष्टि हे रीती. ॥ ७ ॥
भोळा शंकर पावे नांव अजागळ मनुष्य वेडगळ
ऐसा प्रकार उलटा त्वत्प्राप्तीनें घडे पहा सकळ. ॥ ८ ॥
परिस निजस्पर्शानें लोहा करितो सुवर्ण कीं जैसें
तूं निजसहवासानें दुर्गुण करितेस ते सुगुण तैसे. ॥ ९ ॥
हा भ्रम आहे अंतीं गुण ते गुण अगुण ते अगुण होती
रंग कितीहि दिसो परि खोटें खोटें खरें खरें मोती. ॥ १० ॥
ही भ्रांतिमूलक स्तुति ऐकुनियां जाणते जन न फसती
असतिसतीच्या भेदा समजुनियां स्वस्थ मानसें बसती. ॥ ११ ॥
या दासाला लक्ष्मी भ्रम हा तिळही कदापि न पडावा
व्यसनाचा लेश तसा त्यानें याला कधींहि न जडावा. ॥ १२ ॥

वि. कों. ओक.

———

## १०१ गुरु कसा असावा ?

श्लोकः—मन सुनिर्मल धर्मपरायण
परम सत्य मनोहर भाषण

कृति विशुद्ध निरंतर हो करी
गुरु असा धर नित्य शिरावरी ॥ १ ॥
मनिं धरी परमेश्वरभक्तिला
इतर लाजति हेतु सदा जिला
परहितीं रति ज्यास परोपरी
गुरु असा धर नित्य शिरावरी. ॥ २ ॥
भ्रम निवारुनि दाखवि सत्पथा
श्रवणवी हितबोधकशा कथा
सम सुवर्तन बाहिर वा घरीं
गुरु असा धर नित्य शिरावरी. ॥ ३ ॥
न विभवें तिळ उद्धतता जडे
डगमगेहि न ये जरि सांकडें
सहज वृत्ति अशी तुज वीतरी
गुरु असा धर नित्य शिरावरी. ॥ ४ ॥
निजहिताहुनि देशहिताकडे
वळवितो मन निश्चित रोकडें
भुलविना मतिला पळही भरी
गुरु असा धर नित्य शिरावरी. ॥ ५ ॥
न असला तुजला गुरु सांपडे
तरि न मान भयंकर सांकडें
उघड नेत्र पहा इतिहास तो
गुरुसमुद्रचि वास्तव भासतो. ॥ ६ ॥
हितकर इहलोकीं आणि जो अन्यलोकीं
परम गुरु खरा तो ज्ञानदृष्टी विलोकीं

चरण दृढ धरावे नित्य त्याचे सुभावें
निशिदिनीं परमेशासारखें त्या भजावें. ॥ ७ ॥

**वि. कों. ओक.**

---

## १०२ कृष्णकुमारीचें आईस उत्तर.

( कृष्णकुमारीची गोष्ट बहुतकरून सर्वांस ठाऊक आहे. बापाच्या संकटाचें निवारण करण्यासाठीं मरण्याचा निश्चय केल्यावर तिनें आपल्या दुःखित आईस जें उत्तर दिलें, त्याचें तात्पर्य असें:— )

श्लोकः-ज्यानें जन्म दिलें कडे मिरविलें घेवोनि खांदां भलें
केलें लालनपालनादि सगळें जें मत्सुखा लागलें
त्याचे संकटवारणीं खरचिला हा देह माझा जरी
माझे पुण्यतरू सुखप्रद फलीं ओथंबले हो तरी. ॥ १ ॥
प्राण्यांतें मरणें जगीं सकलही केव्हां न केव्हां तरी
गेले कोट्यवधी तयांत कसली या पामरीची परी
ताताच्या यशरक्षणीं मरण हें लग्नाहिपेक्षां मला
संतोषप्रद वाटतें शपथ गे शंका नसावी तुला ॥ २ ॥

शूरोदरीं घेउनि जन्म आई
भ्यावें मराया वद योग्य काई
कस्तूरिका स्वाद न दे तरी ती
मातीसमा मानिति लोकरीती. ॥ ३ ॥
वाटे पिता देव तसाचि माते
ज्ञानी गुरूचें वच हेंहि माते
वेंचीन हा जीव तदीय पायीं
पावेन मी मुक्ति अशा उपायीं. ॥ ४ ॥

वेचावया जीवित तातकामीं
झालें न मी सिद्ध तरी हरामी
जन्मोनियां सार्थक काय केलें
क्षुद्रा जरी कीटकशीच मेलें. ॥ ५ ॥

लाधे कीर्ति मला तुला सुख महा श्री भीमरायाप्रती
ऐशा कां मरणीं विटेल वद गे आई मदीया मती
टाकीं शोक करीं मना स्थिर जगद्वंद्या सदा आठवीं
संतोषें मज विश्वपालकपदें सेवावया पाठवीं. ॥ ६ ॥

यावें मला मरण संकट हें टळावें
तातास दुःख न कधीं तिळ आतळावें
हा दे मला वर दयाकर आजि माते
देईल कोण वद इष्ट दुजें मुलातें. ॥ ७ ॥

वि. कों. ओक.

---

## १०२ औरंगजेबाचा शेवटचा विलाप.

श्लोकः–आहाहा राज्यलोभें मजकडुनि महा जाहले दोष भारी
तारुण्याच्या मदानें मति न तिळभरी राहिली कीं विचारीं
जें कोणींही न केलें अधमपण कधीं तें स्वयें सर्व केलें
पश्चात्तापाग्निनें हें हृदय तडफडे–दग्ध होवोनि गेलें. ॥ १ ॥
पूजावें म्यां जयाला सुरसम सुमनें भाक्तिनें शुद्ध भावें
सोसोनी कष्ट आधीं उदित निशिदिनीं मीं जयाचें करावें
त्या ताताला[२] कठोरीं शरसमवचनीं[३] ताडिलें दुष्ट वाचे
बंदी घालोनि केले नय विसरुनियां हाल भारी तयाचे. ॥ २ ॥

---

१ सांगणें २ बापाला ३ बाणांप्रमाणें

ज्या बंधूंचें करावें हित झिजवुनियां देह मी प्रेमभावें
त्यांचें मी काय केलें हर हर न मना तें कधीं आठवावें
म्यां दुष्टानें तयांचे, नरक मज घडो, घेतले जीव हाय
व्याली माझी कशाला मज कुलगरला दुःख सोसोनि माय ३
ज्या राज्या मेळवाया अनुपम रचिली सर्व ही पापराशी
तें झालें सिद्ध मागें त्यजुनि परजनीं टाकुनी जावयासी
आतां वाटे मनाला हळहळ सगळा व्यर्थ हा शीण झाला
हें काळें तोंड कैसें, त्वरित वद मना, दाखवूं विश्वपाला ॥४॥

पातकें रचुनि राज्य साधिलें
तें मला त्यजुनि येथ राहिलें
पातकें मजसवेंचि चाललीं
हाय हाय विधि हा कसा बली. ॥ ५ ॥

विश्वेशा करुणार्णवा शरण मी आलों तुला या क्षणीं
गाजे ब्रीद तुझें जुनें अघनगांच्याही सदा रक्षणीं
तें घालोनि मदीय कर्म सगळें पोटांत साचें करीं
या दीना शरणागता लवकरी येवोनियां उद्धरीं. ॥ ६ ॥

वि. कों. ओक.

---

## १०४ लेखणीचा महिमा.

श्लोकः—हे लेखनी तव चरित्र विचित्र आहे
गातां बृहस्पतिहि होउनि थक्क राहे
तत्रापि अल्प कवि अल्पचि वर्णिताती
कीं त्यांत अल्प तरि ते सुख पावताती. ॥ १ ॥

---

१ कुलास विष अशा २ दैव ३ व्रत. ४ पापपर्वत.

नाहीं तुझ्या सम कुणा समदृष्टि मोठी
पंक्तिप्रपंच न वसे तिळमात्र पोटीं
चांडाळ साधु अपवित्र पवित्र यांतें
तूं सारखी विवश कार्य करावयातें ॥ २ ॥
तूं कीर्तिदायक जशी घडशी नृपाला
तैशी धनेंकरुनि हीन अशा जनांला
जो भूप तीन शतकें रचिता तयाची
तैशीच कीर्ति धनहीन अभंगियाची. ॥ ३ ॥
वारोनी पापधीतें निगमपथजना दाविती धर्मशास्त्रें
तैशीं सारीं पुराणें अनुभवकथनें हीं महा ज्ञानपात्रें
हीं तूझीया कृतींचीं अनुपम सुफलें मानवां प्राप्त झालीं
या कर्तृत्वा बघोनी तव सुरवरही मान घालील खालीं. ॥ ४ ॥
* जो उत्पन्न मनांत होउनि सदा चैतन्यरूपें वसे
जाणाया रसरूपगंध सहसा ज्याला मुळींही नसे
त्याचें चित्र सुरेख काढुनि पटीं तूं दावितेसी जना
ही युक्ती तव लाजवी निजगुणें अन्यां कलां कल्पनां. ॥ ५ ॥
केलेंसी अजरामर क्षितिवरी त्वां व्यासवाल्मीकियां
तैसें अन्य जनांसही तव पथें जे लागले जावया
जोडोनी कर दोनही बहु तुझे पायांस मी लागतों
दे तूझा सहवास उत्तम सदा हें मागणें मागतों. ॥ ६ ॥

वि. कों. ओक.

---

१ भर्तृहरि २ तुकाराम ३ इंद्र * हें वर्णन मनांतल्या विचारांचें आहे. ४ पृथ्वीवर.

## १०५ दत्तवियोग !

( रा० रा० दत्तात्रय कोंडो घाटे, बी. ए. यांस ता० १३ माहे मार्च सन १८९९ रोजीं देवाज्ञा झाली. हे एक होतकरू व प्रासादिक कवी होते, यांचा व चंद्रशेखर कवी यांचा फार स्नेह होता. त्यांच्या मृत्यूस अनुलक्षून चंद्रशेखर कवीचे पुढील दुःखोद्गार आहेत. )

श्लोकः—कुटुनियां कटुकंटक–कल्पना
प्रसवतुल्यहि सोसुनि वेदना ॥
करुनि धाव पदावयवांवरी
घडिति अक्षरबंध कसातरी ॥ १ ॥
कवि–कुळास कलंक असे किती ॥
धरणिधूलिमधीं खळ लोळाति ॥
म्हणविती जरि ते कवि आपण
तरि म्हणूं करिती जनवंचना ॥ २ ॥
स्वकृतिनें परि जो जन भारती
सजवितो जणुं तो दुसरी रती ॥
त्यजुनि अन्य विचार तयास मी
कवि म्हणोनि सदा शिरसा नमीं ॥ ३ ॥
जरि तदीय समागम हो मला
तरि म्हणेन सुरेश्वर लाभला ॥
परि असा कवि ह्या वसुधेवरी
झळकतो विरळाच कुठेंतरी ॥ ४ ॥
मग तदीय समागम लाभ तो ॥
मजसि संतत कोठुनि लाभ तो ॥
परि अहो ! कविरत्न असें भलें
सुकृतिनें सहजीं मज लाभलें ॥ ५ ॥

समजलों किति धन्य तदा मला
अमित हर्ष किती मज जाहला ॥
त्यजुनियां कितिदां व्यवसायही
धरुनि ती बसलों कविता–वही ॥ ६ ॥
विकसतांच सरोज सरोवरीं
मधुर तो लुटितो मधुमाधुरी ॥
सरस–दत्त–कवी सह मी तसा
सतत सेवितसे कवितारसा ॥ ७ ॥
सकल मोह जगांतिल त्यापुढें
मग अम्हां गमले तृण बापुडे ॥
न कविता, परमामृत ! सेवनी
न कळतां सरल्या दिनयामिनी ॥ ८ ॥
सुख मिळेल सुदैव असें मला
ग्रह असाच मनें मम घेतला ॥
तंव अहा ! कटुकाळ निशामुखीं
श्रवणिं दंश करी जणुं वासुकी ॥ ९ ॥
समजलें विषमज्वर येउनी
कवि पडे अति निश्चल होउनी ॥
सं‍तगडी विषमामधिं सांपडे
परि तयांतिल मोह मला घडे ॥ १० ॥
द्रुत–विलंबित जाउनि भेटलों
प्रकृति पाहुनि दुःखित जाहलों ॥
परि असाध्य न ती दिसली मला
कवि सखाहि हताश न लाभला ॥ ११ ॥

दिसुनि उज्ज्वल मालवतो दिवा
दिसुनि रुग्ण बरा, मुकतो जिवा ॥
उतरला ज्वर यद्यपि भासला
तरि पुन्हां अनिवारचि वाढला ॥ १२ ॥
कठिण लोह जरी अति तापुनी
पडतसें मृदु भस्मचि होउनी ॥
तरि शरीर-कथा मग ती किती
कवितनू पडली अवनीप्रती ॥ १३ ॥
बघुनि ते, मम देह गमे मला
क्षणभरी मृततुल्यचि जाहला ॥
पडुनि अंधतमीं जडभावना
जणुं घडे तनुलाहि तशी मना ॥ १४ ॥
फिरुनि रोम तनूवरि ऊठले
खळखळां नयनीं जळ लोटलें ॥
धडकला घनघाव उरावरी
करपलें मृदु काळिज अंतरीं ॥ १५ ॥
सकळ जेथिल तेथ झुगारुनी
सवगडी विरहानलिं लोटुनी ॥
कविसख्या ! परलोकचि तो भला
वद कसा सदया रुचला तुला ॥ १६ ॥
उडुनि उंच नभीं तव कल्पना
चकित गा ! करिते मम लोचनां ॥
विविधशा विषयीं तुझिया कृती
मज मयूर कलापचि भासती ॥ १७ ॥

" बव्रसि अंत कितीतरि राजसे "
मधुर " कोकिल कूजितही " तसे ॥
सरस " मुग्ध " अशी " कलिका " हि ती
वदु अशा मधुरा कविता किती ॥ १८ ॥
श्रुतिमनोहरसा कवितौघ तो
विमल—गांगजलासम वाहतो ॥
कुणिहि जो रस त्यांतिळ चाखतो
अनुभवी अमृतानुभवास तो ॥ १९ ॥
करुनि त्यांत सदैव निमज्जना
परम हर्ष घडे रसिका जना ॥
परम वस्तु निरंतर सेवुनी
परम हर्ष कसा नुपजे मनीं ॥ २० ॥
सुरवधूहुनि मंजुळ बोल की
तव सतार अतां धरि मौन कीं ॥
सवतबोल वरी रुचले तुला
म्हणुनि ये रुसवा जणु कीं तिला ॥ २१ ॥
धरिसि तूं पदवी तरि तूजला
दुरभिमान तिचा नच जाहला ॥
सुजनता, रसिकत्वहि लीनता
भरत भूविषयीं अनुरागिता ॥ २२ ॥
गुण अमोल असे किति आठवूं
विरहशोक कुठें तव साठवूं ॥
अति सुखासचि जे गुण कारण
करिति संप्रति वक्ष विदारण ॥ २३ ॥

जलनिधीमधिं एक दुजास ते
मिळुनि काष्ट फिरोनि दुरावते ॥
बघुनि त्यासम संगम आपुला
अति हताशचि हा जन जाहला ॥ २४ ॥
परि असो ! जंव राहिन भूवरी
तंव तुझ्या कवितेंतिल माधुरी ॥
सतत सेवुन मानिन धन्यता
कवियशें मज भेटत जा अतां ॥ २५ ॥
कविवरा ! धरिसी निज अंतरीं
प्रणय उत्कट ज्या कवितेवरी ॥
सुरपुरींतहि ती अधिदेवता
कवि पदस्थ करो तुजला अतां ॥ २६ ॥
तुजवरी कविमान परंपरा
सतत वर्षुनि कीर्ति निरंतरा–॥
सुखद शाश्वत शांति मिळोहि ती
मुनि जिला परमार्थाचि मानिती ॥ २७ ॥

चंद्रशेखर.

## १०६ किल्ल्याची खबरदारी.

देहरूप किल्ला हृदय–मंदीर । आत्मा सावकार धनी त्याचा ॥
दशेंद्रियें वाटा किल्ल्यांत जावया । मन हें द्वार या मंदीराचें ॥
सन्मति ही माला ज्ञानार्कपदक । रत्नें अमोलीक भांडारीं त्या ॥
उपद्रव त्यांसी चोरांचा न व्हावा । म्हणोनी राखावा दारवंठा ॥
आत्मसंयमन अगळा घालोनी । आत्माराम धनी निजो द्यावा ॥
विवेकाची गस्त रात्रंदीन ठेवा । तस्करांचा केवा मग काय ? ॥ १ ॥

मंदिराबाहेर झाली बहू दाटी । धन्याचिये भेटी कोणी आले ।।
खजिनाच कोणी लुटाया पातले । विवेकें त्यांतले निवडावे ।।
हितकर्ती कुळें धन्याचीं शोधावीं । मग तीं सोडावीं मंदीरांत ।।
हितशत्रू जे का तयां पारखोनी । द्यावें घालवोनी अर्धचंद्रें ।।
शत्रुमित्र कोण ऐका त्यांचीं नामें । वेगळालीं कामें मुद्राधाटी ।।
विवेकें तयांचीं लक्षणें पाहोनी । हृदयस्थ धनी भेटो द्यावा ।। २ ।।
क्रोधाजी धडपडे नाईक चोरांचा । शत्रू हा थोरांचा क्रूरकर्मा ।।
कपाळासी आंठ्या भिवया तिर्कस । मुद्राही उग्रस मांगाची या ।।
कामाजी नटव्या तापसांचा वैरी । दृष्टी त्याची कैरी मिजासीची ।।
मिशांसी पिळोनी दावी मुखशोभा । लावण्याची प्रभा यौवनादी ।।
दोघांची या एकी घातक लोकांतें । धाडिती नर्कातें साधकासी ।।
घालिती दरोडा शमदमावरी । तयांसी मंदीरीं रिघो न द्या ।। ३ ।।
गर्वाजी फाकडा मिशांवरी ताव । देवोनीया, भाव तुच्छतेचा– ।।
दावितो, दिमाख छाती काढोनीया । म्हणतसे वाया माझा मीच ।।
मत्सर जळफळ्या आठ्या घाली भाळा । कलहाचा चाळा सदा त्यासी ।।
जरी हे मंदीरीं शिरतील चोर । होईल बा घोर अनर्थची ।।
म्हणोनी तयांसी मंदिरीं न सोडा । बसेलची खोडा धन्यालागी ४
लोभाजी गुजर हरामी हा फार । पुरा दावेदार सद्धर्माचा ।।
इतरां जीवांची परवा न याला । स्वताच्या स्वार्थाला दक्ष मोठा ।।
दंभ बहुरूपी कावेबाज ढोंगी । दावीतसे अंगीं नाना शक्ती ।।
परी हा शेवटीं फसवील बापा । भुलूं नका थापा ऐकोनीया ।।
आत्म्याचे हे शत्रू मुख्य सहाजण । द्यावे घालवोन देखतांची । ५ ।
आळस कुतर्क यांचा आंगवात । करील बा घात सर्वस्वाचा ।।
तैसीच वासना कोटाळीण मोठी । बैसली चोहोटीं सिंदळ ती ।।

तीजमुळें जीवा जन्म-मृत्यु-बंध– । सोयरे-संबंध तिजसाठीं ॥
गर्भवास-दुःख मुक्त जीवालागी । संग तिचा त्यागी अटाहस्यें ॥
तिला शिरो न द्या आत्म्याचे मंदिरीं । करील बोहरी मालकाची ६
कल्पना कुशंका ममता, कुबुद्धी । आशेची उपाधी तोडा वेगें ॥
भूल भ्रांती तृष्णा अवघ्या जारिणी या । रिघो न द्या तयां मंदिरांत
एकदां कां यांनीं वस्ती आंत केली । अवदशा ठेली प्रत्यक्षची ॥
संगती तयांची सुखदायी वाटे । परिणामीं काटे बोंचतील ॥
हाय हाय ! होतां सोडवीना कोणी । सावधानपणीं वागा सदा ।७
धन्याच्या हिताचीं पूर्ण विश्वासाचीं । कुळें आत्मयाचीं मागें उभीं।
शुद्ध सत्वभाव शांतवृत्ति त्याची । प्रभा सुवर्णाची त्याचे आंगीं ॥
मुद्रा ती गंभीर भाषण रसाळ । अंतर निर्मळ, जळापरी ॥
त्याचे बरोबरी दया क्षमा शांती । तारीती आकांतीं आत्मयासी ॥
वैराग्य-विरक्ती जोडपें हें आलें । दूरची राहीलें मुक्यापरी ॥
ऐशा मंडळीला करू नका बंदी । आत्माराम वंदी त्यांचे पाय ८
भजन, पूजन, सत्य, स्वानुभव । आनंद सद्भाव सद्बोधादी ॥
हातीं धरोनिया भेटवा आत्म्यासी । तेणें होय त्यासी सौख्य मोठें॥
धैर्य समाधान औदार्यादी बंधू । वैभवाच्या सिंधू पाववीती ॥
उद्योग-सन्मित्र सौजन्य लीनता । करोनी मान्यता सोडा आंत ॥
सज्ञानाचे पाय वंदोनीया भावें । ठेवोनीया घ्यावें मंदिरांत ॥ ९ ॥
नवाविधा भक्ती, उन्मनी, समाधी । त्यांची मैत्री साधी विवेकानें ॥
आणखीही कोणी हितकर्ती कुळें । ठेवा भावबळें मंदिरांत ॥
यांच्या संगतीनें आत्मयाचें हीत । होईल निभ्रांत जाणोनिया ॥
विवेकाची गस्त ठेवोनी किल्याची । घ्यावी रक्षणाची खबरदारी ॥

तरीच सत्संगें आत्मराज मुक्त । शमदम युक्त होवोनीया ॥
ब्रह्मपदीं स्थीर राहील आकल्प । मुळींना विकल्प माधवासी । १०

——— — माधवराय.

१०७ इंद्रजित् स्वपत्नीसह, युद्धास जाण्यापूर्वी मंदोदरीस भेटतो.

अरुणासह रम्य उषा येई गगनोदरांतुनी जैशी
शयनगृहांतूनि निघे प्रमिला वामाकुलोत्तमा तैशी ॥ १ ॥
शिबिकासनांत बसुनी मातासदनास दंपती जाय
उभयांहीं नतभावें जननीचे विमल वंदिले पाय ॥ २ ॥
पाहूनि नंदनातें स्फुंदे मंदोदरी करी शोक
प्रेम खरें मातेचें, मातेविण शून्य सर्व भूलोक ! ॥ ३ ॥
पुष्पीं जैसा परिमल मुक्ताफलवास रम्य शुक्तींत
माताहृदयीं तैशी प्रीति नसे या असत्य उक्तींत ॥ ४ ॥
" यज्ञ पुरा करुनि झणी जातों मारावयास रामातें
मातें द्यावी आज्ञा, वदला घननाद शोकपर माते ॥ ५ ॥
" मन्नयनपूर्णचंद्रा ! देऊं आज्ञा कशी तुला बाळा
धाडुनि संग्रामातें अर्पू तुज काय मी अहा ! काळा ॥ ६ ॥
तो राम शूर मोठा लक्ष्मण त्याचा पराक्रमी भाऊ
ते कालसर्प साक्षात् काय तयांच्या मुखीं तुला देऊं ॥ ७ ॥
हांसुनि घननाद वदे ' शंका धरिसी वृथा मनीं माते
मी इंद्र-जित् प्रसादें तुझिया जिंकीन सत्य रामातें ' ॥ ८ ॥
चुंबुनि शिर तनयाचें प्रेमें मंदोदरी पुन्हा बोले
" मायावी मानव ते असुनी वश देवही तयां झाले ॥ ९ ॥
मी ऐकिलें असे कीं, रामाज्ञेनें शिला जलीं तरती
होई शीतल पावक वृष्टीतें वारिवाहही करिती " ॥ १० ॥

" शोक पुरे कर जननी कष्टविसी करुनि कां विषाद मन
व्यर्थ सुखाची आशा जोंवरि झालें न शत्रुचें दमन ॥ ११ ॥
नगरप्रांतीं उत्सुक मत्संगें अरि करावया कदना
कैसें स्वस्थ बसावें वद जननी अग्नि लागतां सदना ? ॥ १२ ॥
ख्यात जगीं रक्षःकुल सुयश तयाचें कसें अहा मळवूं
घेउनि माघार रणीं स्वर्गीं पितरांस काय मी कळवूं ! ॥ १३ ॥
हांसेल विश्व सारें, दे आज्ञा जावया कुमारा या
पूजुनि इष्ट दैवत शिरतों समरांत राम माराया ॥ १४ ॥
दे दे जननी आज्ञा वीरा कर्तव्य योग्य साच रण
समरीं संपादुनि यश येतों पूजावया तुझे चरण " ॥ १५ ॥
माता त्यास वदे तैं " रक्षो तुजला रणीं विरूपाक्ष
जाणार तर सुखें जा वत्सा युद्धीं रहा सदा दक्ष ॥ १६ ॥
' चल मत्संगें बोले प्रेमें मंदोदरी स्नुषे बाळे
पुत्रवियोगीं पाहुनि तव मुखकमलास सांत्वविन डोळे ॥ १७ ॥
वंदुनि पद जननीचे लागे रणभूकडे बळी जाया
नूपुररव तों पडला तच्छ्रवणीं, अनुसरे तया जाया ॥ १८ ॥
" नाथा टाकुनि जातां दीन अनाथा असे कसे बोला ?
येतें अपुल्या संगें " वदली प्रमिला सती विनयशीला ॥ १९ ॥
मुक्तामंडित वक्षीं तन्नेत्रांतूनि जळ गळे विमल
शोभे तें उज्ज्वलतर शिशिरकणांहीं न त्यापरी कमल ॥ २० ॥
वदला तैं वीरोत्तम आलिंगुनि करयुगीं प्रिया भार्या
" आर्ये स्वस्थ रहा जा येतों मी परत साधुनी कार्या" ।२१ ।
इंद्राज्ञेनें गेला मदन जसा शिवसमाधि भंगाया

वदुनि असें जाय बैली टाकुनि जायां रणांत रंगाया ॥ २२ ॥
प्राक्तनगति दारुण अति अशुभदिनीं मेघनाद जाय रणा
रतिसम विलापमग्ना झाली प्रमिला स्वनाथपदशरणा ॥ २३ ॥
जोडुनि करयुगुलातें भावें व्योमाकडे सती पाहे
रक्षू नाथास रणीं रात्रंदिन म्हणुनि अंबिके बाहे ! ॥ २४ ॥

माधवानुज.

## १०८ पुण्याची सद्यःस्थिति.

पुण्याई सरली न पुण्यनगरी हें नांव साजे तुला
झाली जी तव हानि तीस भुवनीं कोठेंच नोहे तुला
अत्यंत प्रिय तूं जशी नरवरां होतीस तैशी जनां
सर्वस्वी हतभागिनि ! प्रभुवरें केली तुझी हेलना ॥ १ ॥
झंझावात सुटे अकाळिं गळती जैशीं फळें कोंवळीं
किंवा बालतरू वनीं उलथुनी कीं लोळती भूतळीं
गारांची अवकाळिं वृष्टि घडतां होई फुलांचा सडा
तैसा काळ मनुष्यजीवित हरी मारूनियां हांसडा ॥ २ ॥
एकामागुन एक नित्य मरती, कोणी न कोणा रडे
जो तो आपुलिया मनीं म्हणतसे होणार तें तें घडे
होतां अप्रिय लेशही, खळखळां जीं आंसवें लोटती
दुःखाचा अतिरेक आज घडतां नेत्रींच तीं आटती ॥ ३ ॥
मेला तो परवां ! दुजा अमुक तो गेला अहो तेरवां
देवाज्ञा तमक्यास काल घडली ! वार्ता अशी दुःश्रवा

३ इंद्राजित्. ४ आपली स्त्री.

१सन १९०० च्या आक्टोबर नोव्हेंबर महिन्यांत पुण्यास जो प्लेगनें कहर करून सोडला त्या वेळीं कवीनें हे उद्गार काढिले आहेत.

पत्रीं वाचुनि अंतरंग चिटलें, मित्रांचिया भाषणीं
सौख्याचा नच शब्द, कान किटले; वृत्तान्त हे ऐकुनी ॥ ४ ॥
होता हा तरणा, अपात्र मरणा तो देखणा शाहणा
नाहीं मोल गुणा, परंतु करुणा आली न नारायणा
पोरेंही पडलीं कितीक उघडीं होऊनियां बापडीं
भिक्षापात्र करीं धरून छबडीं जातील देशोधडीं ॥ ५ ॥
जों उल्लंघिति शैशवा, पतिगृहीं आस्वादिती वैभवा
तों झाल्या विधवा, न पार दिसतो त्यांच्या विपत्त्यर्णवा
देती शाप भवा, न त्या परिसवे शोकार्त हा ! हा ! रवा
देवा हें मिटवी अरिष्ट सगळें, धांवा, जनां वांचवा ॥ ६ ॥
पानें जीं पिकलीं, अपाप सुकलीं, खालीं बहू लोंबलीं
वार्धक्यें थकलीं, तशींच पितरें जीं भूमिला वांकलीं
पुत्रांकीं शिर ठेवुनी यमगृहा जायास उत्कंठलीं
ऐशीं कालवशें निपुत्रिक अहा ! एक्या क्षणीं जाहलीं ॥ ७ ॥
पाषाणास फुटेल पाझर अशी एकेक वार्ता नवी
ऐकूं येइ, उपाय सर्व हरले " आतां प्रभो सोडवी "
ऐसे हे करुणार्त शब्द निघती सर्वत्र, चितानलें
झाले दग्ध समस्त दूर जन जे आम्हांपरी राहिले ॥ ८ ॥
पापाचा भरला घडा म्हणुनिया हा राग कां एवढा
नेला मालचि रोकडा प्रभुवरा ! निःपात हा केवढा !
न्यायानें भरडा तुरी, न बरडा कां भेडवा भेकडां
पाप्यातें निवडा, करा उलगडा, रोषासि या आंखडा ॥ ९ ॥

ग. ज. आगाशे. बी. ए.

## १०९ कवितेचें प्रयोजन.

श्लोकः—शान्तीचें घर सोडुनी प्रखर त्या हाटीं प्रयत्नाचिया
प्रीतीचाहि निकुंज सोडुनि रणीं जीवित्व नांवाचिया
सर्वांही सरसावणें झटुनिया, हें प्राप्त झालें असे
या वेळे न कळे कवे! तुज सुचे गाणें अहा रे कसें ! ॥ १ ॥
" माता ही सुजला स्वभूमि सुफला, तीच्या परी लेंकरां
खायाला पुरतें पहा नच मिळे, कीं हाल आहे पुरा
झांकायास तनूस वस्त्रहि न तें आतां पुरेसें मिळे
या वेळेस कसे कवे ! तुज सुचे गाणें न मातें कळे! " ॥२॥
हें कोणीं म्हणतां जवें कविमनीं खेदोर्मि हेलावल्या
नेत्रांतूनि सवेंचि बाष्पसरिता वाहावया लागल्या
त्याचा स्त्रैणपणा असा प्रकटला वाटेल कोणा, परी
धीरोदात्त असोचि तो श्रुत असे हें दूरही भूवरी ! ॥ ३ ॥
सोन्याचे सरले अहा ! दिवस ते, आली निशा ही कशी !
सौख्याचा नद तो सुकून पडलों या दुःखपंकीं फशीं !
कालक्रीडित हें बघूनि रडला, हें व्यस्त कांहीं नसे;
प्रौढत्वीं निज शैशवास जपणें, बाणा कवीचा असे. ॥ ४ ॥
बाष्पांतीं तरल स्वरें मग कवी निश्वासुनी बोलिला—
" जो पूर्वी गुण पुण्यभूमिवरि या अत्यन्त वाखाणिला,
तें हें दिव्य कवित्व दुर्विधिवशें हीनत्व कीं पावलें,
त्याची बूज करावया न अगदीं कोणी कसें राहिलें ! ॥ ५ ॥
" गाणें जे परिसावया कविपुढें राजेशाही वांकले,
यत्नादेंच लहान थोर सगळे गुंगून वेडावले;

त्याला मान नसे, नसो पण, अतां त्याची अपेक्षा नसे,
हें कोणी म्हणतां विषाद अहिंसा मन्मानसाला डसे ! ॥ ६ ॥
" आलेल्या दुरवस्थितींतुनि तुम्ही उत्तीर्ण व्हाया जर
उद्योगीं रत व्हावया धरितसा औत्सुक्य चित्तीं, तर
गाण्यानें कविच्या प्रभाव तुमचा वर्धिष्णुता घेइल,
स्फूर्तीचा तुमच्या पिढ्यांस पुढल्या साक्षी कवी होइल. ॥ ७ ॥
" हातीं घेउनियां निशाण कवि तो पाचारितो बान्धवां—
' या हो या, झगडावयास सरसे व्हा, मेळवा वाहवा !'
प्रेतेंही उठवील जी निजरवें, ती तो तुतारी करी
आतां नादवती, निरर्थ तर ती त्याची कशी चाकरी ? ॥ ८ ॥
" आशा, प्रेम, तसेंच वीर्य कवनीं तो आपल्या गाइल,
गेलें वैभव गाउनी स्फुरण तो युष्मन्मना देइल;
द्या उत्तेजन हो कवीस, न करा गाणें तयाचें मुकें?
गाण्यानें श्रम वाटतात हलके हेंही नसे थोडकें. ॥ ९ ॥
" आतां जात असे दुरी शिथिलता अस्मत्समाजांतुनी,
याची खूणच गान जें निघतसे तें साच जाणा मनीं?
तारा ताणिलियावरी पिळुनियां खुंट्यांस वाद्याचिया,
त्यांच्यांतून अहा ! ध्वनी उमटती जे गोड ऐकावया!" ॥ १०

—— —— . —

केशवसुत.

## ११० रुक्मिणीपत्रिका.

शा. वि.:—प्रभो भुवनसुंदरा श्रवणरंध्रिं ज्यांच्या शिरे–।
तुझा गुणगण, त्वरें विविध ताप त्यांचा हरे ॥
स्वरूप तव पाहतां सकल लाभ येती करीं ।
असें परिसुनी त्रपा त्यजुनि चित्त हें त्यांवरी ॥ १ ॥
स्वरूपकुलविक्रम–द्रविणधामविद्यादिकीं ।
स्वतुल्य अवलोकुनी जनमनोहरा सात्विकी ॥
मुकुंद नरकेसरी तव गुणीं सदा हांवरी ।
विवाहिं कुलबालिका तुज कशी न धीरा वरी ॥ २ ॥
शरीर तुज अर्पुनी पति तुला वरीलें मनें ।
म्हणूनि करिं मत्करग्रहण केशवा सन्मनें ॥
न मानिशि विनंति ही कमललोचना तूं जरी ।
हरील मज चैद्य हा सहज नीच नाहीं तरी ॥ ३ ॥
जरी सतत पूजिलें सुरवरिष्ठ दुष्टांतका ।
व्रतादि नियमीं धनें बहुत तर्पिलें याचकां ॥
सुरद्विज गुरूस मी जरिहि वंदिलें सन्मती ।
वरो हरि कदां मला न दमघोष भूमीपती ॥ ४ ॥
हरी जवळ घेउनी सकल सैनिकां सत्वरी ।
विवाहदिन पूर्वि तूं रिपुचमूप्रती संहरी ॥
प्रभाव निज दाउनी मम पित्यास शुल्कापरी ।
निशाचरविधी मनीं स्मरुनि तूंच मातें वरीं ॥ ५ ॥
तुझे वधुन बंधु मी तुजसि केविं अंतःपुरीं ।
हरूं ? म्हणसि तूं जरी तुज कथीन युक्ती तरी ॥
कुलीं अमुचिया असे दयित देवियात्रा जिथें–।

नवीन वधु जातसे मज हरी हरीं तूं तिथें ॥ ६ ॥
शिवादि सुर वांछिती तव पदाब्जरेणूस ते ।
तमोपहरणा निजा प्रतिदिनीं स्मरूनी तुतें ॥
प्रसाद न मिळे मला कमलनेत्र आतां जरी ।
शतीं जननिं चिंतुनी तुज मरेन नाहीं तरी ॥ ७ ॥

### उपसंहार.

सुताहुनिहि जी प्रिया नृपति भीमका पुत्रिका ।
वरार्थ लिहि संस्कृतीं हरिस **रुक्मिणीपत्रिका** ॥
तदर्थ उकलूनियां आजि यथामति प्राकृतीं ।
अनंत सुजनांप्रति समुद अर्पितों ही कृती ॥ ८ ॥

दंडी.

---

## १११ राघोबादादा व अहिल्याबाई.

शा. वि.:—हीशीं वैर खरें करीन तर मी पावेन संत्रास तो ।
कांहीं लाभ नसून खेद मजला होईल संप्राप्त तो ।
यासाठीं निघुनी स्वयें निज पुरा जावें असे हें बरें ।
साध्वीला पुसण्यास तो मग निघे माहिष्मतीला[१] त्वरें ॥ १ ॥
तेथें एक कथा बरीच घडली आश्चर्य—युक्ता पहा ।
राघोबा बघुनी तिच्या धनचया लोभिष्ट झालाचि हा ॥
मागे द्रव्य तिला परंतु सतिनें घ्या दक्षिणा बोलुनी ।
आणाया जल धाडिलें, परि नसे तो मान्य लाजे मनीं २
देतों युद्ध म्हणे रघूपति तदा बोले सती त्यास ती ।
आहे सिद्ध करा रणास धन न्या जिंकून मातें अती ॥

---

१ महेश्वराला.

तेव्हां तो लढण्यास सिद्ध बघुनी युक्ती सतीनें नवी ।
योजोनी फशिं पाडिला रघुपती मानेसही वांकवी ॥ ३ ॥
केल्या सज्ज स्त्रिया तिनें जलदिनें त्याशीं लढाया स्वयें ।
बांधी कंबर तो रघूपति रणा-प्रीत्यर्थ भूमीस ये ॥
पाहोनी अबला मनांत दबला तैसाच ओशाळला ।
साध्वीला वदला जसें गमतसे वाटा घनाला चला ॥ ४ ॥

——— गो. ए. गोसावी.

## ११२ काव्य-देवीची प्रार्थना.

शा. वि.:—स्वातंत्र्योपवनस्थ भूपसरसें तीं कोरडीं जाहलीं;
त्यांचीं हृत्कमलें रसाकुल अशीं तीं सर्वथा शोषलीं;
तत्प्रोत्साहन-गंध आजि तुजला मोहावया ना सुटे;
हा! आतां कवि-षट्पदा करिसि तूं गुंजारवातें कुठें? ॥ १ ॥
दुर्दैवें मम यापरी रसिक ते प्राचीन गेले लया;
कोठें नूतन आज जे चमकती ते लुब्ध जीर्णास या;
अर्वाचीन जरी असे कवि महात्स्थित्यंतरा पावले,
दुःखें व्याकुल, पाहिजे न किमपी चित्तांत लोपावले ॥ २ ॥
दुःखें आर्त शरीर होउनि भवच्चक्रांत जे पाडिती;
शत्रूंनीं अभिभूत होउनि मनश्चिंतेंत ओसंडती;
त्या सर्वांसहि दुःखमुक्त करिते जी स्निग्ध काव्यांगना,
आहे आश्रय जों तिचा, भ्रमसि कां? आळीव तीतें मना ॥ ३ ॥

---

१ या कवितेंत स्वतंत्रदशारूप बागेंतील, भोज-श्रीहर्षरूप सरोवरांतील, त्यांचीं हृदरूप कमलें शुष्क झालीं असून त्यांचा प्रोत्साहनुरूप सुगंध अर्वाचान कविरूपी भ्रमरांस चाखावयास मिळत नाहीं, म्हणून दुःख प्रदर्शित केलें आहे. पारतंत्र्यानें वाङ्मयास पाहिजे तसें प्रोत्साहन मिळत नाहीं हा भाव. २ काम-क्रोधादि षड्रिपु ३ पूर्णपणें बुडतात.

जी रम्योपवनीं विलास करिशी तूं कालिदासासवें;
जी शोकें भवभूतिच्यासह वनीं तूं गाळिशी आसवें;
जी दंडीसह तूं सलील धरिसी लालित्य–पद्में करीं;
हो, हो, सत्वरि जागरूक कविता–देवि प्रसादा करीं ॥ ४ ॥
आर्ये, तूं मयुरासवें बहुदिनीं केलीस लीला गडे,
किंवा खेळविलास वामनकवी जो त्वत्करीं सांपडे;
ज्ञानेशासह वेगईवरि सुखें ओव्यांस तूं गाइलें,
तेणें श्रांत शरीर होउनि तुझें निद्रिस्त का जाहलें ? ॥ ५ ॥
वा मुक्तेश्वरसंगतीं सुरपदीं गेलीस गे, भक्तिनें?
किंवा विठ्ठलपाद पूजुनी तुकारामासह प्रीतिनें;
रामाचा जप अंतरांत करितां तूं रामदासासवें-
वा झालीस समाधिसक्त ह्मणुनी जीवित्व ना भासवे. ॥ ६ ॥
आतां नूतन भक्त दीनवदनें हा आळवीतो तुला,
आहे कीर्ति तुझी ' अनन्यहृदया भक्तांस तू वत्सला, '
दे आज्ञा रत व्हावयास मजला त्वत्पाद पद्मांतरीं;
हो, हो, सत्वरि जागरूक कविता देवि, प्रमादा करीं. ॥ ७ ॥
जी तूं जाउनियां पुराण तरुच्या अग्रावरी बैससी,
तूतें आणिन हालवून म्हणतों तेथून या भूमिसीं;
सद्यस्थित्यनुरूप रम्य कुसुमें वेंचोनि विद्वज्जनां
सन्माला इतिहासरूप करणें हीच स्पृहा मन्मना ॥ ८ ॥
हा ! हें काय; दिपावले नयन कां माझे? न कांहीं दिसे?
ऐसें आळवितां, मधेंच कविता–देवीस, झालें कसें ?
नेत्रा चोळित आकुलार्त हृदयें जों राहिलों मी उभा,
आले मंजुल शब्द, कर्ण भरुनी भेदीत गेले नभा. ॥ ९ ॥

वत्सा, तूं श्रम हे करीं, परि न जों अंधत्व गेलें लया,
मिथ्या-धर्म न जोंवरी समजला अज्ञान हिंदूस या,
भेदातें विसरोनि सर्व हृदयें एकत्र झालीं न जों,
तों वायां श्रम हे सदा अवनती तुम्हांस ऐशी सजो. ॥ १० ॥
गेलें तेज लया, अमानुष असा तो शब्द ऐकों न ये-
तेव्हां कांपत राहिलों क्षण उभा त्याच स्थलीं मीं भयें;
माझे कर्णपथांत नाद घुमतो तो नित्य सत्यार्थसा,
चित्तीं बाळगुनी तयास करितों हा यत्न मी अल्पसा. ॥ ११ ॥

——— शं. प. जोशी.

## ११३. एक स्त्री आपल्या बागेंतील वृक्षांस सोडून जातांना त्यांचा निरोप घेते.

मंदा०:—सत्पुष्पांचीं जरिहि मजला भूषणें आवडीचीं,
येते शोभा बहुत कुरळ्या मूर्धजां पल्लवांची;
जाणोनी कीं कुसुम खुडतां त्यामुळें दुःख होतें
नाहीं पुष्पें कधिंहि तुमचीं काढिलीं म्या स्वहस्तें ॥ १ ॥
प्रातःकाळीं प्रथम उठुनी घातलीं रोज न्हाणीं,
प्रेमें तुम्हां प्रतिदिनिं करें पाजिलें गोड पाणी,
वात्सल्यानें कर फिरवुनी नाशिलें कीट—रोगां,
ऐसें मातेपरिस तुमच्या पोषिलें कोमलांगा ॥ २ ॥
मैना, राघू विटपिं बसुनी काढिती कीलराव
त्या ऐकाया मधुर वचना घेतली शीघ्र धाव;
प्रेमाचे मत्समिप न कुणी सांगण्या प्रेमभाव;
तें एकांतीं हितगुज तुम्हां बोललें मी सदैव ॥ ३ ॥
माझे तुम्ही प्रियकर गडे, बाळमित्र प्रसंगीं,

झालां प्रेमें अजवरि मला सौख्य-दुःखीं विभागी,
त्यां सोडाया क्षणभरि, तुम्हां वाटतें दुःख फार;
आलिंगावी विटप-करिं ही भक्तिनें एकवार ॥ ४ ॥
मच्छोकाचा हृदयिं विरहाऽऽवेग हा सावरेना,
येतें ! बाई ! मजसि मनिंचा हुंदका आवरेना;
बालक्रीडा बहुपरि इथें केलि अन्योन्यसंगें,
होतो आतां विरह म्हणुनी दीन आत्मा दुभंगे " ॥ ५ ॥
वात्सल्यानें हृदय भरुनी कंठ दाटून आला,
मुग्धा राहे क्षणभरि उभी त्याच चिंतेंत बाला;
आतां केव्हां पुढति तुमचें दर्शन प्राप्त होय,
या चिंतेनें विकल मन हें, मी करूं यास काय ? ॥ ६ ॥
देवा झालें प्रियकर मला स्थान जें तद्वियोगीं
एकाएकीं अदयपणिं ही लोटिली कां अभागी
कोणापाशीं क्षणिक सहसा संगति प्राप्त झाली
भासे त्याचा विरह न कसा मैत्रिचा भेदकालीं ? " ॥ ७ ॥
केला शोक प्रिय-तरुवर-स्कंध पोटीं धरून,
तो येईना मजसि कविला सांगतां आदरून;
चाखावें जैं जननि-हृदय-प्रीतिला लेंकरानें
बाष्पें, वृक्षा हृदयिं धरुनी, न्हाणियेलें, करानें ॥ ८ ॥
त्यानें तीच्या विटपिं धरिलें उत्तरीयांचलातें;
ना जाऊं दे सुत जननिला दूर, वाटे मला तें.
मोठ्या कष्टें परि पदर त्यापासुनी सोडवीला,
उत्कंठेनें विकल-हृदया जाहली दूर बाला. ॥ ९ ॥
पाही मागें मुरडुनि, पुढें टाकिते ती पदातें,

शोकावेगें दिसत नव्हतें तीजला दीपदाते,
तेणें होते पडत विषम, प्रीतिनें अंध पाद;
पावे ऐसा विरहसमयीं वत्सला ती विषाद ॥ १० ॥

शं. प. जोशी.

———

## ११४ चंडोलास उद्देशून.

व. ति.—चंडोल उंच गगनांत उडोनि जाई ।
तत्स्वागतार्थ अति मंजुल गीत गाई ।
तो मंडलें भ्रमुनि घेत नभास जोडी ।
गीत प्रवाह धरणीवरि रम्य धाडी ॥ ४ ॥
चंडोल, काय तुजलाच तदागमानें ।
होवोनि हर्ष म्हणसी श्रवणीय गाणें ।
झालें अम्हासहि तुझेसम सौख्य मोठें ।
उड्डाण ये न म्हणुनी बहु खेद वाटे ॥ ८ ॥
जासी वरी वरि नभांतरिं उंच फार ।
गीत प्रवाह तव ऐकुनि लोक गार ।
कीं भानुचा दिससि रे, मज लाडका तूं ।
दैवें अतर्क्य महिमा दिधला परंतू ॥ १२ ॥
त्यातें स्वयेंचि उपभोगुनि, अन्य लोकां ।
मानूनि, तुच्छ वरि जासि अमर्त्यलोका ।
श्रेष्ठ प्रभाव परि जाणसि ना कवींचे ।
जे पंख लावुनि तुझ्यापरि कल्पनेचे ॥ १६ ॥
जाती विशाल गगनांत तुझे- पुढेंही ।
त्याचे पुढें स्वमद- दर्शन योग्य नाहीं ।

---

१सूर्याचे.

स्वर्गीं न मात्र, परि सृष्ट पदार्थ जेथें ।
जाऊं शके न, कविंची गति होय तेथें ॥ २० ॥
निर्जीव वस्तुस करूनि सजीव, त्यातें ।
अस्तित्व देति, मुखिं बोलविती तयातें ।
जे गोड बोल बलवंत्[2] परिसोनि कानीं ।
न्हाती शिलोच्चयहि आकुल आसवांनीं ॥ २४ ॥
वज्रास अंतर असेल तरी तयास ।
ते शब्द भेदातिल ना पडता प्रयास ॥ २६ ॥

**शं. प. जोशी.**

---

## ११९ खरा मित्र.

श्लोकः—आपत्कालीं पडुनि वदना दीन मी फार केलें
साह्याला ते मम विनवितां मित्र तैं दूर गेले
त्यांची मैत्री शिथिल पडली अल्प कालांत फार
दारिद्र्यानें जनिं घडतसे नित्य हाच प्रकार ॥ १ ॥
आहे माझा खचित बरवा मित्र ऐसा मदंगीं
ताराया जो मजसि झटला घोर आल्या प्रसंगीं
बांधावें कीं सदन पुलिनीं तेवि विश्वास लोकीं
श्रद्धेनें मी अजि विभुवरा सव्यहस्ता विलोकीं ॥ २ ॥
आला मातें उलट विधिच्या कालिं अत्यंत धीर
होतें जैसें स्वबल झटला हस्त हा शूर वीर
चिंतेच्या त्या मज बहु तयें रक्षिलें संगरांत
वस्त्रान्नातें मुळिं न पडुं दे वाण आतां घरांत ॥ ३ ॥

---

२ हें बोलांचें विशेषण – परिणाम करणारे.

आले माझ्या जवळ फिरुनी लोपले मित्र सारे
तन्मैत्रीचा रवि उगवला, सूटलें प्रेम वारें
नाहीं त्यांची गरज तितुकी फार जी तन्मनांत
आभारी मी तव बहु असें सव्यहस्ता जनांत ॥ ४ ॥

सुमंत.

११६ संक्रांतीची भेट.

श्लोकः—असति तव करांत श्रेष्ठ हीं पंचभूतें
वसुनि जगतिं देवा हांकिसी सर्व तूं तें
तुजसि विनवितों मी सारथी हो कृपेनें
गति कवनरथा या माझिया दे जपें ने ॥ १ ॥
मित्राच्या मी गृहिं तुज पिका पाहिलें जैं गताब्दीं
झाला मातें हरिख किति तैं बोलुं तो काय शब्दीं ॥
द्याया तूतें तइंच सुतिलां खास येणार होतों
माझा पाहीं विफल परितो सर्वही हेतु हो तो ॥ २ ॥
आला गांवीं आमुच्या प्लेग दुष्ट
मारूं लागे फार तो दुष्ट सुष्ट
गेलों रानीं सोडुनी दूर गांव
तेथेंही तो घालि बा क्रूर घाव ॥ ३ ॥
आधीं मातुल मारिला मजवरी माया जयाची अती
सौख्याची मग साउली हरपली मन्माउली ती सती
नेला नंतर तात हाल करुनी प्रेमोदधी आगळा
दुःखाचा वदुं काय हाय! दिन तो दाटून आला गळा ॥ ४ ॥
दुःखी असा मी गतवर्षि झालों
द्याया तिला तैं तुज नाहिं आलों

आतां तसें दुःख मला न कांहीं
राजाश्रयीं मी प्रभुची कृपा ही ॥ ५ ॥
ईशास वंदुनि तिलार्पण आधि केलें
शाहू नृपास मग पात्र भरून नेलें
झाली तिथें मज तुझी स्मृति पक्षिराया
आलों त्वरें तुज तिळा वितरावयाया ॥ ६ ॥
असे करविराहुनी बहुत दूर मुंबापुरी
तरी कवनरूप हा सुरथ जोडिला सत्वरी
वरी कुशल सारथी प्रभु बसोनि हांकी हय
क्षणांत मज पोंचवी मम रथांत लागे लय ॥ ७ ॥
घेतली तुझी भेट या परी, जाहला मला हर्ष अंतरीं
मत्तिळां तरी घे पिका करीं, सेवुनी वदे गोड वैखरी ॥ ८ ॥
असति कंटक तिळांवरि या जरी
मधुरता वसते बहु अंतरीं
सुचविती खरता विलसो वरी
मधुरता विलसो हृदयांतरीं ॥ ९ ॥
असो, या तिळां सर्व मित्रांस ओप
मला जावया सत्वरी दे निरोप
तुझ्या संगतीनें फिराया द्विजार्य
नसे वेळ मातें असे स्वामिकार्य ॥ १० ॥

सुमंत.

## ११७ इंदिरा व चंद्रकेतू.

[ पुढील उतारा इंदिरा काव्यांतील आहे. इंदिरा व चंद्रकेतू यांचें लग्न लहानपणींच ठरलें होतें. इंदिरा उपवर झाल्यावर तिणें विवाह करण्याचें नाका-

रिलें. स्त्रीजातीस स्वातंत्र्य देण्याचे इच्छेनें तिनें एक कॉलेज काढिलें. त्या कालेजांत स्त्रियांचाच प्रवेश होत असे. तेथें चंद्रकेतु स्त्रीरूप घेऊन गेला पुढें कांहीं काळानें चंद्रकेतूचें कपट उघडकीस आलें त्यानें एका प्रसंगीं इंदिरेचा प्राण वांचविला व तिजसाठीं द्वंद्व युद्ध केलें. युद्धांत जखमा लागून आजारी असतां इंदिरा त्याची शुश्रूषा करीत असे; तेव्हां तिचें मन विवाहास प्रवृत्त करण्याचा तो प्रयत्न करीत आहे. ]

शिख०:—अगे साध्वी ऐकें तुजशि वरुनी मुक्त करिन।
तुझ्या स्वातंत्र्यातें कधिंहि न विवाहीं बुडविन ॥
नरांची गे बाधा तुज न कधिं होईल अणु ती।
घजे स्त्री गांजाया कवण नर घेईन झडती ॥ १ ॥
स्त्रियांच्या दास्याचें करिन निज यत्नांनिं हरण।
तुझ्या गे आनंदें करिन कृतिचें मी प्रसरण ॥
तुझ्या-सांगातें मी झटुनि अवघ्या योग्य पुरुषां।
तुझ्या सत्कार्यार्थ भ्रमविन सहाय्या दशदिशां ॥ २ ॥
नको एकाकी तूं श्रम परि करूं या दृढपणें।
जगाच्या हालांचा तिळहि तुज ना स्पर्श घडणें ॥
तुझ्या सौख्यालागीं जगिं जंव जगें, लाविन मन।
तुझ्या साह्या सारें करिन तुझिया आधिन धन ॥ ३ ॥
साकी—दोघांठायीं असे योग्यता आपण थोर कुळींची.।
दोघें संगति स्त्रीची सुधरूं स्थिति, दे तव कर याचीं ॥
चढवूं उच्च पदा। असती ज्या सुखदा ॥ ४ ॥
दिव्या—कशासाठीं स्त्री नरा ऐशि व्हावी।
तिणें कां गे नरकृती आचरावी ॥
पुरुष-साम्यार्ती कां मनीं वहावी।
नरांची गे कृति नरांनीं करावी ॥ ५ ॥

पुरुषनारी हीं आपुलिया देहीं ।
तनमनाच्या घटनेंत भिन्न पाहीं ॥
पिंड पुरुषांचा असे निर्मियेला ।
शौर्यधैर्याला बळा दाविण्याला ॥ ६ ॥
स्त्रियेनें गे पति गृहीं राहुनीयां ।
सिद्ध व्हावें गृहकार्य तें कराया ॥
प्रेम जागवुनी नरां सौख्य द्यावें ।
नरां ना तरि गे कुठें सौख्य व्हावें ॥ ७ ॥

पृथ्वी—परस्पर जयीं द्वयें निजसमागमें स्त्रीनर ।
बघोन गुणदोष तीं करितिल स्वरूपांतर ॥
स्त्रिया प्रबल अंशतः नर मनीं तसे कोमळ ।
तयेच समयीं जगीं सफल आयु तें होइल ॥ ८ ॥

आर्या—विद्या संपादावी परि गृहकृत्याप्रती न त्यागावें ।
संसारीं निजभर्त्या सुख संतत होइ तेविं वागावें ॥ ९ ॥
वाढवुनी निजबालां बालांसम शुद्धचित्त राखावें ।
ऐसा परमेशाचा आहे संकेत पूर्ण समजावें ॥ १० ॥

पृथ्वी—प्रसंग मग येइ कीं पुरुष सर्व तैशा स्त्रिया ।
मनें करुनि मोकळीं सुख परस्परां द्यावया ॥
प्रयत्न करिती जयीं विषमता नुरे लेशही ।
स्वतंत्र परि ऐक्य तीं करुनि शोभवीती मही ॥ ११ ॥

दिंड्या—होइ जगताचा तयीं समुत्कर्ष ।
दुर्भावाचा होणार नाहिं स्पर्श ॥

औतें भुवनीं उपजेल योग्य काळीं ।
मनुज—जाती संपूर्ण भाग्यशाली ॥ १२ ॥

का. र. कीर्तीकर.

---

## ११८ निजाम व रावबाजीची भेट.

अनु०:—औरंगाबादनगरा-समीप ग्राम हा असे ।
तेथें प्रधान तो बाजी निजसैन्यासवें वसे ॥ १ ॥
बाजीराव असे मंत्री वीर सुंदर जित्वर ।
निजामांतःपुरीं ऐसा कळे वृत्तांत सत्वर ॥ २ ॥
झाल्या उताविळ्या नारी बाजीरावा पहावया ।
निजामातें प्रार्थिती त्या भेटीसाठीं बहावया ॥ ३ ॥
दुष्यंत भेटिचा योग आणी मोगल उत्सुक ।
पाहे जवनिकांतस्थ-यवनीजन कौतुक ॥ ४ ॥
सर्वे सेवक दोघेच निघे घेउनि यावया ।
बाजीराव करी वेष शोभेसा त्याचिया वया ॥ ५ ॥
पदीं जोडा करीं खड्ग शिरीं फेटा मुखीं विडा ।
स्त्रिया म्हणति पाहोनी टळो याची इडा पिडा ॥ ६ ॥
लोडा लागोनि बसतां राजे ते द्युतिमत्तर ।
गमे लोड धरा दोघे ध्रुव दक्षिण उत्तर ॥ ७ ॥
अन्योन्य कुशल प्रश्नोत्तरें ऐकति बायका ।
पुसे निजाम बाजीतें अति अद्भुत आयका ॥ ८ ॥
" बाजीराव तुम्ही भोळे आलां हें काय एकटे ।
आतां येथुनि सुटका कराया कोण हो झटे ? ॥ ९ ॥

कोठें होळकर ख्यात आहे शिंदाहि संप्रती " ।
रावबाजी महामंत्री वदे त्या यवनाप्रती ॥ १० ॥
" जेथें मी सर्वही तेथें नव्हे अनृत हें कदां ।
हा होळकर हा शिंदा विलोका नीट एकदां " ॥ ११ ॥
ऐसें वदोनि तें दावी जें सवें सेवकद्वय ।
चित्तीं चकीत तेव्हां तो करी मोंगल विस्मय ॥ १२ ॥
ते गुप्तरूप हुजरे मुजरे करिती तदा ।
वदे मोंगल संतुष्ट बाजीचा जय सर्वदा ॥ १३ ॥

श्री. गणपतराव पटवर्धन.

---

## ११९ पतिव्रतामाहात्म्य.

पति दैवत मुख्य सती जाणुनि जी धरिल भक्ति दृढ त्याची
धाक तिचा कळिकाळा कोण उपेक्षा करील मग तीची ॥ १ ॥
अर्ची हृदयीं साध्वी प्रेमभरानें उपास्य दैवत तें
तत्पदिं लीन सदा ती इतर सुखासी रमे न हो मन तें. ॥ २॥
पातिव्रत्याची हो करुं न शके योगिही गमे समता-
गेल्या होउनि साध्वी गाते अद्यापि कीर्तिला जनता ॥ ३ ॥
धन्य सती सावित्री अघ दग्धाचि होय नाम आठवितां- ॥
दृढ निश्चयासि धरुनी गेली उतरोनि पार भवसरिता ॥ ४ ॥
जी नृपकुलांत पावुनि जन्म बहू भोगिले विलास जिनें.
वरिला कांत अकिंचन खडतर वनवास स्वीकरोनि तिनें ॥ ५ ॥
अल्पायु जरी कळलें मग पूर्वींच योजि जो मनीं कांत- ॥
फिरवी न वचन धीरें जाणुनि निज शक्ति राहिली शांत ॥ ६ ॥

निष्कपट मानसें जो प्रीतीनें एकदांचि वर वरिला
आयुष्यहीन निर्धन जरि होता तरि मनास मानवला ॥ ७ ॥
श्रीहीन अंध सासू श्वशुर खरे परि कधीं न अवमानी.
मानूनि वंद्य वचना सेवि तयां एकनिष्ठ दिनरजनी ॥ ८ ॥
राहे नमुनी कांता बोलुनि मधु वचन सर्वदा रमवी
गमवी न एक पलही चंदनसम देह कांत-पदिं झिजवी ॥ ९ ॥
आला कृतांत हरण्या तत्सौभाग्या बळेंचि तस्कर तो. ॥
बहु आर्जवें मृदुरवें आकळिला शब्दपाशीं दृढ यम तो- ॥ १० ॥
अंधासि नयन तैसे तनय तया राज्य पुत्र निज ताता- ॥
व्हावे पराक्रमी मज पुत्र गुणी विनवि हेंचि सुर-नाथा- ॥ ११ ॥
न कळोनि गर्भितार्थी शब्दांच्या तो प्रसन्न होवोनी ॥
गुंतोनि येथ गेला बोले तोषें 'तथास्तु' डोलोनी ॥ १२ ॥
खलसुजनांतकही जो यम निष्ठुर तन्मनासि वेधुनि घे ॥
चुकवोनि नाथमृत्यू उभय कुलांच्या हितासि साधुनि घे ॥ १३ ॥
ख्याती त्रिजगीं झाली वाढविलें महतिला तिच्या धर्मे ॥
गुणवेत्त्यांविण गुण नच कळती हीं सुज्ञ जाणती मर्मे ॥ १४ ॥
तावुनि सुवर्ण घेती धर्में तैसेंच देखिलें सत्व ॥
छळकाविण साधूंचें होत न हें उमगली सती तत्व ॥ १५ ॥
द्यूतीं नेम करोनी झटति परस्पर पणासि जिंकाया
हटवाया प्रतिपक्षा तैसाची सत्यवंत या समया ॥ १६ ॥
करुनि निमित्याचे धर्में चोजें लटिकेंचि युद्ध माजविलें
पातिव्रत्यसमुद्भव बळ साध्वीनें जगासि दाखविलें ॥ १७ ॥
पतिभक्ति शुद्ध सतिची शक्तीरूपेंचि साह्य तिज झाली-
सोडवि पतिला अंगें काळमुखांतुनि न अल्प कृति केली ॥ १८ ॥

गाजविलें नाम जगीं भूषण चिरकाल जाहली महिला !
पद वंदिति नर सुरही झाली ती पूज्य धन्य हो महिला १९ ॥
भूगोल कीर्तिभेरीनादें अद्यापि सर्व दणदणतो ।
गुंगे स्त्रीजनकर्णी, निज कर्तव्या झटा, सदा म्हणतो ॥ २० ॥
झाली जगती अखिला साध्वीसमुहांत श्रेष्ठ जी युवती ।
गाता चरित्र तीचें देईल निःशंक थोर ते सुगती ॥ २१ ॥
गाउनि चरित्र घ्यावे गूण तयांतिल पवित्र जे थोर ।
मम सर्व भगिनि सूज्ञचि नलगे हें सांगणेंचि मी पोर ॥ २२ ॥
पय जलमिश्रित देतां घेतो एक्या दुधासि कलहंस ।
घ्या तैशा ह्या आर्यांवरूनी सद्गुण त्यजोनि दोषांस ॥ २३ ॥

सत्यभामा.

---

## १२० दसरा.

आली आश्विन शुद्धपक्षदशमी विख्यात मोठा सण
नामें हा दसरा समस्त करिती देवीस पूजार्पण
पक्वान्नें विविधें करोनि जन हे संभोजना ब्राह्मणा
देवोनी नवरात्र पूर्ण करिती होई महापारणा ॥ १ ॥
घालोनी किनखापिच्या सुविमला झूली गजांच्या वरी
श्रृंगारूनि समस्त अश्व करिती पूजा गृहाभीतरीं
शस्त्रें मांडुनि पूजिती दफतरें लेती नवीं भूषणें
वस्त्रें, थोर, गरीब सर्व दिनहीं नेताति संतोषणें ॥ २ ॥
वाजंत्रे वाजताती सुमधुर सनया सूर , कर्णे, तुतारे,
भोंभारे, नौबताही धुमधुम धुमधूं वाजताती नगारे

घंटांचे शब्द होती घणण, कडकडा वाजवीताति तासे
जाणों गंभीर मेघध्वनि गडगड हा अंतरिक्षांत भासे ॥ ३ ॥
जाती लोक शिलंगणास अवघे स्वारी नृपाची निघे
हस्ती, अश्व, तसेच उष्ट्र, रथही गर्दी, न मुंगी रिघे
अंबाऱ्या, शिबिका, शतावधि तसे म्याने, सहस्त्रावधी
घोडेस्वार तसेंच पायदळही जाणों असे नीरधी ॥ ४ ॥
धूंधूंधूं सुटती क्षणोक्षण बहू तोफा, उठे धूमही
वाटे, अंबर मेघपूर्णचि, भरे कोलाहलानें मही
पट्टे खेळति, दांडकेहि, टकरा हत्तीचिया लाविती
वेगानें बहु मंडलें धरुनियां अश्वांसही पीटती ॥ ५ ॥
कोणी एक सफेत लोक करिती पोषाक' कांहीं जन
घेवोनी हिरवाच, एक पिंवळा लेती, मनोरंजन
अस्मानी कितिएकही, भरजरी शाली दुपट्टे महा
भूमी चित्रपटासमान नयनानंदप्रदा ही पहा ॥ ६ ॥

घेवोनियां पटकुरें उडवीत खांदा
आला तयांत भट, जेंवि फुलांत कांदा
अश्मंतपूजन करा, जय हो तुम्हांला
द्या दक्षणा म्हणतसे, जनहो अम्हांला ॥ ७ ॥
बोले तयास भट अन्य, कशास आला
येथें तुम्ही अमुचिया धरिल्या स्थळाला
आम्ही अनादि अपट्यावरि राहणारे
आलास तूं अजि नवा बहु शाहणा रे ॥ ८ ॥
तूं राहणार अपट्यावरिचा अनादी
कीं पिंपळावरिल ऐस, वितंडवादी

माझा अजा, जनक, मीहि करीत आलों
येथील वृत्ति न कधीं कवणास भ्यालों ॥ ९ ॥
ऐसे विवाद करिती भट एकमेक
अश्मंत पूजिति, शमीहि समस्त लोक
येती शिलंगण करूनि घरास जेव्हां
ओवाळितात रमणी सकळांस तेव्हां ॥ १० ॥

**कृ. शा. राजवाडे**

---

## १२१ ईशस्तवन.

प्रभो प्रणतवत्सला बहुत पातकी दीन मी
निराश्रित आजाणता तुज सदैव चित्तीं नमीं
चुकें तर पदोपदीं पण न भीं नसें घाबरा
क्षमाच करिशील तूं भरंवसा मला हा बरा ॥ १ ॥
अगाध महिमा तुझा बुधहि गावया नेणती
यथामति वदावया मजचि लाज ती कोणती
पिईन परमेश्वरा विमलकीर्तिगानामृता
भिईन न कदापि भो मग पुढें जित्या वा मृता ॥ २ ॥
सुखास्तवच आमच्या अति अपूर्व केली धरा
कमी किमपिही नसे जिजमधें यशःश्रीधरा
प्रशस्त पडली सुखा विपुल देत आम्हांस ती
धरून हृदयीं जशी प्रियकरा स्वबालां सती ॥ ३
तिच्यांत अति सुंदर प्रभु मणी बहू शोभती
सुवर्णरजतादि ते सकळ धातुही लाभती

असोत पण ते सदा उदक अन्न ती देतसे
अपार उपकार हा नच तिचा तुझा होतसे ॥ ४ ॥
असंख्य दिसती नभीं रुचिर गोल जे प्रत्यहीं
तुझें यश कथावया उदित दैवतें सत्य हीं
दिलीस गति ज्यांस जी सतत तीच संभाळिती
सुबोध करण्यास त्यां स्वनियमां न जे पाळिती ॥ ५ ॥
तुझी कृति दिसावया रवि तमास उच्छेदितो
स्वकीय किरणामृतें सकल विश्व आल्हादितो
अशेष तरु जीव यां भयद शीत तें नाशितो
तुझ्या प्रभु कृपेमुळें सतत त्यांस तो पोशितो ॥ ६ ॥
शशी विमल-कांति जो गगनमंडला भूपितो
अदृश्य असतां रवी पथिक यांस संतोषितो
पहा प्रतिदिनीं कसा क्षयविवर्धना भोगतो
प्रभो तुजविना नसे किमपि नित्य हें सांगतो ॥ ७ ॥
समुद्र सरिता गिरी तरु जिवांस तूं निर्मिलें
विचित्र रचना तुझी बुधहि वर्णितां शर्मिले
अनादि सकलज्ञ जो मुदित नित्य त्या मी नमीं
असो प्रभु दयार्णवीं पतित एक हा मीन मी ॥ ८ ॥

भा. दा. पाळंदे.

---

## १२२ प्रीती निमाली तर.

नादें मंजुळ आपल्या रिझविते जी मन्मना नेहमीं
ती एका निमिषांत रम्य मुरली भंगून टाकीन मी

अंगातें जडवून पंख उसने जाईन कीं सत्वर
मी येथून उडून उंच गगनीं, प्रीती निमाली तर ॥ १ ॥
माझी कोण करील उत्सुक मनें म १ प्रतिक्षा घरीं
प्रेमें बालक कोण सुंदर वदा, देईल माझ्या करीं
आतां भासतसे मला भवन जें सर्वस्व चेतोहर
त्या देईल खरोखरीच वनता, प्रीती निमाली तर ॥ २ ॥
काव्याला अनुरूपसा विषय तो कोठून राहे जनीं
स्फूर्तीच्या उठतील नित्य लहरी कैशा कवीच्या मनीं
वाहावी कवणास काव्यसुमनें त्यानें वदा भूवर
कोठूनी जगतीं उरे रसिकता, प्रीती निमाली तर ॥ ३ ॥
अस्ता जाइल सूर्यतेज वितरी विश्वास जें जीवन
तेणें व्याप्त समस्त होइल जगत् दुःखांधकारें घन
सौख्याचा लवलेशाही न मनुजा लाभेल हो दुर्धर
भीतीनें मरतील मानवकुलें, प्रीती निमाली तर ॥ ४ ॥

काव्यरत्नावलि, वर्ष ११ वें अंक १ला.

---

## १२३ सवाई माधवरावांचा मृत्यू.

नारायणसुत माधव रघुनाथसुतावरी करी समता
नानांस आवडेना त्याशीं जी पेशवा धरी ममता ॥ १ ॥
तुमचा पिता वधियला त्याचा सुत बाजि हा लहान खरा
उतरील आमुचाचि न तुमचाही हो पहाल हा नखरा ॥ २ ॥
सुंदर दिसे परि न त्या हस्तीं घेती कधीं न नागातें
सहवास दुर्जनाशीं करुनि सुखी होइ कोण सांगा तें ॥ ३ ॥

---

१ पराक्रम, तेज, वर्चस्व.

जरि पथ्य तथ्य वच कटु भासे रावांस खेद बहु जाला
बाजीविषयीं प्रेमा अधिकचि वाढे परंतु न बुजाला ॥ ४ ॥
धाडी निरोप बाजी तुम्ही आम्ही समान बंदींत
आहें शिवनेरीला वाड्यांत तुम्ही अहां अखंडीत ॥ ५ ॥
अनिवार दुःख झालें आलें विपरीत मानसीं कांहीं
लिहिलें असे विधीनें जें जें होणार तें चुकत नाहीं ॥ ६ ॥
कारंज्यावरि पडले तिसऱ्या मजल्यावरूनि चौकांत
नाना धांवत आले पसरे हें वृत्त सर्व लोकांत ॥ ७ ॥
शीतकरें तर्पाया भूलोक नभस्थ चंद्रमा वळेला
तेव्हां त्यजूनि सकलां आप्तजनां भूसुरेंद्र मावळेला ॥ ८ ॥
शोकसमुद्रीं बुडवी सकल मराठ्यांस मृत्यु रावांचा
नानांस दुःख झालें वदण्याला तें अशक्त ही वाचा ॥ ९ ॥

**का. शि. मुळ्ये.**

---

## १२४ मूर्खांचीं लक्षणें.

आर्याः—शक्ती असोनि न करी उद्योगा, व्यर्थ काळ जो गमवी
दोषां लपवुनि खोटी, विद्वज्जनिं कीर्ति आपुली मिरवी ॥ १ ॥
विश्वास पूर्ण ठेवी, वेश्येच्या भाषणावरी नित्य
ढोंगाविषयीं आहे, अनुभव मज सांगतो असें सत्य ॥ २ ॥
द्यूतापासुनि अपणा मिळवावें, वाटतें जया वित्त
करि शत्रु घात अपुला, परि तिकडे देइना कधीं चित्त ॥ ३ ॥
आहे मतिमंद जरी करिन महत्कार्य जो ह्मणे स्वमनीं
द्रव्यार्जनदक्ष असे, परि वागे नीतिच्या विरुद्ध जनीं ॥ ४ ॥

---

२ आशा, उगवला. ३ मनुष्यश्रेष्ठ स. माधवराव. ४ लोपला, नष्ट झाला ५ माधवाचा.

ऋण काढुन दुसऱ्याचें, तत्द्रव्यें घेत भूमि-सदनाऽदि
झाला वृद्ध जरी तरि, लागे पाणिग्रहाचिया नादीं ॥ ५ ॥
निर्भय सुज्ञ जनांमधि, अश्रुतशा ग्रंथवर्णनास करी
जी वस्तु दृष्टिगोचर, नाहिंच ती म्हणुनि आग्रहास धरी ॥ ६॥

धुंडिराज गणेश बापट.

## १२९ कवीची कविता.

दिंडी:—जसे पक्षी येतात वसंतांत,
कुठोनीयां ठाऊक ती न मात;
जशा येती तारका अंतरालीं
प्रदोषीं त्या घन-नील गगन—भालीं; ॥ १ ॥
ढगांतूनी पर्जन्य पडे नीट,
झरा अथवा फोडून धरा-पीठ;
व्योम-शून्यांतूनियां निघे नाद
स्मान भारी वा नसे ज्यास पाद; ॥ २ ॥
सुरभि जैशी झाडांस फुलें ताजीं,
फळें अथवा येतात मधुरशीं जीं
अनिल येई, डोलवी वृक्ष-राजी,
उदधि भरती येऊन गगन मोजी; ॥ ३ ॥
क्षितिज-लग्ना हो दृष्ट जेविं नौका
जलधि-रंगीं, आनंद जैं अनेकां;
जसा क्षोभें वा फेन जलीं थाटे,
रुचिर ओठीं वा मधुर हास्य लोटे; ॥ ४ ॥

कवन तेवीं तें घेत कवी-भेट
उगम ज्याचा अज्ञात-मंडलांत;
असे त्याचें तें, नसे तेविं गीत;
स्तुती–कीर्तीची होय तशी वाट. ॥ ५ ॥
सृष्टि-देवीचे शब्द गुंजतात
दिवस रजनीं कर्णांत जे नितांत
कवीच्या, तैं होऊन चिंतनांत
मग्न, आज्ञाधर काव्य-लेखनांत! ॥ ६ ॥

" मणिमंजूषा "

अ. सि. साठे.
नी. व. भवाळकर.

---

## १२३. भक्ति.

दयालु परमेश्वरा! तव मुखा न पाहों जरी।
तुलाच कवटाळितों धरुनि भाव चेतोंतरी॥
प्रमाण न चले जयीं नच सुयुक्ति लाभे फला।
नसेहि बरवा तयीं हृदयिं भाव तो एकला! ॥ १ ॥
तुवां स्रजियले पहा विलसती नभीं गोल हे
पशूंसि मनुजांसिही असु दिले तुवां शवहें॥
तुवांचि परि निर्मिला, सकल लोक ज्याला भितो-।
त्वदीय कृति भक्षितो, प्रिय कसा तुला काल तो ॥ २ ॥
जरीहि वधिसी नरा, नच तया रजीं लोळवीं ॥
विनिर्मित कशास तो, न कळतें मुखें बोलवीं ॥
रजांत नच लोळण्या जनि तया दिली सत्य ती —।

त्वदीय कृति तो, कसे बुध तुझ्या नया शकिती ॥ ३ ॥
परात्पर पवित्र तूं असुनिही मनुष्यावरी
पया प्रकट दाविसी तव कशी वदावी परी ॥
असे सकल इंद्रियांवरिहि शक्ति ती आमुची।
"कशी?" न कळतें जरी तव गुणी रतो सत्यची ॥ ४ ॥
वसे नियत काल हें क्षणिक आमुचें जीवित।
पळे अवधि संपतां, क्षण न लागतां हें द्रुत ॥
प्रकीर्ण करटे तुझे सकल जीव हे वाटती।
जिथूनि निघती तिथें फिरुनि येउनी मीळती ॥ ५ ॥
धरूं हृदयिं भावची नच कळे खरें ज्ञान तें!
अदृश्य कळतें कसें? मन म्हणूनि विश्वासतें॥
गमे करहि एक तो तिमिर दाटतां पातला।
भविष्यदुदयें तुवां अरुण कीं पुढें घातला ॥ ६ ॥
दिनानुदिनही पत्रो अतुल वृद्धि सज्ञानता।
तिच्यापरिस भक्तिही हृदयिं ईश—पादीं नता।
घडो सतत योग हा बुधमनीं वसो पूज्यधी—॥
प्रबुद्ध नर हो जसा सुदृढ भक्ति होवो सुधी ॥ ७ ॥
विमूढ अणुमात्रसे तव निदेश मानूंच ना—।
नसे भयहि जोंवरी तव पदा स्मरे कोण ना ॥
सहेंच अपराध हे विनटतोंच एका पिसें—।
सुतेज तव साहवे न नयनां असूं अंधसे ॥ ८ ॥
सहें मदपराध तूं गुणहि जे मला वाटती-।
न ते गुण तुझ्यापुढें सुगुणता तयांची किती- ॥

समाजगत मानवां गुण सुखेंच वाटोत ते
करो नर परस्परस्तुति न पावतो योग्यते ॥ ९ ॥

——— त्रिं० मो० महाजनी.

## १२७ मंथरा कैकेयीचें मन वळविते.

आर्याः—तुज संतुष्ट कराया राजा बहुगोड भाषणा करितो ।
कामुक अतथ्यवादी केवळ वाचें मना तुझ्या हरितो ॥ १ ॥
रामाच्या मातेच्या कार्या करितो सपुष्कला गे हा ।
मनिं हेंच धरुन सानुज मामाच्या भरत धाडिला गेहा ॥ २ ॥
होईल सुमित्रेचें बरवें संशय नसे स्वसुखपर्व ।
रामानुग जो होतो लक्ष्मण अनुभविल राज्य तें सर्व ॥ ३ ॥
शोभेल भरत केवळ किंकर तो राघवापुढें जाण ।
नगराहून विवासित अथवा होईल हो गतप्राण ॥ ४ ॥
तूं कौसल्या दासी-परि सेवीशील हें असो स्मरण ।
वाटे श्रेय सपत्नी-पासूनि पराभवापरिस मरण ॥ ५ ॥
करिं यत्न आजि वेगें तवराज्यश्रीशिं भरत वत्स रतो ।
वनवास आदरावा रामें नव आणि पंच वत्सर तो ॥ ६ ॥
तस्माद्राज्ञि तव तनय होइल निःशंक अभयिं तो रूढ ।
करितें कथन तुला तो पूर्वसुनिश्चित उपाय जो गूढ ॥ ७ ॥
पूर्वि सुरासुरयुद्धीं सत्यपराक्रम नृपाल दशरथ हो ।
साहाय्यास्तव धन्वी इंद्र प्रार्थि स्वयें महारथ हो ॥ ८ ॥
महती सेना घेउन तुझियासंगें शुभानने गेला ।
त्या कालिं राक्षसांच्या संगें युद्धप्रसंग गे केला ॥ ९ ॥
तंव अक्षकील पडला होऊनी छिन्न परि नृपा न कळे ।

तूं कीलरंध्रिं योजुन कर तिष्ठसि पतिहितार्थ धैर्य बळें ॥ १०॥
असुरा वधुनि अरिंदम वेगें तुजलागिं पाहतां झाला ।
आलिंगन आश्चर्यें तुज देउन हर्ष थोर हो जाला ॥ ११ ॥
मागें गे भूप वदे वांछित वर दोन तूस देईन ।
वदलीस तूं पतीतें वर अवसर पाहुनीच घेईन ॥ १२ ॥
रावें तथेति बोलुन तुजलागीं मंदिरास पाठविलें ।
इति पूर्वी त्वांच मला कथिलें हो तेंच आज आठवलें ॥ १३॥
शयन करीं भूमीवर कोपें टाकून सर्व आभरणें ।
तव पति अभीष्ट यावत् करि तावत् या दुराग्रहा धरणें ॥ १४॥
वदतां असें त्रिवक्रा कैकेयी वरुनि बुद्धिविभ्रम ती ।
दुःसंगें मानि खरें बोले तव कोठुनी अशी हि मती ॥ १५ ॥
मम वक्रसुंदरि जरी पावे प्रियपुत्र भरत राजपदा ।
ग्रामशता देइन तुज संशय याचा प्रिये न मान कदा ॥ १६ ॥
इति वदुन कोपभवनीं शिरुनी सहसा अतीव रागावे ।
मलिना भूमीवरती लोळे आश्चर्य काय सांगावें ॥ १७ ॥
शयन करिन मी यावत् जाय श्रीरामजी वनाला गे ।
जाई न तरी कुब्जे हानि असें मान जीवना लागे ॥ १८ ॥
निश्चय केल्या निकरीं होइल कल्याण अर्थ मन गे हा ।
ऐसें बोलुन कुब्जा कैकेयीतें करी गमन गेहा ॥ १९ ॥
धीर नयज्ञ दयान्वित विवेकवान् नर जरी सदाचार ।
दुष्टाच्या संगतिनें पावे तत्साम्य तो हि साचार ॥ १९ ॥
तस्मात्संग धरोनी दुष्टांचा सर्वथैव कामा न ।
दुःसंगी स्वार्थ बुडवि जेवीं ही राजकन्यका मान ॥ २० ॥

आ० मो० छत्रे.

## १२८ स्मशानशांतता.

दिंडीः—उग्र भेसुर हे उंच शैल नाना।
सौम्यतेनें बघतात शवस्थाना ॥
निश्चलत्वातें अखिल पवन सेवी।
महासागरगांभीर्य असे जेंवीं ॥ १ ॥
परी याहुनिहीं थोर शांततेंत।
स्वस्थ ऐक्यें असतात समाधींत ॥
स्मशानाच्या अति लांब अंगणीं या।
येइ जेथें जणुं शांतता रमाया ॥ २ ॥
चंद्रसूर्याची गरज तिला नाहीं।
दुःखशोकाचें अशुभ तिला नाहीं ॥
अंतकाची तिज भीति मुळी नाहीं।
मनोव्याधी कसलीहि तिला नाहीं ॥ ३ ॥

—— प०ग० भांडारे.

## १२९ सुजनता असो मोहिनी परी.

( श्री. चिमाजी आपानीं वसई सर करण्याचे वेळीं घडलेल्या एका प्रेमळ व उदार चरिताचें उदाहरण या कवितेंत दिलें आहे. पुढील उद्गार एका पोर्तुगाज स्त्रीनें आपल्या पतीजवळ काढिले आहेत. )

शु० कामदाः—वसइ सोडुनी चाललों अम्ही
गलबतांतुनी दीन होउनी
गलबतें जरी धरिति ते घडी
असति खास ते शूर हो गडी ॥ १ ॥

शिखरि०ः—प्रिया ज्यांच्यासंगें समर करितां ते पुरुष कीं

जगीं कोठें कोठें दिसत असती हें नवल कीं
तयां हातीं मी ही अशि तरुण रंभाचि पडतां
अहा सांभाळीती कितिक मम अब्रू सुजनता ॥ २ ॥

शालिनीः—साडी चोळी देउनीयां अम्हांसी
सन्मानानें तोषवूनी अम्हांसी
किल्ल्यामाजी धाडिलें आपुल्याची
शत्रूची कीं रीत ही होय साची ॥ ३ ॥

स्रग्धराः–अप्पासाहेब ज्यांना जन म्हणति सदा तें असे हो असार
बाप्पाजी ते प्रजेचे मज दिसत असे खास ते धीर वीर
त्यांचा तो थोर भाला चमचम करिते नंगि समशेर घोर
त्यांचा घोडा यशस्वी चपल फिरफिरे भोंवरा जेंवि थोर ॥४॥

शिखरि०–मराठे मोठे हे मज दिसतसे आज सुदिनीं
तयांना धर्माची कितिक असते चाड भुवनीं
तयांसंगें नाथा समर करणें होइल वृथा
फिरंगी बंधूंची मज न दिसते ही धडकथा ॥ ५ ॥

उपजातिः–प्रिया करावा तह हें बरें दिसे
तहांत आतां तइं मौज ही असे
ज्यांनीं स्त्रियांना समरींहि रक्षिलें
झाले मराठे जगिं धन्य ते भले ॥ ६ ॥

शुद्धकामदाः—धरुं नका तुम्ही आडवाट ती
करिल नाश ती खचित ही मती
विनवितें प्रिया आपुली तरी
सुजनता असो मोहनी परी ॥ ७ ॥

ज. रा. दुल्लू.

## १३० मृतवसंत.

शा० वि०:—ब्रह्माविष्णुमहेश—कीर्तनिं कदा माझें न लागे मन ॥
साधूसंत—समागमांत हि मला वाटे मुळीं प्रेम न ॥
माता—तात—पदांबुजा विसरुनी झालों भ्रमिष्टापरी ॥
ना शांती मृत तो वसंत म्हणुनी या भूमिपृष्ठावरी ॥१॥
ज्या काळीं नरनारि पक्षिपशुही स्वेच्छें सुखा पावती ॥
गाती मंजुळ कोकिळा पिकहि ते प्रेमें सुखें नाचती ॥
वायू मंदसुगंधयुक्त सुटुनी संतोष देई जना ॥
ते आतां दिन काय येतिल अहा, संदेह वाटे मना ॥२॥
रत्नांनीं परिपूर्ण हेम तरुसी मीं पाहिलें एकदां ॥
यच्छाया सकलांसि होय सुखदा जो ताप ना दे कदा ॥
नेत्राल्हादक मानसा सुखद जो इच्छीयलें देतसे ॥
तो कल्पद्रुम आज सर्व वठला उद्विग्नता येतसे ॥ ३ ॥
आला काल खराचि काल सकलां राहू जसा भास्करा ॥
गेला काय भिऊनियां यम कुठें त्या दानवा तस्करा ॥
किंवा हा कलिचाच कालमहिमा होई मनासी व्यथा ॥
गेला आज वसंत टाकुनि अम्हां शोकार्णवीं सर्वथा ॥४॥
ज्याचें दुःखद—वृत्त ऐकुनि धरा निस्तेजता पावली ॥
वायूचा घनघोर नाद गमतो कीं सत्य शापावली ॥
झाले मेघ पहा पयोनिधि परी दुःखें बहू कोरडे ॥
होई तेज सुतप्त दुष्ट अधमां मारी जणूं कोरडे ॥ ५ ॥
तें आकाशहि शून्य भासत असे तन्नाश-दुःखें महा ॥
सर्वी दर्शविती तिरस्कृति कशी तीं पंच तत्वें पहा ॥
ज्या भूतीं निजजन्म त्या दुखविणें ही सर्वथा दुष्कृती ॥

याचा दुष्परिणाम सेविल रिपू हें सांगतों निश्चितां ॥६॥

स्रग्धरा:—घाला आला वसंतावरि चहुंकडुनी जेविं ती टोळधाड ॥

किंवा ते सेविताती मृत तनु समुळीं टोंचुनीयां गिधाड ॥

तैशा रीतीं खलांनीं अदय रिपुपरी नष्ट केलें वसंता ॥

नेवोनीयां तदात्मा कळत न बसले ध्यावया काय आतां ॥७॥

गो. कृ. जाधव.

---

## १३१ 'मृत्यु'

इथें मृत्यु भासे, तिथें मृत्यु भासे,
जगीं जीवजन्तू-गळां घालि फांसे;
वसे अन्तरीं, भोंवती, ऊर्ध्वभागीं,
समग्रां जिवां वेष्टुनी अग्रभागीं. ॥ १ ॥
असे दृश्य तें नष्ट होणार साचें,
बळी, निर्बळी, भेद हे मानवांचे;
महीपाल वा रंक वा सानथोर,
गणी ना करी हानि हा नित्य घोर. ॥ २ ॥
जगच्चक्षु जो सूर्य सर्वांतरात्मा,
सुधा वर्षुनी नीववी मानवात्मा—
निशाकान्त; तो तारकापुंज सारा—
तयाधीन; हा व्यर्थ सारा पसारा. ॥ ३ ॥
मुळीं सृष्टि ही बुद्‌बुदप्राय आहे.
परी मानव सृष्टिला पृष्ठि वाहे;
तरी कोठची शाश्वती मानवां या;

परी भूलले, नाडले लोक वायां. ॥ ४ ॥
' खरें पाहतां सत्य ही मृत्युभूमी, '
वदे जीव अज्ञान गर्वे ' प्रभूमीं; '
जरी स्वप्नवत् सर्व हा कारभार,
शिरीं आवडीं घेइ संसार-भार. ॥ ५ ॥
' जगीं येइ जन्मास तो मृत्यु पावे, '
अहो रात्र हें उक्त ध्यावें जपावें;
असंख्यात ते थोर जन्मास आले,
परी शेवटीं मृत्युपंथेंचि गेले. ॥ ६ ॥
पुरें, पट्टणें, सर्वही ओस झालीं,
महाथोर राज्यें धुळीला मिळालीं;
प्रजापालनीं दक्ष ऐसे नृपाल,
कुठें? काय झालें तयांचें वेदाल. ॥ ७ ॥
कुठें वीर बाजी, कुठें शूर गाजी—
रणीं सिंह सच्छिष्य तो हो! शिवाजी;
कुठें धीर गंभीर ते रामदास?
जयांच्या कृपें मुक्त तो होय दास. ॥ ८ ॥
महात्मे परी मृत्यु मार्गेंचि गेले,
जगीं कीर्तिरूपें चिरंजीव ठेले;
तनू माझि जाणार हें खास ठावें,
परी आस ही-कीर्तिरूपें उरावें ॥ ९ ॥

' सरस्वतिरमण. '

## १३२ नदी.

पद्य चाल—समय बांका.

तुझें हें पाणी । येतसे सांग कोठोनी ॥ धृ० ॥
सुभगे नदी कुठें तूं जाशी
चिन्तातुर कां ऐशी दिससी
हळु हळु पाउल कां टाकीसी
तुजला कोणी । दुखविलें सांग बोलोनी ॥ १ ॥
डोंगरजमीन माझी आई
पर्जन्याची वृष्टी दाई
झरा पाळणा खासा होई
जाय झांकोनी । जो वरुनी रानफुलांनीं ॥ २ ॥
एक्या दिवशीं घरुनि पळालें
हांसत खिदळत पुढें निघालें
बहुपरि चेष्टा करुनी रमलें
उंचावरोनी । खालीं मी आलें रानीं ॥ ३ ॥
मग मी आलें ठुमकत मुरकत
तृणमयतीरांमधुनी विलसत
मज चुंबाया पुष्पें वांकत
रक्तोष्ठांनीं । गृहिं न्याया मज भुलवोनी ॥ ४ ॥
परी सुखें हीं आतां सरलीं
कष्टावस्था मजला आली

हांक उदधिची कानीं पडली
मुख पसरोनी । मजला हा टाकिल गिळुनी ॥ ९ ॥

म. पां. ओक.

---

१३३ तमाखु.

पद्य.

निज तनु झिजवुनि परांस रिझवी
तोचि चढे जगिं उच्चपदा । पावतो सदा बहुमान् ॥
दुकानिं ठेविती कोनीं
भरोनि गोणीमधिं आधीं । किति तिची होय धुळदाण् ॥
परि ती झिजवुनि स्वतास घेई
जंई तंई जर्दाच बने । मग डब्यांत मिळवी स्थान् ॥
॥ जर्दा बनतां सरे पुढें ॥
॥ दर्जा वाढुनि दरा चढे ॥
जितुकि झीज घे तितुकि आवडे
लोकांनां ती अधिक पहा । जन करिति तिचें गुणगान् ॥
झिजवुनि झिजवुनि तनूस शेवटिं
बने जंई तपकीर तंई । बहुमोल होय ती जाण् ॥
॥ कधिं सोन्याची कधीं रुप्याची डबी तिला लाभते ॥
॥ सभेंत कटिवरि थोरजनांच्या बसावया मीळतें ॥
या परि येई महत्त्व त्यातें
झीज घेइ जो अपुणाला । परकार्यि करी तनुदान् ॥

म. पां. ओक.

---

## १३४. स्मृतिचित्र.

ओव्याः—अहा मम जन्मभूमि, प्रिय पितृजन्मभूमि,
तुझें गीत गाईन मी, आवडीनें माते. १.
नभस्पृष्ट गिरिकुटें, रम्य महा नदीतटें,
आम्हां तव शोभा वाटे, अनुपम माते. २.
तव वनें उपवनें, सदा सुगंधि सुमनें,
सुस्वरित पक्षी गानें, उल्हासती माते. ३.
मधुर संस्कृत वाणी, काव्यरत्नें कविगणीं,
मंडित पाहोनि मनीं, तोष होय माते. ४.
ऋषि ज्ञानविलसित, धर्मवृक्ष कुसुमित,
नाना दिव्य फलयुक्त, शोभताती माते. ५.
सुलभा गार्गी मैत्रेयी, भैमी सावित्री वैदेही,
अहल्या तारा मिराबाई, कन्या तव माते. ६.
धीरोदार महा शूर, तव पुत्र धुरंधर,
राम भीष्म पार्थवीर वीरसू तूं माते. ७.
कालचक्रें तयांप्रति, लागे भोगणें विपत्ति,
तैशीच ही तव स्थिति, कांहीं काळ माते. ८.
तुझ्या ऐश्वर्याची कीर्ति, ऐकोनि थोर वाखाणिती,
तुझ्या ऐशी सर्व जगतीं, दुसरी कोण माते. ९.
भाग्यसूर्य मावळला, येईलचि उदयाला,
ऐसा निश्चय चित्ताला, धीर देतो माते. १०.
तुझ्या सेवेलागीं जाण, अर्पूनियां धनप्राण,
सिद्ध असों थोर सान, सकळही माते. ११.

——— वामन आबाजी मोडक.

## १३५ हिमालयवर्णन.

[ पुढील उतारा " गजासुरवध " नामक अप्रसिद्ध काव्यांतील आहे 'गजासुर' व कारणपरत्वें झालेला त्याचा मित्र 'पराशर' नांवाचा ब्राह्मण हे हिमालयावर तपश्चर्येकरितां जात आहेत. ]

द्रुतवि०:—तुहिनसंततिच्या ध्रुव आलया।
क्षितितळीं " नगराज " पदाश्रया ॥
त्रिभुवनश्रुतशुभ्रयशाश्रया।
अदितिजां दितिजां मनुजां प्रिया ॥ १ ॥
निखिलरम्यपदार्थसमुच्चया।
विविधविस्मयवस्तुवरालया ॥
कुतल-कौतुक-केलि-निकेतना।
शिवसती-वसती-प्रियकेतना ॥ २ ॥
खरतपश्चरणव्रतसाधना।
शुभवनांतरशांततपोधना ॥
असुर ये सवयस्य हिमालया।
नगवरा गवराजधराश्रया ॥ ३ ॥
गिरिगता सुषमा नयनां हरी।
चढति ते बहुमंदपदें वरी ॥
पथिं पराशर त्या असुराप्रती।
वच वदे चव देति तया अती ॥ ४ ॥
विदितवर्ण-नगोचित-वर्णना।
विदित वर्णन-गोचित वर्ण ना ॥
तरि यथामति वर्णन हा करी।
सरस वा रसवारित तें जरी ॥ ५ ॥

रुचिर भव्य उदात्त मनोहर ।
सुगुरु उच्च पुराण नगेश्वर ॥
प्रतिपदीं नयनां नव वाटतो ।
जनमना नमनार्ह यथार्थ तो ॥ ६ ॥
गहन भव्य सुदुश्चर सर्वदा ।
सुरुचिरा हरिता तिमिरास्पदा ॥
गिरितळीं विलसे सवनेचरा ।
सवन–भू–वनभूमिपरंपरा ॥ ७ ॥
सरलसालरसालवटोत्तरा ।
बकुल–पिप्पल–तालपुरःसरा ॥
वसत तेथ असे खगपालिका ।
पवनपा वनपादपमालिका ॥ ८ ॥
मधुर पल्लव पुष्प फळें वरी ।
तरु असे शिरती गगनोदरीं ॥
विबुधवास गमे इह निर्मिती ।
ख–वन–देवन देवपदीं क्षिती ॥ ९ ॥
भिडतसे तरुवर्ग वरी नभा ।
धरितसे हिमशुभ्रसुमप्रभा ॥
गगन कीं भगणा दिनिं वाटतें ।
मिरवितें रवितें न जुमानितें ॥ १० ॥
सरस कीं खमुख–द्युति–चुंबना ।
सतृष कीं सुरपादपदर्शना ॥
उदित कीं अचलोन्नतिनिर्णया ।
द्रुवर ते वरते रत जावया ॥ ११ ॥

द्रुमगणें गिरिशें गिरिजा जशी ।
वरियली शुभपत्रफला तशी ॥
कुसुममंडलमंडनमंडिता ।
व्रततिसंतति संततसंगता ॥ १२ ॥
विटपहस्तविशेषसमागमें ।
दृढ परस्परसंगतितें गमे ॥
करुनि नांदति वृक्ष अभेद्य ते ।
अहति संहतिसंगत वागते ॥ १३ ॥
विविध हिंस्र तदन्य पशू किती ।
वसति आक्रमुनी विपिन क्षिती ॥
विहरती खग चित्रविचित्रही ।
अलघु वा लघु वा रमती अहीं ॥ १४ ॥
न दलपंक्तितुनी तरुच्या तळा ।
गति मिळे ख–घनोदरिंच्या जळा ॥
भिजविण्या म्हणुनी क्षितिमेव कीं ।
गजपती जपती स्वमदोदकीं ॥ १५ ॥
जलदगर्जितशी वनतर्जना ।
हरि करी विततोदर गर्जना ॥
मुदित नाचति मुग्ध मयूर ते !
अवितथीं वितथीं जडधी रते ॥ १६ ॥
विविध चार यथासुख गोकुळीं ।
विकृति, रास, निकुंजवनस्थळीं ॥
मुररिपूसम वाघ शुभाकृती ।
नव नवी वनवीर वरी कृती ॥ १७ ॥

जपतसे बहु, सत्वपरिग्रहा ।
रचितसे सुपदक्रमही महा ।
चहुंकडे निजकार्यवशें भ्रमे ।
वृक वनीं कवनीं कविसा रमे ॥ १८ ॥
नयनयुग्म वळे गगनाकडे ।
हृदय वेधविधींत सदा जडे ॥
उडुसमागम मानस आदरी ।
इह वराह वराहतुला वरी ॥ १९ ॥
विरसवर्णविकास विराजवी ।
विकलता चरणीं स्फुट दाखवी ॥
प्रगटवी असदुक्ति न तो कसा? ।
तरस नीरस नीच कवी जसा ॥ २० ॥
नयन कृष्ण विशाल सुचंचल ।
तनु सतेज मनोरम कोमल ॥
गति सुशीघ्र अशी हरिणावली ।
विचरते चरते कुश-भू-वरी ॥ २१ ॥
निपजवी स-विषाणमहाद्वय ।
वदन शोणितनेत्र मनीं भय ॥
महिष वन्य असे फिरती वनीं ।
यम न दे मन देखुनि वाहनीं ॥ २२ ॥
असित-लोहित-वक्त्रवती कुठें ।
विततपुच्छ-विपुच्छ-भरा कुठें ॥
विलसते चटुला विविध स्थळीं ।
नवनवा वन-वानरमंडळी ॥ २३ ॥

विकटकज्जलशैलसमाकृती ।
विपुल सांद्र सुघोर तमस्तती ॥
तदुदरीं सुखवास वरी सदा ।
नुरविती रवि–तीव्रमहोग्रदा ॥ २४ ॥
यवसजाल विशृंखल वाढतें ।
तरुतलग्रसनोत्सुक भासतें ।
सदय त्यां, जणुं पावविती लया ।
भुजगराज गराग्निवशें तया ॥ २५ ॥
रविकरच्छुरिताग्रदलोच्चया ।
रजनिवासरसंगतिसंशया ॥
निपजवी मनिं, ती निरखीं प्रभू ॥
कृततमा ततमाल-तमाल भू ॥ २६ ॥
जपरता परतापविनाशिनी ।
स्व-परताप-रता श्रुतिसेविनी ॥
स्व–पर–ताऽपरता मुनिमंडळी ।
इह वनीं हवनीं वितरी बळी ॥ २७ ॥
शतशुचींद्रशरासनसंश्रय ।
अचल हा अमिताक्ष सुरां प्रिय ॥
मिरवितो बहु नंदनकानना ।
पविकरा विकराल विडंबना ॥ २८ ॥
विविधवर्णविहंगम-मंडळी ।
विलसते ततपक्ष खमंडळीं ॥
मज गमे चलदिंद्रधनुःप्रभा ।
विहरते हरते मन दुर्लभा ॥ २९ ॥

रविकराभसमुज्वलता वरी ।
तुहिनशीतल पादतती धरी ॥
मृगशशौषधिपालनही करी ।
भवर भूवर भूधरता धरी ॥ ३० ॥
न करितां सुरमस्तकमंडना ।
न करितां जनमानसरंजना ॥
इह सुके फुलली कुसुमावली ।
अजनि वा जनि वा न कळे भली ॥ ३१ ॥
विलसती विपिनीं ज्वलदोषधी ।
बघुनि त्यां कुतुकाकुल होय धी ॥
तिमिरसागरवेष्टित त्या तशा ।
गमति कां मतिकांत न बेटशा ॥ ३२ ॥
कनकराजतताम्रमुखा जशी ।
विविधमौक्तिकरत्नमयी तशी ॥
उदरिं वागवि पार नसे जिचा ।
खनिजता निज तात भवानिचा ॥ ३३ ॥
गिरिवरी सकलेंद्रियमोहन ।
गहन दुर्गम निस्तुल पावन ॥
बघुनि सृष्टिसुवैभव तें मनीं ।
न जड तो जडतो प्रभुचिंतनीं ॥ ३४ ॥
घन नगाक्रमणा चढती वरी ।
क्रमिति अर्ध पथास सरासरी ॥
न जलवृष्टिस ते परि सुश्रमें ।
श्रमजला मजला त्यजिती गमे ॥ ३५ ॥

हिमनगा जलरूप सुता किती? ।
असति ती करवेल कुणा मिती ॥
बघुनि हृद्य विलक्षण तत्कृती ।
मन वरी नवरीति चमत्कृती ॥ ३६ ॥
धरिति मार्ग अधोगतिचा जरी ।
विविध जंतुंस उद्धरिती तरी ॥
पचविती मळ पाप परोपरी ।
भुवनपावनपात्र सदा तरी ॥ ३७ ॥
जनकमंदिरलोभ न तोडवे ।
पतिसमागमसौख्य न सोडवे ॥
उभय-सिद्धिस यास्तव त्या किती
असुकरा सुकरामत दाविती ॥ ३८ ॥
पितृपदीं तनु मागिल ठेउनी ।
सुरस दूरवरी मुख सारुनी ॥
सतत राखुनि ही तनुची स्थिती ।
अदर सादर सागर चुंबिती ॥ ३९ ॥
कुटिल मार्ग सदा अवलंबिती ।
निपट त्या तट दोन उभारिती ॥
उचित वृत्ति जरी परिलंघिती ।
परहिता रहितावधि साधिती ॥ ४० ॥
धरणिधेनुस पाडस होतसे ।
रुचिररत्न महौषधि पीतसे ॥
अजुनि तद्गत पुष्टि नगीं वसे !
काशि खरी शिखरांश-कथा नसे ॥ ४१ ॥

"अचलराज" यथार्थ गमे कृती ।
विविधतीर्थजलार्द्रशुभाकृती ॥
कनकवेत्र-विभूषित सन्महा ।
चमरचामरचालनचारु हा ॥ ४२ ॥
सर ससारससार्थ नगावरी ।
कमल-कोमल-कोश खुला करी ॥
सकळ तें कळतें अलि याचकां
चपळ ते पळ तेथ न घेति कां? ॥ ४३ ॥
शिखरसंकरदीर्घपरंपरा ।
वरिवरी उसळे हिमपांडुरा ॥
दिसतसे जंव ती गगनस्पृशा ।
उपरि ती परि ती नच दृग्वशा ॥ ४४ ॥
धवलदुग्धपयोनिधिपृष्ठभू ।
गुरु तरंग खरंगनटप्रभू ॥
विधिवशें घनरूप तयांवरी ।
स्वशिखरीं शिखरींद्र गमे करी ॥ ४५ ॥
शिखररूप गमे विलसे नगीं ।
तुहिन-जंगल विस्मय-भू जगीं ॥
पाथिक दृष्टिस दुःश्चर तें जरी ;
अपरती परती नच ती तरी ॥ ४६ ॥
तुहिनशुभ्रसहस्रशिरांवरी ।
अचलराज सुरालय सांवरी ॥
अहिपति-प्रतिमा नृमुदा भली ।
सुविधिनें विधिनें जणु निर्मिली ॥ ४७ ॥

कांताऽऽरवा सरसदानकरी नरा जी ।
कांतारवास-रस-दा न करी न राजी ॥
कस्तूरिकाहरिणपंक्ति सुखें विहारा ।
या पर्वतीं करितसे धृतभृगभारा ॥ ४८ ॥
राजी वसे वन-वशा-गजराज यांची ।
राजीवसेवनवशा; गजरा जयांची ॥
तुंडावली करितसे पळतां भयानें ।
ऐकोनि या नगवरीं हरिशब्द कानें ॥ ४९

श्लोकः–हरिते सन्नगमंडन मानसे । हरितें-सन्नग-मंडन मानसे ॥
सुरस-सारस-सार-समाकुल । सुरससार ससारस माकुल॥५०॥

आर्याः–सुरसाधरावरी ते शिवा सकुतुका गिरीशजा यो हो
सुरसाधरा वरीते शिवास, कुतुका गिरीशजाया हो ॥ ५१ ।

१ हरित–हरण करितें, वेधून टाकितें. २ सन्नगमंडन–( सत् + नग + मंडन ) उत्तम पर्वत ( हिमालय ) त्यास भूषणभूत. हें ५ पदाकडे जातें. ३ मानस–चित्त. ४ हरित ( हिरवें ) सत् ( सुंदर ) नग ( वृक्ष ) मंडन ( भूषण ) आहेत ज्यास असें. ५ मानस-सरोवर. ६ सुरस ( मधानें भरलेलीं ) सारस ( कमळें ) सार ( श्रेष्ठ ) समाकुल ( युक्त ). ७ सु ( गोड, स्वच्छ ) रस ( पाणी ) सार ( संपत्ति ) ज्यांत पुष्कळ गोड व स्वच्छ पाणी आहे असें. ८ ससारस–हंसांनीं व्याप्त. ९ माकुल–मा ( लक्ष्मी ) कुल ( मंदिर ).

१ सु –रसाधरा- वरीः– सु ( श्रेष्ठ ) रसाधर ( पर्वत ) त्यावर म्ह.हिमालय पर्वतावर. २ शिवाः– कल्याणी, शुभा. ३ सकुतुकाः– कुतुक ( उत्साह ) उत्साहानें, आनंदानें ४ गिरीशजाः–( गिरि+ईश+जा ) पर्वतांचा राजा हिमालय त्याची मुलगी पार्वती. ५ या–: याचा संबंध 'सुरसाधरावरी' या पदाकडे आहे. ६ सुरसाधर ( सुरस+ अधर ) सुंदर आहे अधरोष्ठ जीचा अशी ७ वरीतेः–लग्न लाविते ८ शिवासः–शंकरास ९ कुतुकाः– आश्चर्यास १० गिरीशजाया ( गिरीश+ जाया ) शंकराची पत्नी ११ होः– झाली. गिरीशजा ( गिरीशाची मुलगी ) गिरीशजाया ( गिरीशाची बायको ) झाली हें आश्चर्यास कारण.

धरा[1] धराया[2] महती[3] समान[4]
धरा[5]धरा या[6] मह[7] ती[8]समान
धरा[9] धराया[10]महतीस[11] मान
धरा[12]धरा या[13] महती[14] समा[15] न[16] ॥ ५२ ॥

**राधारमण.**

---

१ पृथ्वी. २ धारण करण्यास. ३ मोठी ४ पूज्य, गौरवयुक्त ३।४ हीं धरेचीं विशेषणें. ५।६ या धराधरा ( पर्वतास ) हिमालयास ७ मह– सामर्थ्य. ८ तिच्या ( पृथ्वीच्या ) तोडीचें ९।१६ धरा न ( धरित, मानीत नाहीं का? ) १० धरीं. ( पृथ्वी ) आयाम ( विस्तार ) हती ( इचा भार ) पृथ्वीचे विस्ताराचे भारास. ११ गळा, कंठ आहे अशा. १२ धराधरा ( शेषास ). १३ या ( हिमालयास ). १४ मोठेपणा योग्यता. १५ सारखीं.

या श्लोकांत हिमालय व शेष यांची योग्यता सारखी आहे असें ध्वनित केलें आहे दोघे भूभारधारणार्थ समर्थ आहेत शिवाय दोघांचा वर्ण शुभ्रच आहे.

---

**समाप्त.**

# स्पष्टीकरण, टीपा वगैरे.

## प्रकरण १.

सांगोपांग=( स+अंग+उपांग ) अंगें व उपांगें यांसह. गोचर=विदित. अगम्यस्वरूपा=ज्याच्या स्वरूपाचें यथार्थ ज्ञान होणें शक्य नाहीं अशा.

## प्र. २.

जडमति:—मंदबुद्धि. वर्णार्णव:—वाङ्मयरूपी समुद्र. मागे धरोनि—लेंकरातें:—हातीं लागण्यास दुर्मिळ अशा वस्तूचा बालकानें छंद घेतला असतां आई जसा तो पर्यायानें पुरविते, त्याचप्रमाणें हे देवि शारदे, तूं माझा काव्य रचण्याचा दुर्घट अभिलाष पूर्ण कर. प्रास:—अनुप्रास. वामनाला:—वामन पंडितांस; वामन पंडितांची अनुप्रास, यमकें इ. साधण्याची हातोटी प्रसिद्धच आहे.

## प्र. ३

अशेष—हेतुला:—सर्व जगतांची उत्पत्ति, स्थिति व नाश यांस कारणभूत. चतुर्विध पुमर्थ:—धर्म, अर्थ, काम, मोक्ष हे चार पुरुषार्थ. कुंदामला:—कुंदाचे फुलाप्रमाणें शुभ्र अशा यशाला; यशाचा वर्ण शुभ्र मानण्याचा कविसांप्रदाय आहे. महर्षि तुज————————वासवा:—श्रीकृष्ण हा सामान्य मनुष्य आहे; तो देवाचा अवतार नव्हे; असें बृहस्पतीच्या भाषणावरून इंद्रास वाटलें. श्रीकृष्णाच्या अंगीं कांहीं दैविक तेज आहे कीं काय हें पाहण्यासाठीं इंद्रानें सात दिवस पर्यंत गोकुळांत मुसळधार पाऊस पाडिला. त्याप्रसंगीं गोवर्धन पर्वत एका बोटावर उचलून धरून श्रीकृष्णानें गोकुळवासीजनांचें रक्षण केलें व इंद्राचा गर्व परिहार केला; या पौराणिक कथेकडे कवीचें लक्ष आहे. बत:—पादपूरणार्थक अव्यय.

## प्र. ४

तो पारिजात———वर्षाव:—पारिजातक ( प्राजक्त ) वृक्षाचीं फुलें, पाकळ्यांचे ठिकाणीं मौक्तिकाप्रमाणें शुभ्रवर्णाचीं असतात व देठांचे ठि-

काणीं पोंवळ्याप्रमाणें लाल असतात, या गोष्टीकडे कवीचा रोख आहे. कुड्मल:——कळ्या. स्वारीमधः——या ऐवजीं " स्वारीमध्यें " असें वाचावें.

## प्र. ५

श्लोक ४:–ग्रीष्मऋतूंत दिवस फार मोठे होतात त्याचें कारण ' ग्रीष्मऋतूंतील तापानें सूर्याचे घोडे थकून मंद चालतात ' असें कवीचें धोरण आहे. दुष्कीर्तिः–कविसांप्रदायाप्रमाणें दुष्कीर्तीचा वर्ण काळा मानिला आहे. श्लोक २१:–पर्वतांचे अंगांसभोवतीं मेघांची दाटी होते व वर्षाऋतूचे आरंभीं जिकडे तिकडे एक प्रकारचा सुगंध सुटतो; त्यावरून वर्षाकाळ पर्वतांस धूप दाखवित आहे अशी कल्पना. नरकपूर्व–दिनीं:–दिपवाळीचे दिवशीं. करिति सीर१०:–नांगरतात.

## प्र. ६

श्लोक २:–यांत मेघाचें चक्रधर जो ( विष्णु ) त्याच्याशीं साम्य दाखविलें आहे. श्लोक ६:–ऐकोनि———नभातें:–चित्रविचित्र वर्णांनीं युक्त असे आपले पंख विस्तारून मोर आनंदानें आकाशांत उडतात; त्यावर कवीची अशी कल्पना आहे कीं, मोर मणिमयव्यजनीं (रत्नखचित पंख्यांनीं ) आकाशास वाराच घालीत आहेत. दर्दुर:–बेडूक. तमालपत्र नलिनीं:–तमालवृक्षाच्या पानांप्रमाणें कृष्णवर्ण. रजत:–रुपें. नीलाभ,:–नीला आभा ज्यांची ते. ( बहुव्रीहि स. ) निळें. चंद्रव्यसनें:–चंद्रावर व्यसन ( संकट ) आलें म्हणून. बलरामवस्त्रसमकाय:——बलरामाच्या वस्त्राप्रमाणें ( निळा ) आहे देह ज्यांचा असे.

## प्र. ७

उडुसती:–उडु ( तारका ) याच सती. भगण:–भ ( नक्षत्र ) त्यांचा समुदाय. जरी=जरि असें वाचावें. पविवर्ष:–वज्रपतन. करिप:–मोठा हत्ती. सुनवयौवनलब्ध=' लब्ध–सुनव–यौवना ' असा समास वास्तविक पाहिजे, परंतु कवीनें तसा घातला नाहीं. अभिनव तारुण्य जीस प्राप्त झालें आहे अशी. कृषीवल:–शेतकरी. निलय:–गृह, मंदिर. हट्टाकडे:–बाजाराकडे.

प्र. ८

श्लोक २:—हेमंत ऋतूंत रात्री मोठ्या असतात व रात्रीस थंडीही फार पडते. उष्णतेच्या योगानें पदार्थ प्रसरण पावतात व शीताच्या योगानें आकुंचन पावतात; या न्यायानें रात्री लहान असाव्या परंतु तशी नसतात, यावर कवीची दृष्टि आहे.

प्र. ९

श्लोक २:—तेलाच्या अभावामुळें दिवा जाण्याचे बेतांत आला म्हणजे तो जसा मोठा होता, त्याप्रमाणें र्शात ( ज्याचे ठिकाणीं सजीव प्राण्यांची प्रीति नसते ) जातां जातां वृद्धिंगत होते असा भाव. चणकः— हरभरा.

प्र. १२

श्लोक १:—तर तर—तमारीः—सूर्योदयीं फुलांच्या पाकळ्या उघडतात तेव्हां फुलें जणूं " सूर्य उदय पावत आहे " ही आनंदाची बातमी परस्परांस सांगत आहेत असा आशय. खगाच्याः— सूर्याच्या. श्लोक ३ ओळ ४:— अंतकाळापेक्षां मध्यानकाळ कठीण. प्रतीचिः—पश्चिम दिशा. रवीपरी— मुखाकडेः—मध्यान्हकाळीं सूर्याचें तेज अत्यंत दुःसह असल्यामुळें त्याजकडे ज्याप्रमाणें कोणी पहात नाहीं त्याप्रमाणें ' इ.

प्र. १३

विरहविकलाः— वियोगातुरा. जलदपटलें:— मेघसमुदाय. कनकरजप्रान्तः— या ठिकाणीं " कनकरजतप्रांत " असें वाचावें. सोनें आणि रुपें यांचे प्रांत.

प्र. १४

चुंवितः— ' चुंबिल ' असें वाचावें. अक्षयमोक्षसिंधुलहरीः— कधींही नाश न पावणारा असा जो मोक्षरूपी सागर त्याच्या लाटा . उषींः— उषः- कालीं, प्रभातकाळीं. कुमुदः—चंद्रविकासिकमल.

प्र. १५

आदित्य दिव्य पथिकः— सूर्य हाच कोणी अंतरिक्षांतून जाणारा वाटसरू. श्लोकः— ज्याप्रमाणें वृद्धपणीं मस्तकावरील केश विरळ होतात त्याप्रमाणें अस्तसमयीं सूर्याचे किरण विरळ झाले. करभारः— खंडणी पक्षीं किरण.

श्लोक ५ ओळी ३ । ४ :– युद्धास जाण्याचे वेळीं रजपूत लोक ‘ केशरी ’ पोषाख करितात, त्या चालीकडे कवीचा कटाक्ष आहे. कुंकुमरसें:– लालरंगानें. प्रतीची:–तोंडीची. परिताप:–उष्णता पक्षीं दु:ख. निर्जर:– देव. मित्रापदा:– सूर्यास्त पक्षीं मित्रसंकट. कुलग्ना:–वाईट लग्नावर; वाईट वेळेवर.

प्र. १६

श्लोक २ ओळ ४ :–चंद्रोदयाचे वेळीं पूर्वदिशा आरक्त होते. अंधकार रूपीं हत्तीचा चंद्ररूपी सिंहानें वध केला. त्याचें रक्त लागून पूर्वदिशा लाल झाली असा भाव.

प्र. १७

ताउस:–वाद्यविशेष. वारयुवती:– वेश्या.

प्र. १८

आरामीं:–बागेंत. आराम:– हुषारी. द्यति=“ द्युति ” असें वाचावें:– प्रकाश; तेज.

## प्र. १९

भीमरथी:–भीमा. हरितनू:–कृष्णा. गायत्रि-सावित्री. सस्ययुत=धान्यें संपन्न. श्लोक ३ ओळी ३।४—स्नान—वली—स्नानासाठीं लगबगीनें आलेल्या देवस्त्रियांचे दागिने जींमध्यें पडले आहेत अशी. स्वर्गंगा—मंदाकिनी शतधा विकीर्णतनू:—जिच्या शरीराचे शेंकडों विभाग झाले आहेत अशी. पर्वतचक्रवर्ति:—पर्वतांमध्यें श्रेष्ठ. दंतिः—हत्ती ( सह्याद्रीवर हत्ती फिरतात ही कवीची उक्ति वस्तुस्थितीस धरून नाहीं ) सद्गुण श्रेष्ठ—धाम:--हा सगळा एक शब्द वाचावा.

## प्र. २०

क्षितिधरेंद्रतटप्रदेशीं ( क्षितिधर+इंद्र+तट+प्रदेशीं ) पर्वतश्रेष्ठ जो हिमालय त्याच्या बाजूंवर. हिमधूसर=बर्फामुळें धुरकट दिसणारी. तीव्र दक्षिणसमीरिता= दक्षिणेकडील सोसाट्याच्या वाऱ्यानें संचारित. प्रतीत=प्रख्यात. निर्झर=झरा. यूथ=कळप. ऋक्ष=अस्वल. अनूप=दलदलीचा प्रदेश. प्रवितत–विषोद्गारगंधी= विषारी वायूचे फवारे ज्यांमध्यें अविच्छिन्नपणें दरवळत आहेत असा. गल-

तप्रेम—नेत्रांबु--पूर=ज्यांच्या डोळ्यांमधून आनंदानें प्रेमाश्रु गळत आहेत असे; हें मयूरयांचें विशेषण. हिमांनीं=बर्फाचा ढीग; वन्यच्छगळ.=एक रानटी रेड्यासारखें जनावर आहे. तिंतिडिका=चिंचा.

## प्र. २३

प्रमेय=सिद्धांत; समायुक्तदलावलीला=एकत्र जोडलेल्या पानांना.

## प्र. २४

अंशु=किरण;उद्वहन क्रिया=वर काढण्याची क्रिया; भ्वानना=( भू+आनना ) पृथ्विमुखास; मातंगाकृति=हत्तीसारखे मोठे; मंदरशैल=मंदरपर्वत; पूर्वीं सागरमंथन कालीं हा पर्वत मंथनदंड केला होता.

## प्र. २७

नदिपति=( हें वास्तविक ' नदीपति ' असें पाहिजे. ) =समुद्र; व्यसनसमयीं=संकटसमयीं; लंगराशीं=मोठ्या नांगराला.

## प्र. २८

अर्थोष्मा=धनाची ऊब; स्वानें=स्वरानें; शब्द सुधाधारा=शब्दरूपी अमृताचा वर्षाव; कलरव=मधुर परंतु अस्पष्ट असा नाद; अमरसुंदरी=अप्सरा; सामवेद=या वेदामध्यें गायनशास्त्राचें विवरण केलेलें आहे; सरीचा=तोडीचा; अनुराग =प्रेम. सतनु वाङ्मन--लगामीं=काया वाचा मनें करून मी रसिक जनांच्या-आधीन आहें; विलोल=उत्सुक; उपाधी=पीडा.

## प्र. २९

सस्यविहीन=धान्यरहित; कांचनमही=सुवर्णभू ( हिंदुस्थान ). कराळ=भयंकर; विपन्नरक्षण परा=संकटांत सांपडलेल्या लोकांचें रक्षण करण्यामध्यें तत्पर. श्लोक १४ ओळ १ स्फुरे तळमळी " हा शुद्ध पाठ होय. तळमळी:--हें नाम आहे तळमळ, अस्वास्थ्य.

## प्र. ३२

दायाद=दाईज; क्षमानभस्तरणी=क्षमारूपी आकाशांतील—सूर्य; अपमान शिखिज्वाला=मानभंगरूपी अग्नीच्या ज्वाळा; कठिणवाग्विशिख=जिचे शब्द-

रूपी बाण फार तीव्र आहेत अशी. सुहृदर्थसिद्धिपर=भक्ताची इच्छा पुरविणारा; निकाम=अत्यंत; अशनिनिपातासमान=वज्रपात तुल्य; खरासम=गर्दभासारखा; वदनच्छवि=मुखांचे तेज. बंदी=वैतालिक; घनातपालाही=प्रखर सूर्यतेजास; विनायकता=गरुडत्व. रमाजानें=( रमा आहे जाया ज्याची ) विष्णु; व्याप= खटाटोप; प्रेमप्रणाल=प्रेमाचे पाट;

## प्र. ३२

दूरवीं:—दूर करितों; नाहींशी करितों. मयुरः—कविवर्य मोरोपंत. श्लोक ४ ओळ १।२ त्याची संपत्ति दानानें शोभत असे; नदामध्यें विपुल पाणी असून जर नदानें तें परोपकारार्थ दिलें नाहीं तर त्या पाण्याचा उपयोग काय ? तद्वत ज्याच्या जवळ पुष्कळ संपत्ति आहे परंतु जो दानधर्म करण्यांत तिचा व्यय करीत नाहीं त्याची संपत्ति असून नसून सारखीच. दैवज्ञमंडलमतें:—ज्योतिषी लोकांचे संमतीनें.राजयक्ष्माः—क्षय. क्ष्माः—पृथ्वी.समरमानस--युद्धोत्सुक.सिंधुराज-- गजश्रेष्ठ.विदुलातनुभवें:—विदुलेच्या पुत्रानें; रणाजिरः-रणांगण. दवार्तीः वणव्यांत. सांपडलेली. उसंतः—आराम, सुख. दग्धधारा—याठिकाणीं दुग्धधारा वाचावें शब्दरोप—वाग्बाण. अयः प्रहार लोखंडाचा आघात. श्लोक २० ओळी १२ पूर्वजन्मीं आचरलेलीं कोट्यावधी पापेंच तुझ्या रूपानें माझ्या पोटीं जन्म पावलीं आहेत. कुसुंबीः—लाल. आलातः—कोलीत तुषः—टरफल; कोंडा. वचनाशुगः—वाग्बाण. दुरुद्धतें:—अत्यंत उद्धट अशा. महाहवः— ( महा + आहव ) मोठेंयुद्ध समिद्दव ( समित् + दव )युद्धरूपी वणवा. दिस याठिकाणीं " दिसं " वाचावें. प्रसुः—आई. निमीलिताक्षा दिनहिप्रदोषः--- ज्यानें आपले डोळे झांकून घेतले आहेत त्याला दिवस सुद्धां रात्रीप्रमाणें भासतो. त्रपाकारकः-- लज्जा उत्पन्न करणारे. श्लोक ७२ ओळी ३।४ जो खरा क्षत्रिय वीर आहे तो परिस्थितीचा किंकर बनत नाहीं तर स्वतजानें तो आपल्याला पाहिजे असेल तशी परिस्थिति घडवून आणितो. पदेश राज्याचा स्वामी. सद्यशः-- स्वस्तरुः-- विमलयशोरुपीकल्पतरु. श्लोक ७७ ओळ ४ हे राजपुत्रा मानापेक्षां अधिक योग्यतेचें असें राजपुत्रास कांहीं नाहीं. प्रचंडांशुसूर्य. भूसुरः—ब्राह्मण.

## प्र. ३४

दिनमणी सूर्य. गहन—अरण्य उपलकंटक युक्त—दगड व कांटे यांनीं युक्त

## प्र. ३५

शशिशेखर:—शंकर. तपस्या:—तपश्चर्या मुक्तावली:—हार. बिससित:—कमलाप्रमाणेंशुभ्र. दिव्यपुरुषगी–दिव्यपुरुषाची वाणी

## प्र. ३६

श्लोक ८:—सूर्याचा यम हा पुत्र होय. पुत्रानें आरंभिलेलें दुष्ट कृत्य बापाच्यानें पाहवेना ह्मणून त्यानें आपल्या दृष्टीवर धूळीचें वस्त्र ओढिलें. रणांगणांत पुष्कळ धुळीचे लोट उठले व त्यांनीं सूर्यास झांकून टाकिलें हा भाव. पट्टिश:--पट्टा श्लोक ३८:—अश्वारूढ अथवा गजारूढ होऊन जो वीर युद्धास येई तो व त्याचें वाहन या दोघांस शत्रूकडील लोक ठार करीत हा भावार्थ. संख्य:– युद्ध. धराकंपमहाप्रहार–भूकंपाचा मोठा आघात. उदार:--वैभवशाली भूयिष्ठ:--बहुतेकसर्व. सूर्यपुत्र—कर्ण संनिहितास्तकाळ–हें विशेषण सूर्य व सदा शिवराव या दोहोंकडे लागतें.

## प्र. ३७

अशुद्धसागर:– रक्ताचा समुद्र. उत्पात:– अनर्थ. रिकवल जन पुसे कोण मानापमाना:—विपत्तींत सांपडलेल्या मनुष्याचे मनांत मान व अपमान यासंबंधी विचार आले तरी त्यांकडे मनुष्य लक्ष देत नाहीं; त्यांस एके बाजूस ठेवितो. अनलसम:–विस्तवासारखे लाल. वारण:—हत्ती.

## प्र. ३८

गांडीवधर:--अर्जुन 'गांडीव' अर्जुनाच्या धनुष्याचें नांव हीनद्युति रक्तकंज यापरिस:—अर्जुनाचे डोळे क्रोधानें इतके लाल झाले होते कीं, त्याच्या पुढें रक्तकमलांची कांति फिकी पडली. रवितेजोविरहचिंतनें–सूर्य आणि तेज परस्परांपासून भिन्न झालीं असें विधान कोणी करील तर जसे हासें येईल तसें दुर्योधनाचे भाषणानें हांसें येतें. व्यक्त- योधन -रस:–जीमध्यें वीररस स्पष्ट नांदत आहे अशी ( वाणी ). अजातरिपु:—धर्म. अघखनिखल–पापाची खाणच असा दुष्ट निरय:–नरक खलतिलक:–खलामध्यें श्रेष्ठ मालिनगल:--मळले

आहेत गाल ज्याचे असा. आर्या २४ व २५ भीष्म त्या ठिकाणीं " भीम " असें वाचावें. इंद्राशनिशनिर्गतिस्वसा ( गदा )— इंद्राचें वज्र व शनिगति ( साडेसाती ) या दोहोंची स्वसा ( बहीण ) म्हणजे या दोहों सारखी. गिरिकूटोपम—पर्वत शिखरा एवढा. तूल:—कापूस. उखळी:—नाहींशी करी. सकल:—हंतां—सर्व—दुष्ट. लोकांचा बलाविपर्यीचा गर्व. वाग्दोर:—लगाम; कासरे. गर-धर-वर:—सर्पश्रेष्ठ. हीन जे क्षयें:—ज्यांच्या बाणांचा कधीं क्षय होत नसे असे. विशिख:—बाण. कालाही:—कालसर्प. कालाहीं:—यमास देखील. आर्या ३:—म्हणीं असा शुद्ध पाठ होय. अन्वय:—जो भज मज झगडाया वांछी तो सूत ( दुर्योधनाच्या ) संनिध असतां जड कठोर दगडा अंधसुता वाग्रका हाणीं.

प्र. ३९

श्लोक ९ ओळ २ स्वार्थेच त्यांस तुझ्याकडे बळें ओढून आणितो. श्लोक ११ ओळ १ राजमागावरी:—" राजमार्गावरी " असें वाचावें.

प्र. ४०

तपनदीप्तिस:—सूर्यतेजास. नक्रेंद्र:—मोठा मगर. श्लोक ११ ओळ ३ बसति:—" बैसति " असें वाचावें.

प्र. ४२

साधुपीडाफल फल खरोखर:—खरोखर दुष्ट लोकांच्या अंगसामर्थ्याचें पर्यवसान सदोदित साधुलोकांचा छळ करण्यांत होतें. अभिवादना:—वंदन करण्यास. छद्म—कपट. व्यसन:—संकट. श्लोक ८ श्रद्धा:— " श्राद्ध " असें वाचावें. आघ्राण सुखदायि:—नाकास तृप्त करणारा. श्लोक १० घार:—" घोर " असें वाचावें. स्थविरद्विज:—वृद्धब्राह्मण. व्याज:—कपट. महानस:—पाकशाळा, स्वयंपाकघर. निजविग्रह:—स्वदेह. कलभ:—हत्तीचे छावे. पुरांतक:—शंकर. पंचसायक:—मदन. फुल्लपद्मविकस्वर:—फुललेल्या कमलांप्रमाणें टवटवीत. महाशय:—मोठ्यामनाचे; उदार.

प्र. ४३

श्लोक १ ओळ ४— कामलांगी:—" कोमलांगी " असें वाचावें. श्लोक २ ओळ:—यागें " योगें " असें वाचावें. उरजभागीं:—वक्ष:स्थलावर.

## प्र. ४५

उशीनरः—शिबि. अमर्षमात्सर्यविनष्टसन्मतीः—क्रोध व परोत्कर्षासहिष्णुता यांनीं ज्याची सद्बुद्धि लोपली आहे असा. सप्ततंतुः—यज्ञ. श्येनः—बहिरी ससाणा कपोतः—कबूतर. श्लोक ८ ओळ ४ हा " हो " असें वाचावें. शशादनः—ससाणा. असुप्रदाताः—प्राणदान देणारा. त्रिदिवः—स्वर्ग. निर्मंतु—निरपराधी. निसर्ग संस्थापितः—सृष्टिक्रमानें ठरविलेलें. शरणागतावनः—शरण आलेल्यांचें रक्षण. मदन्नरोधनें—माझ्या अन्नाच्या आड येऊन. श्लोक २५ ओळी १।२:—दोन धर्मनिषिद्ध गोष्टी पुढें येऊन जेव्हां आपण कोण तीचा अंगीकार करावा या विचारांत पडतो तेव्हां ज्या गोष्टीपासून पाप कमी लागेल ती गोष्ट स्वीकारावी. गदविक्लवाः—रोगपीडित. नीडः—घरटें उद्भिन्नपतत्रः—पंख फुटलेले. उड्डाणः—उडणें. लुलायः—रेडा. गोवृषाः—गाई बैल. मृषाः—असत्य. आमिषः—मांस. कपोतकाया परिमाण तोलिलाः—कपोताच्या शरीराचें जितकें वजन आहे तितकें. पलः—मांस. तपांतीं:—ग्रीष्मऋतु सरल्यावर. विग्रहः—देह. श्लोक २६ तदा " तुला " असें वाचावें. छुरिकः—सुरी. पलखंड—मांसभाग. क्रव्यः—मांस. कपोत तोलना हा एक शब्द समजावा ( कपोततोलना ). विद्याधरः—प्रस्तुत कविता रचणाऱ्या कवीचें नांव. असिधेनुकासुरीः—हिरण्यरेताः—अग्नि. निग्रहः—निश्चय. ईतिः—दैविक आपत्ति; अतिवृष्टि, अनावृष्टी, टोळधाड इ. अध्वर—यज्ञ. नीरजें:—कमलें.

## प्र. ४६

पदपातीं:—पावलें टाकतांना. सजलजलदजालें:—पाण्यानें भरलेल्या मेघसमूहानें. व्यसनजनिततापें:—संकटांपासून उत्पन्न झालेल्या दुःखानें. क्षितिधरतटः—पर्वताची बाजू.

## प्र. ४७

दानें:—भिकार. दुर्दिनः—हा शब्द दोन अर्थी योजिलेला आहे. पावसाचे दिवस किंवा वाईट दिवस. अनर्घ्यः—बहुमोल. नाचविः—याबद्दल ' नाचित " वाचावें. महिलाजनः—स्त्रीजन. अर्थहीनः—द्रव्यहीन, गरीब.

प्र. ४८

जीवनाधारः—जीवितास आवश्यक. शलाकाः—काडी. सुधीः—नीट, सरळ. भवींः—संसारीं.

प्र. ५०

हेलावलाः—उचंबळला. निर्बंधत्वः—मुक्तता.

प्र. ५२

मदीयेक्षणाचीः—माझ्या डोळ्यांची. अंशुमालीः—सूर्य. वीचिः—लाटा. सारभूताः—महत्वाची.

प्र. ५३

भवदुपगमनानें:—आपल्या भेटीनें. कृषिवलः—शेतकरी ( कृषीवल ). नियतिहतजनः—दुर्दैवी लोक. प्रस्तरप्रायः—दगडासारखें कठोर. नूत्नः—नवें. श्लोक १५ ओळी १।२ " सेवक जोंपर्यंत नवीन असतात तोंपर्यंत ते स्वामिसेवा नीट करितात असा अनुभव आहे " हा आशय. निर्घृणत्वः—क्रूरता, क्रौर्य. भजकशिखीः—भक्त हेच मोर. वारिवाहः—मेघ. नव-भव-दव-तप्ताः—प्रबल अशा संसाररूपी वणव्यानें दग्ध झालेले. करमणूकः—" पुणें येथें प्रत्येक शनवारीं प्रसिद्ध होणारें वर्तमान पत्र " या पत्रद्वारें नोटीस फर्माविण्यांत आली होती.

प्र. ५४

सुरभिः—गाय. नृपपथः—राजमार्ग. कदन्नः—वाईट अन्न. तटस्थः—उदासीन. नियमुनीः—दाबून टाकून. असिसमव्रतोपासनीं:—तरवारीच्या धारेप्रमाणें तीव्र अशा व्रताचें पालन करून. नयपरायणाः—न्यायी. विगत-भर्तृकोद्वाहः—विधवांचा पुनर्विवाह.

प्र. ५५

या तुतारीचे नादानें कवि ' कालाच्या गतीस अनुसरून आवश्यक भासणाऱ्या सुधारणा करा; जुनें तितकेंच चांगलें, नवीन वाईट, ही भ्रामक कल्पना सोडून द्या; ' अशा आशयाचा आपल्या देशबांधवांस कळकळीचा इशारा देत आहे. अवकाशः—मोकळी. पडसादः— प्रतिध्वनी. संतानें:—मुलें

( कारटीं ) वाईट रूढीपासून होत असलेले दुष्परिणाम. नवीं:—" जगीं " असें वाचावें. प्राप्तकाल:—सध्या चालू असलेला काळ. भूधर:—पर्वत.

**प्र. ५६**

चपला:—वीज. नच करी स्थिर सुंदर संगती:—सुंदर वस्तु फार दिवस लाभत नाहीं. भिषग्वर:—उत्तम वैद्य.

प्र. ५८

निजामवजिर:—मशिरुन्उलमुल्ख—ज्याच्या अवभाषणानें खर्ड्यांची लढाई जाहली. वारुणी:—दारू, मद्य.

प्र. ५९

पाथेय:—प्रवासांतील फराळाचें सामान. पटांत:— वस्त्रांत. कलाप:—समुदाय. पारंगतत्व यश:—परिपूर्णज्ञानप्राप्तीपासून होणारी कीर्ति. दुराप:—दुर्लभ. कमला:—लक्ष्मी, संपत्ति. विबुध:—विद्वज्जन. ग्रंथावलोकनविकस्वररूप:—पुष्कळ ग्रंथांचे वाचनानें विकास पावलेली. तरुखंड:—झाडांचा समुदाय. कठिन रज्जूसमान सार:—दोरखंडाप्रमाणें बळकट. अभ्यासवर्ती:—जवळ असलेल्या. कांतार:—अरण्य. संचरण:—चालणें. कीकस:—हाड. अभ्यस्त:—अभ्यास केलेलें. कंकाल:—सांपळा. श्लोक १३ ओळ ३ आस्ति याबद्दल अस्थि वाचावें. बाढतर:—अधीक मोठी. हर्यक्ष:—सिंह. केकी:—मोर. घटा:—समुदाय. वात्या:—वादळ. रथ:—वेग. धृति:—धैर्य. विलोचन:—डोळे. अध्वनीन:—प्रवासी.

**प्र. ६३.**

अबलरक्षण हें बलकार्यगे:—दुर्बल जीवांचें परिरक्षण करणें हाच शक्तीचा उपयोग होय. सृजिलीं:—निर्माण केलीं. झषीं:—माशांनीं.

प्र. ६४

निशापति:—चंद्र. सुरोपवनसाम्य:—नंदनवनाची योग्यता. क्ष्मा:—पृथ्वी. सुधास्यन्दन:—अमृतवृष्टी. लास:—दु:ख. ( झोंबणारें ) तरी:—नौका. मनोरुजावर्त:—अंत:करणस्थ दु:खरूपीं भोवरा. रसा:—पृथ्वी. संहति:—भुंग्याची झुंड. कंज:—कमल. चित्कळा:—प्राण. शिरोरुह:—

केस. निर्वापणा:—प्रेतसंस्कार. अघनग:—अत्यंत पापी मनुष्य. सुपुति:—झोंप. क्षतें:—घाय, जखमा.

प्र. ६६.

दंडधर:—मम. कविराय:—कालिदास ( मरणंप्रकृतिः शरीरिणाम्. ) परिपाक:—पूर्णविकास. धवलगिरी:—हिमालयपर्वत. कलेवर:—शरीर. अवडंबर:—मोकळ डौल. वरकांती मयका. रहस्यस्फोट:—गूढ गोष्टीचें स्पष्टीकरण.

प्र. ६७.

वासवचापलिला:—इंद्रधनुष्याची शोभा. पयोधर:—मेघ पक्षीं स्तन.

प्र. ६८

दीनावनीं:—दुर्बलाचें रक्षण करण्यांत. श्लोक ५ ओळ ४ वरिसि " वरिसी " असें वाचावें. श्लोक ३ ओळ २ दिनावनीं. " दीनावनीं " असे वावाचावें. श्लोक ४ ओळ २ जगादिशें " जगदीशें " असें वाचावें. श्लोक ४ ओळ ३ मानवा " मानव " असें वाचावें. श्लोक ४ ओळ ४ पुरति " पुरती " असें वाचावें. श्लोक ६ ओळ ४ सांगा " सांग " असें वाचावें.

प्र. ६९

तो पावला भास्कर अन्य लोकीं:—सूर्य मावळला. लाभे न वास स्थिर संपदाना:—संपत्तीचें अस्थिरत्व नित्य सिद्ध आहे.

प्र. ६९

सुरवरपदस्थ:—इंद्रपदस्थ. अकलंका:—निष्पापा. पंकजाक्ष—कमलाक्ष. हीनभूपाल—क्षत्रियविरहीत. क्रतु—यज्ञ. वरुणालय—सागर. श्रभिवभालस्थ—श्रीशंकराच्या मस्तकावर असणारा. अग्निवर्ण—रघुवंशांतील एक राजा होय. नरसुत—अभिमन्यु. निरागास—निरपराधास.

प्र. ७०

संजीविका:—जीवन देणारी. अंगार:—निखारे. अंभोद:—मेघ.

प्र. ७१

भंगुरता:—क्षणिकता. लीन:—नाहींसा.

प्र. ७३

वीथ्या:—रस्ता. कौमुदी:—चंद्रप्रकाश. हरिन्मणि:—पाच. सप्तभूमिक:—सात मजली. सोपानपरंपरा:—जिन्यांची रांग.

प्र. ७६

क्षुद्बोध:—भुकेची जागृति. निर्झर:–झरा. क्षुद्विकला:–भुकेलेल्यास. अतनुध्वनि:—अशरीरिणीवाणी. नाक:—स्वर्ग. भूदेव:—ब्राह्मण.

प्र. ७७

नोर:—नौकेचें भाडें. जंगमबंदिशाळा:—चालणारा तुरुंग. निष्क्रिय:—कामावांचून. अभ्रें:—ढगें. रत्नाकर:—समुद्र. समीर:—वारा. वीचिहस्त:—लाटा हेच हात. अमोघ:—कधींही फुकट न जाणारा. धनाधिनाथ:—कुबेर.

प्र. ७८

निर्व्याज:—निष्कपट. होन:—साडेतीन रुपयांचें एक नाणें होतें. लवण:—खारट. वडवाग्निवासभाजन:—वडवाग्नीचें रहाण्याचें ठिकाण. क्ष्वेड:—विष.

प्र. ७९

संयम:—मनोनिग्रह.

प्र. ८४

असकृत्:–वारंवार. स्वादिष्टान्नसुभोज:—गोड अन्न पुष्कळ खाणारा. तारस्वरें:—उच्च शब्दानें. विधि:—दैव. ओदन:—शिजविलेला भात. सुवर्तिका:—चांगली वात. किसलयकरां:—नूतन पल्लवरूपी हस्त.

प्र. ८५

कामनापूर्ति:—मनोरथसिद्धि. तरणि:—सूर्य. अमृतानुभव:—अमृतराय कवीनें लिहिलेला एक वेदांतपर ग्रंथ. संसृतितरंगिणी:—भवनदी. त्रिभुवनमहिताशिवमहीनाथगुरु:—त्रिभुवनामध्यें पूज्य असा जो शिवाजी राजा त्याचे गुरु. आर्या १४ ओळ १ काव्यदेवीच्या गळ्यांत जो कविरत्नाचा हार आहे त्या हारांतील मध्यमणि; म्हणजे कवीमध्यें श्रेष्ठ. घ्राण :—नाक. महीसुर:—ब्राह्मण. कुळप्रतिष्ठा:—कुळाला मोठेपणा किंवा कुळाला स्थैर्य यावें

म्हणून. विषण्णमुखी:—जिचा चेहरा दु:खित झाला आहे अशी. पराङ्मुख:—पाठमोरे. सर्वंकषनियति:—सर्वांवर सत्ता गाजविणारें दैव. क्षीराब्धिवास—विष्णु.

प्र. ८७

कराप्तकनकें:—खंडणी म्हणून मिळालेलें सोनें. श्लोक १० ओळ २ 'हीनवर्ग' याबद्दल 'हीनगर्व' असें वाचावें.

प्र. ८७

काछी:—फळें विकणारा. समुद्रकन्या:—लक्ष्मी.

प्र. ९०

कलानिधी:—चंद्र. कामुकजनमानसप्रमोदी:—विषयलंपट जनांच्या मनाला आल्हाद देणारा. जीवितपतिसदनमार्गदर्शी:—पतीच्या गृहाचा मार्ग दाखविणारी.

प्र. ९२

पीयूषरसीं:—अमृतरसीं. तोक:—मूल. आर्या ९ ओळ २ 'लाजाविली' याबद्दल लाजवील' असें वाचावें. आर्या १० ओळ १ 'धमी' याबद्दल यमी असें वाचावें. यमी:—मनोनिग्रह करणारा.

प्र. ९३

श्लोक २ ओळ १ ली 'जनतिला' याबद्दल 'जननिला' असें वाचावें. विचक्षण:—शहाणा, मार्मिक. रामा:—स्त्रीस. रामा:—रामचंद्रास. विमुक्तभृंग:—हें 'कुंद' याचें विशेषण. उडून गेलेले आहेत भुंगे ज्यावरून. नलिन:—कमळ. श्लोक ११ ओ. १ 'पायद' या ऐवजीं 'पादप' असें वाचावें. पतंग:—सूर्य.

प्र. ९४

झपूरझा:—या नांवाची एक लहानशी कविता आहे. विशद:—स्पष्ट.

प्र. ९५

पुढील पदांत कवि काव्यदेवीच्या प्राप्तीसाठीं अतोनात खटपट करीत आहे परंतु ती त्यास प्राप्त झाली नाहीं तेव्हा अगदीं निकडीवर येऊन पुढील उद्गार काढीत आहे. आढ्य:—वैभवसंपन्न.

प्र. ९६

अबुधः--मूर्ख, अज्ञान. सत्रें:--अन्नछत्रें.

प्र. ९७

प्रसूः—आई. धैर्यप्रदीपकः—धैर्य वाढविणाऱ्या. मृदुलस्वनानें:—गोड शब्दानें.

प्र. ९८

साक्षरवर्गातले:—शिक्षित लोकांतले. कलानिधिः--कलाकुसरीचीं कामें करणारे. सिद्धांत वाक्यः--अमोघवाणी. समाधिः—चित्ताचें एकाग्र्य व स्थैर्य.

प्र. १०५

कटुकंटककल्पनाः—वेचव व कांट्याप्रमाणें मनाला वोंचणाऱ्या कल्पना. प्रसवतुल्यद्दिसोसुनिवेदनाः—जे विचार मनांत आले ते कवितेंत शद्बांनीं व्यक्त करून दाखविण्यास अत्यंत श्रम पडतात ते श्रम सहन करून. वासुकीः—एक सर्प आहे. विषमः—संकट. द्रुतविलंबितः—सत्वर व सावकाश. मित्र आजारी आहे म्हणून अत्यंत घाईनें त्याला भेटण्यास निघालों परंतु ही उद्वेगजनक बातमी ऐकून पाय भराभर उठत ना म्हणून सत्वर व सावकाश अशा रीतीनें.

प्र. १०७

वामाकुलोत्तमाः---स्त्रीजातीमध्यें श्रेष्ठ. वारिवाहः--मेघ. विरूपाक्ष म्हणजे शंकर. प्रमिलाः---सुलोचना.

प्र. ११०

त्रपाः---लज्जा. द्रविणः--द्रव्य. दमघोषभूमीपतिः--शिशुपाल.

प्र. ११२

बंगई:--झोपाळा. सुरपदीं:---स्वर्गीं.

प्र. ११३

विटपीं: --खांद्यांवर, शाखांवर.

प्र. ११४

स्वमदद्रर्शनः--आपल्या गर्वाचें आविष्करण.

प्र. ११५.

" मनुष्याच्या मनगटांतील जोर हाच त्याचा खरा व विश्वासू मित्र होय." हा अर्थ या प्रकरणांत कवीनें ध्वनित केला आहे.

प्र. ११६

या प्रकरणांतील संक्रांतीची भेट कवीनें केरळकोकीळ मासिक पुस्तकास दिलेली आहे. पिका:--केरळकोकिळा. गताब्दीं:—गेल्यावर्षी. प्रेमोदधी:-प्रेमाचा सागर. शाहू नृपास:—सध्या कोल्हापूरचे गादीवर असलेल्या महाराजांस. वितरावयाया:-हा शब्द 'वितरावया या ' असा वाचावा. वैखरी:—वाणी. खरता:—क्रौर्य.

प्र. ११७

पुरुषसाम्यार्ती:—पुरुषांची बरोबरी करण्याची उत्कट इच्छा. विषमता:-वैषम्य, वितुष्ट.

प्र. ११८

बाजी:—इतिहासप्रसिद्ध पहिला बाजीराव. जित्वर:--विजयशाली. श्लो.-४ " दुष्यंत " या ऐवजीं " दुष्यांत " असें वाचावें-अर्थ=तंबूत. जवनिकांतस्थयवनीजन:—पडद्याच्या आंत बसलेल्या निजामाच्या स्त्रीया. द्युतिमत्तर:-अत्यंत तेजस्वी.

प्र.११९

जनता:—लोकसमुदाय. अघ:—पाप. अकिंचन:—भिकारी. सुरनाथ:-यमधर्म. धर्मे:—यमधर्मानें. महिला:—पृथ्वीला. महिला:--स्त्री.

प्र. १२०

शिलंगण:--सीमोल्लंघन. शिबिका:--डोली. अश्मंत:—आपटा ( वृक्ष ) अजा:—आजा.

प्र. १२१

श्लो. १ ओळ २ " आजाणता " बद्दल " अजाणता " असें वाचावें. रजत:—रुपें. क्षयविवर्धना:—क्षयवृद्धीस. शर्मिले:—सुख पावले.

प्र. १२२

निमाली:—मावळली, नाहींशी झाली, नष्ट झाली. भवन:—घर. या प्रकरणांतील कविता प्रसिद्ध " विनायक " कवीची आहे.

प्र. १२४

या प्रकरणांतील प्रत्येक आर्येत यथास्थळीं " तो मूर्ख " हें अध्याहृत घ्यावें. द्रव्यार्जनदक्ष:—संपत्ति मिळविण्यांत चूर झालेला. पाणिग्रह:—लग्न.

प्र. १२५

मात: —गोष्ट. उदधि भरती येवोनि गगन मोजी:—सागराला भरती आली म्हणजे त्याच्या लाटा आकाशांत वर उंच उसळतात; त्या जणूं आकाशाची उंची किती आहे याचें गणितच करीत आहेत असा कवीचा आशय आहे.

प्र. १२६

प्र. १२३ ( १२६ ) श्लोक. १ ओळ ३।४ " प्रत्यक्षप्रमाण किंवा युक्तिवाद यांहीं करून जी गोष्ट सिद्ध करून दाखवितां येत नाहीं, ती केवळ श्रद्धेनें किंवा भावानें खरी मानून घेणें हा मार्ग हितप्रद नव्हे का? " असा कवीचा आशय दिसतो. सृजियलें:—निर्माण केलें. शंवहें:—हितकर्त्यानें. रजीं:—धुळींत. जनि:—जन्म. श्लोक ४ ओळ २ " पया " याबद्दल " दया " वाचावें. श्लोक ५ ओळ ३।४ " या सृष्टींतील सर्व जीव हे एका परमात्म्याचेच अंश होत, ते त्यापासूनच उत्पन्न होतात व शेवटीं त्याचे ठाईं लय पावतात. परमात्मा हा सूर्य होय व जीव हे त्याचे किरण होत " असा कवीचा भाव. विनटतोंच एकापिसें:—एका पिसानेंच आम्ही मोर होतों.

प्र. १२८

अतथ्यवादी:—खोटें बोलणारा. वत्सर:—वर्षे. अक्षकील:—आसांचा खिळा. अरिंदम:—शत्रूला जिंकणारा.

प्र. १३०

ह्या प्रकरणामध्यें कवीनें सत्ययुगाचा सुखाचा काल सकल जगतीतलावरून नाहींसा होऊन त्याचे ठिकाणीं कलियुगाचा दु:खदकाल आला याबद्दल आपला शोक निर्दिष्ट केला आहे.

प्र. १३२

या प्रकरणांत कवीनें आयुष्यांतील बाल्य, तारुण्य व वार्धक्य या तीन अवस्था व बाल्यावस्थेंतील निष्पाप बुद्धि, तारुण्यांतील पापप्रवृत्ति व वार्धक्यांतील पश्चात्ताप यांचें अन्योक्तिरूपानें वर्णन केलें आहे. उदधिः—समुद्र, हा नदीचा पती, असा नेहमींचा कवि संप्रदाय आहे; परंतु या ठिकाणीं तो तिचा काळ कल्पिलेला आहे.

प्र. १३३

ओळ ३ ठेविति या शब्दापुढें " तमाखु " शब्द वाचावा.

प्र. १३५

तुहिनसंततीः—बर्फाची रास. नगराजपदाश्रयाः—पर्वतांचा राजा ही-पदवी धारण करणारा. त्रिभुवन—चयाः—ज्याचें शुद्ध यश तीन जगां मध्यें माहित आहे अशा. अदितिजांः—देवांस. दितिजांः—असुरांस. कुतल—निकेतना—पृथ्वीतलावर कौतुक वाटण्यासारखे जे पदार्थ आहेत त्यांचें विलास-मंदिर. शिवसतीः— पार्वती. केतनः—गृह. खर—साधनाः—खडतर तपश्चर्या व कडकडीत व्रतें करण्यास सोईचें ठिकाण. शुभ—तपोधनाः—ज्याच्या सुंदर अरण्यामध्यें शांतदांत असे तपस्वी वास करीत आहेत अशा. सवयस्यः—मित्रासह ( पराशर ). नगः—पर्वत. गवराजधराश्रयः—गवराजधर ( शंकर ) याचें वसती स्थान. गिरिगताः—पर्वतावरील. सुषमाः—उत्कृष्टशोभा. श्लो. ५ ओळ १ विदित ( विश्रुत ) वर्ण ( कीर्ती ) असा नग ( पर्वत ) त्याचें उचित ( यथायोग्य ) वर्णना ( वर्णन करण्यास ) ओळ २ वर्णनगो ( वर्णनपरभाषा ) तीमध्यें चित ( समाविष्ट झालेले ) वर्ण ( अक्षरें ) विदितना ( माहित नाहींत ) भावार्थः—सर्वविश्रुत असा जो हिमालय पर्वत त्याचें हुबेहुब वर्णन करण्यास वर्णनपर भाषेमध्यें उपलब्ध असलेले वर्ण पुरेसे होत नाहींत. ( अवर्णनीय आहे ) रसवारितः—रसानेंवियुक्त ( नीरस ) प्रतिपदींः—पावलोपावलीं. तिमिरास्पदाः—काळोखाचे ठिकाण. सवनेचराः —किरात ( कातकरी ) जींत रहातात अशी. वनभूः—वन ( पाणी )

भू ( जमीन ) पाणथळ जमीनी यांनीं युक्त अशी अरण्यभूमीची परंपरा-
सरल:—देवदारू ( देवदार ) साल:—वृक्षविशेष रसाल:—आम्रवृक्ष.
खगपालिका:—पक्षांचेपालन करणारी. पवनपा:—वायूभक्षण करणारी. विबुध-
वास:—स्वर्ग. खवनदेवन:—अकाश रूपी अरण्य त्याला उज्वलित ( सुशोभित
करणारे. देवपदीं:—स्वर्गीं सुम:—फुलें. भगण:—नक्षत्रसमुदाय सरस:—उ-
त्सुक. अचलोन्नति:—पर्वताची उंची. द्रुवर:—मोठेवृक्ष, द्रुमे—वृक्ष. शुभ-
पत्रफला—सुंदर फळें व पानें आहेत जींचीं अशी. व्रततिसंतति—लतांची मा-
लिका. विटप—शाखा अहति—( माघार न घेणें ) इष्टसिद्धि. संहति एकी
तिच्याशीं सयुक्त. दल—पानें खघनोदरिंच्या—आकाशांतील मेघामधिल
क्षितिमेघ-- भूतलावरील मेघ जलद—मेघ, गर्जित—गडगडणें वनतर्जना--अर-
ण्यदणाणवून सोडणारी. मुग्घ-भोळे वितथ-खटें, अवितथ ( खरें ) जडधी--मूर्ख
श्लो. १७ या श्लोकांत वाघ व श्रीकृष्णयांचें साम्य श्लेषगर्भोपमेच्या द्वारें दा. आहे.
चार=चेष्टा. गोकुळीं=धेनुच्या समुदायांत पक्षीं गोकुळांत. विकृती—( या-
ऐवजीं विहृती वाचावें. ) विहृती=विहार रास—ओरडणें पक्षीं रास
क्रीडा श्लो. १८ यांत कवि व वृक ( लांडगा ) यांचें साम्य दर्शविलें आहे
सत्वपरिग्रहा—भक्ष्यश्वापदें धरण्यासाठीं पक्षीं काव्यांत उत्तमपणा साधण्यासाठीं
पदक्रम—उड्या पक्षीं शब्दरचना—श्लोक १९ यांत वराह—( डुकर ) व
ज्योतिः शास्त्रवेत्ता वराहमिहिर यांची तुलना आहे. वेधविधि—जमिनींत
भोकें पाडण्याची क्रिया पक्षीं ग्रहांचे वेध घेण्याचे व्यवसाय. उडू—पाणी
पक्षीं नक्षत्रें. श्लोक.२० यांत तरस व कुकवि यांची तुलना केलेली आहे.
वर्ण—रंग पक्षीं अक्षरें विकलता—न्यूनपणा विषाण—शिंगें शोणित—लाल
असित—कृष्ण, काळें लोहित—तांबडें चटुला—चपळ विकट— मोठा
रवि- तीव्रमहोमदा- रवीच्या प्रखर तेजाचा गर्व. यवसजाल—गवत. निशृंखल:-
अनावर. गराग्नि विषापासून उत्पन्न झालेला अग्नि. रवि—चया-- सूर्याच्या
किरणांनीं सारविलेला आहे शिरोभागस्थित पर्णसमुच्चय जिचा. रजनि--संशय

दिवस आणि रात्र एकाच वेळीं एका ठिकाणीं नांदत आहेत असा संशय. कृततमा—अंधःकार पाडणारी. स्वपरतापरता—स्वतांस होणारा दुःसह ताप सहन करणारी. श्रुतिसेविनी—वेदाप्रमाणें चालणारी. स्व–पर–ताऽपरता—आपपरभाव जिला नाहीं अशी. हवनीं—यज्ञांत. बळी—आहुती. श्लो. २८ ओळ १ ली. शेंकडों सुंदर इंद्रधनुष्यें ज्यावर आहेत असा. अमिताक्ष—संख्यातीत अक्ष नावाचे वृक्ष ज्यावर आहेत असा. पविकरा—इंद्राला. विकराल—जबरदस्त, भयंकर. श्लोक ३० यांत भवर ( चंद्र ) व भूधर ( पर्वत ) हिमालय यांचा ऐक्यभाव कल्पिला आहे. पादः—किरण, पक्षीं पर्वताच्या पायथ्याशीं असणाऱ्या लहान लहान टेंकड्या. जनिः—जन्म. मतिकांतः—मनाला आवडणाऱ्या-राजतः—रुपें. खनिजताः—खनिज द्रव्यांची संपत्ती. श्रमजलः—घर्म, घाम. जळरुहसुताः—नद्या. नवरीतिः—नवीन प्रकारची. सुकरामतः—चांगली करामत. अदरः—भयरहित. रहितावधिः—निस्सीम. शिखरीशः—पर्वतश्रेष्ठ. ससारससार्थः—हंस समुदायांनीं युक्त. पांडुरः—पांढरी. तरंगः—लाटा. खरंगनटप्रभूः—आकाशरुपी रंगभूमीवर नृत्य करणारे नर्तकश्रेष्ठ. अपरतीः—रुचिहीन. सुरालयः—स्वर्ग. अहिपतिः—शेष. सुविधिनेंः—सुदैवानें. विधिनेंः—ब्रह्मदेवानें. श्लोक ४८ वा कांताऽऽरवाः—मधुर शब्द करणारी. सरसदानकरीः—सुगंध युक्त दान करणारी म्ह० कस्तुरी देणारी. कांतारवासरसदाः—अरण्यामध्यें राहण्याची गोडी उत्पन्न करणारी. धृतभृंगमाराः—भ्रमरांचें समुदाय धारण केले आहेत जिनें अशी. श्लोक ४९ वा वनवशा गजराजः—रानटी हत्ती व हत्तिणी. राजी व सेवनवशाः—कमलांचें सेवन करायामध्यें तत्पर. श्लोक ५२ ओळ ३ धरायामहतीस मान पृथ्वीचे विस्ताराचा भार त्यास मान ( माप ) मानभूत धराधर ( शेष ).

कृ. पां. लिमये व कृ. गो. किनरेकृत

## वाचनपाठमाला भाग १ ला.

मराठी भाषेंतील कसलेल्या व नामांकित लेखकांच्या सर्वमान्य ग्रंथांतून विविध विषयांवरील निवडक, सुंदर, विचारपरिप्लुत, मनोरंजक व वाचनाची अभिरुचि उत्पन्न करणारे असे रसभरित उतारे काढून त्यांचा या अंतर्बाह्य मोहक पुस्तकांत संग्रह केला आहे. हें पुस्तक इंग्रजी ६ व ७ व्या इयत्तेंतील विद्यार्थ्यांना गद्य वाचन पुस्तक म्हणून जरी विशेषतः तयार केलें आहे, तरी यांतील विचारांच्या थोरपणामुळें तें विद्वान् व मोठ्या लोकांसही वाचनीय झालें आहे. यांतील एकेक उतारा वाचला म्हणजे ज्या पुस्तकांतून तो उतारा घेतला [illegible] तें पुस्तक वाचावें अशी मनाला साहजिक स्फूर्ति उत्पन्न होते. महाराष्ट्रांतील लोकमान्य वर्तमानपत्रकारांचे व मासिक पुस्तककर्त्यांचे अभिप्राय फारच अनुकूल. अशा प्रकारचें मराठींत एवढें मोठें पुस्तक हें पहिलेंच. बांधणी कापडी, सुंदर व मजबूत. पृ. संख्या ३ [illegible] किं. १ रुपया ट. हा. निराळें.

## वाचनपाठमाला भाग २ रा.

इंग्रजी ४ व ५ इयत्तेंतील मुलांकरितां गद्यवाचनपुस्तक हल्लीं तयार होत आहे. मांडणी व रचना पहिल्या भागाप्रमाणेंच. विविध विषयांवरील सोप्या भाषेंत लिहिलेल्या बऱ्याच निबंधांचा यांत मुद्दाम संग्रह असून इतर उतारेही विविध असून फारच मासलेदार आहेत.

पुस्तकें मिळण्याचीं ठिकाणें.

मुंबई—चित्रशाळा दुकान काळका देवी रस्ता.

पुणें—म्यानेजर चित्रशाळा